गांधी-स्मारक-निधि ( महाराष्ट्र शाखा )

# गांधी विचार दर्शन



९६६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ९३०८

## सत्याग्रह-विचार

REFBK-0010864

४

गांधी वाङ्मय प्रकाशन समिति

गांधी विचार दर्शन : खंड चौथा

# सत्याग्रह-विचार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८१५९ वि: शिवं धा
क्रमांक ९३० नों: दि: १-५-२५

☆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १०८६४

REFBK-0010864

गांधी स्मारक निधि ( महाराष्ट्र शाखा ) अंतर्गत

**गांधी वाङ्मय प्रकाशन समिति**

मूल्य : रु. २·५०

प्रथमावृत्ति : २४ डिसेंबर १९६०

प्रकाशक : शंकरराव देव, अध्यक्ष, गांधी वाङ्मय प्रकाशन समिति (महाराष्ट्र), १२४२ सदाशिव, विद्यापीठ वाडा, पुणें २.

मुद्रक : रा. ना. सरनाईक, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार, पुणें २.



# निवेदन

गांधीजींचे जीवनविचार भारतीय, किंबहुना अखिल मानवी जीवन समृद्ध करणारे आहेत अशी आमची श्रद्धा आहे, कारण त्या विचारांना सत्याच्या वा सद्‌वस्तूच्या शोधांतून प्रेरणा मिळालेली आहे. याच कारणानें हे जीवनविषयक विचार ज्या शब्दांत मांडले गेले आहेत ते 'अ–क्षर वाङ्मय' आहे.

गांधीजींचे लेख व भाषणें यांच्यामागें ही सत्यशोधनाची प्रेरक शक्ति असल्यामुळें त्यांच्यांत आणखी असा एक गुण आहे कीं त्यांचा संसारी, सेवक व साधक अशा सर्वांना सर्व काळीं स्वतःच्या जीवनांत मार्गदर्शन होण्यासाठीं उपयोग आहे.

गांधीजींच्या जीवन-विचारांत संसार, समाजसेवा आणि आध्यात्मिक साधना यांच्यामध्यें वेगळेपणा किंवा विरोध नव्हता, कारण त्यांच्या जीवनांत या तिहींचा पवित्र संगम झालेला होता. सत्य, अहिंसा, अस्तेय आदि पांच यम वा महान् तत्त्वें आणि इतर लहानसान नियम अथवा व्रतें यांची व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं जरुरी आहे अशी या देशांत प्राचीन काळापासून समजूत आहे. परंतु व्यवहार अथवा समाजसेवा मोक्षदायी करण्यासाठींसुद्धां यम-नियमांची जरुरी आहे ही गोष्ट प्रथम गांधींजींनीं लोकांपुढें मांडली व आचरून दाखविली. याचा परिणाम असा झाला आहे कीं व्याख्यानें, पत्रें व लेख यांच्या रूपानें गांधीजींच्या हातून जें उदंड वाङ्मय निर्माण झालें आहे त्याचा सर्व क्षेत्रांतील आणि वर्गांतील अगदीं सामान्यापासून अ-सामान्यापर्यंत सर्वांना प्रत्यक्ष आचरणाला मार्गदर्शक या दृष्टीनें उपयोग होत आहे. वाल्या कोळ्याचा जसा वाल्मीकि ऋषि झाला तसे या यम-नियमांच्या अखंड व जागरूक पालनानें एकाच जन्मांत 'मोहनदास करमचंद गांधी' हे 'महात्मा' झाले हा अद्‌भुत पुरुषार्थ साऱ्या जगानें पाहिला आहे.

गांधीजींचें जीवनकार्य पुढें चालविण्यासाठीं १९४९ सालीं 'गांधी

स्मारक निधीची ' स्थापना झालेली आहे. त्या निधीच्या उद्दिष्टांत गांधीजींच्या विचाराचा प्रचार देशांतील सर्व भाषांत व देशाबाहेरहि करणें हें एक उद्दिष्ट आहे. त्याच्या सिद्धीसाठीं निरनिराळ्या भाषिक प्रदेशाकरितां निधीनें वाङ्मय-प्रकाशन-समित्या स्थापन करण्याचा उपक्रम केला आहे. आतांपर्यंत कानडी, तामीळ, मल्याळम् या भाषांच्या प्रदेशाकरितां अशा समित्या स्थापन झाल्या आहेत व त्यांच्यातर्फे क्रमशः खंडरूपानें गांधी-वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. त्याचप्रमाणें मराठी भाषिक प्रदेशाकरितां निधीनें १९५८ सालच्या जुलै महिन्यांत ' गांधी वाङ्मय प्रकाशन समिति ' स्थापन केली. या समितीच्या कामाला रीतसर सुरुवात १९५९ च्या जानेवारी महिन्यापासून झाली आहे.

समितीनें ' गांधी विचार-दर्शन ' या नांवानें गांधीजींचें निवडक वाङ्मय विषयवारीनें वीस ते पंचवीस खंडांत प्रसिद्ध करण्याची योजना तयार केली आहे. त्यांत ( १ ) सत्याग्रह ( २ ) धर्म ( ३ ) अर्थकारण ( ४ ) शिक्षण ( ५ ) जातीय ऐक्य ( ६ ) सर्वोदयी समाजरचना इत्यादि विषय येणार आहेत. गांधीजींची जीवन-निष्ठा व जीवन-मूल्यें ज्यांत नमूद झालीं आहेत असे तीन खंड यापूर्वीं १९५९ सालच्या डिसेंबर महिन्यांत प्रसिद्ध झाले आहेत. आतां या वर्षीं चौथा, पांचवा व सहावा हे खंड प्रसिद्ध करतांना आम्हांस आनंद होत आहे.

यांपैकीं ' सत्याग्रह-विचार ' या चौथ्या खंडांत गांधीजींचें सत्याग्रहासंबंधींचे सर्व महत्त्वाचे विचार विषयवारीनें एकत्र करण्याचा प्रयत्न केला आहे. सत्य आणि सत्यमय जीवन, अहिंसेची सत्याग्रहांत अपरिहार्यता, अन्यायनिवारणार्थ सुसंस्कृत मानवसमाजापाशीं सत्याग्रह हा एकमेव उपाय, सत्याग्रही कोण होऊं शकतो, सत्याग्रहाचीं पथ्यें, सत्याग्रहाचे निरनिराळे प्रकार, निःशस्त्र प्रतिकार व सत्याग्रह यांतील मूलभूत भेद, भ्याडपणाशीं सत्याग्रहाचा विरोध, शत्रूच्या आक्रमणालासुद्धां सत्याग्रहानें कसें लढतां येतें, सामाजिक क्षेत्रांत सत्याग्रह कसा अमलांत आणावा, इत्यादि सत्याग्रहासंबंधींचें सर्व विवेचन या पुस्तकांत आलेलें आहे. गांधीजी भ्याडपणापेक्षां हिंसासुद्धां कां मान्य करीत होते याविषयीं स्पष्टता करणारीं आजवर मराठींत अप्रसिद्ध असलेलीं गांधीजींचीं पत्रेंहि या पुस्तकाच्या परिशिष्टांत

घेण्यांत आलीं आहेत. त्यांवरुन गांधीजींची अहिंसानिष्ठा शूराची कशी होती हें विशद होण्याला मदत होते.

हा खंड तयार करतांना ज्या अनेक ग्रंथांचा आधार घेतला त्यांची यादी संदर्भग्रंथावलि व प्रत्येक उताऱ्याचा संदर्भ दाखविणारी संदर्भसूचि या पुस्तकाला जोडली आहे. अभ्यासू वाचकांच्या दृष्टीनें या दोन गोष्टी फार उपयुक्त होतील अशी आम्ही उमेद बाळगतों. पुस्तकांच्या यादीवरून कळून येईल कीं आजवर सत्याग्रहासंबंधीं जें जें गांधीजींचें मत लिखित स्वरूपांत व त्यांच्या बोलण्यांत अधिकृत म्हणून इतस्ततः विखुरलेलें होतें तें तें सर्व या पुस्तकांत पद्धतशीरपणें एकत्र करण्यांत आलें आहे. बहुशः महत्त्वाचा असा एकहि अधिकृत विचार–मग तो त्यांच्या लेखांतून असो, व्याख्यानांतून असो, खासगी बोलण्यांतून किंवा पत्रांतून असो वा मुलाखतींतून असो–असा नसावा कीं जो या पुस्तकांतून सुटला आहे. त्या दृष्टीनें हा ग्रंथ अद्यतन व प्रायः पूर्ण असा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सत्याग्रहाच्या कोणत्याहि बारीक तपशीलासंबंधींचासुद्धां गांधीजींचा विचार या पुस्तकांत संग्रहीत करण्याचा प्रयत्न केलेला आढळून येईल.

सत्याग्रहाचें एक शास्त्र आहे, पण इतर भौतिक शास्त्रांप्रमाणेंच कधींहि पूर्ण बनूं शकत नाहीं असें तें शास्त्र आहे असें गांधीजींनींच म्हटलें आहे. परंतु त्याचें एक शास्त्र बनविण्याच्या हेतूनेंच गांधीजी आपल्या सर्व हालचाली करीत होते, बोलत होते, लिहीत होते; मानवसमाजांतील लहान-मोठे प्रश्न अहिंसेच्या साधनानें म्हणजे सत्याग्रहानेंच सुटूं शकतात आणि सत्याग्रह हें एक वर्धिष्णु शास्त्र आहे हें गांधीजींना आपल्या आयुष्यांत सिद्ध करावयाचें होते. या ग्रंथानें तें शास्त्रच वाचकांच्या हातीं देण्याचा नम्र प्रयत्न आहे.

आज गांधीजींच्या मृत्यूनंतर समाजांत ज्या ज्या चळवळी सत्याग्रहाच्या नांवानें केल्या जात आहेत त्या गांधीजींच्या कसोटीवर घासून पहावयाच्या असतील तर हा ग्रंथ त्याकरितां उपयोगी पडावा अशी आमची अपेक्षा आहे.

—शंकरराव देव

# विषयानुक्रमानें ग्रंथ-परिचय

**गांधीजींची विज्ञापना— पृष्ठ अठरा.**

**सत्याग्रहाचें शास्त्र— पृ. वीस ते बावीस.**

चालू क्षणीं सत्यार्थी मी सुसंगत, पृ. वीस, –म्हणून माझें अगदी ताजें मत ग्राह्य मानावें, पृ. वीस, –माझें सत्याग्रहाचें ज्ञान वाढतें, पृ. वीस, माझें सत्य कदाचित् सत्य नसेलहि, पृ, एकवीस –सत्य-अहिंसेचा प्रचार ग्रंथापेक्षां आचारानें अधिक, पृ. एकवीस, –माझा सल्ला बुद्धीला व हृदयाला न पटला तर मानूं नये, पृ. बावीस, –अहिंसा-शास्त्राचा मी फक्त एक शोधक, पृ. बावीस.

**प्रकरण १–सत्य हेंच जीवनाचें अंतिम साध्य, पृ. १ ते ४**

सत्याची व्याख्या, पृ. १ –पूर्ण सत्याचा साक्षात्कार या देहीं अशक्य, पृ. १ –सत्यरूपी परमेश्वराचा मी शोधक, त्यासाठीं नम्रता अवश्य, पृ १ –स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव म्हणजे नम्रता, पृ. २ –' ईश्वर हा सत्य ' ऐवजीं ' सत्य हेंच ईश्वर ', पृ. २ –मूलभूत सत्यें व मानलेलीं सत्यें, आणि खरें व खोटें पृ. २-३ –मानलेल्या सत्याची आराधना शुद्ध सत्याकडे नेते, पृ. ३ –जीवनाच्या प्रवृत्तीचें मूळ एकच, पृ. ३ – निरासक्तालाच सत्य-दर्शन शक्य, पृ. ३ –आपण आहों तसेंच दिसावें, पृ. ४

**प्रकरण २– सत्य हाच परमेश्वर, पृ. ५ ते १०**

सत्यरूपी परमेश्वर व त्याचा कायदा एकरूपच, पृ. ५ –' सत्य हेंच परमेश्वर ' व ' परमेश्वर सत्य आहे ' यांतील फरक, पृ. ५, ६, ७ –सत्य म्हणजे अंतरात्मा सांगतो तें; अंतरात्म्याचा आवाज ऐकूं शकण्याला व्रतपालन आवश्यक, पृ. ९-१०

**प्रकरण ३—सत्यमय जीवन, पृ. ११ ते १५**

मनुष्यजन्म सत्याप्रीत्यर्थ, पृ. ११—विचार–उच्चार-आचारांतलें सत्य तेंच सत्यपालन, तें व्यक्तिगणिक भिन्न असलें तरी अंतीं एक–

पृ. ११–सत्याचारामुळें पश्चात्तापाची पाळी येत नाहीं, पृ. १२– सत्याचरणाकरितां ग्रंथाध्ययन आवश्यक नाहीं, पृ. १२–सत्यशोधक कधींच असत्य बोलणार नाहीं, पृ. १२, १३–सत्याचारांतच कर्मप्रवृत्ति येते, पृ. १३–सत्योपासनेकरितां वैराग्य आवश्यक, पृ. १४–चालू क्षणांतील सत्याशीं जो प्रामाणिक त्याचें जीवन सुसंगत, पृ. १४–सत्याचरणांत सहिष्णुता आवश्यक, पृ. १४–सत्याच्या उपासकाला मौनसाधना व मितभाषीपणा अवश्य, पृ. १४, १५–मौन म्हणजे गुप्तता नव्हे, पृ. १५–सत्याविरहित सौंदर्याला अस्तित्व नाहीं, पृ. १५

### प्रकरण ४ सत्याचा आग्रह, पृ. १६, १७

सत्याच्या आग्रहाचें प्रयोजन, पृ. १६–सत्याग्रहाकरितां हृदय-संशोधन आवश्यक, पृ. १६–सत्य अहिंसेहूनहि श्रेष्ठ, पृ. १६–सत्य-आहिंसेच्या उपासकाची ईश्वरावर जिवंत श्रद्धा पाहिजे, पृ. १६, १७–असत्य म्हणजे हिंसा, पृ. १७.

### प्रकरण ५—सत्याचा आविष्कार अहिंसा, पृ. १८ ते ४४

सत्यमय होण्याचा एकमेव मार्ग आहिंसा, पृ. १८–अहिंसा म्हणजे जीवमात्राविषयीं प्रेम, तें आत्मशुद्धीशिवाय अशक्य, पृ. १८, १९–सत्यदर्शनार्थ आहिंसा हाच मार्ग, १९–अहिंसा साधन, सत्य साध्य, पृ. २०–आहिंसेंत मूलभूत आवश्यकता उचित विचाराची, पृ. २०, २१–आहिंसेंत सत्य नाहीं, सत्यांत अहिंसा आहे, २१, २२–सत्याची अभिव्यक्ति अहिंसेच्या रूपानें होते, पृ. २२–अहिंसा विवाक्षित स्थळ–काळापुरती नसून ती जीवनाचें आविभाज्य अंग, पृ. २३–आहिंसा हें स्वतंत्र क्रियात्मक तत्त्व, म्हणून तें पिंडीं तसें ब्रह्मांडीं प्रभावी, पृ. २४–आहिंसेचा खरा प्रभाव हिंसेपुढेंच, त्याकरितां संयमशक्तीची जरूरी, पृ. २४, २५, २६–प्रेम हेंच जविनाचें सूत्र, त्याग त्याची कसोटी, पृ. २७–प्रेमानें द्वेष निष्प्रभ करावा, पृ. २८–स्वतः क्लेश सोसून विरोधकाला चुकीपासून परावृत्त करावें, पृ. २८–राष्ट्रांची उभारणीसुद्धां आत्मक्लेशांतून होत असते, पृ. २८–अहिंसेचा श्रीगणेशा, पृ. २८–विरोधकाशीं तडजोड करण्यांतील सौंदर्य, पृ. २९–विरोधाच्या वेळींच अहिंसेची कसोटी, पृ. २९–अहिंसा-

धर्म यमपालनावर अवलंबून, पृ. २९, ३०–अपरिग्रह, अस्तेय, अभय, पृ. ३०, ३१, ३२–' अहिंसेचा हिंसेच्या मुखांत प्रवेश, ' पृ. ३२, ३३– अहिंसा बळवानाची पाहिजे, पृ. ३३–म्हणून अहिंसेचा उगम मनांत झाला पाहिजे, पृ. ३४–भित्र्याला अहिंसा साधणार नाहीं, पृ. ३४– भ्याडपणापेक्षां हिंसा बरी, पण अहिंसा हिंसेहून श्रेष्ठ, पृ. ३५–अहिंसेच्या मागें परमेश्वर उभा असतो, पृ. ३६–अहिंसक क्रिया हा चढाईचाच प्रकार आहे, पृ. ३६–जगाच्या हिंसेपुढें एकटा अहिंसक पुरे, पृ. ३६– अहिंसेची विद्या स्वतःच्या आचरणांतूनच शिकवितां येतें, पृ. ३७– शूरत्वाचें अत्युच्च स्वरूप प्रत्याघात न करतां स्वतः मरणें, ३७, ३८– स्त्रियांचें व पूजास्थानांचें रक्षण अहिंसेनें करण्याचें ज्ञान नसेल त्यानें लढाई करून त्यांचें रक्षण करावें, पृ. ३८–शरीरबळ व आत्मबळ यांची तुलना, पृ. ३८, ३९–क्षमा वीराचें भूषण, पृ. ३९–हिंसेच्या व अहिंसेच्या परिणामांची तुलना, पृ. ३९, ४०–अहिंसेवरील श्रद्धा व हिंसेवरील श्रद्धा यांच्या परस्परभिन्न दिशा, पृ. ४०–अहिंसा म्हणजे जीवमात्राविषयीं प्रेम, केवळ जीव न घेणें नव्हे, पृ. ४०–प्रेमाचें संघटन शक्य, पृ. ४१–प्रेमानें कोणाचाहि जीव घेणें असंभवनीय, पृ. ४१–खरी अहिंसा व चुकीची अहिंसा, पृ. ४१–एकान्तिक स्वामित्वभावना प्रेम- भावनेशीं विरोधी, पृ. ४२–पिळवणूक म्हणजे हिंसा, पृ. ४२–आणी- बाणीच्या क्षणीं हिंसेचा अगतिकपणें वापर क्षम्य असला तरी अहिंसेला मर्यादा आहेत असा त्याचा अर्थ नाहीं, पृ. ४२, ४३–अहिंसाभक्ताचा डावा-उजवा पक्ष, पृ. ४३–आत्मबळाशीं विसंगत असलेल्या गोष्टी, पृ. ४३–सत्य-अहिंसा हे सार्वत्रिक, आणि केवळ व्यक्तिगत नव्हे तर समूहांनी आचरणांत आणण्याचे सद्गुण, पृ. ४४–आध्यात्मिक धर्म हा सर्वस्पर्शी असतो, पृ. ४४–आपली जीवननिष्ठा, पृ. ४४

**प्रकरण ६–साध्य–साधन विचार, पृ. ४५ ते ४७**

साध्य–साधनाचा वृक्ष–बीज-संबंध; जशीं साधनें तसे परिणाम, पृ. ४५, ४६–साधनें म्हणजेच सर्व कांहीं, पृ. ४७–साध्याच्या जपापेक्षां साधनांची काळजी घेणें जरूरीचें, पृ. ४७.

## प्रकरण ७-सत्याग्रहाचें शस्त्र व शास्त्र, पृ. ४८ ते ६७

सत्याग्रह हें शस्त्रहि आहे, पृ. ४८-स्वाभिमानरक्षण हा धर्म आहे, पृ. ४८-सत्याग्रह म्हणजे आत्मबळ, पृ. ४८-अन्याय-निवारणार्थ आत्मबळ सर्वसमर्थ, पृ. ४९-आत्मबळ प्रकट करण्याकरितां शरीरक्लेशाची तयारी आवश्यक, पृ. ४९-आत्मक्लेशामागची निष्ठा, पृ. ४९-आत्मबळामागचें ज्ञान, पृ. ४९-भलाईतूनच भलाई निष्पन्न होते, पृ. ४९-अप्रतिकाराचा खरा अर्थ, पृ. ५०-सत्याग्रह म्हणजे अन्यायनिवारणार्थ आत्मबलिदान, पृ. ५०-आत्मक्लेश अन्यायावर रामबाण उपाय, पृ. ५१-आत्मबळावर म्हणजे प्रेमबळावरच जगाचें अस्तित्व, पृ. ५१-सत्याग्रह सर्व क्षेत्रांत लागू होऊं शकतो, पृ. ५१-सत्याग्रहाचा व्यापक प्रमाणावर अंमल करणाऱ्यांची सत्य-अहिंसेवर अढळ श्रद्धा पाहिजे आणि अहिंसा म्हणजे सौजन्याचा मार्ग, पृ. ५३-सत्याग्रहाच्या चळवळीनें बोल्शेविझम् वाढेल काय, पृ. ५३-सत्याग्रहांतील प्रेमाची कसोटी शत्रूशीं सामना करतांना, पृ. ५४-सत्याग्रह मन पालटविण्याची प्रक्रिया, पृ. ५४-विरोधी माणसाचा दृष्टिबिंदु त्याच्याचकडून समजावून घेणें सत्याग्रहांत अवश्य, पृ. ५४-सत्याग्रहांत मागणी कमींत कमी पण त्यांत दृढता, पृ. ५४-सत्याग्रहाला गणितश्रेढीचा नियम लागू होतो, पृ.५५-सत्याग्रह्यानें प्रथमारंभीं ठरविलेल्या उद्दिष्टांत भर घालूं नये, पृ. ५६-बिन महत्त्वाचें सर्व सोडावें लागलें तर सोडावें पण महत्त्वाचें मुळींच सोडूं नये, ५६-प्रत्येक हितकारी आंदोलनाच्या पांच अवस्था, पृ. ५६-विवेकशून्य प्रतिकार कुपरिणामी, पृ. ५७-सत्याग्रही 'शत्रू 'ला आपल्या संभाव्य मित्राप्रमाणें मानतो, पृ. ५७-विरोधकांतील सदंश जागृत करण्याच्या कामीं निराश होतां कामा नये, पृ. ५७-सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी इतर सर्व सनदशीर साधनें अजमावावींत पृ. ५७, ५८-अन्याय ज्यांच्यावर होतो त्यांनींच सत्याग्रह करावा, पृ. ५८-सत्याग्रह हा सहजगत्या चालत येतो, पृ. ५८-सत्याग्रहाची मीमांसा, ५९, ६०, ६१-अहिंसक सैनिक पूर्ण अर्थानें अहिंसक असला पाहिजे असें नाहीं, आचरणांत अहिंसा पाळली तरी पुरे, पृ. ६१-पूर्ण सत्याग्रही होणें सामान्यांनाहि शक्य, पृ. ६३-पशुता आत्मबळापुढें वांकते अशी श्रद्धा बाळगणारेच सत्या-ग्रही होऊं शकतात, पृ. ६२-सत्याग्रहाचें शिक्षण म्हणजे मनुष्यत्वाची

पूर्णता गांठण्याचें शिक्षण, पृ. ६३–हक्क आणि कर्तव्यें यांचा परस्परसंबंध विचारणीय, पृ. ६४–सत्याग्रह्यांची जबरदस्ती व असहिष्णुता जास्त हानिकारक, ६५–सहकाऱ्यांचीं मनें काबीज केलीं पाहिजेत, पृ. ६६–खेड्यांत काम करणारा एकटा एक सत्याग्रही कसा असावा, पृ. ६६, ६७.

**प्रकरण ८—निःशस्त्र प्रतिकार आणि सत्याग्रह, पृ. ६८ ते ७५**

'सत्याग्रह' शब्दाची जन्मकथा, पृ. ६८–'पॅसिव्ह रिझिस्टन्स' चे इंग्लंडांतील प्रयोग, पृ. ६९–मताधिकार असेल तेथें किंवा शस्त्राचें बळ असेल तर सत्याग्रहाला वाव कमी, पृ. ७०–पॅसिव्ह रिझिस्टन्स व सत्याग्रह यांच्यांतील भेद, पृ. ७०, ७१–येशूचा व त्याच्या अनुयायांचा पॅसिव्ह रिझिस्टन्स हा सत्याग्रहच होता, पृ. ७२–हिंदुस्तानांतील प्रतिकार हा पॅसिव्ह रिझिस्टन्स आहे, पृ. ७३–निःशस्त्र प्रतिकारांत हृदयपरिवर्तनाची शक्ति नसते, पृ. ७३–हिंदुस्तानच्या लढ्यांत अहिंसेचें तंत्र अंमलांत आणण्याचें मला जमलें नाहीं, म्हणून स्वातंत्र्यानंतर जातीय प्रक्षोभ माजला पृ. ७४, ७५.

**प्रकरण ९–सत्याग्रहाकरितां पात्रता व पथ्यें पृ. ७६ ते ९३**

सत्याग्रही योद्धा कोणं होऊं शकेल, पृ. ७६ ते ७९–आत्मशुद्धि व तपस्या आवश्यक, पृ. ७९–लोकमत जागृत केलें पाहिजे, पृ. ८०–सत्याग्रहांत महत्त्व गुणाला, संख्येला नाहीं, पृ. ८०–सत्याग्रहांत हृदय जागृत करण्याचा प्रयत्न, पृ. ८०–सत्याग्रहीचे पात्रतेचे गुण, पृ. ८१–त्याचीं पथ्यें, पृ. ८१ ते ८३–सत्याग्रह पक्ष–वर्ग–संप्रदाय यांच्या अतीत पृ. ८३–असत्य व हिंसा निषिद्ध, पृ. ८३, ८४–खासगी जीवनांत अहिंसेचे गुण उतरले पाहिजेत, पृ. ८४–सत्याग्रह्याचा मर्यादाधर्म, पृ. ८४, ८५–ज्याला विरोध करायचा त्याच्याशीं मृदुतेची वागणूक, पृ. ८५–विरोधकाविषयीं कदर, पृ. ८५–दुसऱ्याला प्रामाणिक समजून चालावें, पृ. ८६–कारण न्याय्य व हिंसा वर्ज्य असेल तरच सत्याग्रह शक्य, पृ. ८७ सत्याग्रह्याची मूलभूत श्रद्धा, पृ. ८७–सत्याग्रह्याची शारीरिक पात्रता, पृ. ८८–ईश्वरावर नितान्त विश्वास आवश्यक, पृ. ८८–ज्यांचा ईश्वरावर विश्वास नसेल ते सत्याग्रही होऊं शकणार नाहींत काय? पृ. ८९–सत्याग्रह्याला ब्रह्मचर्य आवश्यक,

संपत्ति–कीर्ति–लालसा वर्ज्य, पृ. ८९, ९०, ९१–सत्याग्रहांत गुप्तता वर्ज्य, पृ. ९२–नासधूस म्हणजे उतावळेपणा, उतावळेपणा म्हणजे हिंसा, पृ. ९२, ९३–अ-सत्याग्रहाचे उदाहरण, पृ. ९३.

**प्रकरण १०—सत्याग्रहांत उपवासाचें स्थान, पृ. ९४ ते ९७**

उपवासरूपी सत्याग्रह विरोध करण्याकरितां करतां येणार नाहीं, प्रेमीजनांच्या भल्याकरितांच करतां येईल, पृ. ९४–अधिकारावांचून उपवास अयोग्य, पृ. ९५–माझा राजकोटचा उपवास अभ्यासूंना उपयुक्त, पृ. ९४, ९५–उपवास हा अंतिम, उपाय, पृ. ९५–स्वार्थी हेतूकरितां उपवास अयोग्य, पृ. ९५–अंतःप्रेरणा होईल तेव्हांच उपवास अंगीकारावा, पृ. ९६–आमरणान्त उपवास हें प्रभावी शस्त्र, राजकारणांतसुद्धां उपयुक्त, पृ. ९७–सत्याग्रही उपवासाच्या मर्यादा, पृ. ९७.

**प्रकरण ११—राजकारणांत सत्याग्रह, पृ. ९८ ते १३५**

राजकीय सत्याग्रहाचा मानलेला सिद्धान्त, पृ. ९८–गुलामगिरी ही मनाची अवस्था आहे, पृ. ९८–असह्य अन्यायाविरुद्ध बंड हा प्रत्येकाचा हक्क, पृ. ९९–बंडाचा अहिंसक मार्ग म्हणजे असहकार, पृ. ९९–सत्याग्रह हा अनत्याचारी प्रत्यक्ष प्रतिकार आहे, पृ. ९९, १००–असहकार व सविनय कायदेभंग या सत्याग्रहाच्या दोन शाखा, पृ. १०१

**असहकार**

राजकीय सत्याग्रह म्हणजे कुटुंबधर्माचा राजकीय क्षेत्रापर्यंत विस्तार, पृ. १०१–असहकाराचा हेतु सरकारला पेंचांत आणणें हा नसतो, पृ. १०१–असहकाराचे दोन उद्देश, पृ. १०२–असहकार हें सरकारला नीतिमान् बनविण्याचें साधन, पृ. १०२–हिंसक प्रतिकार व अहिंसक प्रतिकार, पृ. १०२, १०३–असहकारांत हिंसा वर्ज्य असली पाहिजे, पृ. १०३–असहकारवादी नम्र असला पाहिजे पृ. १०३–असहकार म्हणजे रक्तपात-विरहित क्रान्ति, पृ. १०४–अहिंसात्मक म्हणजे प्रेमात्मक, पृ. १०४–नीतिशून्य सरकारच्या अंमलाखालीं सत्ता व संपत्ति बाळगणें दुर्गुण, पृ. १०४–असहकारांत प्रतिपक्ष्याविषयीं सहिष्णुता, पृ. १०४–पण विरोध

करणें कर्तव्य, पृ. १०५–हृदयपरिवर्तनानें दुसऱ्याचें व्यक्तित्व कायम राहतें, पृ. १०५–हिंसेचा आधार घेणें म्हणजे जुलमी सरकारशीं सहकार करणेंच, पृ. १०५–शस्त्रास्त्रांऐवजीं नियमनिर्बंधयुक्त असहकारितेचा परिणामकारक उपयोग होतो, पृ. १०६–ज्याच्या बाजूला सत्य आणि न्याय असेल अशा कोणालाहि असहकाररूपी सत्याग्रह उपयोगी पडतो, पृ. १०६, १०७–कशावरहि मालकी नसलेलाच सरकारविरुद्ध व्यक्तिगत असहकार करूं शकतो, पृ. १०७–विध्वंसात्मक असहकार म्हणजे हिंसा, म्हणून त्याज्य, पृ. १०७–मजुरांचा उपयोग राजकीय हेतूसाठीं कितपत व्हावा, पृ. १०८.

## सविनय कायदेभंग

सविनय कायदेभंगाचें स्वरूप, पृ. १०९–त्याकरितां पात्रता, पृ. १०९, ११०–सविनय कायदेभंग नीतीशीं संबंध न येणाऱ्या कायद्यांचा, पृ. १११–सविनय कायदेभंग म्हणजे केवळ तुरुंगभरती नव्हे, पृ. १११–कायदेभंगांत मनः क्षोभ नसला पाहिजे, पृ. १११, ११२–आत्मबलिदानाची तयारी पाहिजे, पृ. ११२–सविनय कायदेभंगांत ‘ सविनय ’ या विशेषणाला महत्त्व, पृ. ११३–अंतःस्फूर्त सविनय कायदेभंग कर्तव्यकर्म, पृ. ११४–आक्रमक सविनय कायदेभंग, पृ. ११४–बचावाचा सविनय काययेभंग, पृ. ११४–कायदेभंगांतील ‘ विनय ’ प्रतिपक्षाला जाणवला पाहिजे, पृ. ११५.

## सामुदायिक सविनय कायदेभंग

सामुदायिक सविनय कायदेभंगाला शांतिमय वातावरण जरूरीचें, पृ. ११५–सत्याग्रह्यांचा विनय जितका जास्त तितकें यश त्वरित, पृ. ११६–लोकांचा संपूर्ण सविनय कायदेभंग म्हणजे शांततामय बंडच, पृ. ११७–सामुदायिक सत्याग्रहानंतरच्या परिणामांची सर्व जबाबदारी सत्याग्रह्यांवर असते, पृ. ११७ –लोक आवेगाला बळी पडणारे असले तरी संयमक्षमहि असतात, पृ. ११८ –लोक केवळ श्रद्धावान् असले तरी चालतात पण पुढारी ज्ञानवान् पाहिजेत, पृ. ११८ –हिंदुस्तानांत अहिंसेची परंपरा आहे, पृ. ११८ माझी विशेष कामगिरी म्हणजे दुर्बळाची अहिंसा शूराची करणें, पृ. ११८ –जितकी दडपशाही जास्त

तितके आत्मक्लेश ओढवून घ्यावे, पृ. ११८ —असहकार होमिओपथीप्रमाणें अल्पप्रमाणांत असूनसुद्धां महान् परिणामकारी ठरतो, पृ. ११९— सामुदायिक सत्याग्रहांत क्लेश सहन करण्याला विशिष्ट मर्यादा असते, पृ. ११९—सामुदायिक सविनय कायदेभंग सामुदायिक अहिंसेवांचून व शिस्तीवांचून अशक्य, पृ. ११९, १२० —व्यक्तिगत व सामुदायिक सविनय कायदेभंगाची तुलना, पृ. १२०

## विधायक कार्यक्रम

कायदेभंग करणाऱ्यांना लोकांचा पाठिंबा त्यांच्याविषयीं सद्भाव व विधायक कार्य यांतून मिळतो, पृ. १२० —हिंसाव्याप्त वातावरणांत सविनय कायदेभंग निर्बंधयुक्तच होऊं शकेल, पृ. १२१ —लोकांना अहिंसक लढ्याचें शिक्षण कसें द्यावें, पृ १२१ - विधायक कार्यक्रमाची पूर्ण अंमलबजावणी झाली तर कायदेभंगाची गरज नाहीं, पृ. १२२, १२३ —सविनय कायदेभंग आणि विधायक कार्य यांच्या मधील संबंध, पृ. १२३, १२४— विधायक कार्यक्रमाची पूर्ण अंमलबजावणी म्हणजे पूर्ण स्वराज्य होय, पृ. १२४ —विधायक कार्याला सरकार अडथळा करूं लागलें तर सत्याग्रहाचा प्रसंग उद्भवेल, पृ. १२५ —अन्यायाच्या सविनय प्रतिकाराकरितां तयारी म्हणजे विधायक कार्याकरितां तयारी, पृ. १२५—अखंड विधायक कार्यानें लोकांत विश्वास उत्पन्न होतो तो सविनय कायदेभंगाचें भांडवल, पृ. १२५, १२६— सविनय कायदेभंग शेवटचा उपाय, विधायक कार्यक्रम हा आरंभ, पृ. १२६

## करबंदी

करबंदीची चळवळ सत्ता लोकांच्या हातीं येण्याकरितां, म्हणून त्यापूर्वी शेतकरी वर्गाला राष्ट्रीय सद्गुणांचा आचार शिकविणें आवश्यक, पृ. १२६, १२७—कर देणाऱ्यांच्या क्लेशांनीं राष्ट्राला संपन्न करणें हा करबंदीचा हेतु, पृ. १२७—करबंदी अहिंसक नसेल तर तिला गुन्हेगारीचें स्वरूप येतें, पृ. १२७

## लोकशाहींत सत्याग्रह

खरें लोकराज्य म्हणजे सत्तेचा दुरुपयोग करणाऱ्यांचा प्रतिकार करण्याची

लोकांमध्यें शक्ति, पृ. १२८–खरी सत्ता लोकांची, पार्लमेंटची नव्हे, पृ. १२८–स्वराज्यांतसुद्धां सत्याग्रहाची आवश्यकता, पृ. १२९–अहिंसक असहकाराच्या शक्तीवर सामान्य जनतेची सत्ता अवलंबून, पृ. १२९–सत्ता काबीज करणें हें अहिंसक उपायांचें साध्य नसून सत्तेवर नियंत्रण हें साध्य, पृ. १३०–सत्याग्रह विशिष्ट मुद्द्याकरितां होऊं शकतो, सत्तेकरितां नाहीं, पृ. १३१–सत्ताशुद्धीसाठीं एका सत्याग्रहदलाची सदोदित आवश्यकता, पृ. १३१–शास्ते आणि शासित यांच्या परस्परसंबंधांत क्रांति हें अहिंसक बंडाचें कार्य, पृ. १३२–सत्तेच्या शिखरावर असलेल्यांच्या बिघाडाला जनताच कारणीभूत असते, पृ. १३२–लोकसत्तेपाशीं असलेलें एकमेव सामर्थ्य म्हणजे लोकमत, पृ. १३२, १३३–लोकांना आपले राजकीय हक्क माहीत पाहिजेत, पृ. १३३–कायद्यांचें खुषीनें पालन करण्याची ज्याची प्रवृत्ति तो लोकशाहीवादी, पृ. १३३–पंचायत-राज्यांत लोकमत हें अहिंसक मार्गानें क्रांति घडवून आणील, पृ. १३४–पंचायत-राज्य हा लोकांचा हक्क, पृ. १३४–सत्ताधारी गुंडशाहीवर उपाय म्हणजे मतदारांच्या मनांत पालट घडवून आणणें, पृ. १३५–सामुदायिक झगडे अहिंसक मार्गानें मिटविणें हा स्वतंत्र हिंदुस्तानचा धर्म, पृ. १३५.

**प्रकरण १२–देशरक्षणाच्या कामीं सत्याग्रह, पृ. १३६ ते १५४**

शुद्ध अहिंसक साधनांनीं देशरक्षण शक्य व इष्ट, पृ. १३६, १३७–चढाईखोर राष्ट्रावर अहिंसक असहकाराची उपाययोजना करण्याकरितां लक्षावधी जीवांचा बळी देण्याची तयारी ठेवली पाहिजे, पृ. १३९–अहिंसक असहकाराचा उपाय नव्या आक्रमक राष्ट्राच्या बाबतींतहि शक्य आहे, पृ. १४०–काश्मीर-रक्षणाच्या बाबतींतील उपाययोजना पृ. १४१, १४२–स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय सरकारचें रक्षणाचें धोरण हिंसक-अहिंसक मिश्र राहील, पण शुद्ध अहिंसा प्रकट करणारा एक तरी पक्ष देशांत राहील, पृ. १४३–अहिंसक उपाययोजनेच्या बाबतींत तीन आक्षेप व त्यांचीं उत्तरें, पृ. १४३, १४४, १४५–जुन्या व स्थिर झालेल्या आक्रमकाच्या बाबतींत व नव्या आक्रमकाच्या बाबतींत उपाय वेगळे वेगळे, पृ. १४५–एका तटस्थ राष्ट्रानें चढाईखोर राष्ट्राकडून शेजारच्या राष्ट्रावर

होणाऱ्या हल्ल्याला अहिंसेनें कसें तोंड द्यायचें, पृ. १४६ –अत्यंत दुर्बल राष्ट्रसुद्धां अहिंसेच्या विद्येनें शक्तिसंपन्न होऊं शकतें. पृ. १४६ –अहिंसेची पांच सिद्धान्तसूत्रें व त्यांना धरून आक्रमकाशीं सामना, पृ. १४७, १४८ –हिटलर असला तरी त्याला तोंड देण्याला अहिंसा समर्थ, पृ. १४९ –शस्त्रास्त्रांचा अप्रत्यक्ष रीतीनें वापर करणाऱ्यांवर अहिंसेचा प्रभाव पडेल काय, पृ. १४९, १५० –सत्याग्रही जनता आपला आत्मा, मन आणि शरीर शत्रूपुढें झुकविणार नाहीं त्याचें स्पष्टीकरण, पृ. १५०, १५१ –लुटारू राष्ट्रांच्या बाबतींत अहिंसक उपाययोजना, पृ. १५२ –जपानी आक्रमणाला सामना, पृ. १५३, १५४

### प्रकरण १३–युद्धाशीं असहकार, पृ. १५५ ते १५७

युद्धें हिंसक म्हणून युद्ध करणाऱ्या सरकारशीं संपूर्ण असहकार हा धर्म पृ. १५५, १५६–सैन्यांत भरती झालेल्याला युद्धांत भाग न घेणें अशक्य, पृ. १५७.

### प्रकरण १४–वांशिक भेदभाव व सत्याग्रह, पृ. १५८ ते १६१

जर्मनांविरुद्ध ज्यूंनीं काय उपाययोजना करावी, पृ. १५८, १५९–दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा गोऱ्यांना सत्याग्रहानें सामना, पृ. १६०–नीग्रो विरुद्ध गोरे, पृ. १६०, १६१.

### प्रकरण १५–सामाजिक सत्याग्रह, पृ. १६२ ते १९१

सामाजिक सुधारणेकरितां सत्याग्रहाचा उपयोग करतां येईल. पृ. १६२–सत्याग्रह–शक्ति मूक पण शीघ्रपरिणामकारी, पृ. १६२–गरीबांचा श्रीमंतां-विरुद्ध सत्याग्रह, पृ. १६२, १६३–धनसंग्रह हा पिळवणुकीशिवाय अशक्य पृ. १६३–गुंडगिरीवर अहिंसक असहकार हा उपाय, पृ. १६५, १६५–कायद्यानें हृदयपालट शक्य नाहीं, पृ. १६४–दरोडेखोरांवर उपाय पृ. १६५, १६६–गुन्हेगाराच्या बाबतींत सरकारची पद्धति वेगळी, सत्याग्रह्याची वेगळी, पृ. १६६–पोलिसांना मदत करणें हें सत्याग्रह्याचें काम नव्हे, पृ. १६७–सत्याग्रह–सिद्धान्त व शिक्षापद्धति, पृ. १६८–धार्मिक सत्याग्रहांत केवळ बुद्धिवादानें भागत नाहीं, हृदय हालवावें लागतें,

पृ. १६८, १६९–धार्मिक सत्याग्रहांत पुढारी खोल आध्यात्मिक प्रवृत्तीचा असणें अवश्य, पृ. १६९–धार्मिक सत्याग्रहाचीं पथ्यें, पृ. १६९, १७०–अस्पृश्यता–निवारणाच्या बाबतींत सत्याग्रहाचें स्वरूप, पृ. १७०, १७१, १७२–शेतकरी-संघटना राजकारणाकरितां कधींहि वापरूं नये, पृ. १७२, १७३–संप व हरताळ उठल्याबसल्या योग्य नव्हे, पृ. १७३, १७४–दारू व परदेशी कापड–दुकानांवर निरोधनासंबंधींचे नियम, पृ. १७४, १७५–निरोधनांत अडवणूक वर्ज्य, पृ. १७७–न्याय्य कारणाविरहित निरोधन अयोग्य, पृ. १७७–सामाजिक सुधारणांकरितां आत्मशुद्धि आवश्यक, पृ. १७७–जरठ–कुमारी–विवाहावर सामाजिक बहिष्कार उपाय, पृ. १७८–सामाजिक बहिष्काराची मीमांसा, पृ. १७९, १८०, १८१.

## प्रकरण १६–प्रार्थना, पृ. १८२, १८३

जीवनाच्या विविध क्षेत्रांत आत्मबलिदान करण्याची कला शिकण्याकरितां प्रार्थना हा पहिला व शेवटचा धडा आहे, पृ. १८२, १८३.

## परिशिष्टें

## परिशिष्ट १—(सन १९१८), पृ. १८५ ते १९८

मारण्याची तयारी असेल तरच मनुष्य मरायला शिकेल–लढण्याची शक्ति असेल तरच अहिंसा कळेल–हिंदुस्तानाला शस्त्रानें लढण्याची विद्या अवश्य आली पाहिजे–न मारतां ज्याला मरतां येत नसेल त्यानें मारून मरायला शिकलें पाहिजे–ज्याला मारण्याची शक्ति नाहीं त्याला अहिंसा समजाविणें अशक्य–भारतीयांनी पूर्वीच्या काळीं ज्ञानपूर्वक हिंसात्याग केला नव्हता-दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यांत बहुसंख्य लोकांनीं सत्याग्रह नव्हे पॅसिव्ह रिझिस्टन्स आचरलें होतें–स्वसंरक्षण करण्याचें शिक्षण मिळत नाहीं तोंवर निर्भयता येणार नाहीं–बहुसंख्य लोकांत शक्तीची जाणीव निर्माण होण्याकरितां त्यांना लष्करी शिक्षण दिलें पाहिजे–निर्भय माणसांचें अहिंसक लष्कर–अहिंसावादी हा युद्धाकडे तटस्थ राहून पाहूं शकत नाहीं–प्रत्येक मारण्याची क्रिया हिंसाच असते असे नाहीं–आत्मरक्षणाची शक्ति संपादन केली तरच स्वराज्याला आपण लायक–शरीरबळाचें वैयर्थ्य समजून

येऊन त्याचा त्याग झाला पाहिजे–हिंदी लोकांतील भ्याडपणा नाहींसा होण्यासाठीं रणमैदानांत लढण्याचें धैर्य अंगीं आणलें पाहिजे–हिंसेंत अहिंसा आहे–आजचा हिंदुस्तान मारण्याची शक्ति गमावून बसला आहे.

### परिशिष्ट २ — ( १९२१–१९४७ ), पृ. १९९ ते २०३

अहिंसाधर्मपालनाविषयींचा माझ्या मनांतील संघर्ष आणि उत्तर : यांत्रिक रीतीनें हिंसात्याग करून नव्हे, ज्ञानपूर्वक अनासक्त झाल्यानें अहिंसासिद्धि–अहिंसा श्रेष्ठ पण दुर्बळाची अहिंसा कनिष्ठ म्हणून हिंसेचा सल्ला देतों – माझ्या आदर्शांतील नव्हे प्रत्यक्ष स्वराज्याला संपूर्ण अहिंसेची आचारसंहिता मी देऊं शकत नाहीं – हत्यारांचा कायदा रद्द कां व्हावा–अहिंसक असूनहि मी लष्करी शिक्षणाच्या बाजूनें मतदान करीन – अन्याय सहन करण्यापेक्षां पाकिस्तानशीं युद्ध पत्करलें–माझा मार्गः दुष्टपणाचा बदला सत्प्रवृत्तीनें घेणें यांतच माणुसकी.

### परिशिष्ट ३—( १९४७—१९४८ ), पृ. २०४ ते २०६

सैनिकांना अहिंसा कशी शिकवावी यासंबंधी जनरल करिअप्पा व गांधीजी यांच्या मधील चर्चा.

### परिशिष्ट ४—पृ. २०७ ते २०९

स्त्रियांनी गुंडांचा केलेला हिंसक प्रतिकार.

## दुरुस्ती

पान १२८, परि. ६३, ओळ ५, ‘ सभा ’ ऐवजीं ‘ **सत्ता** ’ करावें.

* * *

# गांधीजींची विज्ञापना

माझ्या लिखाणाच्या सांक्षेपी अभ्यासकास त्याचप्रमाणें त्यांत रस घेणाऱ्या इतरांनाहि मी सांगूं इच्छितों कीं, सर्व काळीं जगाला मीं एकरूपच दिसलें पाहिजे याची मला मुळींच पर्वा नाहीं. सत्याच्या माझ्या शोधांत मी किती तरी विचारांचा त्याग केला आहे आणि किती तरी नव्या गोष्टी शिकलों आहें. वयानें मी भले वृद्ध झालों असेन, परंतु माझा आंतरिक विकास कुंठित झाला आहे किंवा देह पडल्यानंतर माझा विकास कुंठित होईल असें मला वाटत नाहीं. मला एकाच गोष्टीची तळमळ आहे आणि ती गोष्ट म्हणजे प्रतिक्षणीं सत्यनारायणाच्या आदेशाचें अनुसरण करण्याची तत्परता. आणि म्हणून कोणाला माझ्या दोन वचनांत विरोध भासल्यास त्यानें, त्याचा माझ्या शहाणपणावर विश्वास असेल तर, एकाच विषयावरील त्या दोन वचनांपैकीं मागाहूनचें वचन प्रमाण मानावें.

मी 'महात्मा' म्हटला गेलों म्हणून माझें वचन प्रमाण आहे असें समजून कोणी चालूं नये. 'महात्मा' कोण हें आपल्याला माहीत नाहीं. म्हणून चांगला मार्ग हा की 'महात्म्या' चें वचन देखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावें आणि तें कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा.

जसजसा मी विचार करतों, जसजसा आपल्या गतकाळच्या जीवनावर दृष्टि टाकतों, तसतसें माझें अल्पत्व मला स्वच्छ दिसूं लागतें. मला जें साधायचें आहे, ज्याची मला, वर्षें झालीं, आस लागून राहिली आहे, तें म्हणजे आत्मदर्शन होय, ईश्वराचा साक्षात्कार होय, मोक्ष होय. माझी हालचाल सगळी त्याच दृष्टीनें होते. माझें लिहिणें-करणें सर्व याच दृष्टीनें आहे आणि माझें राजकारणाच्या क्षेत्रांत उडी घेणेंहि त्याचकरितां आहे.

माझ्या प्रयोगांत आध्यात्मिक म्हणजे नैतिक समजावें; धर्म म्हणजे नीति; आत्म्याच्या दृष्टीनें आचरलेली नीति तोच धर्म. वैज्ञानिक ज्याप्रमाणें आपले प्रयोग अगदीं नियमांना धरून, विचारपूर्वक आणि बारकाव्यानें करतो तथापि त्यांतून निघालेले निष्कर्ष तो शेवटचे म्हणून मांडीत नाहीं, किंवा हे

निष्कर्ष त्या प्रयोगांचे बिनचूक असेच निष्कर्ष आहेत याविषयींहि तो साशंक नसला तरी तटस्थ राहतो, तसाच माझ्या प्रयोगांबाबतहि माझा दावा आहे. मीं खूप आत्मनिरीक्षण केलें आहे, एकूण एक मनोवृत्ति तपासली आहे, तिचें विश्लेषण केलें आहे. पण त्यांतून निघालेले निष्कर्ष हे सर्वांच्याच बाबतींत अंतिम आहेत, ते खरेच आहेत वा तेच खरे आहेत, असा दावा मी केव्हांहि करूं इच्छीत नाहीं.

पण एक दावा मात्र मी अवश्य करूं इच्छितों, आणि तो हा कीं माझ्या दृष्टीनें ते खरे आहेत आणि तूर्त तरी ते मला स्वतःला अंतिम असे वाटतात.

माझ्या मतें सत्यच सर्वश्रेष्ठ आहे आणि त्यांत असंख्य वस्तूंचा अंतर्भाव होऊन जातो. हें सत्य म्हणजे स्थूल वाचिक-सत्य नव्हे. तें जसें वाचिक तसें वैचारिक देखील आहे. हें सत्य म्हणजे केवळ आपण कल्पिलेलेंच सत्य नव्हे तर स्वतंत्र चिरंतन सत्य होय. म्हणजे परमेश्वरच.

माझ्यासारख्या अनेकांचा भले क्षय होवो, पण सत्याचा जय होवो. अल्पात्म्याला मापण्यासाठीं सत्याचा गज कधीं आंखूड न होवो.

* * *

# सत्याग्रहाचें शास्त्र

## ( गांधीजी )

लिहिण्याच्या वेळीं त्यापूर्वीं मीं काय मत प्रकट केलें होतें त्याचा मी कधीं विचार करीत नाहीं. अमुक प्रश्नासंबंधीं पूर्वीं जें मीं लिहिलें असेल त्याच्याशीं आतांचें लिहिणें सुसंगत राहिलें पाहिजे हें माझें उद्दिष्ट नसतें, तर त्या क्षणीं जें मला सत्य भासेल त्याच्याशीं सुसंगत राहणें हें उद्दिष्ट असतें. त्यामुळें सत्याच्या बाबतींत माझा उत्तरोत्तर विकास होत गेला आहे. स्मरणशक्तीवर पडणारा बोजा कमी झाला आहे; शिवाय जेव्हां जेव्हां मला माझें पन्नास वर्षांपूर्वींचें लिखाण माझ्या आतांच्या लिखाणाशीं ताडून पाहण्याचा योग आला तेव्हां तेव्हां त्या दोहोंत मला कसलीहि विसंगति आढळून आलेली नाहीं. पण ज्या मित्रांना तशी विसंगति दिसून आली असेल त्यांनीं माझ्या अगदीं अलीकडच्या लिखाणांत जो अर्थ असेल तो घेणें बरें. अर्थात् त्यांना जुना अर्थच बरा वाटला तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. पण ती निवड करण्यापूर्वीं त्या दोन बाह्यात्कारीं विसंगत दिसणाऱ्या लिखाणांत मुळाशीं कायम राहणारी अशी सुसंगति आहे कीं नाहीं हें पाहून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा. १

माझ्या सत्याग्रहाच्या ज्ञानाची दिवसेंदिवस वाढ होत आहे. अडचणीच्या वेळीं ज्याचा सल्ला उपयोगी होईल असें त्यासंबंधींचें एखादें पाठ्यपुस्तकहि माझ्यापाशीं नाहीं; गीता ही मी माझा कोश म्हणून म्हणतों तीसुद्धां त्या बाबतींत मला उपयोगी पडत नाहीं. माझ्या कल्पनेंतील सत्याग्रह हें एक प्रयोगावस्थेंत असणारें शास्त्र आहे. ज्याला मी ‘ शास्त्र ’ असें नांव देतों तें कदाचित् शास्त्र नसेलहि, आणि तें कदाचित् एका वेडगळ, किंवा मूर्ख म्हणा वाटलें तर, माणसाचे कल्पनातरंग आणि चाळे असण्याचा संभव आहे. सत्याग्रहाचें शस्त्र हें सूर्यचंद्राइतकें प्राचीन असलें तरी जगाचे महान् प्रश्न किंवा युद्धाचा जो मोठ्यांत मोठा प्रश्न तो, सोडविण्याच्या कामीं त्याला कांहीं किंमत आहे ही गोष्ट अजून मान्य झालेली नाहीं. त्यांत जें नवीन

आहे असें मी म्हणतों तें हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें खरोखर शून्य किंमतीचें आहे असेंहि कदाचित् ठरण्याचा संभव आहे. सत्याग्रहाचे म्हणजेच अहिंसेचे विजय म्हणून जे मीं म्हटले ते वास्तविक सत्य-अहिंसेचे विजय नसून हिंसेविषयीं वाटणाऱ्या भयाचेच विजय आहेत असेंहि ठरण्याचा संभव आहे.

या सर्व शक्यता नेहमीं माझ्या डोळ्यांपुढें असतात. पण माझा त्याला निरुपाय आहे. राष्ट्रानें स्वीकार करावा म्हणून जें कांहीं मी पुढें ठेवीत आहें तें सर्व प्रार्थनेंतून, किंवा ईश्वराच्या सतत आराधनेंतून मिळालेलें उत्तर आहे. २

आतां 'गांधी-तत्त्वज्ञान' असें ज्याला म्हटलें जातें त्याकडे व त्याच्या प्रचाराच्या साधनाकडे मी वळतों. सत्य-अहिंसेचा प्रचार ग्रंथापेक्षां आचार केल्यानेंच अधिक होऊं शकतो. सत्यमय जीवन हें ग्रंथापेक्षां मोलाचें आहे. याचा अर्थ ग्रंथ व वृत्तपत्रें काढूं नयेत असा नाहीं. फक्त त्यांच्याशिवाय चालायचें नाहीं असें नाहीं एवढेंच मला म्हणायचें आहे. आपण जर सत्य-अहिंसेचे खरे भक्त असूं तर प्रश्न सोडविण्याची बुद्धि ईश्वर आपल्याला देईल. भक्तींत विरोधकाचा दृष्टिकोन समजून घेण्याची इच्छा गृहीत असते. विरोधकाच्या मनांत शिरून त्याचा दृष्टिकोन समजून घेण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. यालाच 'अहिंसेचा थेट हिंसेच्या मुखांत प्रवेश' म्हणतात. अशी जर आपली मनःप्रवृत्ति झाली तरच अहिंसेच्या सिद्धान्तांचा प्रचार आपल्याकडून होण्याची आशा आहे. त्यावांचून ग्रंथांच्या आणि वृत्तपत्रांच्या प्रचाराला कांहीं अर्थ नाहीं. 'यंग इंडिया' मी किती बेदरकारपणें चालवीत होतों त्याची तुम्हांला कल्पना नाहीं. तो बंद करावा लागला तेव्हां डोळ्यांतून एक टिपूसहि मीं गाळलें नाहीं. परंतु ज्या सत्याग्रहाला मदत करण्याचा त्या पत्राचा उद्देश होता तो सत्याग्रह मात्र त्या पत्रानंतरहि टिकून राहिला; कारण सत्याग्रह हा बाह्य मदतीवर अवलंबून नसतो, त्याला सर्व सामर्थ्य आंतून मिळत असतें. ३

मी जो कांहीं सल्ला देतो त्याच्या बाबतींत नेहमीं एक संरक्षक कलम असतें; तें हें कीं तो सल्ला स्वतःच्या बुद्धीला आणि हृदयाला पटत नसेल

तर त्याप्रमाणें कोणी वागण्याचें कारण नाहीं. ज्याला प्रामाणिकपणें अंतरांतून कांहीं वेगळा आदेश असेल त्यानें, माझा सल्ला त्याहून वेगळा आहे म्हणून, त्या आदेशाच्या विरुद्ध वागण्याचें मुळींच कारण नाहीं. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर, ज्यांना कसल्याहि आंतल्या आदेशाची जाणीव नाहीं आणि ज्यांची माझ्या परिपक्व अनुभवावर व निर्दोष निर्णयबुद्धीवर श्रद्धा आहे त्यांनाच तो सल्ला लागू होतो. ४

आजची समाजरचना अहिंसेचा बुद्ध्या स्वीकार करून झालेली नाहीं, तरी जगभरची मानवजात नांदत आहे, माणसें आपापली पुंजी बाळगून आहेत तीं एकमेकांना संभाळून घेऊन चालतात म्हणूनच. तसें जर नसतें तर अगदीं मूठभर आणि अत्यंत हिंसक माणसें तेवढींच शिल्लक राहिलीं असतीं. पण तशी स्थिति नाहीं. कुटुंबें प्रेमाच्या बंधनानें एकत्र बांधलेलीं आहेत, तशींच सुसंस्कृत म्हटलेल्या समाजांतील ' राष्ट्रें ' म्हणविणारे मानवसमूहहि एकत्र बांधलेले आहेत. एवढेंच कीं त्यांनीं अहिंसेच्या कायद्याचें सार्वभौमत्व ओळखलेलें नाहीं. यावरून सरळ असें निघतें कीं अहिंसेंत ज्या महान् शक्ती दडलेल्या आहेत त्यांचा त्यांनीं शोध घेतलेला नाहीं...अहिंसेचें संपूर्ण शास्त्र मीं लोकांपुढें ठेवलें आहे असें मीं कधींच म्हटलेलें नाहीं. तसें तें संपूर्ण कधीं होऊंच शकत नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें कोणतेंहि भौतिक शास्त्र घेतलें तरी, अगदीं गणितशास्त्रासारखें कांटेकोर शास्त्र घेतलें तरी, तें पूर्ण असल्याचा दावा करतां येत नाहीं. मी एक अहिंसाशास्त्राचा शोधक आहें. माझ्यासारखेच जे इतर शोधक असतील त्यांना मी या अत्यंत कठीण पण तितक्याच हृदयंगम शोधाच्या कामीं सहभागी होण्याकरितां पाचारण करतों. ५

* * *

# सत्याग्रह–विचार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........
क्रमांक ........................ नों: दि: ........

## : १ : सत्य हेंच जीवनाचें साध्य

पृथ्वी ही सत्याच्या बळावर टिकलेली आहे. असत् – असत्य – म्हणजे ‘ नाहीं ’, सत् – सत्य – म्हणजे ‘ आहे ’. असत्‌ला जेथें अस्तित्वच नाहीं तेथें त्याचा जय कसा असणार ? आणि ‘ आहे ’ त्याचा नाश कोण करूं शकणार ? एवढ्यांत सत्याग्रहाचें सर्व शास्त्र आलें. १

सत्य ही इतकी पुरातन आणि बहुमोल वस्तु आहे कीं जसजसा त्याचा विचार करीत जावें तसतसें वाटूं लागतें कीं, सत्याचा अनुभव घ्यायचा असेल तर देहाविषयींचा अनुराग अगदीं नाहींसा झाला पाहिजे, मोक्षासाठीं मनाची तगमग झाली पाहिजे. मोक्षाची किंमत या विचारानें वाढत गेली पाहिजे. ती सर्वांत बहुमोल वस्तु आहे, अर्थात् या देहांत ती अप्राप्यच समजली पाहिजे. जोंपर्यंत देहरूपी कवाडें उघडलेलीं नाहींत तोंपर्यंत मोक्षाचा सुगंध यावयाचा नाहीं. ही गोष्ट कोणाला भयंकर वाटेल कदाचित् पण सिद्धान्त मात्र हाच आहे. २

दा. क्र. 10668

माझ्या मनानें सत्य हें सर्वश्रेष्ठ आहे आणि त्याच्यांत अगणित गोष्टींचा समावेश होतो. हें सत्य म्हणजे स्थूल – वाचेचें – सत्यच नव्हे. तें वाचेचें तसेंच विचाराचेंहि सत्य समजावें. हें सत्य म्हणजे आपल्या कल्पनेंत असलेलेंच सत्य नव्हे तर स्वतंत्र, चिरस्थायी सत्य, म्हणजे परमेश्वरच.

मी सत्यरूपी परमेश्वराचा पूजक आहें. तोच एक सत्य आहे. बाकी सर्व मिथ्या आहे. तें सत्य मला सांपडलेलें नाहीं, पण मी त्याचा शोधक आहें. तें शोधण्याकरितां मला अत्यंत प्रिय असलेल्या वस्तूचा त्याग करण्यालासुद्धां मी तयार आहें, आणि या शोधरूपी यज्ञांत या शरीराची-सुद्धां आहुति देण्याची माझी तयारी आहे; तशी माझी शक्ति आहे असा मला विश्वास आहे. पण त्या सत्याचा मला साक्षात्कार होत नाहीं तोंपर्यंत माझा अंतरात्मा जें सत्य मानतो त्या कल्पनेंतील सत्यालाच माझा आधार मानून, माझा दीपस्तंभ समजून त्याच्या आसऱ्यानें माझें जीवन मी व्यतीत करीत आहे.

हा मार्ग जरी तलवारीच्या धारेवर चालण्यासारखा असला तरी मला तो अत्यंत सोपा वाटला आहे. त्या मार्गाने जात असतांना झालेल्या भयंकर चुकाहि मला क्षुल्लक वाटल्या आहेत. कारण त्या चुका करीत असतांनासुद्धां मी त्यांतून वांचलों आहें आणि, माझ्या समजुतीप्रमाणें, पुढें गेलों आहें. अगदी दुरून विशुद्ध सत्याचें-ईश्वराचें- पुसट का होईना दर्शन मला लाभत आहे. सत्य हेंच एक आहे, त्याशिवाय दुसरें कांहींच या जगांत नाहीं हा माझा विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. आणखी मला असेंहि जास्त जास्त वाटत चाललें आहे कीं जेवढें करणें मला शक्य आहे तेवढें एखाद्या लहान मुलालासुद्धां शक्य आहे, आणि असें वाटण्याला मजजवळ सबळ कारणें आहेत. सत्याच्या शोधाचीं साधनें जितकीं कठीण तितकींच सोपीं आहेत. तीं अभिमानी माणसाला अशक्यशीं वाटतील, पण एखाद्या निर्दोष बालकाला सहज शक्य वाटतील. सत्याच्या शोधकाला रजःकणाहूनहि तुच्छ व्हावें लागतें. सगळें जग धुळीच्या कणाला तुडवितें, पण तो कणसुद्धां आपल्याला तुडवूं शकेल असें वाटण्याइतका सत्याचा पूजक अल्प बनला नाहीं तोंवर त्याला निर्विकल्प सत्याचें अल्पहि दर्शन दुर्लभ आहे. ३

सत्याच्या मार्गावरचा मी केवळ एक वाटसरू आहें. तो मार्ग मला सांपडला आहे आणि त्याचा पूर्ण शोध करण्याचा मी सतत प्रयत्न करीत आहें एवढाच माझा दावा आहे. पण तें सत्य अजून मला सांपडलेलें नाहीं हें मी कबूल करतों. पूर्ण सत्य सांपडणें म्हणजे आत्मसाक्षात्कार होणें आणि आपल्या जीवनाचें मूळ कारण हातीं येणें, म्हणजेच पूर्णावस्थेला पोंचणें. माझ्या उणीवांची मला दुःखद जाणीव आहे आणि त्या जाणिवेंतच माझें सगळें बळ सांठवलें आहे, कारण स्वतःची अपूर्णता आणि स्वतःच्या उणीवा लक्षांत येणें ही या जगांत दुर्लभ गोष्ट आहे. ४

लहानपणापासूनच मी सत्याचा उपासक आहे. माझ्या बाबतींत ही अत्यंत सहज अशी गोष्ट होती. भक्तियुक्त अंतःकरणानें केलेल्या शोधाअंतीं ‘ईश्वर सत्य आहे’ या प्रचलित सूत्राऐवजीं ‘सत्य हेंच ईश्वर आहे’ हें वस्तुस्थितीचें मर्म प्रकट करणारें सूत्र मला लाधलें. ५

विश्वाचीं अनंतकाळापासूनचीं मूलभूत सत्यें संख्येनें फारच थोडीं

आहेत. इतर सर्व सत्यें हीं त्या प्राथमिक सत्याचे बदलत्या परिस्थितींना, काळांना आणि स्थळांना लागू करून केलेले केवळ प्रयोग आहेत. मूलभूत सत्यें हीं आतां आणि पुढेंहि नित्य स्थिर राहणार आहेत; पण आचारांत उतरलेलीं सत्यें हीं स्थळ – काळ – परिस्थिति-अनुसार वेळोवेळीं बदलतात. म्हणून मूलभूत सत्यांच्या बाबतींत तुमची निष्ठा जितकी दृढ झालेली असेल तितकी त्वरित ‘ स्वतंत्र प्रतिभे ’ची किंवा ‘ नवनिर्मिती’ची शक्ति तुम्हांला लाभेल. अगदीं लहानपणापासून मला खोट्यापासून खरें वेगळें कसें करावें आणि त्या दोन वेगवेगळ्या वस्तु म्हणून त्यांच्याकडे कसें पाहावें याचें शिक्षण मिळालें आहे. त्यामुळें खोटें आणि खरें यांतला भेद ओळखण्याची शक्ति माझ्यांत अगदीं नैसर्गिक असल्यासारखी आहे. अशा रीतीनें असत्य ढीगभर असलें आणि त्यांत सत्याचा एक कण जरी दडलेला असला तरी त्याची मला बरोबर पारख व किंमत करतां येते. त्या एकाच तत्त्वाच्या भावात्मक स्वरूपाला सत्य आणि त्याच्या अभावात्मक स्वरूपाला अहिंसा या नांवानें ओळखतात. सत्यांत सर्व कांहीं येऊन जातें. म्हणून तत्त्वतः अहिंसा स्वतंत्रपणें समजावून सांगण्याची गरज नाहीं. तथापि, काळाची आजची विशेष गरज लक्षांत घेतां तसा प्रचार करणें अवश्य झालें आहे. सत्याचा पाया जर पक्का झाला असला तर त्यांतून अहिंसा आपोआप निष्पन्न होतें. ६

सत्याची व्याख्या सर्वांच्या अंतःकरणांतच आहे. तुम्ही या क्षणीं जें खरें मानीत असाल तें तुमचें सत्य आणि तोच तुमचा परमेश्वर. या स्वकल्पित सत्याची आराधना करतांना मनुष्य अंतिम शुद्ध सत्याकडे जाऊन पोंचणारच; आणि तोच परमात्मा आहे. ७

माझें जीवन एकमेकांपासून अलग अशा अनेक विभागांत मी वांटूं शकत नाहीं. तें अखंड आहे. माझ्या एकूण एक प्रवृत्तींचें मूळ एकच आढळून येईल. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत, तें लहान असो कीं मोठें असो, सत्य-अहिंसेची उपासना करणें हें माझें ध्येय आहे. ८

आणि अहिंसेच्या स्वरूपांतील सत्याचें दर्शनसुद्धां शुद्ध निरासक्त असलेल्या मनुष्यालाच लाभणें शक्य आहे. क्रोध, लोभ, अहंकार, भय अशा गोष्टींनीं सत्यशोधकाच्या डोळ्यांवर पडदा येत असतो. ९

कोणत्याहि गोष्टीला सत्यावांचून शोभा नाहीं. म्हणून आपण आहों तसे स्वतःला जगापुढें दाखवूं असा सर्वांनीं निश्चय करावा. जसे आहों तसे दाखविण्यांत जो आनंद आहे तो शृंगार करण्यात, चेहेरा सजविण्यांत नाहीं. वांकडी टोपी घालणें, अमुक पद्धतीनें साडी नेसणें, भांग पाडणें यांत असत्य आहे. जो मनुष्य अनेक वेष करून आपण नाहीं तसा दिसूं इच्छितो तो खोट्याचा धडा शिकूं लागतो. खऱ्याच्या आधारावर आपल्याला मोठी इमारत उभी करतां येईल. १०

आपण जसे अंतरांत आहोंत तसेच बाहेर दिसावें आणि त्याप्रमाणें वागावें ही धर्माचरणाची शेवटची नव्हे पहिली पायरी आहे. धर्माची इमारत या पायावांचून अशक्य आहे. ११

* * *

## : २ : सत्य हाच परमेश्वर

ईश्वर म्हणजे 'सत्य'. कांहीं वर्षे झालीं, 'ईश्वर सत्य आहे' असें म्हणण्याऐवजीं सत्य ईश्वर आहे असें मी म्हणूं लागलों आहें. हेंच मला जास्त न्यायाचें वचन वाटतें. सत्यावांचून या जगांत इतर कांहीं नाहीं.

येथें सत्याची व्याख्या व्यापक करायची आहे. तें सत्य चैतन्यमय आहे. हा सत्यरूपी ईश्वर आणि त्याचे कायदे हे वेगवेगळे नाहींत, एकच आहेत, म्हणून तेहि चैतन्यमय आहेत. तेव्हां हें जग सत्यमय आहे असें म्हणणें किंवा नियममय आहे असें म्हणणें दोन्ही सारखेंच. या सत्यांत अनंत शक्ति भरलेली आहे. गीतेच्या दहाव्या अध्यायांत म्हटल्याप्रमाणें त्याच्या एका अंशानें जग टिकून राहिलें आहे. म्हणून जेथें जेथें 'ईश्वर' असा शब्द येतो तेथें तेथें 'सत्य' शब्द वापरून अर्थ लावला तर ईश्वराविषयींचें माझें मत समजूं शकेल. १

परमेश्वरच सत्य आहे असें म्हणण्यांत दोष हा येतो कीं परमेश्वर आणखीहि कांहीं आहे असा त्यांतून अर्थ निघतो; परमेश्वर सहस्रनामधारी आहे हें खरें, परंतु परमेश्वराच्या बाबतींत बहुनामाची कल्पना करण्यानें ज्या वस्तूला आपण सर्वार्पण करूं इच्छितों ती वस्तु लहानशी आहे असें वाटण्याचें भय राहतें. पण 'सत्य हेंच परमेश्वर' असें म्हणण्यांत दुसरीं सर्व नांवें बाजूला पडतात, ध्यान फक्त सत्याचेंच राहतें आणि अद्वैतवादाशीं हें अधिक जुळतें. नास्तिकवादाला त्यांत स्थानच राहत नाहीं, कारण नास्तिकसुद्धां 'अस्ति'ला मानतो आणि 'अस्ति'चें मूळ रूप सत् आहे. २

ईश्वर निराकार आहे आणि सत्यसुद्धां निराकार आहे. यावरून सत्य म्हणजे ईश्वर असें मीं पाहिलें किंवा असा निष्कर्ष मी काढला असें नाहीं. मी असें पाहिलें कीं ईश्वराचें संपूर्ण विशेषण सत्य हेंच आहे. बाकी सारीं विशेषणें अपूर्ण आहेत. ईश्वर हा शब्दसुद्धां एक विशेषणच आहे, त्यानें त्या अनिर्वचनीय महान् तत्त्वाची विशेष ओळख होते. पण 'ईश्वर' या

शब्दाचा धात्वर्थ घेतला ( ईश् = सत्ता चालविणें ) तर तो शब्द नीरस वाटतो.

ईश्वराला सत्ताचालक म्हणून ओळखण्यानें बुद्धीचें समाधान होत नाहीं. सत्ताचालक म्हणून ओळखल्यानें त्याच्याविषयीं आपल्या मनांत एक प्रकारचें भय जरी उत्पन्न होत असलें आणि त्यामुळें पाप करण्याची भीति वाटून पुण्य कार्य करण्याला प्रोत्साहन मिळत असलें, तरी असें भय वाटून झालेलें पुण्यसुद्धां पुण्य राहत नाहीं. पुण्य करायचें तर तें पुण्याकरितांच, मोबदला मिळविण्याकरितां नव्हे. असे अनेक विचार करतां करतां एक दिवस असें मनांत आलें कीं, ईश्वर सत्य आहे असें म्हणणें हेंहि अपूर्ण वचन आहे, सत्य हेंच ईश्वर आहे हें वचन, मनुष्याची वाचा ज्या मर्यादेपर्यंत जाऊन पोंचूं शकते तेथपर्यंत, पूर्ण वचन आहे. तिन्ही-त्रिकाळीं जें असूं शकतें असें सत्यच असणार, कारण ' सत् ' म्हणजे असणें. पण, सत्यालाच ईश्वर म्हणून ओळखल्यानें श्रद्धा कमी होण्याचें कारण नाहीं. माझ्या दृष्टीनें तर उलट ती वाढली पाहिजे. मला तरी तसाच अनुभव आला आहे. सत्याला परमेश्वर म्हणून ओळखल्यानें आपण अनेक भानगडींतून सुटतों. चमत्कार पाहण्याची किंवा ऐकण्याची इच्छा राहात नाहीं. ईश्वरदर्शनाचा अर्थ समजायला कठीण वाटतो. पण सत्यदर्शनाचा अर्थ समजायला कांहींच अवघड नाहीं. सत्यदर्शन खुद्द जरी कठीण असलें– तें कठीण आहेच – तरी जसजसें आपण सत्याच्या जवळ जवळ जात जाऊं तसतसें आपल्याला त्या सत्यरूपी ईश्वराचें कांहीं कांहीं दर्शन होत जातें. त्यानें पूर्ण दर्शनाची आशा वाढते आणि श्रद्धाहि वाढते. २

कोणी ईश्वराला डोळ्यांनी पाहिलेलें नाहीं. आपल्याला त्याला हृदयानें ओळखायचें आहे, त्याचा साक्षात्कार करून घ्यायचा आहे, त्याच्या रूपांत मिळून जायचें आहे ... हा ईश्वर सत्य होय. किंवा सत्य हेंच ईश्वर असें म्हणा. सत्य म्हणजे खरें बोलणें एवढेंच नाहीं. सत्याचा अर्थ या जगांत जें निरंतर त्याच्या रूपानें होतें, आहे आणि असेल आणि ज्याच्या-शिवाय दुसरें कांहीं नाहींच, जें स्वतःच्याच सत्तेनें आहे, ज्याला कोणाच्या आश्रयाची गरज नाहीं, उलट ज्याच्या आश्रयानें अस्तित्वमात्र सर्व आहे, तें सत्य. सत्यच शाश्वत आहे, बाकी सर्व क्षणिक आहे. त्याला आकाराची

जरूर नाहीं. तेंच शुद्ध चैतन्य आहे, तेंच शुद्ध आनंद आहे. त्याला ईश्वर म्हणूं, कारण त्याच्या सत्तेच्या योगानेंच सर्व चालतें. तें आणि त्याचा कायदा दोन्ही एकच आहेत. म्हणून तो कायदा चैतन्यरूप आहे. या कायद्याच्या आधारानें सगळें तंत्र चालतें. या सत्याची आराधना हीच प्रार्थना, म्हणजेच आपली सत्यमय होण्याची तीव्र इच्छा. ही इच्छा अष्टौप्रहर असली पाहिजे. पण आपल्यांत इतकी जागृति नसते. म्हणून अमुक वेळीं आपण प्रार्थना, आराधना किंवा उपासना करावीच म्हणजे ती करतां करतां आपल्या मनांत अष्टौप्रहर सत्याचें चिंतन राहूं लागेल. ४

ईश्वर सत्य आहे असें तुम्ही कशावरून म्हणतां, असें तुम्ही मला विचारलें आहे. माझ्या लहानपणीं मला हिंदु धर्म-ग्रंथांत ' विष्णुसहस्रनाम ' म्हणून प्रसिद्ध असलेलीं ईश्वराचीं नामें पाठ करायला शिकविलेलीं होतीं. पण या नामावळींत ईश्वराचीं सर्व नांवें आलीं असें नाहीं, जितकें म्हणून जीवजंतु या जगांत आहेत तितकीं सर्व ईश्वराचींच नांवें आहेत अशी आमची श्रद्धा आहे. आणि तें खरें आहे असें मला वाटतें. म्हणून आम्ही ईश्वर नामरहित आहे असें म्हणतों; आणि ईश्वराचीं रूपें अनंत असल्यामुळें आम्ही त्याला रूपरहित समजतों; तसेंच तो अनेक भाषांच्या द्वारां आमच्याशीं बोलत असल्यामुळें आम्ही त्याला वाणीरहित मानतों. अशीं त्याचीं अनेक वर्णनें करतां येतील. आणि जेव्हां मी इस्लामधर्माचा अभ्यास करूं लागलों तेव्हां इस्लाममध्येंसुद्धां ईश्वराला अनेक नांवें आहेत असें मला आढळून आलें. ईश्वर हा प्रेम आहे असें जे म्हणतात त्यांच्याबरोबर मी ईश्वर हा प्रेम आहे असें म्हणेन, पण मनांतल्या मनांत समजेन कीं ईश्वर हा प्रेम असला तरी ईश्वर हा सत्य आहे हेंच खरें. मनुष्याच्या वाणीनें जर ईश्वराचें पूर्ण वर्णन होणें शक्य असलें तर, माझ्यापुरता तरी, ईश्वर सत्य आहे या निर्णयाप्रत मी आलों. परंतु दोन वर्षांपूर्वीं मी आणखी एक पाऊल पुढें गेलों आणि म्हटलें कीं सत्य हें ईश्वर आहे. ' ईश्वर हा सत्य आहे ' आणि ' सत्य हें ईश्वर आहे ' या दोन विधानांमधला सूक्ष्म भेद तुम्हांला दिसून आलाच असेल. या निर्णयावर मी आलों तो जवळ जवळ पन्नास वर्षांपूर्वींपासून सतत आणि अविरत सत्याचा शोध केल्यानंतर आलों आहें. त्यानंतर मला आढळून आलें कीं, सत्याच्या जास्तींत जास्त जवळ पोंचण्याचा मार्ग प्रेम

हा आहे. परंतु 'प्रेम' या शब्दाचे इंग्रजींत तरी अनेक अर्थ आहेत, आणि विकार या अर्थीं मानवी प्रेम अधःपातालासुद्धां कारणीभूत होऊं शकतें असेंहि मला आढळून आलें. मला असेंहि दिसून आलें कीं 'अहिंसा' या अर्थानें प्रेमाच्या उपासकांची संख्या जगांत फारच मर्यादित आहे. परंतु सत्याच्या संबंधांत मात्र मला दोन अर्थ कधीं आढळून आले नाहींत, आणि सत्याच्या आवश्यकतेच्या किंवा शक्तीच्या बाबतींत नास्तिकांनींसुद्धां आढेवेढे घेतलेले नाहींत. परंतु सत्य शोधून काढण्याच्या उत्साहाच्या भरांत नास्तिकांनीं ईश्वराचें अस्तित्वच मुळीं नाकारण्याला मागें पुढें पाहिलेलें नाहीं. अर्थात् त्यांच्या स्वतःच्या दृष्टिकोनांतून तें बरोबरच आहे. आणि या बुद्धिवादी विचारसरणीमुळें 'ईश्वर सत्य आहे' असें म्हणण्यापेक्षां 'सत्य ईश्वर आहे' असें म्हणणें अधिक योग्य होईल असें मला दिसून आलें.

चार्ल्स ब्रॅडलॉ यांचें नांव मला आठवतें. ते स्वतःला नास्तिक म्हणवून घेण्यांत भूषण मानीत. परंतु त्यांच्यासंबंधीं जी थोडीबहुत मला माहिती आहे त्यावरून मी त्यांना कधींहि नास्तिक म्हणणार नाहीं. ईश्वराला भिऊन चालणारे गृहस्थ असेंच मी त्यांना म्हणेन. पण ते माझ्या म्हणण्याचा निषेध करतील. मी जर त्यांना म्हणेन कीं, 'ब्रॅडलॉसाहेब, तुम्ही सत्याला भिऊन चालणारे गृहस्थ आहांत, ईश्वराला भिऊन नव्हे' तर त्यांचा चेहरा उजळेल. 'सत्य हेंच ईश्वर आहे' असें जर मीं म्हटलें तर त्यांच्या निषेधाला जागाच राहणार नाहीं. अनेक तरुणांचा आक्षेप मी हेंच सांगून दूर केला आहे. याच बाबतींत दुसरी एक अडचण लक्षांत घेतली पाहिजे. ती अशी कीं, लक्षावधि लोकांनीं ईश्वराच्या नांवावर अनन्वित अत्याचार केले आहेत. शास्त्रज्ञ सत्यसंशोधनाच्या नांवावर क्रूर कृत्यें करीत नाहींत असें नाहीं. सत्याच्या आणि विज्ञानाच्या नांवानें जिवंत प्राण्यांची चीरफाड करून पशूंवर किती अमानुष अत्याचार केले जात आहेत याची मला माहिती आहे. तेव्हां ईश्वराचें तुम्ही कसेंहि वर्णन करा, मार्गांत अनेक अडचणी उभ्या राहतात. परंतु मानवी मन ही एक मर्यादित वस्तु आहे आणि तुम्ही जेव्हां मनुष्याच्या ग्रहणशक्तीच्या पलिकडच्या वस्तूसंबंधीं किंवा तत्त्वासंबंधीं विचार करूं लागतां तेव्हां तुमच्या हालचालीला मर्यादाच पडते. शिवाय, आमच्या हिंदूंच्या

तत्त्वज्ञानांत आणखी एक गोष्ट आहे, ती म्हणजे, ईश्वरच फक्त आहे, दुसरें कांहीं अस्तित्वांतच नाहीं, आणि हेंच सत्य इस्लामधर्माच्या कलेमांत जोर देऊन आणि स्पष्ट करून मांडलेलें तुम्हांला आढळेल. त्यांत स्वच्छ असें म्हटलें आहे कीं अल्लाह हाच एक आहे आणि दुसरें कांहीं नाहींच. वस्तुतः 'सत्' या संस्कृत शब्दाचा अक्षरशः अर्थ–'ज्याला अस्तित्व आहे तें' असाच आहे. याकरितां, आणि आणखी अनेक कारणें मी देऊं शकेन त्यांकरितां, 'सत्य हाच ईश्वर' ही व्याख्या अत्यंत संतोषप्रद आहे असा माझ्या मनाचा निर्णय झाला आहे. आणि जेव्हां तुम्हांला सत्याचा ईश्वररूपानें शोध घ्यायचा असेल तेव्हां त्याचें अपरिहार्य साधन प्रेम म्हणजे अहिंसा हेंच आहे, आणि साध्य व साधन हे पर्यायवाची शब्द आहेत असें माझें मत असल्यामुळें 'ईश्वर हा प्रेम आहे' असें म्हणायला मला मुळींच दिक्कत वाटत नाहीं.

'तर मग सत्य म्हणजे काय?'

प्रश्न अवघड आहे खरा, पण तो मी 'अंतरात्मा जें सांगतो तें सत्य' असें म्हणून माझ्यापुरता सोडविला आहे. तुम्ही विचाराल, मग वेगवेगळ्या लोकांच्या मनांत वेगवेगळीं आणि परस्परविरुद्ध सत्यें कशीं येतात? याचें उत्तर असें कीं मनुष्याचें मन हें असंख्य माध्यमांच्या द्वारां काम करीत असतें आणि मनाच्या विकासाची क्रिया ही सर्वांच्या बाबतींत सारखीच नसते हें लक्षांत घेतलें, म्हणजे त्यावरून एकाचें जें सत्य तें दुसऱ्याचें असत्य असूं शकेल हें ओघानेंच येतें, आणि म्हणून ज्यांनीं प्रयोग करून पाहिले आहेत ते अशा निर्णयावर आले आहेत कीं ते प्रयोग करतांना कांहीं अटी पाळाव्या लागतात. शास्त्रीय प्रयोग चालविण्याकरितां जसा एक शिक्षणाचा शास्त्रीय अभ्यासक्रम आवश्यक असतो, तसेंच आध्यात्मिक क्षेत्रांत प्रयोग करण्याची पात्रता येण्याकरितां कडक असें पूर्वतयारीचे नियमपालन आवश्यक असतें. म्हणून आपल्या अंतरांतील आवाजाविषयीं बोलण्यापूर्वीं प्रत्येकानें आपल्या मर्यादा ओळखाव्या. याकरितां आमच्याकडे अनुभवावर आधारलेलें असें मत आहे कीं, सत्याचा ईश्वरस्वरूपांत ज्या कोणाला वैयक्तिक शोध घ्यायचा असेल त्यांनीं कित्येक व्रतांचें पालन करणें आवश्यक आहे; उदाहरणार्थ, सत्याचें व्रत, ब्रह्मचर्याचें व्रत ( हें व्रत अशा-

करितां कीं तुमचें प्रेम तुम्ही सत्यरूपी ईश्वर आणि इतर व्यक्ति किंवा वस्तु यांत विभागूं शकत नाहीं ), अहिंसेचें, अकिंचन राहण्याचें आणि अपरिग्रहाचें व्रत. हीं पांच व्रतें तुम्ही आचरल्यावांचून त्या प्रयोगाला तुम्ही आरंभहि करूं नये. इतरहि अनेक अटी सांगितलेल्या आहेत, पण मी त्या सर्वांविषयीं तुम्हांला सांगत बसत नाहीं. एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं ज्यांनीं हे प्रयोग केले आहेत त्यांना माहीत आहे कीं अंतरींचा आवाज आपल्याला ऐकूं येतो असें ज्यानें त्यानें म्हणणें हें वाजवी नसतें आणि आज जो तो कसल्याहि यमनियमांचें पालन न करतां मनोदेवतेचा हक्क सांगूं लागला आहे. त्यामुळें इतकें असत्य जगापुढें मांडलें जात आहे कीं त्यामुळें जग गोंधळून गेलें आहे. मी आपल्यापुढें अत्यंत विनयपूर्वक एवढेंच मांडूं शकेन कीं अत्यंत निरहंकार वृत्ति ज्यांची झालेली नाहीं त्यांना सत्य सांपडणें शक्य नाहीं. सत्यसागरावर विहार करण्याची जर तुमची इच्छा असेल तर तुम्ही स्वतः शून्य बनलें पाहिजे. ५

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों दि: ........

## : ३ : सत्यमय जीवन

सत्याच्या आराधनेकरितांच आपला जन्म. त्याप्रीत्यर्थच आपली प्रत्येक प्रवृत्ति. त्याच्याचकरितां आपण प्रत्येक श्वास घ्यावयाचा. हें जर आपण शिकलों तर इतर सर्व नियम सहजीं आपल्या हातीं येतील आणि त्यांचें पालनहि सुकर होईल. सत्यावांचून कोणत्याहि नियमाचें शुद्ध पालन अशक्य आहे.

सामान्यपणें सत्य म्हणजे सत्य बोलणें इतकेंच आपण समजतों. पण आपण व्यापक अर्थानें सत्य हा शब्द योजला आहे. विचारांत, उच्चारांत आणि आचारांत सत्य तेंच सत्य. हें सत्य संपूर्णपणें ज्याला समजलें त्याला जगांत दुसरें कांहीं जाणायचें राहात नाहीं. कारण सर्व ज्ञान त्यांत समाविष्ट आहे. त्यांत जें येणार नाहीं तें सत्य नव्हे, ज्ञान नव्हे; मग त्यांत खरा आनंद तरी कोठून असणार ? ही कसोटी लावायला जर आपण शिकलों तर कोणता आचार करण्यालायक आहे, कोणता त्याज्य आहे; काय पाहणें योग्य, काय अयोग्य; काय वाचणें योग्य, काय अयोग्य; हें आपल्याला चटकन् कळून येईल.

पण परिसासारखें, कामधेनूसारखें असलेलें तें सत्य कसें बरें सांपडणार ? त्याला भगवंतांनी उत्तर दिलें आहे : अभ्यासानें आणि वैराग्यानें. सत्याचाच ध्यास म्हणजे अभ्यास; त्याखेरीज इतर सर्व वस्तूंविषयीं आत्यंतिक उदासीनता म्हणजे वैराग्य. असें असूनहि एकाचें सत्य तें दुसऱ्याचें असत्य असें आपल्याला नेहमीं दिसेल. पण त्यामुळें घाबरून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. जेथें शुद्ध प्रयत्न आहे तेथें भिन्न वाटणारीं सर्व सत्यें म्हणजे एकाच झाडाच्या असंख्य वेगवेगळ्या पानांसारखीं आहेत... म्हणून ज्याला जें सत्य भासेल त्याप्रमाणें त्यानें वागावें यांत कांहीं दोष नाहीं, इतकेंच नव्हे तर तें कर्तव्यहि आहे. तसें करण्यांत जर चूक असली तर ती सुधरेलच. कारण सत्याच्या शोधामागें तपश्चर्या म्हणजेच स्वतः दुःख सहन करणें असेल, त्याच्यामागें मरणें असेल. अर्थात् त्यांत स्वार्थाचा गंधहि असणार नाहीं. असा निःस्वार्थ शोध करतांना कोणी आजवर शेवटपर्यंत भलत्या

मार्गाला गेलेले नाहीं. भलत्या मार्गाला गेला कीं ठेच खाल्लीच कीं परत तो सरळ मार्गाला लागतो. १.

सत्याला मंडनाची गरज नाहीं. त्याच्यांत कमीपणाला किंवा मोठेपणालाहि वाव नसतो. जे लोक आपल्या क्षुल्लक कृतींत देखील सत्यच आचरतात, त्यांना कधींहि पश्चात्तापाची पाळी येत नाहीं. वेळ आली कीं त्या आचरणाला खात्रीनें फळ येणारच, मग तो काळ कितीहि लांब वाटला तरी तो त्या मानानें सर्वांत अल्पच आहे. ज्यांची अशी जिवंत श्रद्धा आहे ते कशालाहि किंवा कोणालाहि भीत नाहींत. त्यांचें सत्य हेंच त्यांचें रक्षण करणारें शस्त्र आणि कवच, त्यांची श्रद्धा हीच त्यांची अभेद्य ढाल असते. २

माझ्या दृष्टीनें जोंवर आपल्याला खरेपणाचें जीवन जगतां येणार नाहीं तोंवर सर्व वाचन व्यर्थ आहे. खरेपणाच्या जीवनांत कृत्रिमतेला अर्थातच स्थान नाहीं. सत्याचा पूजक स्वतः जसा आहे तसाच दिसेल. त्याच्या विचारांत, उच्चारांत, आचारांत ऐक्य असेल. ईश्वराला सत्यरूप समजल्यानें हें शिक्षण थोड्या काळांत मिळतें. असें सत्यमय जीवन अंगीं बाणण्याकरितां फार ग्रंथ उलथेपालथे करावे लागत नाहींत, पण तशा जीवनानें सारा डाव आपल्या हातीं येतो. ३

सर्वसामान्य व्यवहारांत असत्य बोलायचें नाहीं किंवा आचरायचें नाहीं एवढाच सत्याचा अर्थ नाहीं. तर सत्य हाच परमेश्वर आहे आणि त्यावांचून दुसरें कांहींच नाहीं हा त्याचा अर्थ आहे. त्या सत्याचा शोध आणि पूजा करण्याकरितां म्हणून इतर सर्व नियमांची आवश्यकता असते व त्यांतूनच त्यांची उत्पत्ति आहे. त्या सत्याचे उपासक स्वतः कल्पिलेल्या देशहिताकरितांसुद्धां असत्य बोलणार नाहींत, आचरणार नाहींत. सत्याप्रीत्यर्थ प्रह्लादाप्रमाणें आईबापांसारख्या वडिलांच्या आज्ञेचासुद्धां विनयपूर्वक भंग करण्यांत धर्म आहे असें मानतील. ४

गाईला वांचविण्याकरितां असत्य बोलावें कीं बोलूं नये असलीं कोडीं घेऊन रोज आपल्या दृष्टीसमोर जें घडत असतें तें विसरून जाण्यानें सत्याची साधना होऊं शकणार नाहीं. असल्या फसव्या गोष्टींत सांपडणें हा सत्याला झांकण्याचा मार्ग आहे. आज जीं कोडीं रोजच्या रोज आपल्यापुढें येतात

त्यांच्या बाबतींत जर आपण सत्याचें पालन केलें तर कठीण प्रसंगीं काय करावें तें आपोआप आपल्याला समजून येईल.

या दृष्टीनें आपण प्रत्येकानें फक्त स्वतःकडे पाहिलें पाहिजे. माझ्या विचारांत मी कोणाला फसवीत आहें काय ? मी जर 'ब'ला वाईट मानत असलों आणि त्याच्यापुढें मात्र 'तुम्ही चांगले आहां' अशी बतावणी करीत असलों तर मी फसवितों. स्वतःला मोठा किंवा भला म्हणवून घेण्याच्या इच्छेनें आपल्यांत नसलेले गुण दाखविण्याचा मी प्रयत्न करतों काय ? मी बोलण्यांत अतिशयोक्ति करतों काय ? आपण केलेले प्रमाद ज्याच्यापाशीं सांगितले पाहिजेत त्याच्यापासून ते लपवून ठेवतों काय ? माझा वरिष्ठ किंवा सोबती मला कांहीं विचारतो त्याला उत्तर देण्याऐवजीं मी उडवाउडवी करतों काय ? जें कांहीं सांगितलें पाहिजे तें लपवून ठेवतों काय ? यांपैकीं एखादी गोष्ट जर मी करीत असेन तर मी असत्य आचरतों. अशा रीतीनें प्रत्येकानें रोज आपली झडती आपल्याशींच घेऊन स्वतःला सुधारलें पाहिजे. ज्याला सत्याचीच संवय झाली, असत्य वचन निघणें शक्यच नाहीं अशा स्थितीला जो पोंचला, त्यानें फार तर अशी स्वतःची झडती न घेतली तर चालेल. पण ज्याच्यांत यत्किंचित् का होईना असत्य असेल किंवा ज्याला सत्य आचरण्याला प्रयासच करावा लागतो त्यानें वर सांगितलेल्या पद्धतीनें या किंवा अशा प्रकारच्या सुचतील तेवढ्या प्रश्नांचीं उत्तरें स्वतःला नेहमीं देत राहावें. एक महिना जरी ही गोष्ट तो करीत गेला तरी त्याला स्वतःमध्यें झालेला बदल स्पष्ट दिसून येईल. ५

जो मनुष्य सांसारिक वस्तूच्या प्राप्तीकरितां किंवा इतर कोणत्याहि कारणाकरितां असत्याचा आधार घेतो, जो रागद्वेषानें भरलेला आहे, त्याला भगवत्प्राप्ति होणेंच शक्य नाहीं. सत्याच्या मार्गावरून चालणें आणि प्रपंचापासून म्हणजे प्रवृत्तीपासून अलग राहणें हें आकाशपुष्पाप्रमाणें आहे. जो प्रवृत्तीपासून अलग राहतो तो कोणत्या मार्गानें जात आहे हें कसें सांगणार ? सत्याच्या मार्गानें चालण्यांतच प्रवृत्तिमध्यें शिरणें हेंहि येतें. त्याशिवाय सत्याच्या मार्गावर चालण्या न चालण्याचा प्रसंगच उत्पन्न होत नाहीं. गीतामातेनें कित्येक श्लोकांत स्पष्ट केलें आहे कीं मनुष्य हा प्रवृत्ती-वांचून एक क्षणभरहि राहूं शकत नाहीं. भक्त आणि अभक्त यांच्यामध्यें

भेद हा आहे कीं पहिला पारमार्थिक दृष्टीनें प्रवृत्तींत राहतो आणि प्रवृत्तींत राहूनहि सत्य कधीं सोडत नाहीं; तो रागद्वेषादींना क्षीण करीत जातो. तर दुसरा आपल्या भोगांकरितां प्रवृत्ति चालविण्यांतच मस्त होऊन राहतो, आणि आपलें कार्य सिद्ध करण्याकरितां असत्यादि आसुरी खटपटीपासून अलग राहण्याचा प्रयत्नसुद्धां करीत नाहीं. हा प्रपंच म्हणजे कांहीं निंद्य गोष्ट नाहीं. प्रपंचाच्या द्वारांच भगवद्दर्शन शक्य आहे. मात्र मोहजनक प्रपंच निंद्य आणि सर्वथा त्याज्य आहे. हा माझा दृढ अभिप्राय आहे, अनुभव आहे. ६

ज्या मनुष्यानें सत्याला वरलें, जो त्याचीच उपासना करतो, तो जर दुसऱ्या कोणत्याहि वस्तूची आराधना करूं लागला तर तो व्यभिचारी ठरेल. अर्थात् विकारांची आराधना करणें त्याला कसें शक्य आहे? ज्याची प्रत्येक हालचाल सत्याच्या दर्शनाकरितांच आहे तो प्रजोत्पत्तिकार्यांत किंवा घरसंसारांत गढून कसा राहूं शकेल? भोगविलासांनीं कोणाला सत्य सांपडल्याचें आजपर्यंत आपल्यापुढें एकहि उदाहरण नाहीं. ७

क्षणाक्षणाला जें आपल्याला सत्य दिसतें त्याला अनुसरून जीवन जगण्यांत कदाचित् स्वतःच्याच मागील वर्तणुकीशीं विसंगति होण्याचा संभव जरी असला तरी त्यांतच सुसंगतपणा आहे. ८

आपणां सर्वांचे विचार कधींच सारखे असणार नाहींत आणि सत्य हें नेहमींच आपल्याला तुकड्या-तुकड्यांनीं आणि भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून दिसत असतें. हें लक्षांत घेतलें म्हणजे आपण एकमेकांविषयीं सहिष्णुता बाळगली पाहिजे हा वागणुकीचा उत्तम नियम ठरतो. सर्वांची विवेकबुद्धि सारखी असते असें नाहीं. म्हणून आपण आपल्या विवेकबुद्धि-अनुसार वागावें हा नियम स्वतःपुरता चांगला असला तरी आपला आचार सर्वांवर लादणें म्हणजे दुसऱ्याच्या विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्यांत अक्षम्य हस्तक्षेप करणें होईल. ९

अनुभवानें मला असें दिसून आलें आहे कीं सत्याच्या पूजकानें मौन पाळणें अवश्य आहे. कळत नकळत मनुष्य पुष्कळ वेळां अतिशयोक्ति करतो किंवा जें सांगणें योग्य असेल तें लपवून ठेवतो किंवा वेगळ्या रीतीनें

सांगतो. अशा आपत्तींतून वांचण्याकरितांसुद्धां मितभाषी होणें आवश्यक आहे. थोडें बोलणारा विचार न करतां बोलणार नाहीं, आपला प्रत्येक शब्द तो तोलून मापून बोलेल. १०

गुप्तता, म्हणजेच असत्य, ही जगाच्या नऊ-दशांश दुःखांना कारणीभूत आहे. सर्वसामान्यपणें बोलायचें तर, गुप्तपणें केलेल्या कामांत त्याच्या नाशाचींच बीजें सुप्त स्वरूपांत असतात. जें उघडपणें करतां येत नाहीं तें सहसा न करावें हें उत्तम. या सिद्धान्ताची गल्लत मौन ठेवण्याशीं करूं नये. आपल्या बोलण्यानें वगैरे अनर्थ व गैरसमज होण्याचा संभव राहूं नये याकरितां मौन राखण्याची गरज असेल तर तें मौन म्हणजे गुप्तता नव्हे. गुप्तता म्हणजे दुसऱ्याला फसविण्याच्या हेतूनें त्याच्यापासून कांहीं माहिती किंवा वस्तुस्थिति लपवून ठेवणें. ११

मी सत्यामध्यें किंवा सत्याच्या द्वारां सौंदर्य पाहतों. सत्याचें प्रतिबिंब असणाऱ्या सर्व वस्तू–खरें चित्र, खरें कार्य, खरें गीत–मला सुंदर वाटतात. लोकांना सामान्यपणें सत्यांत सौंदर्य दिसत नाहीं, त्यांना तें भयंकर वाटतें. पामर माणसें सत्याची भीषणता पाहून पळून जातात, कारण सत्याचें सौंदर्य त्यांच्या लक्षांतच येत नाहीं. सत्यांत सौंदर्य पाहायला शिकला कीं मनुष्य कला पाहायला शिकला, कलारसिक झाला असें समजावें. १२

* * *

## : ४ : सत्याचा आग्रह

...संपूर्ण सत्य जर आपल्याला दिसलें असतें तर मग सत्याचा आग्रह कशाला ? मग तर आपण परमेश्वरच झालों. कारण सत्य हेंच परमेश्वर अशी आपली भावना आहे. पूर्ण सत्य आपण ओळखत नाहीं म्हणून त्याचा आग्रह ठेवतों, त्यामुळेंच पुरुषार्थाला वाव आहे. यांत आपली अपूर्णता आपण कबूलच करतों... १

...सत्य सदैव स्वयंसिद्ध असतें आणि कांहीं झालें तरी तें न सोडणें हेंच सर्वांचें कर्तव्य आहे. सत्याग्रह करणाऱ्यांनीं आधीं आपलें हृदय-संशोधन करावें. आपण खरोखरी सत्याचाच शोध करीत आहों का हें त्यांनीं स्वतःला विचारावें. तसें नसेल तर तो तुमचा आग्रह म्हणजे सत्याची विटंबना होईल. जी वस्तु आपली स्वतःची नाहीं ती मिळवायला जेव्हां मनुष्य प्रवृत्त होतो तेव्हां ती त्याला अहिंसेनें मिळणें कठीण असतें, आणि अहिंसे-शिवाय तर सत्यप्राप्ति नाहीं. २.

सत्याची आणि अहिंसेची तुलना काय करायची ? पण करावीच लागली तर मी म्हणेन सत्य हें अहिंसेहूनहि श्रेष्ठ आहे. कारण असत्य हीसुद्धां हिंसा आहे. ज्याला सत्य प्रिय आहे तो अहिंसेप्रत केव्हां ना केव्हां जाणारच. ३

...त्रिकालाबाधित सिद्धान्त म्हणून मी सत्य आणि अहिंसा यांखेरीज एकहि गोष्ट मांडलेली नाहीं. नव्हे, पुढें जाऊन मी म्हणेन कीं त्रिकालाबाधित वस्तु एक सत्य हीच आहे. कारण, जरी अहिंसा आणि सत्य एकच आहेत तरी, दोहोंमध्यें निवड करण्याची पाळी आली तर, अहिंसेच्या ठिकऱ्या करून सत्याची स्थापना करण्याला मी कचरणार नाहीं. सत्य हेंच माझ्या मतानें सर्वश्रेष्ठ आहे. ४

सत्य आणि अहिंसा हीं समाजवादांत साकार झालीं पाहिजेत. तसें होणें शक्य व्हावें याकरितां सत्य-अहिंसेच्या उपासकाची ईश्वरावर जिवंत श्रद्धा पाहिजे. सत्य-अहिंसेचें केवळ यंत्रवत् पालन करण्यानें तीं ऐन वेळीं

मोडून पडण्याचा संभव आहे. म्हणूनच मीं सत्य हें ईश्वर आहे असें म्हटलें. हा ईश्वर म्हणजे चिच्छक्ति आहे. आमचें जीवन त्या शक्तीचें बनलेलें आहे. ती शक्ति देहांत राहते पण देह म्हणजे ती नव्हे. त्या महान् शक्तीचें अस्तित्व जो नाकारतो त्याला ती अक्षय्य शक्ति लाभत नाहीं आणि त्यामुळें तो पौरुषहीन राहतो...ही अहिंसारूपी शक्ति आणि तिचे संभाव्य परिणाम जाणून घेणें हें अत्यंत प्रयासयुक्त संशोधनाचें काम आहे. या अखंड संशोधनांतूनच मला सत्याग्रह सांपडला असा माझा दावा आहे. अर्थात् सत्याग्रहाचा सगळा आचारधर्म आंखला गेला आहे किंवा उमगला आहे असें माझें म्हणणें नाहीं. एवढें मात्र मी निःशंकपणें व निश्चितपणें सांगतों कीं, सत्याग्रहाचा अवलंब करून कोणतेंहि रास्त उद्दिष्ट साधतां येतें. सत्याग्रह हा अत्यंत उच्च प्रतीचा व अचूक असा उपाय आहे. ती अत्यंत महान् अशी शक्ति आहे. सत्याग्रहानें समाजांतील राजकीय, आर्थिक आणि नैतिक अशा सर्व अनिष्ट प्रवृत्ती नाहींशा करतां येतात. ५

आपल्याला सत्य कितपत प्रिय आहे आणि तें आपण विचारांत, उच्चारांत, आचारांत कितपत पाळतों हें स्वतःला विचारलें पाहिजे. जो मनुष्य सत्यनिष्ठ नाहीं तो अहिंसेपासून फार दूर आहे. असत्य म्हणजेच हिंसा. ६

* * *

# : ५ : सत्याचा आविष्कार अहिंसा

सत्याहून वेगळा असा कोणी परमेश्वर आहे असा माझा अनुभव नाहीं. सत्यमय होण्याकरितां अहिंसा हाच एक मार्ग आहे...माझी आहिंसा सच्ची आहे पण ती कच्ची आहे, अपूर्ण आहे. त्यामुळें माझें सत्याचें अल्पदर्शन म्हणजे, हजारों सूर्य एकत्र केले तरी ज्या सत्यरूपी सूर्याच्या तेजाची त्यांना सर येणार नाहीं अशा सूर्याच्या केवळ एका किरणाचेंच दर्शन आहे. त्याचें संपूर्ण दर्शन संपूर्ण आहिंसेवांचून अशक्य आहे एवढें मात्र मी माझ्या आजपर्यंतच्या प्रयोगांच्या अंतीं अवश्य म्हणूं शकतों.

अशा व्यापक सत्यनारायणाच्या प्रत्यक्ष दर्शनाकरितां जीवमात्राविषयीं आत्मवत् प्रेम बाळगण्याची परम आवश्यकता आहे. आणि तसें प्रेम करूं इच्छिणारा मनुष्य जीवनाच्या एकाहि क्षेत्राच्या बाहेर राहूं शकत नाहीं. म्हणूनच माझी सत्याची पूजा मला राजकारणाकडे ओढून घेऊन गेली. धर्माचा राजकारणाशीं संबंध नाहीं असें म्हणणाऱ्यांना धर्म कळत नाहीं असें म्हणण्यास मला संकोच वाटत नाहीं, त्यांत माझा अविनयहि नाहीं.

आत्मशुद्धीशिवाय जीवमात्राशीं ऐक्य साधणें शक्य नाहीं. आत्मशुद्धि-शिवाय अहिंसाधर्माचें पालन सर्वथैव अशक्य आहे. अशुद्धात्मा परमात्म्याचें दर्शन घेण्याला असमर्थ आहे, म्हणून जीवनमार्गाच्या सर्व क्षेत्रांत शुद्धीची आवश्यकता आहे. ही शुद्धि साध्य आहे, कारण व्यक्ति आणि समष्टि यांच्यामध्यें असा निकट संबंध आहे कीं एकाची शुद्धि म्हणजे अनेकांची शुद्धि ठरते आणि व्यक्तिगत प्रयत्न करण्याची शक्ति तर सत्यनारायणानें सर्वांना जन्मापासून दिलेली आहे.

पण हा शुद्धीचा मार्ग बिकट आहे हें मी क्षणोक्षणीं अनुभवीत आहें. शुद्ध होणें म्हणजे मनानें, वचनानें आणि शरीरानें निर्विकार होणें, रागद्वेष-रहित होणें. क्षणोक्षणीं धडपडत असूनहि मी अजून या निर्विकार अवस्थेला पोंचलेलों नाहीं, म्हणून लोकांची स्तुति मला भुरळ पाडूं शकत नाही, ती स्तुति पुष्कळ वेळां मला खुपते. मनाचे विकार जिंकणें हें जगाला शस्त्रयुद्धानें

जिंकण्यापेक्षांहि मला कठीण वाटतें. हिंदुस्तानांत आल्यानंतर देखील मला माझ्यांत दडून राहिलेले विकार दिसले आहेत, मला शरम वाटली आहे, पण मी हरलेलों नाहीं. सत्याचे प्रयोग करतांना मी अमाप गोडी लुटली आहे, आजहि लुटीत आहें. तथापि मला अजून बिकट रस्ता कापायचा आहे. त्याकरितां मला शून्यवत् झालें पाहिजे. मनुष्य जोंपर्यंत स्वेच्छेनें स्वतःला सर्वांत शेवटचें स्थान देणार नाहीं तोंपर्यंत त्याला मुक्ति नाहीं. अहिंसा ही नम्रतेची पराकाष्ठा आहे. आणि या नम्रतेशिवाय मुक्ति कधीं-काळीं शक्य नाहीं ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. १

सत्याचा, अहिंसेचा मार्ग जितका सरळ तितकाच निरुंद आहे; तलवारीच्या धारेवर चालण्यासारखा तो आहे. डोंबारी ज्या दोरीवर नजर खिळवूनच चालूं शकतो त्या दोरीपेक्षांहि सत्य-अहिंसेची दोरी सूक्ष्म आहे. थोडा जरी गाफिलपणा झाला कीं पडलोंच समजा. क्षणोक्षणीं साधना करीत राहिल्यानेंच त्यांचें दर्शन व्हायचें.

पण सत्याचें संपूर्ण दर्शन या देहांत तरी अशक्य आहे. त्याची फक्त कल्पनाच तेवढी करतां येईल. क्षणिक देहाच्या साधनानें शाश्वत धर्माचा साक्षात्कार कसा शक्य आहे ? म्हणून शेवटीं श्रद्धेचा उपयोग करावा लागतो. त्यांतूनच जिज्ञासूंना अहिंसा सांपडली. ‘ माझ्या मार्गांत अडथळे आणणाऱ्यांच्या बाबतींत मी सहनशीलता ठेवावी कीं त्यांचा नाश करावा ? ’ हा प्रश्न जिज्ञासूच्या पुढें उभा झाला. जर नाश करीत जावें तर आपली प्रगति न होतां आपण आहोंत तेथेंच राहतों, असें त्यानें पाहिलें. जर सहनशीलता ठेवली तर तो पुढें जातो. नाशाच्या पहिल्या कृतीनेंच त्याला आढळून आलें कीं ज्या सत्याचा तो शोध करीत आहे तें आपल्या बाहेर नाहीं, अंतरांत आहे. त्यामुळें तो जसजसा हिंसेचा आसरा घेत गेला तसतसा तो मागें पडत गेला, सत्य त्याच्यापासून दूर दूर गेलें. कारण, बाहेरच्या काल्पनिक शत्रूशीं लढतांना त्यानें अंतरांतील शत्रूकडे दुर्लक्ष केलें.

अहिंसेचें जें ढोबळ स्वरूप आपल्यापुढें आज मांडलें जातें तीच कांहीं अहिंसा नव्हे. कोणाची हत्या मुळींच करूं नये ही तर अहिंसा आहेच, पण तें तिचें बाहेर दिसणारें यत्किंचित् स्वरूप आहे. प्रत्येक कुविचार हिंसा आहे.

उतावीळपणा ही हिंसा आहे. मिथ्या भाषण हिंसा आहे. एखाद्याचें वाईट चिंतणें हिंसा आहे. जें जगाला हवें तें हट्टानें आपल्या ताब्यांत ठेवणें हीसुद्धां हिंसा आहे. परंतु आपण जें खातों तें जगाला हवें असतें. जेथें आपण उभे आहोंत तेथें शेंकडों सूक्ष्म जीव असतात ते तुडविले जातात; ती जागा त्यांची आहे. मग काय आत्महत्या करावी ? तरी सुटका नाहीं. विचारांत देहाविषयींची जेवढी आसक्ति असेल तेवढी सर्व जर सुटली तरच शेवटीं देह आपल्याला सोडील. हें नित्य जागरूक स्वरूप म्हणजे सत्यनारायण. त्याचें दर्शन उतावीळपणानें मुळींच होणार नाहीं. देह आपला नाहीं, ती आपल्याकडे असलेली ठेव आहे, असें समजून त्याचा होऊं शकेल तो उपयोग करून आपण आपला मार्ग काढावा...

...अहिंसेवांचून सत्याचा शोध अशक्य आहे. अहिंसा व सत्य हीं इतकी एकरूप आहेत कीं जशा कांहीं एकाच नाण्याच्या दोन बाजू किंवा गुळगुळीत चकतीच्या दोन बाजू. त्यांत उलटी कोणती आणि सुलटी कोणती ? तरी अहिंसेला आपण साधन समजूं, सत्य हें साध्य मानूं. साधन ही आपल्या हातची गोष्ट आहे म्हणून अहिंसा परमधर्म झाली. सत्य हें परमेश्वर झालें. साधनाची चिंता वाहात राहूं तर साध्याचें दर्शन केव्हां का होईना आपल्याला होईलच. इतका निश्चय झाला कीं जिंकली म्हणून समजा. आपल्या मार्गांत वाटेल तीं संकटें येवोत, बाह्य दृष्टीनें पाहतां आपली वाटेल तितकी हार झालीसें दिसो, तरी आपण विश्वास न सोडतां एकच मंत्र जपावा—सत्य आहे, तेंच आहे, तेंच एक परमेश्वर; त्याचा साक्षात्कार करण्याचा एकच मार्ग, एकच साधन म्हणजे अहिंसा; ती कधीं मी सोडणार नाहीं. ज्या सत्यरूपी परमेश्वराच्या नांवानें ही प्रतिज्ञा केली आहे तो तिचें पालन करण्याचें बळ मला देवो. २

अहिंसेमध्यें अगदीं मूलभूत आवश्यक गोष्ट उचित विचार ही आहे. उचित विचार म्हणजे काय ? ' असें कोणी विचारतील. उचित विचार म्हणजे उचित चिंतन किंवा उचित आंखणी नव्हे; त्याचा अर्थ मूलभूत तत्त्वांचें बरोबर आकलन होणें हा आहे. उदाहरणार्थ, 'ईश्वर आहे' हा उचित विचार आहे. आणि 'ईश्वर नाहीं' हा अनुचित विचार

आहे. 'मी प्रामाणिक असलें पाहिजे' हा उचित विचार आणि 'मी अप्रामाणिक व्हायला हरकत नाहीं' हा अनुचित विचार.

मनाला उचित विचाराची संवय लागली कीं उचित कृति आपोआप घडते; पण मन अनुचित विचाराकडे वळलें कीं अनुचित कृति त्याच्या मागोमाग यायचीच. आणि जरी परिस्थिति मनुष्याला उचित विचाराकडे नेत असली तरी जर मन अनुचित विचाराकडे वळलेलें असेल तर उचित कृति होऊनसुद्धां तिच्यांत निश्चयात्मिका शक्ति येत नाहीं आणि उचित कृतीचीं सर्व फळेंहि कर्त्याच्या पदरांत पडत नाहींत.

उचित विचार नसेल तर अहिंसेंत श्रद्धेची–किंवा निष्ठेची म्हणा – प्राणभूत शक्ति कधीं येणार नाहीं तसेंच जो मनुष्य नित्य उचित विचार करणारा नाहीं, (त्याला त्याची इच्छा असली तरी) अमुक वेळीं आपण यथोचितच वागूं असा भरंवसा बाळगतां येणार नाहीं. ३

जसजसा मी सत्याचा शोध करीत जात आहें तसतसें सत्यामध्यें सर्व कांहीं येऊन जातें असें मला भासतें. अहिंसेंत सत्य आहे असें नव्हे तर सत्यांत अहिंसा आहे, असें पुष्कळ वेळां मला दिसतें. निर्मळ अंतःकरणाला ज्या वेळीं जें वाटेल तें सत्य. त्याला चिकटून राहिल्यानें शुद्ध सत्य आपोआप लाभतें. त्यांत कोठें धर्मसंकटहि मला दिसत नाहीं. पण अहिंसा कशाला म्हणावें त्याचा निर्णय करतांना पुष्कळ वेळां अडचण येते. जंतुनाशक पाण्याचा उपयोग हीसुद्धां हिंसा आहे. हिंसामय जगांत अहिंसामय होऊन राहणें प्राप्त आहे. तें अर्थात् सत्याला चिकटून राहण्यानेंच होणार. म्हणून मी आपला सत्यामधूनच सरळ अहिंसा निष्पन्न होते असें समजतों. सत्यांतून प्रेम मिळतें. सत्यांतून मृदुता मिळते. सत्यवादी, सत्याग्रही हा अत्यंत नम्र असला पाहिजे. त्याच्यांत सत्य जसजसें वाढत जाईल तसतसा तो नम्र बनत जाईल. हें मी क्षणोक्षणीं अनुभवीत आहें. मला आज सत्याची जितकी जाणीव आहे तितकी वर्षापूर्वीं नव्हती आणि आज माझी अल्पता मला जितकी भासते तितकी एक वर्षापूर्वीं भासत नव्हती. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या वाक्याचा चमत्कार दिवसेंदिवस वाढत जात असलेला मला भासत आहे.

म्हणून आपण नेहमीं धीर धरावा. धीर धरल्यानें आपल्यांतली

कठोरता निघून जाईल. ती गेल्यानें आपल्यांत सहिष्णुता वाढेल. आपल्या चुका आपल्याला पर्वतासमान वाटतील आणि जगाच्या चुका मोहरी-एवढ्या वाटतील. शरीराचें अस्तित्व अहंकारामुळें आहे. शरीराचा आत्यंतिक नाश म्हणजे मोक्ष. अहंकाराचा आत्यंतिक नाश ज्याच्या चित्तांत झाला तो म्हणजे सत्याची साक्षात् मूर्ति बनतो. त्याला ब्रह्म म्हणायलाहि हरकत नाहीं. याकरितांच ईश्वराचें सुंदर नांव दासानुदास हें आहे.

स्त्री, पुत्र, मित्र, परिग्रह हें सर्व सत्याच्या आधीन असलें पाहिजे. सत्य शोधत असतांना त्या सर्वांचा सर्वथा त्याग करण्याला जर आपण तत्पर राहूं तरच सत्याग्रही होणें शक्य आहे.

या धर्माचें पालन कांहीं अंशीं तरी सोपें व्हावें अशा हेतूनें मी या चळवळींत पडलों आहें. या चळवळीचें बाह्य स्वरूप हिंद-स्वराज्य आहे. तिचें खरें स्वरूप म्हणजे त्या व्यक्तीचें स्वराज्य हें आहे. अजून एकहि असा सत्याग्रही सिद्ध झालेला नाहीं त्यामुळें विलंब होत आहे. पण म्हणून घाबरण्याचें मुळींसुद्धां कारण नाहीं. त्यानें आपले प्रयत्न वाढावेतच. ४

' सत्य हें ईश्वर आहे ' याचा अर्थ हा कीं पूर्ण सत्य हें ईश्वराप्रमाणेंच अनाकलनीय आहे. पण सत्य जेव्हां मनुष्यापुढें प्रकट होतें तेव्हां तें अहिंसेचा वेष परिधान करून येतें. अनाकलनीय असलेलें सत्य अहिंसेच्या रूपांत आकलनीय होतें. या रीतीनें अहिंसा हा जरी सत्याचा व्यक्त असा भाग असला तरी त्या व्यक्ताच्या पलिकडे सत्याचा अव्यक्त भाग राहतोच.

आणि अहिंसेच्या व्यक्त स्वरूपांतील सत्याचें दर्शनसुद्धां शुद्ध अनासक्त मनुष्यालाच होणें शक्य आहे. क्रोध, लोभ, अहंकार, भय या सर्वांमुळें सत्य-शोधकाच्या डोळ्यांवर पडदा येतो.

असें असल्यामुळें, अहिंसेच्या बाह्यतः ' हिंसक ' भासणाऱ्या प्रकारांचा प्रयोग ऋषी, तपस्वी आणि योगी हेच खरोखर बिनधोकपणें करूं शकतात. सामान्य मनुष्याला जर या धोक्याच्या क्षेत्रांत खोलांत शिरण्याची जोखीम पत्करणें जरूरीचें वाटलें तर त्यानें स्वतःची कांहीं रीतींनीं परीक्षा घ्यावी; उदा० दरेक जिवंत प्राण्याच्या—म्हणजे मनुष्याच्या किंवा मनुष्येतर प्राण्याच्या बाबतींत जसें आपण वागतों तसेंच आपण आपल्या स्वतःच्या

मुलाशींसुद्धां वागूं काय, असा प्रश्न त्यानें स्वतःला विचारावा; जेथें मन साशंक असेल तेथें 'आपल्या मनाविरुद्ध' निर्णय करावा.

ही परीक्षा देखील उन्नत अवस्थेंतील मनुष्यालाच लागू आहे हें सांगण्याची गरज नाहीं. ५

अहिंसा हें एखाद्या विशिष्ट प्रसंगींच, किंवा एखादा विशिष्ट पक्ष किंवा वर्ग यांच्या बाबतींतच आचरावयाचें तत्त्व किंवा सद्‌गुण आहे असें नव्हे. अहिंसा ही आपल्या जीवनाचेंच अविभाज्य अंग बनली पाहिजे. आपल्या अंतःकरणांतून क्रोध पार निघून गेला पाहिजे, नाहींपेक्षां आमच्यांत आणि आमच्यावर जुलूम करणाऱ्यांत फरक तो काय राहिला? क्रोध एखाद्याला गोळीबाराचा हुकूम काढायला लावील, दुसऱ्याला शिवीगाळ करायला लावील, तर तिसऱ्याला लाठी चालवायला लावील. सर्वांचें मूळ एकच आहे. आपल्या अंतःकरणांत क्रोधाची भावना उत्पन्न होणें किंवा तिला थारा मिळणें जेव्हां अशक्य होईल तेव्हांच हिंसा टाकून दिली असल्याचा दावा आपल्याला सांगतां येईल, किंवा अखेरपर्यंत आपण अहिंसक राहूं अशी अपेक्षा बाळगतां येईल. ६

अहिंसा हें अत्यंत उदात्त असें क्रियात्मक तत्त्व आहे. ती आत्मशक्ति किंवा आपल्या अंतर्यामीं वसत असलेली परमात्मशक्ति आहे. त्या प्राणभूत तत्त्वाचें संपूर्ण आकलन अपूर्ण मनुष्याला होणें शक्य नाहीं–त्याचें पूर्ण तेज त्याला सहनच होणार नाहीं; परंतु त्याचा अतिसूक्ष्म अंशसुद्धां जेव्हां आपल्यांत क्रियावान् होतो तेव्हां तो चमत्कार घडवून आणूं शकतो...आपण जितकी अहिंसा साधूं तितक्या प्रमाणांत आपण ईश्वरासमान होऊं. पण आपण पूर्णांशानें ईश्वर कधीं होऊं शकणार नाहीं. अहिंसेचा परिणाम रेडियमसारखा आहे. त्याचा यत्किंचितहि अंश एखाद्या दुर्धर रोगग्रस्त भागांत घालून ठेवला तर तो जसा सातत्यानें, बिनबोभाटपणें व अव्याहत-पणें आपलें काम करीत जातो आणि शेवटीं सबंध रोगट भागाला निरोगी करून सोडतो, त्याचप्रमाणें खरी अहिंसा अंशमात्र जरी असली तरी ती बिनबोभाटपणें व सूक्ष्म, अदृश्य रीतीनें परिणाम करीत जाते आणि तिच्यामुळें सारा समाज विरजलेल्या दुधासारखा बदलून जातो.

अहिंसा ही स्वयंक्रियाशील आहे मृत्यूनंतरसुद्धां जसा आत्मा राहतो, त्याचें अस्तित्व पार्थिव शरीरावर अवलंबून नसतें, याच रीतीनें अहिंसेला किंवा आत्मशक्तीलासुद्धां स्वतःचा विस्तार किंवा परिणाम करण्याकरितां पार्थिव साधनसामग्रीची गरज नसते. तसल्या मदतीशिवायसुद्धां ती स्वतंत्रपणें काम करते. तीं स्थळ-काळातीत आहे.

यावरून, अहिंसा जर एके ठिकाणीं यशस्वी रीत्या सिद्ध झाली तर तिचा प्रभाव सर्वत्र पसरेल हें ओघानेंच येतें. अहिंसेचा आचार ज्या एका मूलभूत सिद्धान्तावर आधारलेला आहे तो सिद्धान्त हा कीं, जें तुमच्या स्वतःच्या बाबतींत खरें तें सगळ्या विश्वाच्या बाबतींत तितकेंच खरें. मुळांत सगळी मानवजात ही एक आहे. म्हणून जें मला शक्य आहे तें कोणालाहि शक्य आहे. याच तर्कपद्धतीला अनुसरून मी अशा निर्णयावर आलों कीं जर मला कोणत्याहि एका खेड्यांत उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांचे अहिंसक उपाय सांपडूं शकले तर त्यावरून मिळालेल्या धड्यानें हिंदुस्तानांतील तशाच स्वरूपाचे सर्व प्रश्न मला अहिंसक रीतीनें अवश्य सोडवितां येतील. ७

'अहिंसा' या शब्दानें आपण जितका आशय व्यक्त करूं इच्छितों तितका सगळा आशय त्या शब्दानें प्रत्यक्ष प्रकट होत नाहीं, त्यामुळें तो शब्द अपूर्णच आहे. म्हणून त्या शब्दाकरितां इंग्रजी 'नॉन्-व्हायोलन्स' हा प्रतिशब्द तोकडा पडतो. त्यापेक्षां अधिक समर्पक प्रतिशब्द म्हणजे प्रेम किंवा सद्भाव असा होईल. आणि सद्भावाला तेव्हांच अवसर मिळतो कीं जेव्हां असद्भाव त्याच्या सामन्याला उभा असेल. भल्याशीं भलें होणें हा सौदा समसमान झाला. रुपयाला रुपया दिल्यानें त्या देण्यांतला विशेष गुण कळून येत नाहीं. पण तोच रुपया जर एका आण्याच्या बदल्यांत दिला तर तें मूल्य हमखास समजून येतें. याच रीतीनें, असज्जन माणसाच्या तोडीला सज्जन मनुष्य उभा राहिला तरच तो वैशिष्ट्यानें ओळखूं येतो.

ही अहिंसा किंवा सद्भावना इंग्रजाविरुद्धच उपयोगांत आणायची नसून आमच्या आपापसांतसुद्धां तिला पूर्ण वाव मिळाला पाहिजे. इंग्रजाविरुद्ध आचरलेली अहिंसा आपद्धर्म ठरूं शकेल, आणि म्हणून ती भ्याडपणावरचें किंवा क्षुद्र दौर्बल्यावरचें आवरणहि होऊं शकेल. एखाद्या

विशिष्ट प्रसंगापुरता योजण्यांत आलेला उपाय म्हणूनहि तिचा उपयोग होईल. पुष्कळ वेळां होतोहि. परंतु जेव्हां हिंसा कीं अहिंसा अशी आपल्याला निवड करायची असते तेव्हां मात्र ती तसा तात्पुरता उपाय होऊं शकणार नाहीं. अशीं उदाहरणें घरगुती संबंधांत, आमच्या आमच्यांतल्या सामाजिक व राजकीय संबंधांत आणि एकाच धर्माच्या प्रतिस्पर्धी संप्रदायांतच नव्हे तर भिन्नधर्मीय व्यक्तींच्या संबंधांतहि घडून येतात. आपण आपल्या शेजाऱ्यांच्या आणि सोबत्यांच्या बाबतींत जर असहिष्णु असलों तर शत्रूच्या बाबतींत आपण खऱ्या रीतीनें सहिष्णु होऊंच शकणार नाहीं. म्हणून जर आपल्यांत कांहीं सद्भाव असेल तर त्याची जवळजवळ रोजच्या रोज कसोटी होत जाईल. आणि जर तो आपण सक्रिय रीतीनें अमलांत आणला तर त्याचा अधिक व्यापक क्षेत्रांत उपयोग करण्याचा आपल्याला सराव पडेल आणि शेवटीं तो आपला एक स्वभावच बनून जाईल. ८.

आपल्या दैनंदिन जीवनांत आपण एकमेकांशीं जाणून अथवा अजाणतां अहिंसक रीतीनेंच वागत असतों. सर्व सुसंघटित समाजांचा पाया अहिंसाधर्म हा आहे. आजूबाजूला सर्वत्र विनाश चालू असतांनासुद्धां त्यामध्ये जीवन टिकाव धरून राहतें यावरून विनाशाहूनहि श्रेष्ठ असा एक ईश्वरी नियम असला पाहिजे असें मला दिसून आलें. असा नियम असेल तरच सुसंघटित समाजाची उपपत्ति लागूं शकते आणि जीवन जगण्यालायक बनतें. अर्थात् असा जीवनाचा नियम जर असेल तर रोजच्या जीवनांत आपल्याला तो प्रयत्नपूर्वक अमलांत आणावा लागेल. जेथें जेथें विसंवाद असतील, जेथें जेथें विरोध उभा होत असेल, तेथें तेथें त्याला प्रेमानें जिंकावें. मी आपल्या ओबड-धोबड रीतीनें तें स्वतःच्या जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. याचा अर्थ माझ्या सर्व अडचणी नाहींशा झाल्या आहेत असा नाहीं. परंतु मला असें दिसून आलें कीं, हा प्रेमाचा नैसर्गिक नियम जसा मला जीवनांत उपयोगी पडला तसा विनाशाचा नियम कधींहि उपयोगी पडला नाहीं.

मनाची वृत्तिच अहिंसक बनावी याकरितां बरेंच कष्टपूर्वक शिक्षण घेण्याची गरज असते. आपल्याला आवडो न आवडो, आपला रोजचा

जीवनक्रम नियमबद्ध व्हावा लागतो—जसा एकाद्या सैनिकाचा असतो तसा. परंतु याला जर मनाचें पूर्ण सहकार्य नसेल तर केवळ बाह्य आचरण हें निव्वळ सोंग होईल, तें त्या मनुष्याला स्वतःला आणि इतरांनाहि घातक ठरेल. मन, शरीर आणि वाणी या तिहींचा परस्परांशीं योग्य मेळ साधला म्हणजेच पूर्णावस्था प्राप्त होते. परंतु हें नेहमीं तीव्र मानसिक संघर्षाचें काम असतें. उदाहरणार्थ, मला कधीं राग येत नाहीं असें नाहीं; परंतु बहुधा अशा सर्व प्रसंगीं मीं माझ्या भावना ताब्यांत ठेवण्यांत यश मिळविलें आहे. परिणाम कांहीं होवो, पण अहिंसेचा नियम विचारपूर्वक आणि अखंडितपणें पाळण्याची धडपड जागरूकतेनें माझ्या मनांत निरंतर चालू असते. या धडपडींतून मनुष्याची शक्तीच वाढते. अहिंसा हें बलवानाचें शस्त्र आहे. दुर्बलाच्या हातांत तिला दंभाचें रूप येण्याचा सहज संभव असतो. भय आणि प्रेम हे परस्परविरुद्ध शब्द आहेत. समर्पणाच्या बाबतींत प्रेम हें बेदरकार असतें, आपल्याला मोबदल्यांत काय मिळणार याचें त्याला भानहि नसतें. प्रेम हें स्वतःशीं तसेंच जगाशीं झुंज देतें आणि इतर सर्व भावनांवर अंतीं प्रभुत्व मिळवितें. माझा, आणि माझ्यासोबत काम करणाऱ्यांचाहि, रोजचा अनुभव असा आहे कीं, सत्य-अहिंसेचा नियम हाच जीवनाचा नियम बनविण्याचा जर आपण निश्चय केलेला असला तर कसलाहि प्रश्न असो, त्याची उकल आपल्याला मिळू शकते. कारण माझ्या मतें सत्य आणि अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

गुरुत्वाकर्षणाचा सृष्टिनियम आपल्याला मान्य होवो वा न होवो, तो जसा अमलांत येतोच, तसा सत्य-अहिंसेचा नियम अमलांत यायचाच. एखादा शास्त्रज्ञ ज्याप्रमाणें निसर्गाचे नियम निरनिराळ्या प्रकारें उपयोगांत आणून चमत्कार घडवून आणील, त्याप्रमाणें जो मनुष्य शास्त्राच्या बारकाव्यानें प्रेमाचा नियम व्यवहारांत आणतो त्याला त्याहून महान् चमत्कार घडवून आणतां येतील. कारण निसर्गाच्या भौतिक शक्तीहून, म्हणजे उदाहरणार्थ विजेच्या शक्तीहूनहि, अहिंसेची शक्ति अधिक अद्‌भुत, चमत्कृतिपूर्ण आणि अधिक सूक्ष्म आहे. ज्या पुरुषांनीं आम्हांला हा प्रेमाचा नियम शोधून दिला ते आजच्या आमच्या कोणत्याहि शास्त्रज्ञांपेक्षां थोर शास्त्रज्ञ होते. एवढेंच कीं खोलांत शिरून संशोधन करण्यांत आमची पुरेशी प्रगति झालेली नाहीं

आणि त्यामुळें प्रेमाच्या नियमाचे सर्व व्यापार प्रत्येक माणसाला आकलन होणें शक्य होत नाहीं. कदाचित् हा माझा भासहि असेल, पण त्यानें मला ग्रासलें आहे खरें. या नियमाचा जितका जितका मी प्रयोग करून पाहात आहें तितका मला जीवनांत आणि विश्वाच्या योजनेंत आनंद लाभला आहे. त्यांतून मला जी शांति लाभते आणि निसर्गाच्या रहस्यांचा जो उलगडा होतो तो अवर्णनीय आहे. ९

प्रेम हा जीवनाचा आदि आणि अंत आहे. आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व उपदेशकांनीं कमी-जास्त आवेशानें याच प्रेमधर्माचा उपदेश केला आहे. प्रेम हें जर जीवनाचें सूत्र नसतें तर सभोंवार मृत्यु असतांना जीवन टिकूनच राहिलें नसतें. जीवन हा मृत्यूवर मिळविलेला सनातन विजय आहे. मनुष्य आणि पशु यांच्यांत मूलभूत असा जर कोणता भेद असेल तर तो हा कीं, मनुष्याला या नियमाची आणि तो आपल्या व्यक्तिगत जीवनांत प्रत्यक्ष कसा लागू करायचा याची उत्तरोत्तर अधिकाधिक ओळख होत जाते. जगांतल्या प्राचीन आणि अर्वाचीन संतांपैकीं प्रत्येकजण स्वतःच्या ज्ञानानुसार आणि शक्तिअनुसार मनुष्यजीवनाच्या या सर्वश्रेष्ठ धर्माचें चालतें बोलतें उदाहरण होता. आमच्यांतील पशुवृत्ति अनेक वेळां आमच्या-वर सहज मात करीत असलेली दिसते हें खरें आहे; पण म्हणून त्यामुळें हा नियम खोटा ठरत नाहीं. त्याचा आचार किती अवघड आहे एवढेंच त्यावरून दिसून येतें. आणि जो नियम साक्षात् सत्याइतकाच अत्युच्च आहे तो आचरणाला तितकाच अवघड असणार नाहीं तर काय? त्याचा आचार जेव्हां सार्वत्रिक होईल तेव्हां ईश्वराचें राज्य स्वर्गाप्रमाणेंच पृथ्वी-वरहि चालू लागेल...बाह्यात्कारी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आमच्या डोळ्यादेखत शक्य झाल्याचीं उदाहरणें आधुनिक विज्ञानांत भरपूर सांपडतील. परंतु जीवनशास्त्राच्या विजयापुढें भौतिक विज्ञानाचे हे विजय कांहींच नव्हत, आणि हें जीवनशास्त्र आमच्या अस्तित्वाचें सूत्र असलेल्या प्रेमभावनेंत एकवटलें आहे. ही गोष्ट युक्तिवादानें सिद्ध करतां येण्याजोगी नाहीं हें मला माहीत आहे. स्वतःवर होणाऱ्या परिणामांची मुळींच क्षिति न बाळगतां आपल्या जीवनांत तें प्रत्यक्ष जगून दाखविणाऱ्या लोकांच्या द्वारांच तें सिद्ध होईल. बलिदानावांचून खरा लाभ नाहीं. आणि प्रेम-

धर्माचें प्रत्यक्ष दर्शन हा मोठ्यांत मोठा वास्तविक लाभ असल्यामुळें त्या करितां आवश्यक असणारा त्यागहि तितकाच महान् असला पाहिजे. १०

द्वेषाचीं कारणें सर्व ठिकाणीं आपल्या दृष्टीवर येऊन आदळतात. पण पूर्वीच्या द्रष्ट्यांनीं परिस्थितीला तोंड देण्याचा एकच मार्ग पाहिला आणि तो हा कीं द्वेषाला प्रेमानें निष्प्रभ करायचें. ११

द्वेष हा मारक आहे, प्रेमाला कधीं मरण नाहीं. अशी या दोहोंमध्यें फार मोठी तफावत आहे. प्रेमानें जें मिळतें तें कायमचें टिकून राहतें. द्वेषानें जें पदरांत पडतें तें अनुभवान्तीं भाररूप ठरतें, कारण तें उलट द्वेषच वाढवितें. मनुष्यप्राण्याचा धर्म द्वेष कमी करीत जाणें आणि प्रेम वाढविणें हा आहे. १२

सत्याग्रह अंमलांत आणीत असतांना, सुरुवाती सुरुवातीच्या अवस्थांतच मला असा शोध लागला कीं, सत्याचा मागोवा घेत असतांना आपल्या विरोधकावर हिंसेचा प्रयोग करण्याला वाव नसतो, तर त्याला त्याच्या चुकीपासून धीरानें व सहानुभूतिपूर्वक परावृत्त करायचें असतें. कारण, एकाला जें सत्य वाटतें तें दुसऱ्याला चुकीचें वाटण्याचा संभव आहे. धीर म्हणजे स्वतः दुःख सहन करणें. यावरून त्या सिद्धान्ताचा अर्थ, सत्याची स्थापना विरोधकाला यातना भोगायला लावून नव्हे तर स्वतः यातना सोसून करणें, असा झाला. १३

दुसऱ्यांची जास्तींत जास्त सोय करून देणें आणि त्याकरितां स्वतः अधिकाधिक गैरसोय सोसणें—फार काय जीव गमावण्याचा धोकाहि पत्करणें यांत अहिंसाधर्म आहे. १४

व्यक्तींच्या प्रमाणेंच राष्ट्रें हीं येशूप्रमाणें दुसऱ्याकरितां आत्मक्लेश सहन करण्यांतूनच उभारलीं जाऊं शकतात, दुसऱ्या कोणत्याहि मार्गांनीं नाहीं, असें मला दिसून आलें. दुसऱ्यांना यातना देण्यांतून नव्हे तर स्वतः स्वेच्छेनें यातना सोसण्यांतून आनंदाचा लाभ होतो. १५

प्रतिपक्ष्याविषयीं सौजन्य आणि त्याचा दृष्टिकोण समजून घेण्याविषयीं उत्कंठा हा अहिंसेचा श्रीगणेशा आहे. १६

सत्याचा आग्रह ठेवल्यामुळेंच तडजोड करण्यांत असलेल्या सौंदर्याचें

मोल जाणण्याला मी शिकलों. पुष्कळ वेळां तडजोड करणें म्हणजे आपला जीव धोक्यांत घालणें आणि मित्रांचा राग ओढवून घेणें असें होतें. पण सत्य हें वज्राहूनहि कठोर आणि कुसुमाहूनहि कोमल आहे. १७

अहिंसा हें सर्वत्र लागू होणारें तत्त्व आहे. आणि प्रतिकूल परिस्थितीमुळें कांहीं तिचें कार्य मर्यादित होत नाहीं. नव्हे, विरोध होत असतांना त्याची दरकार न बाळगतां अहिंसा जेव्हां अंमलांत येते तेव्हांच तिची खरी कसोटी होते. १८

इतरांशीं आपले वैयक्तिक संबंध ठेवतांना जर अहिंसा आचरणांत आणली नाहीं आणि मोठ्या कार्यांत ती आपण अंमलांत आणूं अशी कोणी आशा बाळगली तर ती फार मोठी गैरसमजूत आहे. औदार्या-प्रमाणेंच अहिंसेलासुद्धां अगोदर आपल्या घरापासून सुरुवात झाली पाहिजे. पण व्यक्तीला जर अहिंसेचें वळण देण्याची आवश्यकता असेल तर राष्ट्राला तसें वळण देण्याची तर अधिकच आवश्यकता आहे. कोणीहि स्वतःच्या परिसरांत अहिंसक रीतीनें आणि त्याच्या बाहेर मात्र हिंसक रीतीनें असें वागूं शकणार नाहीं. एकमेकांना नुसतें चालवून घेणें म्हणजे कांहीं अहिंसा नव्हे. अहिंसा हा जीवनाचा कायदा आहे अशी एकदां तुमची खात्री पटली कीं तुमच्याशीं जे हिंसकपणें वागत असतील त्यांच्याशीं वागतांना तुम्हांला ती आचरणांत आणावी लागेल. आणि हा कायदा जसा व्यक्तीला तसाच राष्ट्रांनाहि लागू होणें भाग आहे. १९

अहिंसा संपूर्ण स्वरूपांत प्रकट व्हायची असेल तर त्याकरितां एकाच पक्षाची तिच्यावर श्रद्धा असणें अगत्याचें आहे. जर दोन्ही पक्षांची अहिंसेवर श्रद्धा असेल आणि तदनुसार त्यांचा आचार होत असेल तर अहिंसेंतलें खरें स्वारस्य किंवा तिचें विशेषत्वानें दर्शन त्यांत होणार नाहीं. एकमेकांनीं शांतीनें राहणें ही गोष्ट अगदीं स्वाभाविक अशी आहे. पण त्यायोगें अहिंसेच्या आचारांत जें श्रेय आहे तें दोहोंपैकीं एकाहि पक्षाला लाभत नाहीं. २०

अहिंसेचीं अंगें दया, अक्रोध, अमान वगैरे आहेत. सत्याग्रहाचा पाया अहिंसाधर्म आहे. तो आपण व्रत म्हणून मानला पाहिजे. या विचारांतूनच

पुढें असें निघालें कीं, आपण सर्व यम पाळले पाहिजेत; आणि व्रत म्हणून पालन करतांनाच त्या धर्माचें सूक्ष्म स्वरूप आपल्याला दिसून येऊं शकतें... हीं व्रतें पाळण्यांतच हिंदुस्तानाचा व आपला मोक्ष आहे हें मला प्रत्यक्ष दिसत आहे.

### अपरिग्रह

अपरिग्रह व्रत पाळतांना मुख्य गोष्ट ही लक्षांत ठेवायची आहे कीं, जरूर नसलेलें कांहींहि सांठवून ठेवायचें नाहीं. उदा० शेती करतांना बैल पाहिजे असले तर ते आणि त्यांना लागणारें सामान आपण घेऊन ठेवूं; दुष्काळाचें सदोदित भय असेल तेथें धान्य सांठवून ठेवूं; पण बैलांची किंवा धान्याची जरूर आहे का हा प्रश्न सदोदित आपण स्वतःला विचारीत राहूं. सर्व नियम आपण विचारीपणानें पाळायचे आहेत. त्यामुळें त्यांत दिवसेंदिवस आपण दृढ होत जाऊं आणि आपणांस नवे नवे त्याग सुचत जातील. त्याग करण्याला कांहीं मर्यादाच नाहीं. त्याग जितका अधिक तितकें आत्म्याचें दर्शन अधिक होईल. मनाचा कल परिग्रहाचा त्याग करण्याकडे असेल आणि शरीरशक्ति-अनुसार जर आपण त्याग करूं तर अपरिग्रह व्रत पाळलें असें म्हणतां येईल.

### अस्तेय

तीच गोष्ट अस्तेयाविषयीं. अपरिग्रहांत, नको असलेल्या वस्तूंच्या असंग्रहाचा समावेश होतो. अस्तेयांत, नको असलेल्या वस्तूंचा वापर न करणें येतें. एका सद्र्यानें भागत असतांना जर मी दोन वापरले तर दुसऱ्याची मी चोरी केली. कारण ज्याचा उपयोग दुसऱ्याला होऊं शकला असता तो सदरा माझा म्हणतां येणार नाहीं....अशा रीतीनें फाजील वापर हा अहिंसा-व्रताचाहि भंग आहे. अस्तेयभावनेनें जर आपण वापर कमी करीत जाऊं तर आपल्यांत उदारता वाढेल. जर अहिंसाभावनेंतून वापर कमी केला तर दयाभाव वाढेल. जीवमात्राला नेहमीं आपण अभयदान देतों त्यांत दयेचा—प्रेमाचा विचार असतो. तो विचार जो करील त्याला स्वप्नांतसुद्धां कोणी जीव विरोधी होणार नाहीं, हा शास्त्राचाच निर्णय समजा. तसा माझा अनुभवहि आहे.

या सर्व व्रतांचें सूत्र सत्य हें आहे. स्वतःच्या मनाची फसवणूक करून घेऊन चोरी ही चोरी नव्हे, परिग्रह हा परिग्रह नव्हे, अशी आपण स्वतःची

समजूत करून घेण्याचा संभव आहे. म्हणून पावलोपावलीं अतिशय सूक्ष्म विचार करूनच सत्याचें आपल्याला प्रवर्तन करतां येईल. अमुक वस्तूचा संग्रह करावा कीं नाहीं अशी शंका आली कीं संग्रह न करावा हा सरळ नियम समजावा. त्यागांत सत्याचा भंग नाहीं. जेथें बोलावें कीं बोलूं नये अशी शंका असेल तेथें मौन धरणें हें सत्यव्रती मनुष्याचें कर्तव्य आहे. २१

## अभय

अभयावांचून सत्याचा शोध होऊं शकणार नाहीं. अभयावांचून अहिंसेचें पालन कसें होऊं शकेल? 'हरिनो मारग छे शूरानो, नहीं कायरनुं काम जो ने' (हरीचा मार्ग हा शूराचा आहे, भेकडाचें येथें काम नाहीं). सत्य हाच हरि...शूर म्हणजे भयमुक्त, तलवार इत्यादींनीं सज्ज असलेला नव्हे. तलवार धरणाऱ्याला शूर म्हणत नाहींत, ती भयाची खूण आहे.

अभय म्हणजे सर्व बाह्य भयांपासून मुक्तता. मरणाचें भय, संपत्ति लुटली जाण्याचें भय, कुटुंबपरिवाराविषयींचें भय, रोगाचें भय, शस्त्र-प्रहाराचें भय, अब्रूचें भय, कोणाला वाईट वाटेल असें भय, अशी भयाची मालिका लांबवावी तितकी लांबू शकेल. एक मरणाचें भय जिंकलें कीं सर्व भयें जिंकलीं, असें सामान्यपणें म्हटलें जातें; पण तें बरोबर वाटत नाहीं. पुष्कळ लोक मरणाचें भय सोडतात, पण नाना प्रकारच्या दुःखांपासून दूर पळतात. कोणी स्वतः मरायला तयार होतात, पण आप्तेष्टांचे वियोग सहन करूं शकत नाहींत. कोणी कृपण हें सारें सोडून देईल, देह गमावील, पण सांठविलेलें धन टाकतांना त्याची छाती फाटेल. कोणी स्वतःची मानलेली अब्रू—प्रतिष्ठा—संभाळण्याकरितां अनेक काळींबेरीं कृत्यें करायला तयार होईल आणि करील. जगाच्या निंदेच्या भयानें कोणी सरळ मार्ग माहीत असूनसुद्धां तो धरायला धजणार नाहीं. सत्यशोधकाला या भयांना तिलांजलि दिल्यावांचून दुसरा मार्ग नाहीं. हरिश्चन्द्राप्रमाणें सर्वनाश करून घेण्याची त्याच्या मनाची तयारी असली पाहिजे.

अभयवृत्तीचें संपूर्ण पालन जवळजवळ अशक्य आहे. ज्याला आत्म-साक्षात्कार झाला असेल त्यालाच सर्व भयांपासून मुक्ति लाभते. अभय

म्हणजे जागरूक अवस्थेची पराकाष्ठा होय. निश्चय केल्यानें, सतत प्रयत्न करण्यानें आणि आत्म्यावरील श्रद्धा वाढविल्यानें अभयाचें प्रमाण वाढूं शकतें. मीं प्रारंभींच म्हटलें कीं, आपण सर्व बाह्य भयें टाकायचीं आहेत. अंतरांत जे शत्रू बसलेले आहेत त्यांना मात्र भिऊनच चाललें पाहिजे. कामक्रोधादींचें भय हें खरें भय. त्यांना जिंकलें कीं बाह्य भयांचा उपद्रव आपोआप नाहींसा होतो. भय तेवढें देहाला लागून आहे. देहावरची आसक्ति गेली कीं सहजच अभय प्राप्त होतें. असा विचार केला तर आपल्याला दिसून येतें कीं, भय म्हणून जेवढें आहे ती सर्व आपल्या कल्पनेची सृष्टि आहे. पैशांतून, कुटुंबांतून, शरीरांतून 'माझें' पण काढून घेतलें कीं भय कोठें राहिलें? 'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः' हें रामबाण वचन आहे. कुटुंब, पैसा, देह हीं आहेत तशीं राहूं द्यात. त्यांच्याविषयींची आपली कल्पना बदलली म्हणजे झालें. ती 'आपलीं' नव्हेत, 'माझीं' नव्हेत; ईश्वराचीं आहेत, 'मी'सुद्धां त्याचाच आहें; 'माझें' असें या जगांत कांहींच नाहीं. मग मला भय कशाचें? म्हणून उपनिषत्कारानें म्हटलें कीं, 'त्यांचा त्याग करून तें भोग.' म्हणजे आपण फक्त त्यांचे राखणदार राहावें, त्यांची राखण करण्यापुरती शक्ति आणि सामग्री त्या वस्तू आपल्याला देतील. अशा रीतीनें धनी न राहतां चाकर होऊं, शून्यवत् होऊं, तर सहजीं आपल्याला सर्व प्रकारचें भय जिंकतां येईल, शांति मिळवितां येईल, सत्यनारायणाचें दर्शन घेतां येईल. २२

एका गरीबाचें आणि श्रीमंताचें घर शेजारीं शेजारीं होतें. एके दिवशीं गरीबाच्या घरीं चोर आले. गरीब जागा झाला तों त्याला दिसलें कीं चोर आपल्या घरांत कांहीं शोधीत आहेत. त्यानें विचार केला, उगीच बिचाऱ्यांना कष्ट होतील. कारण माझ्या घरांत त्यांना मिळणार आहे काय? तो उठला आणि अतिशय थंडपणानें आणि धैर्यानें त्यानें चोरांना म्हटलें, 'जास्त कष्ट घेऊं नका, माझ्याजवळ जें कांहीं आहे तें मी तुम्हांला देऊन टाकतों.' असें म्हणून त्यानें चिंध्यांच्या गांठी सोडून एक दहा रुपयांची गुठली त्यांच्या स्वाधीन केली. चोरांना आश्चर्य वाटलें. पण लोभामुळें त्यांचे डोळे झांकलेले होते, म्हणून जास्त पैसे मिळविण्याच्या हेतूनें त्यांनीं शेजारच्या श्रीमंताच्या घरावर दरोडा घातला. तो श्रीमंत जागाच होता आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 21968 वि. क्रमांक 2302 दिनांक

त्यानें सर्व बोलणें ऐकलें होतें. तो नवल करीत राहिला होता कीं, चोरच्या गरीबाच्या घरांतून हात हलवीतच परत जाणार [illegible] त्यानें आपल्या हातांनीं आपली सारी पुंजी चोरांच्या स्वाधीन केली, तर आतां मीसुद्धां माझी पुंजी चोरांना कां नये देऊन टाकूं ? एवढ्यांत चोरांनीं त्याचा दरवाजा खडखडावला. श्रीमंतानें लगेच दरवाजा उघडला आणि चोरांना म्हटलें, या, तुम्हांला जें पाहिजे तें मी देतों. चोर घरांत घुसले, पण त्यांच्या मनांत मंथन सुरू झालें कीं हें चाललें आहे काय ? त्या श्रीमंतानें आपला सर्व पैसा चोरांच्या पुढें आणून ठेवला. तेवढ्यानें चोरांच्या मनांत देव जागा झाला, त्यांनीं त्या श्रीमंताचा आणि गरीबाचा सारा पैसा तेथेंच टाकून दिला आणि यापुढें चोरी न करण्याची प्रतिज्ञा करून ते सज्जन बनले.

मी अशाच रीतीनें हिंसेच्या तोंडांत अहिंसेला झोकून देऊं इच्छितों. शेवटीं केव्हां ना केव्हां तरी हिंसेची भूक शांत होईलच. जर दुनियेला शांतिपूर्वक जगायचें असेल तर माझ्या माहितीप्रमाणें दुसरा मार्ग नाहीं. २३

मी तुम्हांला आणि स्वतःलाहि विचारतों कीं आपली अहिंसा बलवानाची असली पाहिजे ना ? मग तशी ती आहे का ? कीं ती दुर्बळाची आहे ? दुर्बळाच्या हातीं कांहीं प्रमाणांत तिचा परिणाम दिसून येतो हें खरें आहे. पण ती जेव्हां आमच्या दुर्बळतेचा बुरखा बनते, तेव्हां तसल्या अहिंसेनें आपलें पौरुष खच्ची होतें. पौरुषाची हानि होण्यापेक्षां शरीरबळाचा वापर करणाऱ्यांचें शौर्य मी अधिक बरें म्हणेन. भ्याडपणापेक्षां लढत लढत मरण पत्करणें किती तरी चांगलें. आपण सर्व मुळांत पशू होतों आणि त्या पशु-अवस्थेंतून उत्क्रान्तीच्या धिम्या प्रक्रियेनें आम्ही माणसें बनलों आहोंत असें मानायला मी तयार आहें. तेव्हां आपण पशुबळ घेऊन जन्माला आलों खरें पण माणसें म्हणून जन्मलों आणि तें आमच्या अंतरांत वसणाऱ्या ईश्वराला ओळखण्याकरितां. हाच तर मनुष्याचा विशेष आहे, आणि तोच त्याच्या-मधला आणि पशुयोनीमधला फरक आहे. परंतु ईश्वराला ओळखणें म्हणजे जीवमात्रांत त्याला पाहणें, म्हणजेच भूतमात्राशीं आपण एकरूप आहोंत हें ओळखणें, आणि जर आपण शरीरबळाचा वापर स्वेच्छापूर्वक टाकून दिला नाहीं आणि आपल्यांतील प्रत्येकांत सुप्त असलेली अहिंसा जाणीवपूर्वक वाढविली नाहीं तर ही गोष्ट कदापि शक्य नाहीं.

या दोन्ही गोष्टी शक्तीच्या जाणीवेंतूनच घडून येऊं शकतात. आमच्यामध्यें बलवानाची अहिंसा आहे काय? हा अशक्य आदर्श आहे असें समजून तो सोडून देणें आणि त्याऐवजीं हिंसेचा मार्ग पसंत करणें याची आपल्याला मोकळीक आहे. पण मग कोणती तरी निवड ही करावीच लागेल. २४

अहिंसा ही अमोघ शक्ति व्हायची असेल तर तिचा उगम मनांत झाला पाहिजे. मनाच्या सहकार्यावांचून केवळ शरीराची अहिंसा ही दुबळ्याची किंवा भ्याडाची अहिंसा आहे, त्यामुळें तिच्यांत वीर्य नसतें. आपल्या मनांत आपण हेवादावा आणि द्वेष बाळगला आणि उलट आघात करीत नाहीं असें वर वर दाखविलें तर तें आपल्यावर उलटणारच आणि त्यांत आपला नाश होणार. दुखापत न व्हावी म्हणून केवळ शारीरिक हिंसा वर्ज्य करून भागणार नाहीं, प्रत्यक्ष प्रेमभाव जरी आपण निर्माण करूं शकलों नाहीं तरी द्वेषभावनेला तरी निदान आपण थारा देतां कामा नये हें अगत्याचें आहे.

द्वेषसूचक गाणीं व भाषणें हीं सर्व निषिद्ध मानलीं गेलीं पाहिजेत. २५

जो मनुष्य मरणाला भितो व ज्याच्यांत प्रतिकाराची शक्ति नाहीं अशाला अहिंसा शिकवितां येणार नाहीं. अहिंसा काय हें कळण्यापूर्वीं त्याला नेटानें उभें राहण्याला आणि आपल्याला चीत करूं पाहणाऱ्या आक्रमकाला तोंड देऊन स्वतःचें रक्षण करण्याच्या प्रयत्नांत मरणसुद्धां पत्करण्याला शिकविलें पाहिजे. याहून वेगळें कांहीं करणें म्हणजे त्याचा भ्याडपणा तसाच ठेवणें आणि अहिंसेपासून त्याला आणखी दूर नेणेंच होईल. उलटून आघात करण्याला जशी मी कोणाला मदत करूं नये तसेंच भ्याडाला केवळ बेगडी अहिंसेच्या मागें मी लपूंहि देऊं नये. अहिंसेचें सत्त्व काय तें न कळल्यामुळें संकट आलें कीं, त्याला सामना न देतां—विशेषतः जेव्हां त्यांत आपल्या जीवाला धोका असेल तेव्हां—त्यापासून दूर पळून जाणें हा गुण आहे असा पुष्कळांचा प्रामाणिक समज आहे. असला नामर्दपणाचा समज न व्हावा म्हणून अहिंसेचा धडा देणारा शिक्षक या नात्यानें मला सावध राहिलें पाहिजे. आपल्या भावाच्या हातून अवश्य तर मरण पत्करण्याची तयारी

ठेवल्यानेंच मनुष्य मोकळेपणानें जगूं शकतो, त्याला मारून नव्हे. खून किंवा दुखापत, कोणत्याहि कारणाकरितां कां असेना, करणें हा मानवसमाजाविरुद्ध केलेला गुन्हा आहे, परंतु अहिंसेसंबंधींचें हें सत्य दीनदुबळ्यांना सांगण्यासारखें नाहीं हें मला स्पष्ट दिसत आहे. त्यांना अगोदर आत्मसंरक्षण करायला शिकविलें पाहिजे. २६

भ्याडपणा आणि हिंसा यांच्यांत निवड करण्याचा जर प्रसंग आला तर मी हिंसा करावी म्हणेन. उदाहरणार्थ, माझ्या थोरल्या मुलानें जेव्हां मला विचारलें कीं, १९०८ सालीं तुमच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता त्या वेळीं जर मी हजर असतों तर मीं काय करायला पाहिजे होतें ? पळून जाऊन तुम्हांला मारूं द्यायचें हें योग्य झालें असतें, कीं आपल्या शरीरबळाचा जो उपयोग मला करतां आला असता आणि करावासें वाटलें असतें तो करून तुमचा बचाव करणें योग्य झालें असतें ? मीं त्याला सांगितलें कीं हिंसा वापरूनसुद्धां माझा बचाव करणें हेंच तुझें कर्तव्य ठरलें असतें. मीं बोअर युद्धांत, झुलूंच्या ‘ बंडां ’त आणि पहिल्या महायुद्धांत जो भाग घेतला तो या माझ्या मतामुळेंच. म्हणूनच हिंसामार्गावर विश्वास असणाऱ्यांनीं शस्त्रें चालविण्याचें शिक्षण घेतलें पाहिजे असें मी सांगत असतों. हिंदुस्ताननें आपल्या सत्त्वाची पायमल्ली होत असलेली भ्याडपणें उघड्या डोळ्यांनी पाहात राहण्यापेक्षां त्याचें रक्षण करण्याकरितां शस्त्रें हातीं घेतलेलीं मला पत्करलीं.

परंतु माझा मात्र असा विश्वास आहे कीं, अहिंसा ही हिंसेपेक्षां अनंतपटीनें श्रेष्ठ आहे. शिक्षा करण्यापेक्षां क्षमाशील होण्यांत अधिक मर्दपणा आहे. ‘ क्षमा वीरस्य भूषणम् । ’ शिक्षा करण्याची शक्ति असेल तेव्हांच ती न करण्यांत क्षमा आहे; एखादा दीन जीव आपण क्षमा करतों असें म्हणतो तेव्हां त्यांत कांहीं अर्थ नसतो. २७

**प्रश्न :** जगांत जिकडे दृष्टि टाकावी तिकडे हिंसा आणि सत्तालोभाचें राजकारण याशिवाय कांहीं दिसत नाहीं. अशा परिस्थितींत तुमची अहिंसा काय करूं शकणार याचा कधीं तुम्ही विचार केला आहे काय ?

**गांधीजी :** माझी अहिंसा लुळीपांगळीहि नाहीं किंवा दुबळीहि नाहीं.

ती सर्वशक्तिमान् आहे. अहिंसा असेल तेथें सत्य आहे आणि सत्य हें परमेश्वर आहे. ईश्वर स्वतःला कसें प्रकट करील हें मला सांगतां येत नाहीं. तो सर्वव्यापक आहे आणि जेथें तो आहे तेथें मांगल्यच आहे, एवढें मी जाणतों. म्हणून सर्वांच्याकरितां एकच कायदा आहे. जगांत जेथें जेथें सत्य आणि अहिंसा यांचें सार्वभौम साम्राज्य चालतें, तेथें शांति आणि परमानंद आहे. सत्य - अहिंसा कुठेंहि आज अस्तित्वांत नाहींत यावरून तीं तात्पुरतीं दृष्टीआड झालेलीं आहेत एवढेंच, पण तीं कायमचीं नाहींशीं होणें शक्य नाहीं. श्रद्धावन्ताला हीच श्रद्धा टिकवून धरते. २८

**प्रश्न :** आपल्या दृष्टिकोनाप्रमाणें अहिंसा हा प्रत्यक्ष चढाईचा एक प्रकार आहे काय ?

**गांधीजी :** एक प्रकार नव्हे, एकच एक प्रकार आहे. अर्थात् ' प्रत्यक्ष चढाई ' या शब्दांचा अर्थ मी येथें त्यांच्या तांत्रिक अर्थापुरताच मर्यादित मानीत नाहीं. पण अहिंसेला प्रत्यक्ष चढाईचें रूप नसेल तर माझ्या मतानें ती निरर्थक आहे. जगांतली ती सर्वांत महान् आणि सर्वांत क्रियाशील अशी शक्ति आहे. अहिंसक असणें आणि निष्क्रिय राहणें शक्य नाहीं. ' अहिंसा ' शब्दांत ' अ ' हा जरी नकारात्मक प्रत्यय असला तरी ती निष्क्रिय शक्ति नाहीं. वरवर पाहतां जीवनांत आपण झटापटी आणि खून यांनींच वेढलें आहोंत असें वाटतें, दुसऱ्याचा जीव घेऊन आपण जगत असल्यासारखें वाटतें. पण कोणा महान् द्रष्ट्याला सूक्ष्म दृष्टीनें या सर्व हिंसेच्या अतीत असणारें केंद्रीभूत सत्य दिसलें आणि तो म्हणाला, झटापटी आणि हिंसा यांतून कांहीं माणसाला आपलें नियोजित ध्येय आणि आपल्या बांधवांविषयींचें कर्तव्य पूर्ण करतां येणार नाहीं, तें अहिंसेच्या द्वारेंच तो पूर्ण करूं शकेल. अहिंसेच्या केन्द्रस्थानीं अशी एक शक्ति आहे कीं ती स्वयंप्रभावी आहे. अहिंसेंत केवळ मानवसृष्टीच नव्हे तर सर्व भूतमात्र येतें.

**प्रश्न :** एकटा मनुष्य साऱ्या जगाच्या हिंसेला सामना देऊं शकेल ?

**गांधीजी :** जर तो देऊं शकला नाहीं तर तो अहिंसेचा खरा प्रतिनिधीच नव्हे असें तुम्ही समजा. सर्व शक्तींच्यावर मात करणारी ही शक्ति आहे.

**प्रश्न :** अहिंसेची ही अवघड विद्या व्यक्तींना किंवा समाजांना कशी शिकवितां येईल ?

**गांधीजी :** स्वतःच्या जीवनांत या धर्माचा आचार करणें, आपलें स्वतःचें जीवनच त्या शक्तीचा महिमा बोलेल असें करणें, यावांचून दुसरा राजमार्ग या बाबतींत नाहीं. अर्थात् स्वतःच्या जीवनांतून अहिंसा प्रकट करायची म्हणजे अतिशय अभ्यास, प्रचंड चिकाटी आणि पराकाष्ठेची आत्मशुद्धि आवश्यक आहे. भौतिक शास्त्रें हस्तगत करण्याकरितां जर तुम्हांला एक सबंध जन्म खर्ची घालावा लागतो तर मानवजातीला समजून आलेल्या या महत्तम आध्यात्मिक शक्तीवर स्वामित्व मिळविण्या-करितां किती जन्म खर्ची घालावे लागतील ? पण अनेक जन्म त्याकरितां गेले तरी काय बिघडलें ? कारण जीवनांत हीच जर एक शाश्वत वस्तु असेल, लक्षांत घ्यावी अशी हीच जर एक गोष्ट असेल तर ती हस्तगत करण्यासाठीं जो कांहीं प्रयत्न होईल तो सार्थकींच लागेल. २९

ही अहिंसा शूराची आणि सबळाची अहिंसा असावी लागेल. ती अंतरींच्या निष्ठेंतून प्रकट झाली पाहिजे. म्हणून, आपल्या अंतःकरणांत जर हिंसा असली तर आपला नेभळटपणा झाकण्यासाठीं अहिंसेचा बुरखा पांघरण्यापेक्षां आपण हिंसक झालेलें पत्करलें असें मीं स्वच्छ सांगितलें आहे. नेभळटपणापेक्षां हिंसा केव्हांहि श्रेयस्कर. हिंसक मनुष्य हा अहिंसक होण्याची आशा आहे, पण नेभळटाच्या बाबतींत ती आशा नाहीं. ३०

माझ्या कल्पनेंतील समाजांत अत्याचार घडणारच नाहींत. पण आज ज्या समाजांत आपण राहत आहों त्यांत असे अत्याचार घडत आहेत हें खरें आहे. त्या बाबतींत माझें उत्तर अगदीं निःसंदिग्ध असें आहे. अहिंसा-व्रत घेतलेला पुरुष अथवा स्त्री प्रत्याघात न करतां आणि मनांत क्रोध किंवा त्वेष न आणतां आपलें किंवा आपल्या स्त्रीजनांचें रक्षण करीत करीत मरून जाईल; त्यांनीं मरून जावें. शूरत्वाचें हें अत्युच्च स्वरूप आहे.

हा महान् जीवनधर्म अनुसरण्याची ज्या व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची शक्ति अथवा इच्छा नसेल त्याच्या बाबतींत प्रत्याघात किंवा आमरण प्रतिकार हीच त्याच्या खालोखाल उत्तम गोष्ट आहे. अर्थात् ती पहिल्या

गोष्टीपासून अतिशय दूर आहे. भ्याडपणा म्हणजे नपुंसकपणा आहे आणि तो हिंसेहूनहि अत्यंत वाईट आहे. भ्याड मनुष्याला सूडाची इच्छा तर असते, पण स्वत: मरण्याला भीत असल्यामुळें तो दुसऱ्यांनीं आपल्याकरितां रक्षणाचें काम करावें अशा इच्छेनें दुसऱ्यावर, म्हणजे त्या त्या काळच्या सरकारावर, अवलंबून राहतो. भ्याड मनुष्य हा मनुष्यच नव्हे. स्त्री-पुरुषांच्या कोणत्याहि समाजाचा घटक म्हणून राहण्याला तो नालायक आहे. ३१

मी मानीत असलेला अहिंसाधर्म ही पराकाष्ठेची क्रियाशील शक्ति आहे. त्यांत भ्याडपणाला किंवा दुर्बलतेला बिलकुल वाव नाहीं. हिंसक मनुष्य हा कधीं ना कधीं अहिंसक बनण्याची आशा आहे; पण भ्याडाच्या बाबतींत ती मुळींच नाहीं. म्हणून मी अनेक वेळां सांगत आलों आहें कीं, आम्हांला आमचा, आमच्या स्त्रियांचा आणि आमच्या पूजास्थानांचा बचाव आत्मक्लेशाच्या म्हणजेच अहिंसेच्या बळावर कसा करावा याचें ज्ञान नसेल तर आणि आपण मर्द असूं तर लढाई करून त्यांचा बचाव करण्याची तरी शक्ति निदान आपल्यांत असली पाहिजे. ३२ *

एका बाजूनें मी लोकांना लष्करी शिक्षण द्यावें अशी (सरकारला) विनंति करतों तर दुसऱ्या बाजूनें सत्याग्रहाला उच्चस्थान देतों. अर्थात् सत्याग्रहांत शस्त्राचा वापर करण्याला वाव असणें शक्यच नाहीं; आणि तसा तो नाहींहि. परंतु लष्करी शिक्षण हें ज्यांचा सत्याग्रहावर विश्वास नाहीं त्यांच्यासाठीं अभिप्रेत आहे. सगळ्याचा सगळा हिंदुस्तान सत्याग्रह ग्रहण करील ही माझ्या कल्पनेच्या पलिकडची गोष्ट आहे. दुर्बळाच्या संरक्षणाकरितां उभें न राहणें म्हणजे केवळ नपुंसकपणाच आहे, तो सर्वथैव त्याज्य आहे. आपल्या निष्पाप भगिनीवर हात टाकणाऱ्या एखाद्या पुरुषापासून तिचें रक्षण करण्याकरितां आपण आपला बळी देण्याला आनंदानें तयार असलें पाहिजे आणि प्रेमाच्या बळावर त्या मनुष्यांतल्या पशुवृत्तीला जिंकलें पाहिजे. पण ती शक्ति जर आपल्यांत आलेली नसली तर त्या माणसाच्या तसल्या हालचाली मोडून काढण्याकरितां आपण नि:संशयपणें आपलें सारें शरीरबळ

* पुस्तकाच्या शेवटीं दिलेलीं परिशिष्टें अभ्यासूंनीं अवश्य पहावींत.

खर्चीं घातलें पाहिजे. आत्मबळाचा उपासक आणि शरीरबळाचा उपासक दोघेहि शिपाईगडी आहेत. शरीरबळाच्या उपासकाचीं शस्त्रें काढून घेतलीं गेलीं कीं तो पराभूत होतो; पण आत्मबळाच्या उपासकाला पराजय माहीतच नसतो. तो नश्वर अशा शरीरावर आणि शस्त्रावर कधीं विसंबूनच राहत नाहीं. त्याला त्याच्या अजिंक्य आणि अमर आत्म्यांतून बळ मिळत असतें. या दोन्ही बळांच्या पलिकडे असेल तो मनुष्यप्राणि नव्हे, कारण तो स्वतःमधल्या 'देही' ला ओळखत नाहीं. जर ओळखता तर धोक्यापासून भिऊन तो पळून जाता ना. ३३

माझ्या या सांगण्याचा विपरीत अर्थ न व्हावा. शारीरिक सामर्थ्यांतून शक्ति येत नसते. ती दुर्दम्य अशा मनःशक्तींतून येत असते. साधा झुलू माणूस शरीरबळांत सर्वसाधारण इंग्रजाला भारी असतो, पण तो एखाद्या इंग्रज पोराला बघतांच पळूं लागतो, कारण त्याला त्या मुलाच्या बंदुकीची भीति वाटते. तो मरणाला भितो आणि धिप्पाड असला तरी गर्भगळित होतो...स्वतःच्या बळाची निश्चितपणें जाणीव झाली तरच निश्चितपणें चित्तांत क्षमा उपजूं शकते. ज्ञानपूर्वक उपजलेल्या क्षमावृत्तींतून आपल्या चित्तांत बळाची अशी एक प्रचंड लाट उसळली पाहिजे कीं ज्यायोगें जुलूम करणाऱ्यांना आमच्यावर एकामागून एक उपमर्द लादणें अशक्य व्हावें. ३४

अहिंसा ही उपदेश करण्याची वस्तु नव्हे. ती आचारांत आणली पाहिजे. हिंसेचा आचार बाह्य संकेतांनीं लोकांना शिकवितां येतो. अगोदर ते फळ्यावर गोळ्या मारतात, मग निशाण धरून मारतात व मग पशूवर मारतात. त्यानंतर तुम्ही मारण्याच्या कलेंत निष्णात झालांत असें म्हणून तुम्हांला उत्तीर्ण करण्यांत येतें. अहिंसक मनुष्याजवळ बाहेरचें कांहीं हत्यार नसतें, त्यामुळें त्याची वाणीच नव्हे तर त्याची कृतीसुद्धां निरुपयोगी वाटते. मनांत नसतांनाहि नानाप्रकारचे गोड गोड शब्द आपल्याला बोलतां येतात. उलट, माझ्या अंतःकरणांत खरोखर प्रेम असेल आणि तरीहि माझ्याकडून बाह्यतः होणारी अभिव्यक्ति अनुकूल भावना निर्माण करणारी नसेल अशा स्थितींत बाह्यतः दोन्ही बाबतींत माझ्याकडून होणारी कृति सारखीच असली तरी तिचा परिणाम मात्र भिन्न भिन्न होऊं शकेल. कारण

आमच्या कृतीचा परिणाम उघडपणें समजून येत नाहीं तेव्हां पुष्कळ वेळां जास्त शक्तिशाली असतो. उदाहरणार्थ, तुमचा माझ्यावर जो नकळत परिणाम होत असेल तो मला कधींच समजून येणार नाहीं. तथापि तो कळत होणाऱ्या परिणामापेक्षां अगणित पटीनें मोठा असूं शकेल. हिंसेमध्यें अदृश्य असें कांहींच नसतें. उलट, अहिंसा ही तीनचतुर्थांश अदृश्य असते, आणि म्हणून परिणाम हा तिच्या अदृश्य स्वरूपाच्या व्यस्त प्रमाणांत असतो. अहिंसा जेव्हां क्रियाशील बनते तेव्हां ती विलक्षण वेगानें गतिमान होते, आणि मग ती एक चमत्कार बनते. अशा रीतीनें लोकमानसावर प्रथम नकळत परिणाम घडतो, आणि मग त्याच्यांत जागृति येते. जेव्हां सज्ञानपणें तो परिणाम घडतो तेव्हां यश धवधवीतपणें दिसून येतें. माझा स्वतःचा अनुभव पाहिला तर, लोक जेव्हां कच खात आहेत असें दिसत होतें तेव्हां माझ्यांत मात्र पराभवाची लेशमात्रहि भावना नव्हती. ३५

मला विंचवा-सापांची, वाघा-सिंहांची, प्लेगच्या उंदरांची आणि दूषित माश्यांची भीति वाटते, तशीच भयानक दिसणाऱ्या दरोडेखोरांची आणि मारेकऱ्यांचीहि मला भीति वाटते, हें मला कबूल केलें पाहिजे. यांपैकीं मी कोणालाहि भितां कामा नये हें मला समजतें. पण ही कांहीं बुद्धीची कसरत नव्हे. ती हृदयाची करामत आहे. ईश्वराच्या भीतीशिवाय इतर सर्व भीति टाकून द्यायला पोलादाहूनहि कठीण अंतःकरण लागतें. असें असलें तरी अहिंसेवर विश्वास आणि हिंसेवर विश्वास यांमध्यें दक्षिण आणि उत्तर, किंवा जीवन आणि मरण यांच्याइतकें अंतर आहे. जो आपल्या भवितव्याची अहिंसेशीं म्हणजे प्रेमधर्माशीं सांगड घालतो, तो हिंसेचें वर्तुळ रोजच्या रोज कमी करीत जातो आणि तितक्या प्रमाणांत जीवन आणि प्रेम यांची वाढ करतो; जो हिंसेवर म्हणजे द्वेषधर्मावर निष्ठा ठेवतो तो हिंसेचें वर्तुळ रोजच्या रोज वाढवीत जातो आणि तितक्या प्रमाणांत मृत्यु आणि द्वेष यांची वाढ करतो. ३६

अहिंसा म्हणजे केवळ जीवें न मारणें नव्हे. जो मनुष्य उपद्रवी जीवजंतूंना आपण मारीत नाहीं एवढ्याच अहंतुष्टतेच्या समाधानांत राहतो, पण ज्याच्या अंतःकरणांत जीवमात्राविषयीं प्रेमभाव नाहीं, अशा मनुष्याची

किंमत देवाच्या दरबारांत शून्य आहे. खरें प्रेम हें सागरासारखें अथांग आहे; सागराला आंतल्या आंत भरती येऊन त्याच्या लाटा नाचूं लागतात आणि बाहेर पसरून सर्व मर्यादा ओलांडून तो जसा साऱ्या दुनियेला व्यापून टाकतो, तसें खऱ्या प्रेमाचें आहे. ३७

**प्रश्न :** प्रेम संघटित करणें शक्य आहे काय? शक्य असेल तर कसें?

**गांधीजी :** 'संघटन' या शब्दाच्या नेहमींच्या अर्थानें कदाचित् तें करतां येणार नाहीं. पण एकत्र मिळून अहिंसक उठाव करण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं. मी एकामागून एक प्रयोग करून तेंच दाखवून देण्याचा प्रयत्न करीत आहें. त्याचें असें एक वेगळें तंत्र आहे. ३८

**प्रश्न :** शत्रूविषयीं अंतःकरणांत प्रेम ठेवून त्याच्याशीं दोन हात करणें शक्य नाहीं काय? प्रेमानेंच शत्रूवर गोळी घालतां येणार नाहीं काय?

**गांधीजी :** आपल्यामधील प्रेरक हेतु पुष्कळ वेळां मिश्र असतात. तथापि ती अहिंसा होणार नाहीं. हिंसेमध्यें पायऱ्या असूं शकतात, पण अहिंसेंत त्या नसतात. शत्रू म्हटलेल्याविषयींचा आपल्या मनांतला द्वेषभाव काढून टाकून मन त्याच्याविषयीं शुद्ध करणें हा अहिंसेच्या उपासकाचा सतत प्रयत्न असतो. तुम्ही म्हणतां त्या रीतीनें प्रेमानें गोळी घालणें हें संभवनीय नाहीं. ३९

आमच्या अहिंसा-भक्तांच्या बाबतींत दुःखाची गोष्ट ही आहे कीं, त्यांनीं अहिंसेचें आंधळे स्तोम माजवून लोकांत खऱ्या अहिंसेचा प्रचार होण्याच्या मार्गांत फार मोठें विघ्न उत्पन्न केलें आहे. अहिंसेविषयीं आज जें प्रचलित मत आहे ( आणि जें माझ्या मतें चुकीचें आहे ) त्यानें आपल्या मनोदेवतेला भूल पाडली आहे, आणि कठोर शब्द, कठोरपणें बनविलेलीं मतें, क्रोध आणि मत्सर, तसेंच क्रूर लालसा या व यांसारख्या हिंसेच्या इतर अनेक सूक्ष्मतर प्रकारांसंबंधीं आमच्या भावना मारून टाकल्या आहेत; माणसांचा आणि प्राण्यांचा सावकाशीनें केला जाणारा छळ, स्वार्थलंपटपणानें त्यांची केली जाणारी उपासमार आणि पिळणूक, दुबळ्यांची मनसोक्त केली जाणारी विटंबना आणि त्यांच्यावर होणारा जुलूम व त्यांच्या स्वाभिमानाची केली जाणारी हत्या, या सर्व गोष्टी ज्या आपण आज

आपल्या सभोंवार पाहत आहों त्या, केवळ सद्‌बुद्धीनें केलेल्या जीवहत्येपेक्षां, किती तरी पटीनें हिंसक आहेत ही गोष्ट आपण वरील प्रकारच्या अहिंसे-बद्दलच्या मतामुळें विसरूनच जातों. ४०

प्रेम आणि एकान्तिक स्वामित्वाची भावना दोन्ही कधींच एकत्र नांदूं शकणार नाहींत. ४१

अहिंसेच्या सिद्धान्तांत कोणत्याहि स्वरूपाच्या पिळवणुकीपासून अलिप्त राहणें हें अगत्याचें असतें. ४२

पिळवणूक हा हिंसेचा गाभा आहे. ४३

एखादा वेडा झालेला मनुष्य मोकाट सुटला आहे आणि पुढें येईल त्यावर हाणमार करीत आहे अशा वेळीं त्या वेड्याला आवरण्याकरितां शरीरबळाचा उपयोग केला तर तो योग्य म्हणतां येईल कीं नाहीं ? किंवा एखादा जमाव क्षुब्ध होऊन मनाला येईल तें करीत सुटला आहे तर त्याला आवरण्यासाठीं, समजा, अश्रुधूर वापरला तर तें योग्य होईल कीं नाहीं ? अशा प्रश्नांना माझें उत्तर असें कीं, या उपायांची मी केव्हांहि गय करीन. परंतु, अहिंसेच्या दृष्टिकोनांतून ते उपाय योग्य आहेत असें मात्र मी म्हणणार नाहीं. शुद्ध अहिंसक उपाययोजनेवर विश्वास ठेवण्या-इतकें अहिंसेचें प्रमाण तुमच्यामध्यें नाहीं असें मी म्हणेन. तें जर असेल तर तुमची नुसती उपस्थिति तो वेडा शांत होण्याला पुरेशी होईल. अहिंसा ही कांहीं एखादी यांत्रिक गोष्ट नाहीं. ‘ मी शरीरबलाचा उपयोग करणार नाहीं ’ एवढें म्हणून कांहीं तुम्ही अहिंसक बनत नाहीं. ती हृदयांत स्फुरली पाहिजे. तसें स्फुरण असेल तर ती कोणत्या ना कोणत्या कृतींतून प्रकट होईलच. ती मग खूण असेल, नुसता दृष्टिक्षेप असेल किंवा मौन-सुद्धां असूं शकेल: पण ती जी कांहीं कृति होईल तिनें चूक करणाऱ्याचें अंतःकरण विरघळेल आणि चूक घडण्याला आळा बसेल.

अश्रुधुराचा उपयोग आदर्श अहिंसेच्या दृष्टीनें योग्य म्हणतां येणार नाहीं. पण, एखाद्या असाहाय्य तरुण मुलीला अत्याचारापासून वांचविणें किंवा क्षुब्ध झालेल्या जमावाला पिसाटपणाचीं कृत्यें करण्याला अटकाव करणें हें अश्रुधूर वापरल्यावांचून कांहीं शक्य नाहीं. अशा धर्मसंकटांत जर मी

सांपडलों तर साऱ्या जगाविरुद्ध जाऊन मी त्याचा बचाव करीन. मी अहिंसेचा धर्म पत्करल्यामुळें या कृत्यांना अडथळा करूं शकलों नाहीं, असें जर मी ईश्वरापुढें गेल्यानंतर म्हणूं लागलों तर ईश्वर मला क्षमा करणार नाहीं. अहिंसा ही स्वयंप्रभावी आहे. संपूर्णपणें अहिंसक असणारा मनुष्य हा स्वभावतःच हिंसा करण्याला असमर्थ असतो किंवा तिचा त्याला उपयोगच नसतो. कोणत्याहि परिस्थितींत त्याची अहिंसा ही पुरेशी समर्थ असते.

म्हणून हिंसेचा वापर हा कोणत्याहि प्रमाणांत आणि कोणत्याहि परिस्थितींत अयोग्य असें जेव्हां मी म्हणतों तेव्हां तें मी सापेक्ष अर्थानें म्हणतों. एका शाश्वत सिद्धान्ताला अमुक अपवाद, तमुक अपवाद असें मान्य करण्यापेक्षां माझ्यांतच पुरेशी अहिंसा नाहीं असें मी म्हणणें अधिक योग्य ठरतें. दुसरी गोष्ट म्हणजे, अहिंसेला अपवाद नाहींत असें मानल्यामुळें अहिंसेच्या तंत्रांत ज्या उणीवा असतील त्या भरून काढण्याची मला प्रेरणा मिळते. 'अहिंसाप्रतिष्ठायां तत् सन्निधौ वैरत्यागः' (अहिंसा सुप्रतिष्ठित झाली असतांना तिच्या सान्निध्यांत वैरभाव टिकतच नाहीं.) या पतंजली मुनीच्या सूत्रावर माझा अक्षरशः विश्वास आहे. ४४

हिंसा तेवढी सर्व वाईट आणि म्हणून तिचा निषेधच केला पाहिजे, हा जरी सिद्धान्त असला तरी अहिंसाभक्तानें लढाई करणाऱ्या दोन पक्षांत आक्रमक आणि बचाव करणारा असा भेद जर केला आणि तसा भेद करून अहिंसक रीतीनें, म्हणजे बचाव करणाऱ्याला वांचवितांना आपला प्राण देऊन, जर त्यानें त्याची बाजू घेतली तर तें क्षम्य आहे, नव्हे तें अहिंसाभक्ताचें कर्तव्य आहे. या त्याच्या हस्तक्षेपामुळें कदाचित् झगडा लवकर थांबण्याचा संभव आहे आणि कदाचित् दोन पक्षांत त्यामुळें सलोखा घडून येण्याचाहि संभव आहे. ४५

लष्करी बळ हें आत्मबळाशीं विसंगत आहे. भय उत्पन्न करणें, दुर्बलाची पिळवणूक करणें, अनैतिक रीतीनें कमाई करणें, अतृप्तपणें शरीरभोगांच्या मागें धांवणें या गोष्टी आत्मबळाला पूर्णपणें विसंगत आहेत. ४६

सत्य आणि अहिंसा हे कांहीं मठ-मंदिरांकरितां राखून ठेवलेले सद्‌गुण नव्हेत. ते जितके न्यायालयांत आणि कायदेमंडळांत तितकेच बाजारपेठेंतहि लागू करण्याजोगे आहेत. ४७

मी पुढें जाऊन असेंहि म्हणेन कीं, अहिंसा जर लक्षावधि लोकांना आचारांत आणण्याजोगी नसेल तर मला स्वतःला तिचा काडीचाहि उपयोग नाहीं. ४८

सत्य आणि अहिंसा या आपल्याला केवळ व्यक्तिगत आचारांत पाळण्याच्या बाबी करावयाच्या नसून जमातींनीं, समाजांनीं, आणि राष्ट्रांनीं त्या अंमलांत आणण्याच्या बाबी करावयाच्या आहेत. निदान माझें तरी तसें स्वप्न आहे. तें सत्यसृष्टींत उतरविण्याकरितांच जगावें आणि त्यासाठींच मरावें असें मला वाटतें. माझ्या श्रद्धेनें रोजच्या रोज नवीं नवीं सत्यें शोधून काढण्याला मला मदत होते. अहिंसा हा आत्म्याचा गुण आहे आणि म्हणून तो प्रत्येकानें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत लागू करावयाचा आहे. सर्व क्षेत्रांत जर या गुणांचें आचरण शक्य झालें नाहीं तर त्यांची व्यवहारांत किंमत ती काय ? ४९

आध्यात्मिक धर्माचें एखादें स्वतंत्र क्षेत्र आहे आणि तेथें तो प्रकट होतो असें मी मानीत नाहीं. उलट जीवनाच्या नित्याच्या हालचालींतूनच तो प्रकट होत असतो. म्हणून त्याचा परिणाम आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रावर होत असतो. ५०

सत्य आणि अहिंसा यांवांचून आपणां कोणालाहि अन्य गति नाहीं. युद्ध करणें चुकीचें आहे, तें उघड उघड पापच आहे हें मी जाणतों. तें नष्ट केल्या-वांचून गत्यंतर नाहीं हेंहि मी जाणतों. रक्तपातानें किंवा कपटानें मिळविलेलें स्वातंत्र्य हें स्वातंत्र्यच नव्हे याविषयीं माझी खात्री आहे.ज्या कृतींच्या बाबतींत माझ्यावर आक्षेप घेण्यांत आले आहेत त्यांचें मला कांहींहि समर्थन करतां येत नाहीं असें झालें तरी तें मला पत्करेल, पण माझ्या कोणत्याहि कृतीनें मीं अहिंसेचें व्रत शिथिल केलें किंवा कोणत्याहि स्वरूपांतील हिंसेला व असत्याला अनुकूल झालों तर तें मला पत्करणार नाहीं. ५१

* * *

## : ६ : साध्य-साधनविचार

**वाचक :** आपला उद्देश जर चांगला असला तर तो आपण वाटेल त्या साधनांनीं, मारून ठोकूनसुद्धां, पार पाडूं नये काय ? चोर जर माझ्या घरांत शिरला तर मी काय साधनांचा विचार करीत बसेन ? वाटेल तें करून त्याला हांकून लावायचें हें माझें कर्तव्य आहे.

**संपादक :** असल्या युक्तिवादानें फारजण फसले आहेत. मीसुद्धां असाच युक्तिवाद करीत असे. पण आतां माझे डोळे उघडले आहेत आणि मला माझी चूक दिसत आहे. तुम्हांला ती दाखवून देण्याचा मी प्रयत्न करतों.

साध्य आणि साधन यांच्यामध्यें संबंध नाहीं ही तुमची समजूत फार चुकीची आहे. त्या चुकीमुळें धर्मपरायण म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांनींसुद्धां अघोर कर्में केलीं आहेत. गुळवेल लावून त्यांतून मोगऱ्याच्या फुलांची इच्छा बाळगण्यासारखें हें आहे. समुद्र तरून जावयाचा तर साधन जहाज हेंच होऊं शकेल. त्याऐवजीं जर मी बैलगाडी पाण्यांत घातली तर गाडी आणि मी दोघेहि तळ गांठूं. जसा देव तशी पूजा, हें फार विचार करण्यासारखें वाक्य आहे. साधन हें बीज आहे, साध्य हें झाड आहे. अर्थात् बीजाचा आणि झाडाचा जसा संबंध तसाच आणि तितकाच संबंध साधन आणि साध्य यांच्यांत आहे. सैतानाची भक्ति करून ईश्वरभजनाचें फळ मिळणें शक्य नाहीं.

मला तुमचें घड्याळ तुमच्याकडून घ्यायचें आहे. तें हिसकून घ्यायचें असेल तर अर्थात् मला तुमच्याशीं मारामारी करावी लागेल. पण जर तें विकत घ्यायचें असेल तर मला तुम्हांला त्याचे पैसे द्यावे लागतील. जर तें तुमच्याकडून बक्षिस म्हणून घ्यायचें असेल तर मला तुमची मनधरणी करावी लागेल. घड्याळ मिळवितांना जें साधन वापरलें त्याप्रमाणें तो चोरीचा माल, माझ्या मालकीचा माल किंवा बक्षिस असें त्याचें रूप झालें. तीन साधनांचे तीन वेगवेगळे परिणाम झाले. तेव्हां साधनाची पर्वा कशाला असें आतां तुम्ही म्हणूं शकाल ?

आतां चोराला घालवून देण्याचें उदाहरण घेऊं या. त्याकरितां वाटेल तें साधन वापरावें या तुमच्या विचाराशीं मी सहमत नाहीं. जर माझ्या घरांत माझा बाप चोरी करायला आला तर मी एक साधन वापरीन. तेंच साधन माझ्या ओळखीचा कोणी आला तर मी वापरणार नाहीं. आणि तिसराच कोणी अपरिचित असा माणूस आला तर तिसरें साधन वापरीन. जर तो मनुष्य युरोपिअन असेल तर आपण एक साधन वापरूं, हिंदी असेल तर दुसरें वापरूं, असेंहि वेळीं तुम्हीच म्हणाल. एखादा अशक्त पोर चोरी करायला आला तर मी एक साधन वापरीन, माझ्या बरोबरीचा असेल तर वेगळें वापरीन, आणि जर तो माझ्यापेक्षां बलवान असून हत्यारबंद असेल तर मी मुकाटपणें पडूनच राहीन. यांत बापापासून थेट बलवानापर्यंत वेगवेगळीं साधनें आलीं. बाप असला तरी मला वाटतें मी झोपूनच राहीन आणि कोणी हत्यारबंद असला तरी झोपून राहीन. बापांतहि एक बळ आहे, हत्यारबंद माणसांतहि बळ आहे. दोन्ही बळांपुढें नमून मी माझी वस्तु हातची जाऊं देईन. बापाचें बळ कोणतें ? बाप चोरी करतो या विचारानें माझ्या मनांत कींव उत्पन्न होईल आणि मला रडूं येईल; हत्यारबंदाच्या बळानें माझ्यांत रोष उत्पन्न होईल आणि आम्ही कट्टे वैरी बनूं. अशी चमत्कारिक दशा आहे. या उदाहरणां-वरून आपण उभयतां वरील प्रत्येक बाबतींत साधन कोणतें वापरावयाचें याविषयीं एकमत होऊंच असें नाहीं. सर्वच प्रकारच्या चोरांच्या बाबतींत काय केलें पाहिजे याचा इलाज मला सुचतो. पण तो ऐकून कदाचित् तुम्ही भडकून जाल म्हणून मी तो तुमच्या पुढें ठेवीत नाहीं. तुम्हीच कल्पना करा, आणि ती कल्पना तुम्हांला येत नसेल तर प्रत्येक बाबतींत वेगळें वेगळें साधन तुम्हांला हातीं घ्यावें लागेल हें उघड आहे. पण, चोराला घालविण्याकरितां कोणतेंहि साधन उपयोगांत आणलें तरी चालण्यासारखें आहे असें नाहीं, जसें साधन तसा त्याचा परिणाम निपजेल एवढें तरी तुम्हांला दिसून आलेंच कीं नाहीं ? म्हणून तुमचा धर्म वाटेल तें करून चोराला हाकून देणें हा नाहीं हें ओघानेंच येतें. साधन वेगळें वापरलें कीं परिणाम वेगळा होतो हें तुम्हांला दिसलें. चांगले परिणाम जर निष्पन्न करायचे असतील तर साधनें चांगलींच पाहिजेत. आणि नेहमीं नसलें तरी बहुतेक वेळां

शस्त्रबळापेक्षां दयाबळ हें अधिक सामर्थ्यवान् असतें. शस्त्रांत हानि आहे, दयेंत हानि मुळींच नाहीं. १

लोक म्हणतात, ‘ साधनें म्हणजे शेवटीं साधनेंच. ’ मी म्हणतों, ‘ साधनें म्हणजेच शेवटीं सर्व कांहीं. ’ जशीं साधनें तसें साध्य. साध्य–साधनांना एकमेकांपासून वेगळें करणारी कोणतीहि तटबंदी नाहीं. खरोखर जगन्नियंत्यानें आम्हांला जी सत्ता ( आणि तीहि अतिशय मर्यादित प्रमाणांत ) दिली आहे ती साधनावरच दिली आहे, साध्यावर आपली कांहीं सत्ता नाहीं. साधन जितकें साधेल तितक्याच प्रमाणांत तंतोतंत साध्य साधतें. या सिद्धान्ताला अपवाद नाहीं. २

आपलें साध्य काय हें मी स्पष्टपणें मांडणें आवश्यक आहे यावर तुम्ही भर दिला आहे. परंतु एकदां तें निश्चित केल्यानंतर पुनः पुनः तें सांगण्याचें मला कधीं महत्त्व वाटलेलें नाहीं. साध्याची शक्य तितकी स्पष्ट अशी व्याख्या करून त्याचे गुण किती जरी वर्णन करून सांगितले तरी, जर तें प्राप्त करून घेण्याच्या साधनाची मला माहिती नसेल आणि तें जर मी उपयोगांत न आणीन तर नुसत्या व्याख्येनें आणि गुणवर्णनानें कांहीं साध्य प्राप्त होणार नाहीं. म्हणून मी प्रामुख्यानें साधन संभाळण्याकडे आणि त्याचा उत्तरोत्तर जास्त वापर करण्याकडे लक्ष पुरविलें आहे. साधनांची जर आपण काळजी घेतली तर साध्य पदरांत पडणें खात्रीचें आहे. आपलें साधन जितकें शुद्ध तितक्याच प्रमाणांत बरोबर आपली साध्याकडे प्रगति होईल असेंहि मला वाटतें. हा मार्ग लांबचा वाटेल, कदाचित् बराच पल्ल्याचा वाटेल, तरी तोच अगदीं जवळचा आहे याविषयीं माझी खात्री आहे. ३

* * *

# : ७ : सत्याग्रहाचें शस्त्र व शास्त्र

आश्रमाचें अस्तित्व सत्याचा आग्रह ठेवून सत्याचा शोध करण्याकरितां आहे. आणि असा आग्रह ठेवतांना जेव्हां सत्याग्रहरूपी शस्त्र वापरावें लागेल तेव्हां आश्रम त्याचा प्रयोग करील. तो सत्याग्रहाचे नियम आणि मर्यादा यांचें संशोधन करील.

पण सत्याग्रहाची मर्यादा काय ? या शस्त्राचा तीव्र उपयोग केव्हां करतां येतो ? मनुष्य नेहमीं सत्याला चिकटून राहतो त्याचें नांवहि ' सत्याग्रह ' असें आहे. येथें त्या सत्याग्रहाची चर्चा नाहीं, तर दुसऱ्यांच्या विरुद्ध त्याचा शस्त्र म्हणून उपयोग करण्याविषयींची चर्चा प्रस्तुत आहे.

असा सत्याग्रह आपल्या सोबत्यांच्या विरुद्ध, आप्तस्वकीयांविरुद्ध, समाजाविरुद्ध, सरकाराविरुद्ध आणि जगाविरुद्ध होऊं शकतो. १

एका अरबी ग्रंथांत म्हटलें आहे कीं, ज्याला स्वाभिमान नाहीं त्याला धर्म नाहीं. राष्ट्रें मोठीं झालीं तीं आपला स्वाभिमान हळूहळू वाढवीत मोठीं झालीं. स्वाभिमानाचा अर्थ गर्विष्ठपणा किंवा उद्दामपणा नव्हे तर ती एक मनाची अवस्था आहे. त्या अवस्थेंतलें मन केवळ भयामुळें किंवा जडतेमुळें आपले विशिष्टाधिकार गमावूं द्यायला तयार नसतें. ज्याचा खरोखर ईश्वरावर विश्वास आहे असाच मनुष्य स्वाभिमानाच्या अवस्थेप्रत पोंचतो; आणि ज्याचा तसा विश्वास नाहीं त्याला न्याय काय तेंहि कळत नाहीं आणि तो कसा करावा तेंहि समजत नाहीं, असें माझें निश्चित मत आहे. २

' सत्याग्रह ' या शब्दाचा धात्वर्थ सत्याला चिकटून राहणें असा आहे. यावरून सत्य-बळ असा अर्थ निघाला. मीं त्याला प्रेमबळ किंवा आत्मबळ असें म्हटलें आहे. अगदीं प्रारंभींच्या अवस्थेंतच मला असें दिसून आलें कीं आपल्या विरोधकावर हिंसेचा प्रयोग करण्याला सत्य-साधनेंत स्थान नाहीं. त्याला धीरानें आणि सहानुभूतीनें त्याच्या चुकीपासून परावृत्त केलें पाहिजे. कारण एकाला जें सत्य भासतें तें दुसऱ्याला चूक वाटण्याचा

संभव आहे. धीर धरणें म्हणजे आत्मक्लेश सहन करणें. तेव्हां या सिद्धान्ताचा अर्थ, सत्याची प्रस्थापना विरोधकाला क्लेश देऊन नव्हे तर स्वतः क्लेश सोसून करणें, असा झाला. ३

अन्यायाच्या निवारणार्थ लोक जर आत्मबळाचा आधार घेतील तर आज असलेलीं पुष्कळशीं दुःखें टाळतां येतील. ४

आत्मबळाची अपरिमित शक्ति ज्यांनीं ओळखली त्यांनीं शरीरक्लेश आपल्या नशिबीं लिहिले आहेत असें बुद्धिपुरस्सर आणि पूर्ण विचारान्तीं मानून चालणें एवढीच आवश्यकता आहे; आणि एकदां का तें मानलें म्हणजे मग आत्मक्लेश हें ते सहन करणाऱ्याला आनंदाचेंच साधन बनतें. ५

आत्मक्लेश सोसणाऱ्यांना त्याचें फळ आपल्या हयातींतच दिसलें पाहिजे असें नाहीं. त्यांची निष्ठा जर त्यांच्या मागें राहिली असली तर ती इष्ट तो परिणाम घडवून आणीलच याची खात्री बाळगावी. हिंसापद्धतीनेंसुद्धां अहिंसेच्या पद्धतीपेक्षां याहून जास्त हमी मिळत नाहीं. ६

या बळाचा यशस्वी रीत्या उपयोग व्हायचा असेल तर अट एकच; ती ही कीं शरीराहून वेगळा असा आत्मा आहे आणि तो नित्य आहे व शरीराहून श्रेष्ठ आहे हें जाणलें पाहिजे. आणि हें ज्ञान केवळ बुद्धिगत होऊन भागणार नाहीं, ती जिवंत श्रद्धा बनली पाहिजे. ७

माझा असा बिनचूक अनुभव आहे कीं या जगांत भलाई ही दुसऱ्यांत भलाई उत्पन्न करते, आणि बुराईमुळें दुसऱ्यांत बुराई उत्पन्न होते. आणि म्हणून बुराईला जर विरुद्ध बाजूनें बुराईचा पडसाद मिळाला नाहीं तर ती व्यर्थ जाते आणि अशा रीतीनें तिला पोषण न मिळाल्यामुळें ती मरून जाते. बुराई ही केवळ बुराईवरच टिकूं शकते. पूर्वींच्या ऋषींना हें सत्य माहीत होतें आणि म्हणून बुराईचा बदला बुराईनें घेण्याऐवजीं बुद्धिपुरस्सर ते भलाईनें घेत आणि अशा रीतीनें बुराई मारून टाकीत. असें असूनहि बुराई अजून टिकलेली आहे, कारण कीं पुष्कळांनीं या शोधाचा लाभ करून घेतलेला नाहीं. खरें पाहतां, ज्या क्षणीं आपल्याला या नियमांतील सत्याची प्रतीति होते त्याच क्षणीं बुराईचा प्रतिकार भलाईनें करण्याइतकें सोपें

काम दुसरें कोणतेंहि राहात नाहीं. हा नियम खरा ठरला नाहीं असें एकहि उदाहरण माझ्या स्मरणांत नाहीं. माझ्या अनुभवाप्रमाणें तर अगदीं अज्ञात अशा माणसांकडूनसुद्धां अशा वृत्तीला अचूकपणें अनुकूल उत्तर मिळालें आहे. ८

प्रतिकार करूं नये या वचनाच्या खऱ्या अर्थासंबंधीं नेहमींच गैरसमज झालेला आहे किंवा त्याचा विकृत अर्थ केला गेलेला आहे. अहिंसक मनुष्यानें आक्रमकाच्या हिंसेपुढें वांकावें असा त्याचा मुळींच अर्थ नाहीं. आक्रमकाच्या हिंसेला हिंसेनें त्यानें उत्तर दिलें नाहीं तरी त्याच्या अन्याय्य मागणीला त्यानें बिलकुल मान्यता देतां कामा नये, मग त्यांत मरण आलें तरी हरकत नाहीं. अहिंसेचा हा खरा अर्थ आहे. ९

माझ्यांत असें बळ पाहिजे असें मला वाटतें कीं जें मला माझा एकमेव स्वामी जो परमेश्वर त्याच्याशिवाय इतरा कोणाहिपुढें मी वांकणार नाहीं असें सामर्थ्य देईल. असें मला करतां येईल तेव्हांच माझ्यांत अहिंसा आली असें मी खात्रीपूर्वक म्हणूं शकेन. १०

अहिंसा क्रियाशील होते तेव्हां तिचें स्वरूप जाणूनबुजून ओढवून घेतलेल्या आत्मक्लेशाचें असतें. दुष्कर्मी माणसाच्या इच्छेपुढें मुकाटपणें वांकणें हा तिचा अर्थ नसून आपला सगळा आत्मा जुलूम करणाऱ्याच्या इच्छेविरुद्ध उभा करणें हा तिचा अर्थ आहे. ११

एखादें काम मला पसंत नसलें तर तें मी करणार नाहीं; यांत मी सत्याग्रह किंवा आत्मबळ वापरतों. उदाहरणार्थ, मला लागू होईल असा अमुक एक कायदा सरकारनें पास केला. तो मला पसंत नाहीं. जर मी हिंसेचा वापर करून सरकारला तो रद्द करायला लावला तर तेथें ज्याला शरीरबळ म्हणतात तें मीं वापरलें. तो कायदा मी मान्यच केला नाहीं आणि त्याच्या भंगाकरितां होणारी शिक्षा मी भोगली तर मी आत्मबळ किंवा सत्याग्रह उपयोगांत आणला. सत्याग्रहांत मी आत्मबलिदान करतों. दुसऱ्याचा बळी देण्यापेक्षां आपला बळी देणें श्रेष्ठ दर्जाचें आहे हें कोणीहि मान्य करील. शिवाय, सत्याग्रहाच्या साधनानें लढतांना जर तो लढा करणें चुकीचेंच ठरलें तर फक्त लढणाराच दुःख भोगील. म्हणजे आपल्या चुकीची शिक्षा सत्याग्रह करणारा स्वतःच भोगतो. १२

वा. क्र. १०६६४

अकारण सोसलेलें दुःख ज्या अन्यायाकरितां म्हणून सोसलें जात असेल त्या अन्यायाच्या निवारणावर उत्तमांत उत्तम रामबाण उपाय आहे. १३

जगांत इतक्या मोठ्या संख्येनें माणसें अजून नांदत आहेत यावरून हें कळून येतें कीं जगाची रचना शस्त्रबळावर आधारलेली नसून सत्य, दया किंवा आत्मबळ यांवर आधारलेली आहे. म्हणजे मोठ्यांत मोठा ऐतिहासिक पुरावा मुळीं हाच आहे कीं जग हें लढायांचा धिंगाणा चालू असतांना-सुद्धां टिकलें आहे. याचाच अर्थ लढाईच्या बळापेक्षां दुसरें बळ जगाचा आधार आहे.

हजारों काय लाखों माणसें प्रेमाला वश राहून आपलें जीवन घालवितात, कोट्यवधि कुटुंबांतील तंटे आपसांतील प्रेमभावनेंत विरून जातात, शेंकडों समाज गुण्यागोविंदानें राहत आले आहेत, यांची नोंद इतिहास ठेवीत नाहीं. तो ठेवूंहि शकणार नाहीं. जेव्हां हा दयेचा, प्रेमाचा किंवा सत्याचा प्रवाह अडतो, त्यांत भंग पडतो तेव्हांच त्याची नोंद इतिहासांत होते. जी गोष्ट कुटुंबांच्या, जमातींच्या संघांच्या बाबतींत तीच राष्ट्रांच्याहि बाबतींत लागू समजावी. कुटुंबांत एक कायदा आणि राष्ट्राराष्ट्रांत दुसरा असें मानण्याचें बिलकुल कारण नाहीं. इतिहास हा अस्वाभाविक घटनांची नोंद घेत असतो. सत्याग्रह हा स्वाभाविक असल्यामुळें त्याची नोंद घेण्याचें कारणच राहत नाहीं. १४

सत्याग्रह हा सरकारच्या विरुद्धच फक्त करतां येतो असें नाहीं, तो कुटुंबाविरुद्ध आणि समाजाविरुद्धहि करतां येतो. थोडक्यांत म्हणजे, सत्याग्रहाचा उपयोग पति आणि पत्नी यांच्यामध्यें, बाप आणि मुलगा यांच्यामध्यें आणि मित्रामित्रांमध्यें करतां येतो. जीवनाच्या कोणत्याहि क्षेत्रांत आणि कसल्याहि प्रकारच्या गाऱ्हाण्यांचें निवारण करण्याकरितां या हत्याराचा उपयोग आपल्याला करतां येईल. हें हत्यार उपयोगांत आणणाऱ्याची तसेंच ज्याच्या विरुद्ध तें उपयोगांत आणलें जाईल त्याचीहि तें शुद्धि करतें. या हत्याराचा सदुपयोग कधींहि अनिष्ट ठरण्याजोगा नाहीं आणि तो कधींहि वायां जात नाहीं. सत्याग्रहाला दुराग्रहाचें रूप आलें आणि त्यामुळें जर कुपरिणाम निपजले तर त्याचा दोष सत्याग्रहाला लावतां येणार नाहीं.

२११०७



अशा प्रकारचा सत्याग्रह जाणतां अथवा अजाणतां बहुधां कुटुंबांत उपयोगांत आणला जातोसें दिसतें. म्हणजेच, मुलाला जर आपला बाप आपल्यावर अन्याय करीत आहे असें दिसलें तर तो त्याचा अन्याय सहन करीत नाहीं, आणि आनंदानें त्यांतून मिळणारी शिक्षा सहन करतो आणि शेवटीं आपल्या कठोरहृदयी बापाला जिंकून घेण्यांत आणि त्याच्याकडून न्याय मिळविण्यांत यशस्वी होतो. परंतु चैतन्य नाहींसें करणारा जडपणा आमच्यांत असल्यामुळें सत्याग्रह कुटुंबक्षेत्राच्या पलिकडे वाढविण्याला आमची तयारी होत नाहीं. म्हणूनच राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांत सत्याग्रहाचा उपयोग हा एक नवा प्रयोग मी मानला आहे. टॉल्स्टॉय यांनीं आपल्या एका पत्रांत हा नवा प्रयोग असल्याचें सांगून त्याकडे जगाचें लक्ष वेधलें आहे.

सत्याग्रहाचा उपयोग केवळ धार्मिक क्षेत्रांतच करावा असें कित्येकांचें मत आहे. माझ्या व्यापक अनुभवांतून माझें मत उलट झालें आहे. इतरहि क्षेत्रांत त्याचा आपल्याला उपयोग करतां येतो आणि त्या क्षेत्रांना आध्यात्मिक स्वरूप देतां येतें; असें करण्यानें यश लवकर पदरांत पडतें व पुष्कळ चुकीच्या गोष्टी करण्यापासून आपण बचावतों. माझें असें निश्चित मत आहे कीं, सत्याग्रहांत अर्थशास्त्राच्या संशयातीत नियमांचें पालन येतें आणि म्हणून सत्याग्रह ही व्यावहारिक गोष्ट आहे असें मी मानतों. वर मीं सांगितल्याप्रमाणें सत्याग्रह हें अगदीं नवीन हत्यार असल्यामुळें तें समजून यावयाला आणि लोकांनीं तें ग्रहण करण्याला काळ लागण्याचा संभव आहे – आणि ज्या गोष्टींतून अति महान् आणि चांगले परिणाम निपजतात अशा गोष्टी व्हायला काळ हा लागतोच – परंतु जेव्हां तो साऱ्या देशभर पसरेल तेव्हां ज्या राजकीय व सामाजिक सुधारणा घडून यावयाला आज फार काळ लागत आहे त्या त्या मानानें कमी वेळांत पदरांत पडतील, राज्यकर्ते व प्रजा यांच्यांत पडलेला अंतराय सांधला जाईल, आणि अविश्वास व दूरीभाव यांच्या जागीं विश्वास व प्रेमभाव येईल.

सत्याग्रहाचा व्यापक प्रचार होण्याकरितां फक्त एकाच गोष्टीची गरज आहे. लोकनेते जर तो बरोबर समजून घेतील आणि लोकांपुढें ठेवतील, तर लोक त्याचें स्वागत करायला तयार आहेत त्याविषयीं मला खात्री

आहे. त्याचें खरें सौंदर्य समजून येण्याकरितां सत्यावर व अहिंसेवर अढळ श्रद्धा असली पाहिजे. सत्य म्हणजे काय तें विस्तारानें सांगण्याची गरज नाहीं. अहिंसेचेंहि येथें सूक्ष्म विवरण करण्याची माझी इच्छा नाहीं. अहिंसेचा अर्थ थोडक्यांत इतकाच कीं ज्यांच्याकडून आपल्याला न्याय मिळावा अशी आपली इच्छा असेल त्यांच्याविषयींच्या द्वेषभावनेनें आपली हालचाल घडूं नये, त्यांच्या शरीराला इजा करून त्यांच्याकडून कांहीं मिळविण्याचा विचारहि आपल्या मनांत येऊं नये, निव्वळ सौजन्याच्या मार्गानें तें मिळविण्याचा प्रयत्न व्हावा. एवढी अहिंसा पाळण्याइतके आपण अहिंसक होऊं असा विश्वास जर स्वत:विषयीं आपला असला तर इष्ट त्या सुधारणा सहज मिळवितां येतील.

जर सारें राष्ट्र. सत्याग्रह हेंच आपलें कायमचें शस्त्र, असें ठरवील तर आमच्या सर्व हालचालींना निराळेंच रूप येईल. सत्याग्रहांत जेवढी राष्ट्राची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रगति मला दिसते तेवढी दुसऱ्या कशांतहि दिसत नाहीं. १५

'तुमच्या सत्याग्रहाच्या चळवळीनें बोल्शेविझमूच्या हल्ल्याची आम्हांला जी भीति आहे तिचाच जोर वाढतो,' असा कांहीं मित्रांचा आक्षेप आहे.

परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं आपल्या देशावर कोसळूं पाहणाऱ्या या अरिष्टाला जर कोणी थांबवूं शकणार असेल तर तो सत्याग्रहच थांबवूं शकेल. बोल्शेविझम् ( कम्यूनिझम् ) हा आधुनिक भौतिक सुधारणेचा अपरिहार्य परिपाक आहे. भौतिक सुधारणेनें जडाची जी मूढ पूजा चालविली आहे त्यांतूनच भौतिक प्रगति हेंच आपलें अंतिम साध्य असें मानायला शिकलेला एक मतपंथ निर्माण झाला आहे, त्याचा अंतिम जीवन-मूल्यांशीं असलेला संबंध तुटलेला आहे. स्वैराचार हें बोल्शेविकांचें धर्मसूत्र, तर संयम हें सत्याग्रहाचें धर्मसूत्र आहे. सत्याग्रह हें सामाजिक वा राजकीय कोणत्याहि जीवनाचें प्रधान अंग आहे एवढें मान्य करण्याकरितां जर मी राष्ट्राचें मन वळवूं शकलों तर बोल्शेविक प्रचाराची भीति बाळगण्याचें कारण राहणार नाहीं. राष्ट्राला सत्याग्रह स्वीकारायला सांगतांना मी वास्तविक कांहीं नवें घ्यायला सांगत नाहीं. आजपर्यंत आमच्या जीवनावर प्रामुख्यानें सत्ता चालविणाऱ्या प्राचीन धर्माला मी एक नवें नांव देतों

इतकेंच, आणि माझी अटळ भविष्यवाणी आहे कीं जडावर चैतन्याचें, पशुबळावर स्वातंत्र्याचें व प्रेमाचें सार्वभौमत्व सांगणारा हा धर्म जर आपण अमान्य करूं तर थोड्याच वर्षांच्या काळांत एकेकाळीं अत्यंत पवित्र असलेल्या या भूमींत बोल्शेविझम् माजलेला आपल्याला दिसेल. १६

सत्याग्रहाच्या पद्धतींत नेहमीं सत्याला चिकटून राहणें येतें. कोणत्याहि कारणाकरितां – अगदीं आपल्या देशाकरितांसुद्धां – सत्य कधींहि सोडून देतां येणार नाहीं. सत्याग्रहाच्या या अलौकिक पद्धतींत सत्याचा अंतीं विजय नेहमीं गृहीत धरलेला असतो. सत्याची तलवार जर हातीं असेल तर उपासकाला पोलादी तलवारीची किंवा दारूगोळ्याची कांहीं गरज लागत नाहीं. शत्रूला तो आत्मबलानें म्हणजेच प्रेमानें जिंकतो. प्रेमाची कसोटी मित्रा-मित्रांत होत नसते. मित्रानें मित्रावर प्रेम करणें यांत नवलहि नाहीं, गुणहि नाहीं, किंवा त्यांत कष्टहि नाहींत. त्याची खरी कसोटी शत्रु म्हटलेल्यावर जेव्हां आपण त्याचा प्रयोग करूं तेव्हांच होतें; मग तो सद्‌गुण बनतो, त्यांत कष्ट येतात, तें एक पुरुषार्थाचें आणि खऱ्या शौर्याचें कृत्य होतें. १७

योग्य किंवा न्याय्य काय तें पटवून देण्याची व मनुष्यप्राण्यांत असलेल्या बुद्धीला आणि सहसंवेदनावृत्तीला आवाहन करून मन पालटविण्याची सत्याग्रह ही एक पद्धति आहे. मानवांत जो अंतिम सदंश आहे त्यावर सत्याग्रहाची भिस्त असते. १८

सत्याग्रही या नात्यानें माझा नियमच आहे कीं, कोणाहि विरुद्ध कांहीं करायचें झालें तर अगोदर त्या माणसाचा दृष्टिबिंदु त्याच्याकडूनच समजावून घ्यायचा आणि जेथपर्यंत त्याच्याशीं अनुकूल होता येत असेल तेथपर्यंत त्याला अनुकूल व्हायचें. १९

सत्याग्रह्यानें एकदां आपली कमींत कमी मागणी काय तें ठरवून टाकल्यानंतर त्यापासून माघार घेऊं नये. अशा रीतीनें नमून साऱ्या जगाला जिंकतां येईल. २०

कोणत्याहि शुद्ध लढ्याला गणितश्रेढीचा नियम लागू पडतो असें अनुभवानें मी शिकलों आहें. पण सत्याग्रहाच्या बाबतींत तर ही गोष्ट मी

सिद्धान्तरूपच मानतों. सत्याग्रहाचा लढा जसजसा प्रगत होतो तसतशा अनेक गोष्टी त्याच्यांत येऊन मिसळतात आणि त्यामुळें त्यांतून निर्माण होणाऱ्या परिणामांत वाढ होत जाते. सत्याग्रहाचा हा परिणाम अनिवार्य आहे असें मला वाटतें. त्याचें कारण त्याच्या मूळ तत्त्वांतच आहे. कारण सत्याग्रहांत कमींत कमी तें जास्तींत जास्त असतें. म्हणून जें कमींत कमी त्यांतून आणखी कमी करणें राहातच नाहीं. त्यामुळें त्याहून मागें हटतांच येत नाहीं, अर्थात् स्वाभाविक क्रिया वृद्धीचीच संभवते. इतर लढे शुद्ध असले तरीसुद्धां त्यांत केलेल्या मागणीमध्यें कमी करण्याला पहिल्यापासूनच वाव ठेवण्यांत येतो, त्यामुळें त्यांना गणितश्रेढीचा नियम निरपवादपणें लागू करण्याच्या बाबतींत मी शंका प्रदर्शित केली. पण जेव्हां कमींत कमी तेंच जास्तींत जास्तहि असतें तेव्हां गणितश्रेढीचा नियम कसा लागू पडतो हें आतां दाखवावयाचें आहे. गंगानदी पुढें पुढें वाहत जातांना तिला अनेक नद्या येऊन मिळतात आणि तिची वृद्धि होते, पण वृद्धि शोधण्याकरितां कांहीं गंगानदी आपली गति सोडीत नाहीं, तसा सत्याग्रही-सुद्धां आपला मार्ग सोडीत नाहीं. सत्याग्रह चालू आहे अशा स्थितींत प्रतिपक्षी जर स्वतःच नव्या आपत्ती उत्पन्न करील तर त्या आपोआपच सत्याग्रहांत दाखल होतील. सत्याग्रही आपल्या मार्गानें जात असतांना त्याच्या मार्गाला येऊन मिळणाऱ्या गोष्टींची अवगणना करायची म्हणजे त्याला सत्याग्रह सोडूनच द्यावा लागेल. आणि प्रतिपक्षी हा सत्याग्रही असतच नाहीं ( कारण सत्याग्रहाच्या विरुद्ध सत्याग्रह असंभवनीयच आहे ), म्हणून त्याला कमी जास्तीचें बंधनहि असत नाहीं. एखादें नवेंच भूत उभें करून सत्याग्रह्याला भीति दाखवावयाची म्हटली तर तो दाखवूं शकेल. पण सत्याग्रह्यानें भीति सोडलेलीच असते; त्यामुळें प्रतिपक्षानें नव्या आपत्ती आणल्या तर त्यांच्याविरुद्धसुद्धां तो आपला मंत्रोच्चार करतो आणि श्रद्धा बाळगतो कीं मधेंच उपस्थित झालेल्या सगळ्या आपत्तींच्या बाबतींत हा मंत्रोच्चार अवश्य सफल होईल. म्हणूनच सत्याग्रह जसा लांबत जाईल— म्हणजे प्रतिपक्षी तो लांबवीत नेईल—तसें प्रतिपक्षाच्या दृष्टीनेंच त्याचें त्यांत नुकसानच होणार आणि सत्याग्रह्याला तितका जास्त लाभ होणार. २१

शुद्ध लढ्यांत लढाई करतां करतां लढा करणाऱ्यांची शक्ति जरी वाढत

असलेली आढळून आली तरी त्याला लढ्याच्या आरंभीं ठरविलेल्या हेतूच्या पुढें जातांच येणार नाहीं. आणि याच्या उलट, ज्या हेतूकरितां लढा सुरू केला असेल त्या हेतूचा त्याग, कालांतरानें लढण्याची शक्ति क्षीण झाली तरीहि, त्याला करतां येणार नाहीं. २२

अन्याय करणाऱ्यानें वीतभर मागितलें तर हातभर द्यायचें, कुडतें मागितलें तर अंगरखासुद्धां काढून द्यायचा, याचेंच नांव सत्याग्रह नव्हे काय? नेहमींपेक्षां ही उफराटी रीत काय म्हणून, असें कोणी विचारतील. सर्वसामान्य रीत ही हिंसेवर आधारलेली आहे. माझें जीवन जर अंतीं हिंसेच्या कायद्यांनीं चाललें असेल तर इंचभर देण्याचेंसुद्धां मी नाकारीन, कारण पुढें कदाचित् हातभरसुद्धां मागतील. याहून निराळ्या रीतीनें जर मी वागलों तर मी मूर्ख ठरेन. पण माझ्या जीवनाचें सूत्र अहिंसा हें जर असेल तर वीतभर मागितलें असतां हातभर देण्याची मी तयारी ठेवीन, नव्हे देईन. असें करण्यानें लुबाडणाऱ्याच्या मनांत मी एक विलक्षण आणि आनंददायक अशा भावनेची लहर उत्पन्न करतों. तो कदाचित् या माझ्या कृतीनें गोंधळूनहि जाईल आणि माझ्याशीं कसें वागावें हें त्याला समजणार नाहीं. हें 'शत्रु' म्हणून म्हटला त्याच्याबद्दल झालें. जें कांहीं बिनमहत्त्वाचें असेल तें देऊन टाकण्याचा निश्चय केल्यानें, जें अत्यंत महत्त्वाचें मला वाटतें त्याच्या बचावाकरितां आणि रक्षणाकरितां जीव देण्याचें बळ पूर्वींपेक्षां मला अधिक लाभतें. मुख्य वस्तूचें संरक्षण प्राण देऊनसुद्धां करण्याचें सामर्थ्य संपादन करावयाचें असेल तर गौण वस्तु बिनतक्रार देऊन टाकली पाहिजे ही अट पुरी करणें अवश्य आहे. २३

दरेक हितकारी आंदोलन पुढील पांच अवस्थांतून जात असतें : उदासीनता, उपहास, निंदा, दडपशाही आणि आदर. जें आंदोलन सौम्य वा कडक दडपशाहीवर मात करून टिकून राहतें त्या आंदोलनाचा पुढें हटकून आदर होतो, आणि आदर हें यशाचें दुसरें नांव आहे. आपण जर आंदोलनाला प्रामाणिक राहूं तर ही दडपशाही म्हणजे विजयाची खात्रीची खूण म्हणून समजायला हरकत नाहीं. पण, आपण प्रामाणिक असूं तर, या दडपशाहीपुढें भिऊन नमतें घेणार नाहीं, किंवा रागानें जशास तसें करून आपण दांडगाईचाहि आसरा घेणार नाहीं. दांडगाई किंवा हिंसा म्हणजे आत्मघात होय. सत्ता

ही फार चिवट असते, ती मरतां मरत नाहीं. आणि दडपशाही करूनहि जगण्याकरितां शेवटची धडपड करणें हें सरकारच्या बाबतींत स्वाभाविक असतें हें आपण ओळखलें पाहिजे. अशा आणीबाणीच्या वेळीं संपूर्ण आत्मसंयम हाच यशाकडचा जास्तींत जास्त जलद मार्ग होय. २४

सत्ताधिकाऱ्यांना विवेकशून्य प्रतिरोध केल्यानें बेबंदशाही, बे-लगामी बेछूटपणा आणि तत्परिणामीं आत्मनाश हे अनिवार्यपणें येतात. २५

मनुष्याच्या स्वभावाची ठेवण अशी आहे कीं रागाची किंवा अपशब्दांची आपण जर मुळींसुद्धां दखल घेतली नाहीं तर राग करणाऱ्या किंवा शिव्या देणाऱ्या माणसाला थोड्याच वेळांत त्यांचा कंटाळा येतो आणि तो थांबतो. सत्याग्रही हा ' शत्रू 'ला नेहमीं आपल्या संभाव्य मित्राप्रमाणें मानतो. अहिंसेच्या गेल्या पन्नास वर्षांच्या माझ्या अनुभवाच्या काळांत संपूर्ण अहिंसेनें वागल्यानंतर शत्रुत्व शेवटपर्यंत टिकून राहिल्याचें एकहि उदाहरण माझ्या आढळांत आलेलें नाहीं. २६

आशेला यत्किंचित का होईना जागा आहे तोंवर सत्याग्रह्यानें आशा सोडूं नये हें सत्याग्रहाच्या नीतीला आवश्यक आहे. कारण आपल्या विरोधकाची मानखंडना किंवा पराभव करणें हें सत्याग्रह्याचें कार्य नसून त्याच्या मनांत बदल घडवून आणणें हें त्याचें कार्य आहे; म्हणून आपल्या विरोधकामध्यें जें कांहीं उत्तम आहे तें जागृत करण्याच्या आपल्या शक्तीच्या बाबतींत सत्याग्रही कधीं निराश होत नाहीं. त्याकरितां जरूर पडली तर आपल्या विरोधकाच्या दारींसुद्धां तो जातो. मी तसा जनरल स्मट्स् यांच्याकडे अनेक वेळां गेलों होतों, आणि गंमत अशी कीं शेवटचें त्यांच्या दारापाशीं जाणें हा यशाचा आरंभ ठरला. तशी मला मुळींसुद्धां आशा नव्हती. २७

सत्याग्रह ही प्रत्यक्ष प्रतिकाराच्या अत्यंत प्रभावशाली पद्धतीपैकीं एक पद्धति असल्यामुळें सत्याग्रही हा इतर सर्व साधनें अगोदर अजमावून पाहून संपवितो आणि शेवटीं सत्याग्रहाचा अवलंब करतो. म्हणून तो प्रस्थापित सत्ताधिकाऱ्यांच्याकडे वरचेवर आणि सतत जाईल, लोकमताला आवाहन करील व तें शिक्षित करील, जो कोणी त्याची बाजू ऐकून घेण्याची इच्छा धरील त्या प्रत्येकापुढें ती तो शांतपणें आणि

निर्विकारपणें मांडील, आणि हे सर्व मार्ग अजमावून संपविल्यानंतरच तो सत्याग्रहाचा अवलंब करील. पण मग एकदां का त्याला त्याच्या अंतरांतून प्रेरणा देणारी हांक आली आणि तो सत्याग्रह करायला निघाला कीं मग त्याला मागचे दोर कापावेच लागतात, मग मागें पाऊल घेणें उरत नाहीं. २८

प्रत्यक्ष प्रतिकाराच्या कामीं इतर सुसंगत उपाय करून पाहण्याला नेहमीं बंदी असते असें नाहीं. तसेंच, अर्ज-विनंत्या इ. चे मार्ग नेहमींच सत्याग्रह्याचा दुर्बळपणा दर्शवितात असेंहि नाहीं. नव्हे, जो नम्र नाहीं तो सत्याग्रहीच नव्हे. २९

ज्यांना अन्याय सोसावा लागतो त्यांनींच सत्याग्रह करावा हें सत्याग्रहाचें सारभूत तत्त्व आहे. ज्यांना सहानुभूतीचे सत्याग्रह ही संज्ञा यथार्थपणें देतां येईल अशा सत्याग्रहांचीं उदाहरणेंसुद्धां कल्पितां येतील. अन्याय करणाऱ्यां-च्या मनांत पालट घडवून आणणें, त्यांच्यांतील न्यायभावना जागृत करणें आणि ज्यांच्यावर आपण अन्याय करतों त्यांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहकार्यावांचून आपल्याला वाटेल तसा अन्याय आपण करूं शकणार नाहीं हें त्यांच्या प्रत्ययाला आणून देणें, हा सत्याग्रहाचा मूळ हेतु आहे. राजकोट आणि हैद्राबाद या भागांतील लोक जर आपआपल्या हेतूंच्या सिद्धीसाठीं क्लेश सहन करण्याला तयार नसतील तर सत्याग्रहाच्या रूपानें बाहेरची मदत कितीहि झाली तरी त्यांची खऱ्या अर्थानें सुटका होणार नाहीं. ३०

सत्याग्रह सहजगत्या प्राप्त होतो, त्याला शोधीत जावें लागत नाहीं, हीच सत्याग्रहाची खुबी आहे. हा मूळ त्या तत्त्वांतीलच अंगभूत गुण आहे. धर्मयुद्धांत कसलींहि गुपितें राखावयाचीं नसतात, त्यांत कपटाला वाव नसतो, असत्याला स्थान नसतें. असें धर्मयुद्ध न मागतां प्राप्त होतें. धर्म-निष्ठ मनुष्य हा सदोदित त्याकरितां तयार असतो. ज्या युद्धाची अगोदर योजना करावी लागते तें धर्मयुद्धच नव्हे. धर्मयुद्धांत खुद्द ईश्वरच त्या मोहिमा आंखतो आणि ते लढे चालवितो. धर्मयुद्ध हें केवळ ईश्वराच्या नांवानेंच चालवितां येतें, आणि जेव्हां सत्याग्रह्याला आपण असहाय्य झालोंसें वाटतें, शेवटची घडी जवळ आली असें वाटून त्याला आपल्या-भोंवतीं सर्वत्र अंधार दिसूं लागतो तेव्हांच ईश्वर त्याच्या सुटकेकरितां धांव

घेतो. आपल्या पायांतळींच्या रजःकणाहूनहि आपण तुच्छ आहोंत अशी जेव्हां माणसाला प्रतीति होते तेव्हां ईश्वर साहाय्य होतो. 'निर्बल के बल राम.' २१

**सर चिमणलाल सेटलवाड** : तुमच्या सत्याग्रह-सिद्धान्तासंबंधीं बोलायचें तर, त्याची जेवढी मला माहिती आहे त्याप्रमाणें, त्यांत सत्याचा शोध असतो आणि तो शोध करतांना तुम्ही स्वतःवर यातना ओढवून घेतां आणि दुसऱ्या कोणालाहि दुखापत करीत नाहीं, होय ना ?

**गांधीजी** : होय.

**प्रश्न** : सत्याच्या शोधासाठीं माणसानें किती जरी प्रामाणिकपणें धडपड केली, तरी त्याच्या सत्याविषयींच्या कल्पना इतरांच्या कल्पनांहून भिन्न असूं शकतील, मग सत्य काय तें कोणीं ठरवावयाचें ?

**उत्तर** : स्वतः त्या व्यक्तीनेंच तें ठरवायचें.

**प्रश्न** : सत्यासंबंधीं निरनिराळ्या व्यक्तींचीं निरनिराळीं मतें असतील. त्यानें गोंधळ उत्पन्न होणार नाहीं काय ?

**उत्तर** : मला तसें वाटत नाहीं.

**प्रश्न** : प्रत्येक व्यक्तीच्या बाबतींत सत्याकरितां प्रामाणिकपणें होणारा प्रयत्न वेगवेगळा होईल.

**उत्तर** : याचकरितां सत्याग्रहांत अहिंसा हा एक आवश्यक उपसिद्धान्त आहे. अहिंसा नसेल तर घोटाळा आणि सावळा गोंधळ माजेल.

**प्रश्न** : सत्याचा शोध ज्याला करायचा आहे त्याची उच्च नैतिक आणि बौद्धिक तयारी असायला नको काय ?

**उत्तर** : कांहीं गरज नाहीं. प्रत्येकाकडून तशी अपेक्षा करणें अशक्य होईल. 'अ' ला जर त्याच्या स्वतःच्या प्रयत्नांनीं सत्याचा आविष्कार झालेला असला आणि तें सत्य 'ब' व 'क' यांनीं आणि इतरांनी मानायचें ठरविलें असलें तर त्यांची 'अ' इतकी तयारी असण्याची गरज मला वाटत नाहीं.

**प्रश्न** : मग त्याचा अर्थ असा होतो कीं एक मनुष्य अमुक एका निर्णयाला येतो, आणि दुसरे कमी बौद्धिक किंवा नैतिक तयारीचे आहेत त्यांनीं आंधळेपणानें त्याच्या मागून जायचें.

**उत्तर** : आंधळेपणानें नव्हे. मला एवढेंच नम्रपणें म्हणायचें आहे कीं जर प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणें आपापला सत्याचा शोध चालवायचा आहे असें नसेल तर त्या व्यक्तीनें सत्याचा निश्चय केलेल्या व्यक्तीच्या मागें जाणें अपरिहार्य आहे.

**प्रश्न** : तुमच्या योजनेंतून असें निघतें कीं सत्याचा निश्चय उच्च नैतिक आणि बौद्धिक तयारी असलेल्या लोकांनीं करायचा आणि बाकीच्या पुष्कळशा लोकांची बौद्धिक तयारी कमी असल्यामुळें तशाच निर्णयाप्रत येणें त्यांना शक्य होत नाहीं म्हणून त्यांनीं या लोकांच्या मागोमाग आंधळेपणानें जायचें.

**उत्तर** : सर्वसामान्य मनुष्यप्राण्याच्या बाबतींत जेवढी अपेक्षा ठेवतां येईल त्याहून यत्किंचितहि अधिक मी अशा लोकांकडून अपेक्षा करणार नाहीं.

**प्रश्न** : सत्याग्रहाच्या अनुयायांच्या संख्येवर त्याच्या प्रचाराचें बळ अवलंबून असणार असें मी मानतों.

**उत्तर** : नाहीं. सत्याग्रहांत एक जरी सत्याग्रही योग्य त्या गुणांचा असला तरी यश लाभूं शकतें.

**प्रश्न** : गांधी, तुम्ही म्हणालांत कीं मी अजून स्वतःला सर्वगुणसंपन्न असा सत्याग्रही मानीत नाहीं. मग असंख्य लोक तर त्याहूनहि कमी प्रतीचे आहेत.

**उत्तर** : नाहीं. मी स्वतःला असामान्य मनुष्य समजत नाहीं. सत्याचा निश्चय करण्याला माझ्याहून अधिक समर्थ असणारे लोक असूं शकतील. दक्षिण आफ्रिकेंत चाळीस हजार हिंदी लोक जरी पूर्णपणें असंस्कृत होते तरी आपण सत्याग्रही होऊं शकतों अशा निर्णयावर ते आले होते, आणि ट्रान्सवालमधील तीं रोमहर्षक दृश्यें जर मी आपल्यापुढें उभीं करूं शकलों तर तिथल्या आपल्या देशबांधवांनीं जो संयम दाखविला तो ऐकून आपण चकित होऊन जाल.

**प्रश्न** : पण तिथें तर तुम्ही सगळे एकमताचे होतां.

**उत्तर** : दक्षिण आफ्रिकेंतल्यापेक्षां येथें माझ्याविषयींची मताची अनुकूलता जास्त भरीव आहे.

**प्रश्न :** क्लेश सहन करणें आणि सहन करीत राहणें याला असामान्य मनोनिग्रह लागत नाहीं काय ?

**उत्तर :** नाहीं. असामान्य मनोनिग्रह असण्याची कांहीं गरज नाहीं. प्रत्येक आई क्लेश सहन करते. मी नम्रपणें सांगू इच्छितों कीं आपल्या देशबांधवांत तसा मनोनिग्रह आहे आणि तो त्यांनी अतिशय मोठ्या प्रमाणांत दाखविला आहे.

**प्रश्न :** सर्वसामान्यपणें तुमच्या सिद्धान्तांत सरकारशीं सहकार, वर्ण-द्वेषाचें निराकरण आणि आत्मक्लेश ओढवून घेणें यांचा विचार आहे. आत्मक्लेशानें द्वेषभावना उत्पन्न होत नाहीं काय ?

**उत्तर :** आत्मक्लेशामुळें लोकांच्या अंतःकरणांत सरकारविषयीं द्वेष-भावना भरून राहिलेली आहे असें गेल्या तीस वर्षांचा अनुभव मला सांगत नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत अगदीं तीव्र असा लढा केल्यानंतरसुद्धां हिंदी लोकांचें सरकारशीं अत्यंत सख्यत्वाचें नातें राहिलें, आणि जनरल स्मट्स्‌ना त्यांच्याकडून मानपत्रसुद्धां देण्यांत आलें होतें; मानपत्र देण्याचा ठराव हिंदी लोकांनी स्वेच्छेनें केला होता. ३२

अहिंसेमध्यें अंतर्भूत असलेल्या सर्व गोष्टी जे आपल्या जीवनांत तंतोतंत उतरवितात त्यांनाच फक्त आहिंसक सैन्यांत दाखल होण्याचा अधिकार आहे अशी कोणी समजूत करून घेऊं नये. त्या सर्व गोष्टी ज्यांना मान्य आहेत आणि त्या अंमलांत आणण्याचा ज्यांचा सतत वाढता प्रयत्न आहे अशा सर्वांना या सैन्यांत दाखल होतां येईल. पूर्णपणें अहिंसक असलेल्या लोकांचें सैन्य कधींच शक्य होणार नाहीं. जे प्रामाणिकपणें अहिंसा पाळण्याचा प्रयत्न करतील त्यांचें तें सैन्य बनेल. ३३.

माझ्या अहिंसा-तत्त्वावर पूर्ण श्रद्धा असणाऱ्यांचें प्रमाण किती आहे हें संशयास्पद आहे हें मला कबूल आहे. पण मीं असेंहि म्हटलें आहे कीं, माझ्या चळवळीकरितां अहिंसेच्या सिद्धान्तावर, पूर्ण किंवा अपूर्ण, विश्वास असणारेच पाहिजेत असें मुळींच नाहीं, हें विसरूं नका. लोकांनीं अहिंसक लढ्याचे नियम फक्त अमलांत आणले तरी पुरें आहे. ३४

सत्याग्रह कधींहि अपेशी होत नाहीं आणि सत्य सिद्ध करण्याकरितां

एक सत्याग्रही पूर्ण पुरेसा आहे असें मी वरचेवर सांगत आलों आहें. आपण सर्वजण असे पूर्ण सत्याग्रही होण्याचा प्रयत्न करूं या. तसा प्रयत्न करण्याकरितां अशा कांहीं लायकीची गरज आहे असें नाहीं कीं, जी आपल्यांतल्या कमींत कमी योग्यतेच्या माणसालासुद्धां संपादन करतां येणार नाहीं. कारण, सत्याग्रह हा आपल्या अंतरात्म्याचा गुणधर्म आहे. तो आपल्यापैकीं प्रत्येकांत सुप्तावस्थेंत आहे. स्वराज्याप्रमाणेंच सत्याग्रह हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे. तो आपण जाणूं या. ३५.

आत्मबल पराकाष्ठेला पोंचलें म्हणजे त्याला द्रव्याच्या किंवा इतर भौतिक मदतीवर अवलंबून राहावें लागत नाहीं; नव्हे, प्राथमिक स्वरूपांतसुद्धां तें शरीरबळावर किंवा हिंसेवर मुळींच अवलंबून नसतें. खरोखर, हिंसा म्हणजे या महान् शक्तीचा निषेधच होय. जे कोणी हिंसेचा सर्वस्वीं त्याग करतील त्यांनाच ती शक्ति प्राप्त करून घेतां येईल किंवा वापरतां येईल. ही शक्ति अशी आहे कीं ती व्यक्तींना तशीच जमातींनाहि उपयोगांत आणतां येते. ती जशी राजकीय क्षेत्रांत तशी घरगुती बाबींतहि वापरतां येते. अशी ती सर्वत्र लागू करतां येते यावरूनच ती चिरस्थायी आणि अजिंक्य आहे हें स्पष्ट दिसून येतें. तिचा उपयोग पुरुष, स्त्रिया व मुलें अशा सर्वांना करतां येतो. दुर्बळांना हिंसेला हिंसेनें तोंड देण्याची शक्ति जोंवर नसते तोंवर दुर्बळांनींच वापरावी अशी ही शक्ति आहे असें म्हणणें हें संपूर्णपणें मिथ्या आहे. जे स्वतःला दुर्बळ समजतात त्यांना ही शक्ति उपयोगांत आणणें शक्य होणार नाहीं. मनुष्यांत जो पशूचा गुण आहे त्याहून श्रेष्ठ असें कांहीं त्याच्यांत आहे आणि पशुता त्यापुढे वांकते हें ज्यांना कळतें तेच प्रभावीपणें सत्याग्रही होऊं शकतात. प्रकाशाचें अंधाराशीं जें नातें तेंच सत्याग्रहाचें हिंसेशीं, म्हणजेच सर्व प्रकारच्या जुलुमाशीं – अन्यायाशीं नातें आहे.

ही शक्ति वापरायची तर दारिद्र्याचा स्वीकार करणें आवश्यक असतें; या अर्थानें कीं आपला चरितार्थ चालण्याची सामग्री आपल्याजवळ आहे कीं नाहीं यासंबंधीं आपल्याला उदासीन असावें लागतें. गेल्या लढ्यांत सगळे सत्याग्रही, जर कोणी सत्याग्रही असतील तर, तितक्या थरापर्यंत जाण्याला तयार नव्हते. त्यांत कांहीं नांवाचेच सत्याग्रही होते. कसलीहि

निष्ठा नसतांना, पुष्कळ वेळां मिश्र हेतूंनीं, आणि कांहीं वेळां अशुद्ध हेतु धरूनसुद्धां, ते आले होते. कांहींनीं तर लढ्यांत असतांना हिंसेचासुद्धां आसरा घेतला असता, पण आम्ही डोळ्यांत तेल घालून होतों म्हणून तसें झालें नाहीं. त्यामुळें त्याचा परिणाम असा झाला कीं लढा लांबत गेला; कारण अत्यंत शुद्ध आणि पूर्ण स्वरूपांतील आत्मबळाच्या प्रयोगानें इष्ट फळ तत्काळ पदरांत पडतें. तसा प्रयोग होण्याकरितां दरेक व्यक्तीच्या अंतःकरणाला दीर्घकाळपर्यंत शिक्षण देऊन विशिष्ट वळण लावण्याची आवश्यकता असते; कारण पूर्ण सत्याग्रही, सर्वस्वीं नसला तरी बहुतांशीं, पूर्ण मनुष्य बनावा लागतो. आपण सर्वजण एकदमच तसे बनूं असें नाहीं, पण जर माझा सिद्धान्त बरोबर असला—आणि तो बरोबर आहे याची मला खात्री आहे—तर आमच्यांत जितक्या प्रमाणांत सत्याग्रहाची वृत्ति असेल तितक्या प्रमाणांत आपण अधिक चांगले मानव बनूं. म्हणून, मला वाटतें, सत्याग्रहाचा प्रयोग हा वादातीत आहे, आणि जर तो सार्वत्रिक झाला तर तो समाजाच्या आदर्शांत क्रान्ति करून टाकील व त्यायोगानें निरंकुश सत्तेला आणि वाढत्या लष्करशाहीला पायबंद बसेल; आज पश्चिमेकडील राष्ट्रें लष्करशाहीच्या टांचेखालीं हैराण झालीं आहेत आणि तीं भरडलीं जाऊन जवळ जवळ मृत्युपंथाला लागलीं आहेत. थोड्याच काळांत लष्करशाही पूर्वेकडील राष्ट्रांनाहि ग्रासून टाकील असा संभव दिसत आहे. शक्य तितक्या पूर्णत्वानें सत्याग्रही बनण्याच्या उद्योगाला स्वतःला वाहून घेणारे असे थोडेसे जरी हिंदी लोक गेल्या सत्याग्रह-लढ्यांतून पुढें आले तरी त्यांनीं स्वतःची खरीखुरी सेवा बजावली असें होईल, इतकेंच नव्हे तर जगांतल्या माववजातीची सेवा त्यांनीं बजावल्यासारखी होणार आहे.

या दृष्टिकोनांतून पाहतां सत्याग्रह हें एक अत्यंत उदात्त आणि उत्कृष्ट असें शिक्षण आहे. हें शिक्षण मुलांना जें नेहमींचें साक्षरतेचें शिक्षण दिलें जातें त्याच्यामागून न दिलें जातां त्याअगोदर दिलें पाहिजे. मूल मूळाक्षरें लिहायला लागण्यापूर्वीं आणि ऐहिक विषयांचें ज्ञान मिळवूं लागण्यापूर्वीं आत्मा म्हणजे काय, सत्य काय, प्रेम काय, आत्म्यांत कोणत्या शक्ती सुप्त आहेत यांचें त्याला ज्ञान झालें पाहिजे, ही गोष्ट कोणी नाकारील असें वाटत नाहीं. जीवनाच्या संघर्षांत आपण द्वेषाला

प्रेमानें, असत्याला सत्यानें, हिंसेला आत्मक्लेशानें सहज जिंकूं शकूं हें मुलानें शिकावें हा खऱ्या शिक्षणाचा मुख्य भाग असला पाहिजे. ३६

आज समाजाला त्रस्त करणाऱ्या एका मोठ्या अनिष्ट प्रवृत्तीसंबंधीं मी बोलणार आहें. भांडवलदार आणि जमीनदार आपल्या हक्कांची भाषा बोलतात, मजूर आपल्या हक्कांसंबंधीं बोलतात, राजेरजवाडे सत्ता गाजविण्याचा आपला ईश्वरदत्त हक्क मानतात, रयत त्यांचा प्रतिकार करण्याचा आपला हक्क सांगते. प्रत्येकजण जर निव्वळ हक्कांचा आग्रह धरूं लागले आणि कर्तव्यें सोडूं लागले तर सारा गोंधळ आणि अंदाधुंदी माजेल. हक्कांचा आग्रह धरण्याऐवजीं जर प्रत्येकजण कर्तव्य करूं लागला तर मानवसमाजांत लगेच सुव्यवस्थेचा कारभार प्रस्थापित होईल.

हक्क आणि कर्तव्यें यांचा परस्पर-संबंध काय तें समजून घेणें अवश्य आहे. जे हक्क सरळ कर्तव्यपूर्तींतूनच आपोआप निष्पन्न होत नाहींत ते स्वीकारणीयच नाहींत. ते अन्यायानें बळकावलेलेच समजले पाहिजेत आणि त्यांचा त्याग जितक्या लवकर केला जाईल तितकें बरें. हा साधा, सार्वत्रिक नियम जर तुम्ही आई-बाप, त्यांची मुलें, पति व पत्नी, मालक व मजूर, जमीनदार आणि कुळें, राजेरजवाडे व त्यांची रयत, किंवा हिंदू व मुसलमान यांना लावलांत तर समाजजीवनाच्या सर्व विभागांचा परस्परांशीं अत्यंत मधुर असा संबंध प्रस्थापित करणें शक्य आहे असें तुम्हांला दिसून येईल; त्यामुळें जीवनांत आणि नित्यव्यवहारांत कसलाहि बिघाड उत्पन्न होणार नाहीं, तें खिळखिळें होणार नाहीं. ज्याला मी सत्याग्रहाचा धर्म म्हणतों तो, कर्तव्यांची पूर्ति आणि त्या पूर्तींतून ओघानें येणाऱ्या हक्कांची योग्य कदर केल्यानेंच, आपोआप बुद्धीला सांपडतो.

मीं सांगितलें तें लक्षांत घेऊन हा नियम सर्व चालू परिस्थितीला लागू करणें सहज शक्य आहे आणि त्यामुळें लाभच होईल; आजची परिस्थिति मति कुंठित करून टाकणारी आहे याचें कारण, कर्तव्याची पूर्तता अगोदर केल्यानेंच त्यांतून सर्व हक्क निर्माण होतात हा सिद्धान्त लोक व्यवहाराला लागू करीत नाहींत.

हाच नियम राज्यकर्ते आणि प्रजाजन यांना लागू होतो. राज्यकर्त्यांचें

हें कर्तव्य आहे कीं त्यांनीं लोकांचे खरेखुरे सेवक या नात्यानें वागावें. तलवारीच्या बळावर त्यांनीं कधींच सत्ता चालवूं नये. सेवेच्या, अधिक सुज्ञपणाच्या अधिकारानेंच सत्ता वापरावी. तरच त्यांना लोकांनीं स्वेच्छेनें दिलेल्या करांची वसुली करण्याचा अधिकार राहील, त्यांच्या खुशीनें त्यांच्याकडून विविध सेवा मिळविण्याची अपेक्षा बाळगण्याचाहि त्यांना तितकाच अधिकार येईल; अर्थात् हे कर किंवा सेवा त्यांच्या स्वतःकरितां नसून ते ज्यांची चिंता वाहतात त्या लोकांकरितां असतात. हें अगदीं साधें व प्राथमिक कर्तव्य बजावायला जर ते चुकले तर प्रजेनें आपल्या कर्तव्याची पूर्ति करावी असें म्हणण्याचा त्यांना हक्क राहत नाहीं, एवढेंच नव्हे तर ते जर अन्यायानें तो हक्क बळकावण्याचा प्रयत्न करूं लागले तर त्यांना प्रतिकार करण्याचें कर्तव्यहि प्रजेवर येऊन पडतें, किंवा, दुसऱ्या भाषेंत, तसा हक्क प्रजेला मिळतो. पण अशा प्रतिकाराला जर लुटालुटीचें किंवा खुनाखुनीचें स्वरूप आलें तर मात्र, कर्तव्याच्या भाषेंत बोलायचें तर, तो मानवतेविरुद्ध केलेला गुन्हा होईल. कर्तव्याच्या पूर्ततेमधून आपोआप निर्माण होणारी शक्ति म्हणजे सत्याग्रहानें अस्तित्वांत येणारी अहिंसक आणि अजिंक्य शक्ति होय. ३७

सत्याग्रही म्हणविणारांनीं आपली इच्छा जर इतरांवर लादली तर तो जुलूम नोकरशाहीच्या जुलुमापेक्षांहि अधिक वाईट होईल. म्हणून सत्याग्रह्यांनीं आपल्या लढ्यांतून कोणत्याहि स्वरूपांतील जबरदस्ती काढून टाकली पाहिजे. असहकारितेचा सिद्धान्त स्वेच्छेनें मानणारे जर मूठभरच लोक असतील तर दुसऱ्यांना आपल्या मताचे करून घेण्याच्या प्रयत्नांत त्यांना कदाचित् आपला जीव द्यावा लागेल, पण त्यायोगेंच त्यांनीं आपल्या कार्याचें इतरांना योग्य दर्शन करून दिलें व त्याचें समर्थन केलें असें होईल. उलट, आपल्या झेंड्याखालीं त्यांनीं जर जबरदस्तीनें लोकांना गोळा केलें तर आपल्या ध्येयाकडे आणि ईश्वराकडे त्यांनीं पाठ फिरविल्यासारखें होईल आणि जरी क्षणभर त्यांना त्यांत यश मिळाल्याचा भास झाला तरी वस्तुतः अधिक भीषण परिस्थिति निर्माण केल्याचेंच यश तें ठरेल.

असहिष्णुतेमुळें सत्याग्रह्यांनीं दुसऱ्यांचीं मतें दडपून टाकलीं तरी स्वतःच्या कार्याची त्यांनीं पिछेहाट केल्यासारखें होईल. कारण मग आपल्या बाजूचे कोण आणि आपल्या विरुद्ध कोण हें कधींच त्यांना समजणार नाहीं; म्हणून आपण मतस्वातंत्र्याला जास्तींत जास्त उत्तेजन देणें हीच यशस्वितेची अनिवार्य शर्त समजावी. ३८

अहिंसक लढा करतांना आपल्या बरोबर आपल्या सहकारी कार्यकर्त्यांनाहि त्यांच्या मनानिशीं आणि हृदयानिशीं घेऊन जाणें अवश्य असतें. शिस्त टिकविण्याला किंवा आपले आदेश पाळायला लावण्याला याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. ३९

**प्रश्न :** एका खेड्यांत एकटाच एक सत्याग्रही आहे. त्या खेड्यांतील इतरांना हिंसा-अहिंसेची क्षिति नाहीं. त्या एकट्या सत्याग्रह्यानें कोणते नियम पाळावेत ?

**गांधीजी :** त्या एकाकी सत्याग्रह्यानें स्वतःची परीक्षा करणें अवश्य आहे. जर त्याच्यांत सर्वांविषयीं प्रेमभाव असेल, आणि तसा प्रेमभाव आहे म्हटल्यानंतर ज्या गोष्टी पुऱ्या कराव्या लागतात त्या जर तो पुऱ्या करीत असेल, तर त्याचें प्रतिबिंब त्याच्या दैनंदिन वागणुकींत उमटलें पाहिजे. त्या खेड्यांतल्या सर्वांत गरीबांशीं सेवेच्या बंधनानें तो बांधला गेला असेल. तो स्वतः त्या खेड्याचा भंगी, रोग्याची शुश्रूषा करणारा परिचारक, तंटे सोडविणारा लवाद, आणि मुलांचा शिक्षक म्हणून होईल. खेड्यांतले आबालवृद्ध सर्वजण त्याला ओळखत असतील, तो गृहस्थ असला तरी संयमी जीवन घालवील. तो आपल्या आणि दुसऱ्याच्या मुलांत भेदभाव करणार नाहीं. त्याची स्वतःची कांहींहि मालमत्ता असणार नाहीं आणि जी कांहीं संपत्ति असेल ती इतरांची समजून विश्वस्ताप्रमाणें तो संभाळील, आणि त्यांतून आपल्या किमान गरजांपुरताच खर्च करील. त्याच्या गरजा गरीबाच्या गरजांइतक्याच असतील. तो अस्पृश्यता पाळणार नाहीं, त्यामुळें सर्व जातीजमातींच्या लोकांना त्याच्याकडे यायला संकोच न वाटण्याइतका विश्वास तो त्यांच्यांत निर्माण करील.

असा हा आदर्श सत्याग्रही असेल. आमचा पृच्छक मित्र या आदर्शाप्रत

पोंचण्याचा आणि जेथें स्वतः कमी पडेल तेथें तो कमीपणा भरून काढण्याचा सतत प्रयत्न करील; आपल्या शिक्षणांतली कमतरता तो भरून काढील; एक क्षणहि फुकट दवडणार नाहीं. त्याचें घर म्हणजे उपयुक्त उद्योगांनीं गजबजलेलें मधाचें पोळेंच होईल आणि या पोळ्याच्या केंद्रस्थानीं कताई-उद्योग असेल.

असा सत्याग्रही फार काळ एकाकी राहाणार नाहीं. गांव नकळत त्याच्या मागोमाग येईल. पण तें येवो न येवो, आणीबाणीच्या वेळीं तो एकटा-देखील त्या प्रसंगाला परिणामकारकपणें तोंड देईल किंवा त्या प्रयत्नांत आपले प्राण देईल. परंतु त्याच्या या वर्तनानें अनेकांचीं मतें पालटलेलीं असतील याची मला खात्री आहे.

मी सेवाग्रामला असा एकाकी सत्याग्रही म्हणून येऊन राहिलों आहें. सेवाग्राम गांवचा कोणी रहिवासी सत्याग्रही म्हणून म्हटला जाईल कीं नाहीं मला माहीत नाहीं, पण कांहींजणांचीं तरी चरित्रें नकळत तशा स्वरूपाचीं घडत आहेत अशी मला आशा खचित आहे. वर नमूद केलेल्या सर्व कसोट्यांना मी पुरा पडत नाहीं, हें मला सांगितलें पाहिजे. परंतु त्या सर्व मी जर आचारांत उतरविण्याचे प्रयत्न करीत नसतों तर मी त्यांचा उल्लेखहि केला नसता. सेवाग्रामला एक आदर्श खेडें करण्याची आजची माझी महत्त्वाकांक्षा आहे. हें काम हिंदुस्तानला आदर्श देश बनविण्याइतकेंच कठीण आहे याची मला जाणीव आहे. परंतु एका मनुष्याला एका खेड्याच्या बाबतींत कधीं ना कधीं आपली महत्त्वाकांक्षा पुरती करणें शक्य कोटींतलें असलें तरी एका मनुष्याचें आयुष्य सबंध हिंदुस्तानाला कवेंत घ्यायला फारच अपुरें आहे. परंतु जर एका मनुष्याला एक आदर्श खेडें निर्माण करणें शक्य झालें तर सबंध देशाकरितांच नव्हे तर कदाचित् साऱ्या जगाकरितां एक नमुना त्यानें तयार करून दिला असें होईल. साधकानें याहून अधिक आकांक्षा बाळगणें बरें नाहीं. ४०

* * *

# : ८ : निःशस्त्र प्रतिकार आणि सत्याग्रह

दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांनीं तेथील सरकाराविरुद्ध चालविलेल्या चळवळीला काय नांव द्यावें हें आम्हां कोणाला कळत नव्हतें. त्या वेळीं मीं त्या चळवळीला ' पॅसिव रिझिस्टन्स ' हें नांव दिलें. ' पॅसिव रिझिस्टन्स ' या नांवाचें रहस्यहि मला त्या वेळीं पुरतें माहीत झालें नव्हतें किंवा समजत नव्हतें. एका नव्याच गोष्टीचा जन्म झाला आहे एवढें मी समजलों होतों. लढा जसजसा वाढत गेला तसतसा त्या नांवामुळें घोटाळा होत गेला आणि या महान् युद्धाला इंग्रजी नांव देणें मला लज्जास्पद वाटलें. म्हणून ' इंडियन् ओपीनिअन् ' मध्यें त्याला चांगल्यांत चांगला शब्द शोधून देणाऱ्याला एक लहानसें इनाम मीं जाहीर केलें. त्यांत कांहीं नांवें आलीं. या वेळेपर्यंत लढ्याचें रहस्य ' इंडियन् ओपीनिअन् ' मध्यें बरेंच चर्चिलें गेलेलें होतें, त्यामुळें स्पर्धेत भाग घेणाऱ्यांच्यापाशीं शोध करण्याला त्या मानानें पुरेशी सामुग्री होती असें म्हणतां येईल. मगनलाल गांधींनींहि या स्पर्धेत भाग घेतला. त्यांनी ' सदाग्रह ' हें नांव पाठविलें. हा शब्द निवडण्याचें कारण सांगतांना त्यांनीं लिहिलें कीं, हिंदी जमातीची चळवळ हा एक मोठा आग्रह आहे आणि तो आग्रह सत् म्हणजे शुभ आहे, म्हणून आपण हें नांव निवडलें आहे. मला तें नांव पसंत पडलें, तथापि ज्या आशयाचा समावेश व्हावा अशी माझी इच्छा होती त्याचा समावेश त्या शब्दांत होत नव्हता, म्हणून मी ' सदाग्रहा ' चें ' सत्याग्रह ' केलें. सत्यांत शांति आलीच असें मानून, कोणत्याहि गोष्टीचा आग्रह धरला कीं त्यांतून बळ उत्पन्न होतें म्हणून आग्रहांत बळाचाहि समावेश झाला असें धरून हिंदी चळवळीला ' सत्याग्रह ' म्हणजे सत्य आणि शांति यांतून निपजणाऱ्या बळाचें नांव देऊन प्रसिद्धि द्यायला सुरुवात केली. आणि तेव्हांपासून 'पॅसिव रिझिस्टन्स' या शब्दाचा उपयोग या लढ्याच्या बाबतींत करण्याचें बंद केलें. फार काय, इंग्रजी लेखांतसुद्धां पुष्कळ वेळां ' पॅसिव रिझिस्टन्स ' या शब्दाचा वापर टाकून देऊन ' सत्याग्रह ' किंवा दुसऱ्या कांहीं इंग्रजी शब्दाचा वापर करण्याचें सुरू केलें. अशा रीतीनें जी वस्तु ' सत्याग्रह ' या नांवानें प्रसिद्ध

झाली त्या वस्तूचा आणि सत्याग्रह नांवाचा जन्म झाला. पॅसिव रिझिस्टन्स आणि सत्याग्रह यांच्या मधला फरक समजून घेणें आवश्यक आहे.

'पॅसिव रिझिस्टन्स' या दोन शब्दांचा उपयोग प्रथम इंग्रजी भाषेंत केव्हां झाला आणि कोणी केला याची मला कल्पना नाहीं. पण इंग्रज लोकांत जेव्हां जेव्हां एखाद्या लहानशा समाजाला एखादा कायदा नापसंत होई तेव्हां तेव्हां त्या कायद्याच्या विरुद्ध बंड करण्याऐवजीं ते त्या कायद्याला शरण न जाण्याचें पॅसिव म्हणजे नरम धोरण पत्करीत आणि त्याकरितां होणारी शिक्षा भोगीत. कांहीं थोड्या वर्षांपूर्वीं इंग्लंडच्या पार्लमेंटनें जेव्हां शिक्षणाचा कायदा पास केला, तेव्हां डॉ. क्लिफर्ड यांच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडांतील नॉनूकन्फॉर्मिस्ट या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या खिस्ती पक्षानें पॅसिव रिझिस्टन्स अमलांत आणला होता. इंग्लंडच्या स्त्रियांनीं आपल्याला मताधिकार ( सफ्रेज ) मिळावा म्हणून मोठी चळवळ केली, तीसुद्धां 'पॅसिव रिझिस्टन्स' या नांवानेंच ओळखली जात होती. या दोन्ही चळवळी लक्षांत घेऊनच पॅसिव रिझिस्टन्स हें दुर्बळांचें किंवा मताधिकार नसणाऱ्यांचें शस्त्र आहे असें मानलें जाऊं लागलें. डॉ. क्लिफर्ड यांचा पक्ष मताधिकार असणाऱ्यांचा होता. पण कॉमन्स सभेंत त्यांची संख्या कमी, त्यामुळें त्यांच्या मतांच्या वजनानें शिक्षणाचा कायदा नामंजूर होऊं शकला नाहीं, म्हणजेच तो पक्ष संख्येनें दुर्बळ ठरला. स्वपक्षाकरितां शस्त्राचा उपयोग हे लोक करणारच नाहींत असें नाहीं. पण या कामीं तसा उपयोग त्यांनीं केला तर त्यांचें चालायचें नाहीं. तसेंच प्रत्येक खेपेला एकदम बंड करूनच हक्क मिळविण्याची पद्धति सुव्यवस्थित राज्यतंत्रांत चालूंच शकणार नाहीं. शिवाय डॉ. क्लिफर्डच्या पक्षांतील कित्येक खिस्ती लोक सामान्यपणें शस्त्राचा उपयोग होऊं शकत असला तरी तो करण्याला विरोध करणार. स्त्रियांच्या चळवळींत स्त्रियांना मताधिकार नव्हताच; संख्येनें आणि शरीरानेंहि त्या दुर्बळ. स्त्रियांच्या चळवळींत शस्त्रांचा उपयोग टाकलेला नव्हता. स्त्रियांतील एका पक्षानें तर घरें जाळलीं आणि पुरुषांच्यावर हल्लेहि केले होते. एखाद्याचा खून करण्याचा बेत त्यांनी कधीं केला असेल असें मला वाटत नाहीं. पण वेळ पडली तर मारहाण करणें आणि अशा रीतीनें सतावीत राहणें हा त्यांचा हेतु होताच.

हिंदी चळवळींत शस्त्राला कोठेंहि आणि कोणत्याहि परिस्थितींत स्थान मुळींच नव्हतें. भारी दुःखें सहन करावीं लागलीं तरी सत्याग्रह्यांनीं शरीरबळ वापरलें नाहीं. आणि तें सुद्धां अशा वेळीं कीं जेव्हां तें बळ परिणामकारकपणें वापरणें त्यांना शक्य होतें. दुसरी गोष्ट, हिंदी जमातीला मताधिकार नव्हता आणि ती दुबळी होती या दोन्ही गोष्टी खऱ्या असूनसुद्धां चळवळीच्या आंखणीचा त्यांच्याशीं कांहींसुद्धां संबंध नव्हता. यावरून, हिंदी जमातीपाशीं मताधिकाराचें किंवा शस्त्राचें बळ असतें तरीहि तिनें सत्याग्रहच केला असता, अशी मी समजूत करून देऊं इच्छीत नाहीं. मताधिकाराचें बळ असेल तर सत्याग्रहाला बहुतांशीं जागा नाहीं. शस्त्रबळ असेल तर विरुद्ध पक्ष अगोदरच सावध राहून वागेल. म्हणून शस्त्रबळ असणाऱ्यांना सत्याग्रहाचे प्रसंग थोडेच येतील ही सुद्धां लक्षांत येण्याजोगी गोष्ट आहे.

माझ्या सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं हिंदी चळवळीची कल्पना करतांना शस्त्रबळाच्या शक्याशक्यतेचा प्रश्न माझ्या मनांत उत्पन्नच मुळीं झाला नव्हता हें मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों. सत्याग्रह हें केवळ आत्म्याचें बळ आहे. आणि ज्या ठिकाणीं व जितक्या प्रमाणांत शस्त्राच्या बळाचा म्हणजेच शरीरबळाचा किंवा पशुबळाचा उपयोग होत असेल किंवा त्याची कल्पना केली जाऊं शकत असेल त्या ठिकाणीं आणि तितक्या प्रमाणांत आत्मबळाचा कमी उपयोग असतो. माझ्या समजुतीप्रमाणें या दोन्ही अगदीं विरुद्ध शक्ती आहेत. आणि हे विचार चळवळीच्या जन्माच्या वेळींसुद्धां माझ्या हृदयांत पुरतेपणीं रुजलेले होते.

पॅसिव रिझिस्टन्स आणि सत्याग्रह यांच्यामध्यें मुळांतच फार मोठा भेद आहे. म्हणून, तो भेद न समजून घेतां, स्वतःला पॅसिव रिझिस्टर म्हणविणारे लोक आणि स्वतःला सत्याग्रही मानून घेणारे लोक आपण दोघे एकच असें मानूं लागले तर तो उभयतांनाहि अन्याय होईल आणि त्याचे अनिष्ट परिणामहि होतील. आम्हीच खुद्द दक्षिण आफ्रिकेंत पॅसिव रिझिस्टन्स शब्दाचा उपयोग करीत होतों. त्यावरून मताधिकाराकरितां लढणाऱ्या स्त्रियांची बहादुरी आणि आत्मबलिदान यांचे आमच्यावर आरोपण करून आम्हांला यश चिंतणारे फार थोडे होते, पण त्या स्त्रियांप्रमाणेंच आमचीहि गणना जीवितावित्ताचा घातपात करणाऱ्यांत होत होती. मनुष्य स्वतःला

जसा मानतो तसा तो शेवटीं बनतो असें विचाराचें बळ असतें. आपण दुर्बल आहोंत म्हणून नाइलाजास्तव पॅसिव रिझिस्टन्सचा उपयोग करीत आहोंत असें जर आम्ही समजत राहिलों आणि इतरांची तशी समजूत होऊं दिली तर पॅसिव रिझिस्टन्स करतां करतां आपण कधीं बलवान् होऊंच शकणार नाहीं, आणि संधी सांपडली कीं लगेच तें दुर्बळाचें शस्त्र आपण सोडून देऊं. उलट, आपण सत्याग्रही असूं आणि स्वतःला सबळ समजून त्या शक्तीचा उपयोग करूं तर त्यांतून दोन परिणाम स्पष्टपणें घडूं शकतात. बळाच्याच भावनेचें मनांत पोषण केल्यानें आपण दिवसेंदिवस अधिक बळवान् होतों आणि जसजसें आपलें बळ वाढत जातें तसतसें सत्याग्रहाचें तेज वाढत जातें, अर्थात् ती शक्ति टाकून देण्याची संधी तर आपण शोधीत राहाणार नाहींच. आणखी एक गोष्ट म्हणजे पॅसिव रिझिस्टन्समध्यें प्रेमभावनेला थारा नसतो तर सत्याग्रहांत वैरभावाला थारा नसतो, इतकेंच नव्हे तर वैरभाव हा अधर्म मानला जातो. पॅसिव रिझिस्टन्समध्यें, संधी मिळाली तर शस्त्रबळाचा उपयोग करतां येतो; सत्याग्रहांत, शस्त्रांचा उपयोग करण्याकरितां उत्तमांत उत्तम संधी आली तरी तो उपयोग सर्वथैव त्याज्य आहे. पॅसिव रिझिस्टन्स हें पुष्कळ वेळां शस्त्रबळाची पूर्वतयारी म्हणून मानण्यांत येतें. सत्याग्रहाचा उपयोग अशा प्रकारें करतांच येणार नाहीं. पॅसिव रिझिस्टन्स शस्त्रबळाच्या बरोबर चालूं शकतें; सत्याग्रह हा शस्त्रबळाच्या अगदीं विरुद्ध असल्यामुळें दोहोंचा मेळच बसणें शक्य नाहीं; त्यामुळें तीं दोन्ही एकत्र टिकूच शकणार नाहींत. सत्याग्रहाचा उपयोग आपल्या प्रियजनांच्या बाबतींतहि होऊं शकतो आणि होतो. पॅसिव रिझिस्टन्सचा उपयोग यथार्थ रीतीनें प्रियजनांच्या बाबतींत होऊंच शकणार नाहीं – म्हणजे प्रियजनांना वैरी मानलें तरच पॅसिव रिझिस्टन्सचा उपयोग करतां येईल. पॅसिव रिझिस्टन्समध्यें विरुद्ध पक्षाला दुःख देण्याची, सतावण्याची कल्पना नेहमीं असतेच, आणि दुःख देतांना स्वतःला क्लेश सहन करावे लागले तर ते सहन करण्याचीहि तयारी असते; तर सत्याग्रहांत विरोधी पक्षाला दुःख देण्याचा विचारसुद्धां मनांत असतां कामा नये. त्यांत स्वतः दुःख ओढून घेऊन, तें सहन करून विरोधी पक्षाला वश करण्याचाच विचार असला पाहिजे.

अशा रीतीनें त्या दोन मुख्य शक्तींच्या मधला मुख्य भेद मी स्पष्ट केला. पॅसिव रिझिस्टन्सचे जे गुण – किंवा दोष म्हणा – मी वर सांगितले ते सर्व प्रत्येक पॅसिव रिझिस्टन्समध्यें अनुभवाला येतात असें म्हणण्याचा माझा आशय नाहीं, पण पॅसिव रिझिस्टन्सच्या पुष्कळशा उदाहरणांत हे दोष आढळून आले आहेत असें दाखवून देतां येईल. येशू ख्रिस्ताला पुष्कळ ख्रिस्ती लोक पॅसिव रिझिस्टन्सचा आदिनेता म्हणून सांगतात हेंहि वाचकांना सांगणें मला अवश्य वाटतें. पण त्या ठिकाणी पॅसिव रिझिस्टन्सचा अर्थ केवळ सत्याग्रह असाच घेतला पाहिजे. त्या अर्थानें पॅसिव रिझिस्टन्सचे ऐतिहासिक दाखले फारसे आढळांत येणार नाहींत. येशू ख्रिस्तानंतर अपार जुलूम हजारों ख्रिस्ती लोकांनीं सहन केला त्या वेळीं पॅसिव रिझिस्टन्स शब्दाचा उपयोगच होत नव्हता. म्हणून त्यांचीं जेवढीं निर्मळ उदाहरणें सांपडतील तेवढीं मी तरी सत्याग्रह म्हणूनच म्हणेन आणि तीं जर आपण पॅसिव रिझिस्टन्सचा कित्ता म्हणून मानलीं तर मग पॅसिव रिझिंस्टन्स आणि सत्याग्रह यांच्यांत कांहीं सुद्धां भेद राहिला नाहीं. हें सर्व लिहिण्याचा हेतु इंग्रजी भाषेंत सामान्यपणें पॅसिव रिझिस्टन्स शब्द ज्या रीतीनें वापरला जातो त्याहून सत्याग्रहाची कल्पना सर्वथैव वेगळी आहे हें दाखविण्याचा आहे.

पॅसिव रिझिस्टन्सचीं लक्षणें सांगत असतां त्या शक्तीचा उपयोग करणाऱ्याला कोणत्याहि प्रकारें अन्याय न व्हावा एवढ्याकरितां मला जशी वरील सावधगिरीची सूचना द्यावी लागली, तशी, सत्याग्रहाचे गुण सांगतांना जे स्वतःला सत्याग्रही म्हणवितात त्यांच्यांत ते सर्व गुण आहेत असा माझा दावा नाहीं, ही सूचना देण्याचीहि मला गरज वाटते. सत्याग्रहाचे जे गुण मी वर नमूद केले त्यांची पुष्कळ सत्याग्रह्यांना ओळखहि नाहीं, हें मी जाणत नाहीं असें नाहीं. पुष्कळांच्या तोंडून मीं ऐकलें आहे कीं सत्याग्रह ही शस्त्रबळाची पूर्वतयारी आहे. पण मला पुनः सांगितलें पाहिजे कीं मी सत्याग्रही कशा गुणांचे आढळतात तें दाखविलें नाहीं, तर सत्याग्रहाच्या कल्पनेंत काय काय येतें आणि तदनुसार सत्याग्रही कसे असले पाहिजेत हें दाखविण्याचा मीं प्रयत्न केला आहे. १

मी म्हणतों ती अहिंसा दुबळ्या अंतःकरणाचे लोक प्रकट करूं म्हणतील तर तें मुळींच शक्य नाहीं. गेलीं तीस वर्षें हिंदुस्तान जें आचारांत आणीत आहे त्याला योग्य नांव द्यायचें तर तें पॅसिव रिझिस्टन्स (अनाक्रमक किंवा निःशस्त्र प्रतिकार) हें आहे. निःशस्त्र प्रतिकार ही आक्रमक किंवा सशस्त्र प्रतिकाराची पूर्वतयारीच आहे. २

अनाक्रमक किंवा निःशस्त्र प्रतिकारांत अहिंसेप्रमाणें माणसांचीं हृदयें बदलून टाकण्याची शक्ति नसते. त्यामुळें परिणाम काय झाले ते सर्वांना चांगलेच माहीत आहेत. त्यांच्या स्वप्नांतलें स्वराज्य फार दूर राहिलें. ३

मी माझी चूक कबूल केली आहे. आपला (स्वराज्याचा) लढा अहिंसेवर आधारलेला होता असें मला वाटलें; पण खरें म्हणजे तो केवळ निःशस्त्र प्रतिकार होता, आणि निःशस्त्र प्रतिकार हें दुबळ्यांचें शस्त्र आहे. शक्यता वाढली कीं त्यांतून सहज सशस्त्र प्रतिकार उद्‌भवतो.

दक्षिण आफ्रिकेंतील यशानें हुरळून जाऊन मी हिंदुस्तानांत आलों. येथेंहि या लढ्याला सफळता मिळाली. परंतु आतां माझ्या लक्षांत आलें कीं आपला लढा अहिंसेवर आधारलेला नव्हता. हें त्याच वेळीं उमगलें असतें तर मी लढा सुरूच केला नसता. पण ईश्वराला माझ्याकडून तें काम करवून घ्यायचें होतें. म्हणून त्यानें माझ्या दृष्टीवर झांपड आणली. आपला लढा अहिंसक नव्हता म्हणूनच आज तुम्हांला लुटालूट, जाळपोळ आणि खुनाखुनी दिसत आहे.

आमचा लढा दुर्बळांचा का असेना पण तो अहिंसेवर आधारलेला आहे असें मीं म्हटलें होतें तें माझें विधान चुकीचें होतें. दुर्बळांची अहिंसा अशी वस्तूच नाहीं. अहिंसा आणि दुबळेपणा या परस्परविसंगत गोष्टी आहेत. देशाला जर अहिंसेकडे वळवितां आलें नाहीं तर त्यांत त्याचें आणि जगाचें वाईट होणार आहे हें मला स्पष्ट दिसत आहे. त्यायोगें देशाला स्वातंत्र्याला मुकावें लागेल. शूराची अहिंसा प्रयत्नानें अंगीं कशी बाणूं शकेल याचा मी रात्रंदिवस विचार करीत आहे. ४

खून, जाळपोळ, लुटालूट हीं आजच्याइतकीं पूर्वीं कधींच माजलेलीं नव्हतीं यांत शंका नाहीं. आजच्या दुर्दैवी परिस्थितीला मीहि एक जबाब-

दार आहें, कारण गेल्या तीस वर्षांत माझ्या पुढारीपणाखालीं जें करण्यांत आलें तें निःशस्त्र प्रतिकाराहून दुसरें कांहीं नव्हतें. ब्रिटिश सत्तेला हिंदुस्तान सोडून जाण्याला प्रवृत्त करण्यापुरता तो प्रतिकार योग्य ठरला. पण निःशस्त्र प्रतिकारांत अहिंसेप्रमाणें माणसांचें हृदय पालटविण्याची शक्ति नाहीं. त्याचे परिणाम काय झाले ते आपल्याला माहीतच आहेत. आपल्या कल्पनेंतलें स्वराज्य फार दूर राहिलें आहे. विषाचें अमृतांत रूपांतर करण्याकरितां आतां काय करावें ? ती क्रिया शक्य आहे काय ? होय, शक्य आहे, आणि तिचा मार्गहि मला माहीत आहे. पण हिंदी लोकांच्या मनाची निःशस्त्र प्रतिकाराच्या प्रयत्नाला साथ देण्याची जशी तयारी आहे तशी अहिंसेचा धडा बिंबवून घेण्याची नाहीं. आणि अहिंसा – निखळ अहिंसाच – विषाचें अमृतांत रूपांतर करण्याला समर्थ आहे. तो मार्ग उत्तम असल्याचें अनेकजण मान्य करतात पण तो स्वीकारण्याला त्यांचें मन घेत नाहीं. हिमालयाच्या उत्तुंग शिखरावर उभा राहून मी ओरडून सांगूं शकेन कीं अहिंसा हरलेली नाहीं, ती कधीं हरली नव्हती, लोकच तिच्या पातळीला चढण्याला कमी ठरले. अहिंसेचा प्रचार करण्याचें तंत्रच तुम्हांला माहीत नाहीं असें कोणी मला म्हटलें तर मला वाईट वाटणार नाहीं. माझ्या स्वतःमध्येंच अहिंसा नाहीं असें म्हणण्यापर्यंत टीकाकारांची मजल गेली आहे. माणसाचें मन एका ईश्वरालाच माहीत. जगांत जर शांति नांदायची असेल तर अहिंसा हेंच तिचें साधन आहे, अन्य नाहीं हें मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों. ५

हिंदुस्तानाच्या लढ्यांतील अहिंसा ही केवळ नामधारी होती. खरोखर तो दुर्बळांचा शस्त्रविहीन प्रतिकार होता. हिंदुस्तानांतील घडामोडींनीं या विधानांतील सत्यता प्रकट झालेली आपल्याला दिसून येते.

माझ्या बाबतींत जें काय स्पष्टपणें घडून आलें आहे तें हें कीं, माझ्या अहिंसेच्या तंत्रांत कांहीं तरी महत्त्वाचा दोष राहिला आहे याचा मला शोध लागला. ब्रिटिश सत्तेविरुद्ध केलेल्या गेल्या तीस वर्षांच्या लढ्यामध्यें अहिंसेसंबंधींचें खरोखर आकलन लोकांना झालेंच नाहीं. त्यामुळें गेल्या एका पिढीच्या काळांत झालेल्या लढ्यामध्यें लोकांनीं अत्यंत अनुकरणीय अशा

सहनशीलतेनें जी शांति राखली ती अंतरांतून आलेली शांति नव्हती. तो जो दडपून राहिलेला प्रक्षोभ त्याला ब्रिटिश सत्ता जातांच वाव मिळाला, तो मग जाती-जातींतल्या अत्याचारांच्या रूपानें बाहेर पडला; हा जातीय विद्वेष नाहींसा कधींच झाला नव्हता, तो ब्रिटिश संगिनीमुळें दबून राहिला होता. अहिंसेच्या तंत्रांत मला अपयश आलें म्हणून खुद्द अहिंसेवरील माझ्या श्रद्धेंत मुळींच कमतरता येण्याचें कारण नाहीं. उलट ती श्रद्धा तंत्रांतील संभाव्य दोष दिसून आल्यामुळें अधिकच दृढ झाली आहे. ६

* * *

## : ९ : सत्याग्रहाकरितां पात्रता व पथ्यें

सत्याग्रहाच्या लढाईत हार ही वस्तूच नाहीं. उद्दिष्ट जर साध्य न झालें तर त्यांत सत्याग्रही व्यक्तीचा उणेपणा आहे, सत्याग्रहाच्या सिद्धान्तांत उणेपणा नाहीं. ही गोष्ट फार लक्षपूर्वक समजून घेण्यासारखी आहे. शरीरबळाच्या लढाईला हा नियम लागू पडत नाहीं. त्यांत लष्करें भिडतात तेव्हां फक्त योद्धयांच्या कच्चेपणामुळेंच हार होते असें होत नाहीं. योद्धे अतिशय शूर असले तरीसुद्धां इतर साधनें जर कच्चीं असतील तर हार होते. उदा. विरुद्ध बाजूच्या योद्धयांकडे त्यांच्यापेक्षां शस्त्रें अधिक चांगली असतील, किंवा त्यांचे मोर्चे अधिक चांगले बांधलेले असतील, किंवा त्यांच्यापाशीं युद्धविद्या जास्त असेल, इत्यादि अनेक बाह्य कारणांमुळें शरीरबळानें लढणाऱ्यांची हार-जीत होत असते. पण सत्याग्रहानें लढणाऱ्यांना बाह्य कारणें मुळींसुद्धां बाधूं शकत नाहींत. फक्त त्यांचा स्वतःचा कच्चेपणाच त्यांना नडतो. दुसरें, सामान्य लढायांत जो पक्ष हार खाईल त्याच्या सर्व माणसांनीं हार खाल्ली असें समजलें जातें आणि ते खरोखर हरतातहि. सत्याग्रहांत एकाच्या जयानें दुसऱ्यांचा जय झाला असें खुशाल मानावें, सगळे हरले तरी जो एकटा हरला नसेल तो इतरांच्या हार खाण्यानें स्वतः हरत नाहीं.

तेव्हां अशी जी उत्कृष्ट, हारच नसलेली, एकच ( यशाचा ) परिणाम घडविणारी लढाई ती कोण लढूं शकेल हा विचार करणें अत्यंत अगत्याचें आहे.

सत्याग्रहाचा अर्थ पाहतां आपल्याला असें दिसून येतें कीं, ती लढाई खेळणाऱ्यांना सत्याचा आग्रह - सत्याचें बळ - असलें पाहिजे, ही पहिली अट आहे. म्हणजे त्या माणसानें फक्त सत्यावरच आधार ठेवला पाहिजे; दोन डगरींवर हात ठेवून चालणार नाहीं; तसा माणूस मध्येंच चिरडला जायचा. सत्याग्रह ही कांहीं गाजराची पुंगी नव्हे, वाजली तर वाजवूं, नाहीं तर दांतांखालीं रगडूं. तसें समजणारा फुकट मरायचा. शरीरबळाची उणीव असणारे, किंवा शरीराचें बळ चालत नाहीं तेव्हां नाइलाजास्तव सत्याग्रही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक

व्हावें लागतें असें समजणारेच सत्याग्रहाची लढाई करतात ही गोष्ट अगदीं खोटी आहे. असें समजणाऱ्याला हा लढा कळलाच नाहीं असें म्हणतां येईल. सत्याग्रह हा शरीरबळापेक्षां जास्त तेजस्वी आहे आणि त्याच्या जोडीला शरीरबळ हें तृणवत् आहे. शरीरबळाच्या बाबतींत मुख्य गोष्ट ही आहे कीं मनुष्य आपल्या शरीराची पर्वा न करतां रणांत झुंजत असतो, याचा अर्थ तो भ्याड नसतो. सत्याग्रही तर आपल्या शरीराला मुळीं किंमतच देत नाहीं. त्याला भीति शिवूं शकत नाहीं. म्हणूनच तो बाहेरचीं हत्यारें धारण करीत नाहीं, आणि मरणाचें भय न ठेवतां शेवटपर्यंत झुंजतो. म्हणून सत्याग्रह्यांमध्यें शरीरबळाहून जास्त हिंमत असली पाहिजे. अशा रीतीनें सत्याग्रह्यांत अगोदर सत्याचें अवलंबन आणि सत्यावर आस्था असणें अवश्य असतें.

त्याच्यांत पैशाविषयीं बेदरकारी असली पाहिजे. सत्य आणि संपत्ति यांच्यांत सदा बेबनाव असतो आणि शेवटपर्यंत तो राहणार. जो संपत्तीला चिकटून राहतो तो सत्य संभाळूं शकत नाहीं. याचा अर्थ सत्याग्रह्याजवळ संपत्ति असतांच कामा नये असा नाहीं. त्याच्यापाशीं संपत्ति असूं शकेल, पण पैसा हाच त्याचा परमेश्वर होऊं शकणार नाहीं. सत्याचें अनुसरण करीत असतांना पैसा राहिला तर ठीकच आहे; न राहिला तर त्याला हाताचा मळ समजून तो सोडायला तो क्षणभरहि कचरणार नाहीं. असें ज्यानें आपलें मन बनविलें नसेल त्याच्याकडून सत्याग्रहाची अपेक्षा करतां येणार नाहीं. दुसरी गोष्ट, ज्या देशाच्या राज्यसत्तेशीं सत्याग्रही होऊन लढावें लागतें त्या देशांत सत्याग्रह्यापाशीं संपत्ति असणें ही कठीणच गोष्ट आहे. सत्तेचें बळ चालतें तें त्या माणसावर चालत नाहीं, त्याच्या संपत्तीवर चालतें किंवा राज्यसत्तेसंबंधींच्या धाकावर चालतें. एक तर तिजोरी लुटली जाण्याची भीति किंवा शरीराला इजा होण्याची भीति, अशा दोन्ही प्रकारच्या भयानें राज्यकर्ता रयतेकडून आपल्याला पाहिजे तें करवून घेतो. म्हणजेच, जुलमी राज्यांत बहुतकरून जुलमांत सहभागी होणाऱ्या माणसांच्याकडूनच पैसा गोळा करतां येतो. जुलमांत सहभागी होणें हें तर सत्याग्रह्याच्या हातून कधीं होणारच नाहीं, तेव्हां अशा परिस्थितींत सत्याग्रह्यानें गरीबींतच अमीरी मानणें योग्य आहे.

यासंबंधीं आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी अशी आहे कीं शरीरबळाचा प्रयोग करतांनासुद्धां धनदौलत, मालमत्ता यांपैकीं पुष्कळ सोडून द्यावें लागतें; भूक-तहान, थंडी-ऊन सहन करावीं लागतात; कुटुंब-माया सोडावी लागते. बोअर लोकांनीं युद्धाचा म्हणजे शरीरबळाचा प्रयोग करतांना हें सर्व केलें. त्यांच्या शरीरबळाच्या आग्रहांत आणि आपल्या सत्याग्रहांत हा भेद मोठा आहे कीं त्यांचा खेळ हा फांशांचा डाव होता. शिवाय शरीरबळाच्या योगानें ते उन्मत्त झाले होते, जीत अर्धी होते न होते तेवढ्यांत आपली पूर्वींची दशा ते विसरून गेले आणि हिंदी लोकांवर जुलमी सत्ता गाजवूं लागले. सत्याग्रही हा लढून जिंकतो तेव्हां त्याच्या जयाचा परिणाम त्याला तसाच त्याच्या विरुद्ध असणाऱ्याला कल्याणकारक ठरतो. सत्याग्रही सत्य संभाळीत असतां जुलमी होणें कधीं शक्य नाहीं.

सत्याग्रह्याला कुटुंबाची माया सोडावी लागते. ही फार अवघड गोष्ट आहे. पण सत्याग्रह म्हणजे तलवारीची धार आहे. शेवटीं त्यांतसुद्धां कुटुंबाचा लाभच साधतो, कारण कुटुंबीजनांनासुद्धां सत्याग्रहाची गोडी आणि छंद लागण्याची वेळ येते आणि हा छंद ज्यांना लागला त्यांना मग इतर कशाचीहि इच्छा राहत नाहीं. दुःख भोगतांना, धन गमावतांना, तुरुंगांत जातांना आपल्या कुटुंबाचें काय होईल हा शोक किंवा चिंता त्यांना राहतां कामा नये. ज्यानें दांत दिले तो चणेहि देईल. सर्प, विंचू, वाघ, लांडगे इ. भयानक जीवजंतूंना जो त्यांचें अन्न देतो तो माणसाला विसरेल काय? आपण जी कासाविशी टाकून द्यायची आहे ती शेरभर बाजरी-ज्वारीची नव्हे तर चोचल्यांची, थंडी सहन करूं शकण्यापुरत्या कपड्यांची नव्हे तर रेशीम-किनखाबाची. ही हांव जर सोडून दिली तर कुटुंबाच्या भरणपोषणाची चिंता फार राहात नाहीं.

अशा रीतीनें सत्याग्रही कोण होऊं शकेल याचा विचार करतांना निष्कर्ष हा येतो कीं, जो धर्माविषयीं खरी आस्था बाळगणारा असेल तोच सत्याग्रही होऊं शकेल. ‘मुख में राम बगल में छुरी’ असल्या प्रकारची आस्था नव्हे. धर्माचें नांव घेऊन धर्माच्या उलट कामें करणें हा धर्म नव्हे. पण जो मनापासून धर्म पाळणारा आहे तो सत्याग्रही होऊं शकेल. म्हणजे जो मनुष्य ईश्वरावरच सर्व सोपवितो त्याला जगांत कधीं हरणें नाहींच. लोक हरला

म्हणाले म्हणून कांहीं तो हरला म्हणतां येणार नाहीं; आणि लोकांनीं जीत मानली म्हणून कांहीं जीत झाली असेंहि नाहीं. हें अर्थात् ज्याला समजलें त्यालाच समजलें.

हें सत्याग्रहाचें खरें स्वरूप आहे. ज्यानें सत्याग्रहाखातर सर्व वेचलें त्यानें सर्व कांहीं मिळविलें, कारण त्याला संतोष आहे. संतोष हें सुख आहे, इतर सुखें कोणीं जाणलीं आहेत ? इतर सुखे हें मृगजळासारखें आहे. जितकें जितकें त्याच्याजवळ जावें तितकें तितकें तें दूरच दिसतें.

सत्याग्रहाचें शस्त्र हातीं आलें तर अन्यायामुळें होणाऱ्या सर्व दुःखांचा परिहार करण्याकरितां त्याचा उपयोग होईल. मात्र त्याचें खरें स्वरूप समजलें पाहिजे. तें समजणें सोपें तितकेंच कठीण आहे. शरीरबळानें संपन्न जसे थोडेच होतात, तसे सत्याच्या बळानें संपन्न तर त्याहूनहि थोडेच व्हायचे. १

सत्याग्रहांत व्रतस्थता, आत्मसंयम, आत्मशुद्धि आणि सत्याग्रह करणाऱ्याचा समाजमान्य दर्जा या गोष्टी गृहीत असतात. सत्याग्रह्यानें दुराचार आणि दुराचारी यांतील भेद कधींहि विसरतां कामा नये. दुराचाऱ्याच्या बाबतींत आपल्या मनांत त्यानें द्वेषभाव किंवा कडवटपणा बाळगूं नये. दुष्ट मनुष्याचा दुष्टावा किंचितहि कमी झालेला नसला तरी सत्याग्रह्यानें उगीचच त्याला लावून बोलूं नये. कारण, या जगांत प्रेमानें ज्याचें हृदयपरिवर्तन होणार नाहीं इतका नष्ट कोणीहि नाहीं, अशी प्रत्येक सत्याग्रहीची धर्मश्रद्धा असली पाहिजे. सत्याग्रही हा सदोदित साधुत्वानें असाधुत्वाला, प्रेमानें क्रोधाला, सत्यानें असत्याला, अहिंसेनें हिंसेला जिंकण्याचा प्रयत्न करील. याखेरीज जगांतील पापप्रवृत्तीचें प्रक्षालन करण्याचा दुसरा मार्ग नाहीं. म्हणून जो मनुष्य स्वतःला सत्याग्रही म्हणवितो तो एकान्तांत प्रार्थनावृत्तीनें अंतर्मुख होऊन आणि आत्मसंशोधन करून आपण स्वतः क्रोधाच्या, द्वेषाच्या आणि अशाच इतर मानवी दौर्बल्याच्या दोषांपासून पूर्ण मुक्त झालों आहों का, ज्या पापप्रवृत्तींच्या विरुद्ध आपण मोहीम चालवायला निघालों आहों त्या प्रवृत्ती आपल्यांत असण्याची शक्यता आहे कीं नाहीं, हें शोधण्याचा सतत प्रयत्न करतो. सत्याग्रही हा आत्मशुद्धि आणि तपस्या यांनींच अगोदर अर्धी लढाई जिंकतो. व्याख्यान-प्रवचनादि दिखाऊ प्रयोगांनी होणाऱ्या परिणामापेक्षां

सत्याच्या व प्रेमाच्या मूक आणि बिनबोभाटपणें होणाऱ्या कृतीचे परिणाम अधिक चिरंतन आणि टिकाऊ होतात अशी सत्याग्रह्याची श्रद्धा असते.

परंतु जरी सत्याग्रह हा बिनबोभाटपणें कार्य करणारा असला तरी सत्याग्रही मनुष्यानें कांहीं ना कांहीं हालचाल करण्याची आवश्यकता असतेच. उदाहरणार्थ, जी पापप्रवृत्ति निर्मूल करण्याकरितां सत्याग्रही निघाला तिच्या बाबतींत त्यानें प्रथम व्यापक व सखोल चळवळ करून लोकमत आपल्या बाजूला संघटित केलें पाहिजे. लोकमत जेव्हां एखाद्या सामाजिक गैरव्यवहाराच्या बाबतींत पुरेंसें जागृत केलें जातें तेव्हां श्रेष्ठ समजला जाणारा मनुष्यसुद्धां तसला व्यवहार आचरायला किंवा त्याला उघडपणें पाठिंबा द्यायला धजत नाहीं. जागृत व सुबुद्ध लोकमत हेंच सत्याग्रहाचें सर्वांत शक्तिशाली असें शस्त्र आहे. २

अहिंसक सैन्यांतील सैनिकांची संख्या कमी झाली तरी कांहीं हरकत नाहीं. खऱ्या अहिंसक सैनिकांची सेना किती जरी कमी असली तरी ती पुढें-मागें वाढण्याचा संभव असतो. खरे अहिंसक नसणाऱ्या लोकांचें सैन्य वाढलें काय आणि घटलें काय, तें कधींच काम देण्याचा संभव नाहीं. ३

सत्याग्रहांत महत्त्व संख्येला नसतें, तें नेहमीं गुणाला असतें; विशेषतः विरुद्ध बाजूला जेव्हां हिंसेच्या शक्ती अत्यंत जबरदस्त असतात तेव्हां तर गुणालाच महत्त्व जास्त असतें.

दुसरी गोष्ट म्हणजे, अन्याय करणाऱ्याला पेंचांत आणणें हा सत्याग्रह्याचा कधींहि उद्देश नसतो ही गोष्ट लोक पुष्कळ वेळां विसरतात. सत्याग्रहांत भयाची भावना कधींहि जागृत केली जात नाहीं; हृदय जागृत करण्याचा नेहमीं प्रयत्न असतो, असला पाहिजे. सत्याग्रह्याचा हेतु अन्याय करणाऱ्याचें मन पालटणें हा असतो, त्यावर दडपण आणण्याचा नसतो. सत्याग्रह्यानें आपल्या सर्व कृतींत कृत्रिमता टाळावी. त्यानें सहजस्वभावाला आणि अंतःकरणांतल्या निष्ठेला अनुसरून वागावें.

हे नियम आपल्या मनश्चक्षूंपुढें ठेवल्यानंतर मग हिंदुस्तानांतील प्रत्येक

सत्याग्रहीसाठीं पुढें जे पात्रतेचे गुण माझ्या मतें अवश्य म्हणून मी सांगितले आहेत ते वाचकांना कदाचित् योग्य वाटतील :

१. त्याची ईश्वरावर जिती-जागती श्रद्धा असली पाहिजे; कारण तोच एक त्याचा भक्कम आधार आहे.

२. सत्य-अहिंसेवर धर्म म्हणून त्याची श्रद्धा असली पाहिजे आणि म्हणून मनुष्यस्वभावांतील मूलभूत सज्जनतेवर त्याचा विश्वास असला पाहिजे; या सज्जनतेलाच तो आपल्या सत्याचरणानें आणि आत्मक्लेशांच्या द्वारां प्रकट होणाऱ्या प्रेमानें जागृत करूं इच्छितो.

३. त्याचें चारित्र्य निष्कलंक असलें पाहिजे आणि उद्दिष्टाप्रीत्यर्थ आपले प्राण आणि आपलें सर्वस्व आनंदानें अर्पण करण्याची त्याची तयारी असली पाहिजे.

४. तो नित्य खादीधारी आणि सूत कांतणारा असला पाहिजे. हा नियम हिंदुस्तानांत अत्यंत आवश्यक आहे.

५. त्याला दारूचें किंवा इतर मादक पदार्थांचें व्यसन असतां कामा नये, तरच त्याची बुद्धि नित्य शुद्ध राहील, मन स्थिर राहील.

६. वेळोवेळीं शिस्तीचे जे नियम घालून दिले जातील ते त्यानें राजी-खुषीनें अंमलांत आणले पाहिजेत.

७. तुरुंगांतले नियम, जर ते मुद्दाम त्याचा स्वाभिमान दुखविण्याच्या उद्देशानें केलेले नसतील तर, त्यानें पाळले पाहिजेत.

हे सत्याग्रहाच्या पात्रतेचे गुण केवळ नमुन्यादाखल दिले आहेत. येथें सर्व गुण संपले असें समजण्याचें कारण नाहीं. ४

( अ ) सत्याग्रही हा आपल्या मनांत क्रोधाला थारा देणार नाहीं.

( आ ) प्रतिपक्षाचा राग तो सहन करील.

( इ ) तसें करतांना प्रतिपक्षाकडून होणारे आघात तो सहन करील, उलट आघात करणार नाहीं; शिस्त किंवा कर्तव्य म्हणून तो हुकुमांपुढें मान वांकवील, शिक्षेच्या किंवा त्यासारख्या इतर भयानें नव्हे.

( ई ) कोणी अधिकारी सत्याग्रह्याला जेव्हां पकडूं पाहील तेव्हां सत्याग्रही

आपण होऊन पकडून घेईल, आणि जर त्याची कांहीं मालमत्ता असेल तर ती जप्त होतांना किंवा नेली जात असतांना तो प्रतिकार करणार नाहीं.

(उ) सत्याग्रह्याच्या ताब्यांत विश्वस्त म्हणून जर कोणती मालमत्ता असेल तर ती देऊन टाकण्याचें तो नाकारील. आणि तिचें संरक्षण करतांना त्याला जीव द्यावा लागला तरी तो देईल. मात्र तो उलट आघात करणार नाहीं.

(ऊ) उलट आघात न करणें यांत शिव्याशाप न देणेंहि येतें.

(ए) म्हणून सत्याग्रही हा प्रतिपक्षाचा कधीं अपमान करणार नाहीं आणि अहिंसेला न शोभणाऱ्या घोषणांतहि तो भाग घेणार नाहीं.

(ऐ) लढा चालू असतां जर कोणी एखाद्या अधिकाऱ्याचा अपमान करील किंवा त्याच्यावर हल्ला करील तर सत्याग्रही हा त्या अधिकाऱ्याला आपला प्राण धोक्यांत घालूनहि त्यापासून वांचवील.

(ओ) कैदी असतांना सत्याग्रही हा तुरुंगाधिकाऱ्यांशीं सौजन्यानें वागेल, आणि त्याच्या स्वाभिमानाला न दुखविणारे असे तुरुंगाचे सर्व नियम तो पाळील. सत्याग्रही हा स्वतःमध्यें आणि सामान्य कैद्यामध्यें भेद करणार नाहीं. सामान्य कैद्यापेक्षां स्वतःला श्रेष्ठ मानणार नाहीं, किंवा आपलें शरीर निरोगी व चांगल्या स्थितींत ठेवण्याकरितां आवश्यक नसलेल्या सोयींची मागणीहि करणार नाहीं. मात्र आपल्या शारीरिक व आत्मिक सुस्थितीकरितां आवश्यक असणाऱ्या सोयींची मागणी करण्याचा त्याला हक्क आहे.

(क) ज्या सोयी न मिळाल्या तर आपल्या स्वाभिमानाला धक्का पोंचणार नाहीं अशा सोयी मिळाल्या नाहींत म्हणून सत्याग्रही उपवास करणार नाहीं.

(ख) सत्याग्रही आपल्या दलनायकाच्या आज्ञा, आपल्याला आवडोत न आवडोत, आनंदानें पाळील.

(ग) ज्या आज्ञा त्याला दिल्या जातील त्या जरी अपमानकारक, द्वेषपूर्ण किंवा मूर्खपणाच्या वाटल्या तरी तो अगोदर त्या पाळील, आणि मग वरिष्ठांकडे दाद मागेल. दलांत सामील होण्यानें आपल्याला समाधान

लाभणार आहे का याचा विचार सामील होण्यापूर्वी करण्याचें त्याला पूर्ण स्वातंत्र्य असतें; परंतु एकदां सामील झाल्यानंतर मग त्याचे नियम त्रासदायक वाटले तरी त्यांचा आदर करणें हें त्याचें कर्तव्य ठरतें. दलांतील एखाद्या सैनिकाला दलाची एकंदर कार्यपद्धति गैरवाजवी किंवा अनीतिकारक वाटली तर त्या दलाशीं संबंध तोडून टाकण्याचा त्याला हक्क आहे; पण त्यांत असतांना शिस्त मोडण्याचा त्याला मुळींच अधिकार नाहीं.

( घ ) कोणाहि सत्याग्रह्यानें आपल्या अवलंबितांकरितां निर्वाहखर्चाची अपेक्षा बाळगूं नये. तशी कांहीं तरतूद झाली तर ती अनपेक्षितच होय. सत्याग्रही आपल्या अवलंबित माणसांची चिंता ईश्वरावर सोपवितो. ज्यांत हजारों लाखों माणसें आपली आहुति देतात अशा सामान्य युद्धकार्यांत-सुद्धां तीं अगोदर कांहीं तरतूद करून ठेवूं शकतात असें नाहीं. मग सत्याग्रहासारख्या कामीं तर बोलायलाच नको. मात्र अशा काळांत कोणीहि उपाशी राहिलें असें घडत नाहीं, हा सार्वत्रिक अनुभव आहे.

( च ) कोणीहि सत्याग्रही जाणून-बुजून जातीय झगड्यांना कारणीभूत होणार नाहीं

( छ ) तसा झगडा जर उद्‌भवलाच तर तो कोणाचीहि बाजू न घेतां उघड उघड न्याय्य दिसणाऱ्या बाजूला मदत करील.

( ज ) सत्याग्रह्यांची मिरवणूक निघाली असतां कोणाहि जमातीच्या धार्मिक भावना दुखावतील असें ते कांहीं करणार नाहींत, आणि अशा भावना दुखविण्याजोग्या मिरवणुकींत ते भाग घेणार नाहींत. ५

सत्याग्रह्याला आपल्या प्रत्येक मिनिटाचा आपण योग्य विनियोग केला असा हिशेब देतां आला पाहिजे. ६

नियमितपणाला मी सर्वांत मोठें महत्त्व देतों; अहिंसेंतून निघणारा तो उपसिद्धान्तच आहे. ७

सत्याग्रह हा पक्षांच्या व वर्ग आणि संप्रदाय अशा भेदांच्या अतीत आहे. सत्याग्रह हा आपलें सारें जीवन आणि समाज यांना व्यापून राहिला पाहिजे. ८

( सत्याग्रहाच्या तयारीच्या बाबतींत ) पहिलें पाऊल म्हणजे इतःपर सर्व प्रकारचें असत्य आणि हिंसा आपल्याला निषिद्ध आहेत असा दृढ

निश्चय करणें, मग त्याकरितां कितीहि त्याग करावा लागो. कारण, असत्य व हिंसा यांनीं जें हित साधतेसें वाटेल तें फक्त वरवरचें असेल. वास्तविक तें मारक विषच होय. आमचा निश्चय जर पक्का असला आणि निष्ठा स्पष्ट असली, तर अर्धी लढाई जिंकली असा त्याचा अर्थ आहे, आणि या दोन गुणांचा आचार त्या मानानें सोपा होतो. ९

जो अहिंसेचा पुरस्कर्ता आहे त्यानें यापूर्वींच जर आपले आईवडिलांशीं, आपल्या मुलांशीं, पत्नीशीं, आपल्या नोकरमंडळींशीं व आश्रितांशीं असलेले संबंध अहिंसेवर स्थापन केले नसतील तर तसे तो अर्थात् आतां करीलच. पण त्याची खरी कसोटी जेव्हां राजकीय वा जातीय दंगे उद्‌भवतील किंवा चोर-लुटारूंचा धोका उत्पन्न होईल त्या वेळीं होणार आहे. तशा परिस्थितींत आपले प्राण देण्याचा नुसता निश्चयच करणें पुरेसें नाहीं. तसें बलिदान करण्याकरितां लागणारे गुण त्याच्या अंगीं असले पाहिजेत. मी जर हिंदु असेन तर मी मुसलमानांशीं व इतरांशीं बंधुत्वाचे संबंध ठेवले पाहिजेत. त्यांच्याशीं होणाऱ्या माझ्या वागणुकींत 'हे माझ्या धर्माचे आणि हे दुसऱ्या धर्माचे' असा भेद मी करतां कामा नये. मनांत कसलीहि भीति किंवा कृत्रिम भाव न आणतां त्यांची सेवा करण्याचे प्रसंग मी शोधले पाहिजेत. अहिंसेच्या कोशांत 'भय' या शब्दाला स्थान असणेंच शक्य नाहीं. अशा रीतीनें आपल्या निःस्वार्थ सेवेनें लायक बनल्यानंतरच शुद्ध अहिंसेचा पुरस्कर्ता हा जातीय दंगलींत आपली उचित आहुति द्यायला समर्थ होईल. अशाच रीतीनें, चोर-लुटारूंच्या संकटाला तोंड देण्याच्या दृष्टीनें ज्या जमातींतून हे चोर-लुटारू येतात त्या जमातींत जाऊन त्या लोकांशीं स्नेहाचे संबंध तो अवश्य बांधील. १०

(सत्याग्रह्यांनी कसें वागावें यासंबंधीं) सत्य-अहिंसेच्या सिद्धान्तांतून खालील उत्तरें उपलब्ध होतात :

(अ) विरोधकाची बदनामी सत्याग्रह्याकडून कधींच होता कामा नये. परंतु विरोधकाच्या कृत्यांचें यथातथ्य वर्णन करूं नये असा याचा अर्थ नाहीं. विरोधक हा विरोध करतो म्हणून तो नेहमीं वाईटच असतो असें नाहीं. आपण स्वतःला जितके प्रतिष्ठित समजतों तितका तोहि असूं शकेल आणि तरी त्याच्यांत आणि आपल्यांत प्राणभूत असे मतभेद असूं शकतील.

(ब) म्हणून आमची टीकेची पद्धति अशी असावी कीं तो असत्य आचरतो असें जर आपण मानीत असूं तर त्याला सत्यानें तोंड द्यायचें, त्याच्या उद्दामपणाला सौजन्यानें उत्तर द्यायचें, त्याच्या दमदाटीला शांतिमय धैर्यानें सामना द्यायचा, त्याच्या दांडगाईचा मुकाबला सहनशीलतेनें करायचा, तो उन्मत्तपणा दाखवीत असेल तर आपण नम्रता धारण करायची, तो दुष्कर्म करीत असेल तर आपण सत्कर्म आचरायचें. सत्याग्रहाचे अनुयायी त्याचा धिक्कार करण्याला प्रवृत्त न होतां त्याचें हृदयपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करतील.

(क) वैरभाव कोठपर्यंत न्यायचा त्याची मर्यादा ठरविण्याचा प्रश्नच येत नाहीं. कारण व्यक्तींच्याशीं वैरच असतां कामा नये. नीतिमत्तेला किंवा समाजहिताला मारक होत असतील अशा कृत्यांशीं वैर असलेंच पाहिजे.

(ड) अधिकारपद आणि सत्ता हीं टाळलीं पाहिजेत. अर्थात् आज होत आहे त्याहून स्पष्टपणें अधिक सेवा होत असेल तर त्यांचा स्वीकार करण्याला हरकत नसावी. ११

एखाद्या कृत्यावर किंवा पद्धतीवर हल्ला चढवितां येईल, पण त्याला जबाबदार असलेल्या मनुष्यावर हल्ला करतां येणार नाहीं, करतां कामा नये. आपण स्वतःच जेथें अपूर्ण आहोंत तेथें दुसऱ्याशीं वागतांना आपण मृदुतेनेंच वागलें पाहिजे आणि दोषारोप करायचा झाला तर तो बेतानेंच केला पाहिजे. १२

दुसऱ्याचे विचार वाईट, आपले तेवढे चांगले आणि आपल्या मताहून वेगळीं ज्यांचीं मतें असतील ते देशाचे शत्रू असें म्हणण्याची खोड वाईट आहे. १३

आमच्यांत जो सत् संकल्प आहे, देशभक्ति आहे असें आपण म्हणतों ती आपल्या विरोधकांतहि आहे असें मानून आपण त्याची कदर करावी. १४

पुष्कळ वेळां सोबत्यांच्या बाबतींत माझी निराशा झाली आहे ही गोष्ट खरी आहे. पुष्कळांनीं मला फसविलें आहे आणि पुष्कळांत मला उणीवा

दिसून आल्या आहेत. तरीहि त्यांची सोबत केल्याचा मला पश्चात्ताप नाहीं. कारण सहकार कसा करावा हें जसें मला माहीत आहे तसेंच असहकार कसा करावा हेंहि मी जाणतों. लोक जें बोलतात तें खरें धरून चालणें, स्पष्ट असा पुरावा नसल्यास तें खोटें न मानणें हाच जगांत वागणुकीचा अत्यंत व्यावहारिक, अत्यंत सुसंस्कृत असा मार्ग आहे. १५

आपले विरोधक ज्या रीतीनें विचार करतात त्याच रीतीनें आपण विचार करायला लागलों कीं त्यांना संपूर्ण न्याय करण्याची कुवत आपल्या अंगीं येईल. याला मनाची अनासक्त अवस्था असावी लागते, आणि त्याप्रत पोंचणें अतिशय कठीण आहे, हें मी जाणतों. तरी सुद्धां सत्याग्रह्याला ती प्राप्त करून घेणें अत्यंत आवश्यक आहे. आपल्या प्रतिपक्षीयांच्या जागीं स्वतःला कल्पून त्यांची बाजू नीट समजावून घेण्यानें जगांतील तीनचतुर्थांश दुःखें आणि गैरसमजुती नाहींशा होतील. त्यायोगें आपल्या विरोधकांच्या मताशीं आपण एक तर चट्‌कन् सहमत होऊं किंवा त्यांच्याविषयीं सद्‌भाव मनांत बाळगूं. जेथें आदर्श पूर्णतः भिन्न असतील तेथें सहमत होणें शक्य नसलें तरी सद्‌भाव मनांत बाळगून ते जें म्हणतात तसेंच खरोखर त्यांच्या मनांत आहे असा विश्वास आपल्यांत येईल. त्यांचें म्हणणें हें स्वार्थाच्या पोटीं असो किंवा अज्ञानाच्या पोटीं असो, तें चुकीचें आहे असें आपण मानूं शकतों. म्हणून मग आमचें काम त्यांची बाजू चुकीची आहे हें त्यांना दाखविणें हें आहे आणि तें आपण क्लेश सहन करून दाखवायचें आहे. जेथें समजुती फार काळापासून रूढ झालेल्या असतील आणि धार्मिक म्हणून कल्पिलेल्या आप्तवाक्यांवर आधारलेल्या असतील तेथें केवळ बुद्धीला पटविण्याचा प्रयत्न करून भागत नाहीं असें मला दिसून आलें आहे. बुद्धीला आत्मक्लेशानें दुजोरा द्यावा लागतो. आत्मक्लेशानें प्रतिपक्षाच्या ठिकाणीं समजून घेण्याची वृत्ति जागृत होते. म्हणून आपल्या वागणुकींत जबरदस्तीचा लवलेशहि असतां कामाचा नाहीं. आपण अधीर होता कामा नये, आणि आपण जें साधन हातीं घेत असूं त्यावर आपली अढळ श्रद्धा असली पाहिजे. १६

अन्याय्य कारणाकरितां सत्याग्रह होऊं शकत नाहीं. न्याय्य कारण असलें तरी त्या कारणाच्या पुरस्कर्त्यांच्या अंगीं वज्रसंकल्प आणि शेवटपर्यंत

झगडण्याची व क्लेश सहन करण्याची शक्ति नसेल तर तो सत्याग्रह निरर्थक ठरतो; आणि अत्याचाराचा यत्किंचित्‌हि उपयोग झाला तर न्याय्य कारण पुष्कळ वेळां पराभूत होतें. सत्याग्रहांत हिंसेचा उपयोग विचारांत, उच्चारांत किंवा आचारांत कोणत्याहि स्वरूपांत चालत नाहीं. आपलें कारण न्याय्य असेल, वाटेल तितके क्लेश सहन करण्याची ताकद असेल आणि हिंसा टाळलेली असेल तर जय ठेवलेलाच आहे. १७

सत्याग्रहाचा हा एक मूलभूत सिद्धान्त आहे कीं सत्याग्रही हा ज्या जुलमी राज्यसत्तेचा प्रतिकार करूं इच्छितो त्याची सत्याग्रह्याच्या शरीरावर आणि भौतिक मालमत्तेवर सत्ता चालेल, त्याच्या आत्म्यावर त्याची बिलकुल सत्ता चालणार नाहीं. शरीर जरी बंदिवासांत पडलें तरी आत्मा हा अपराजित आणि अजिंक्य राहूं शकतो. या मूलभूत सत्याच्या ज्ञानांतूनच सत्याग्रहाचें सबंध शास्त्र जन्माला आलें. जेव्हां आपल्या अंगीं स्वतःच्या सुखसोयींविषयीं बेफिकिरीची वृत्ति बाणेल तेव्हां पुष्कळ कटकटींतून आणि त्रासांतून आपण वांचूं, आणि स्वातंत्र्य आपल्यापुढें हात जोडून उभें राहील. अशी बेफिकिरीची वृत्ति बाळगणाऱ्याची नेहमीं उपासमारच होईल असें कोणी समजूं नये. चिमुकल्या मुंगीला साखरेचा रवा आणि हत्तीला त्याचा रोजचा मणाचा मलिदा पुरविणारा विश्वंभर मनुष्याला त्याचा रोजचा घांस देण्याच्या बाबतींत उपेक्षा करील असें होणार नाहीं. निसर्गांतील प्राणी उद्यांविषयींची चिंता किंवा रुखरुख मनांत बाळगीत नाहींत, उद्यांच्या निर्वाहाकरितां उद्यांवरच विसंबून राहतात. फक्त मनुष्यप्राणि मात्र आपल्या अहंकाराच्या तोऱ्यांत स्वतःला पृथ्वीचा धनी समजतो आणि स्वतःकरितां नश्वर अशा वस्तूंचे ढीगच्या ढीग सांठवीत जातो. निसर्ग हा रोजच्या रोज जबरदस्त धक्के देऊन त्याच्या अहंकारापासून त्याला वळविण्याचा प्रयत्न करतो पण मनुष्य अहंकार टाकत नाहीं. सत्याग्रह हा नम्रतेचा धडा गळीं उतरविण्याचा रामबाण उपाय आहे. मनांत कांहींहि संशय किंवा भय न आणतां ईश्वराच्या दयेवर आपण विसंबून राहिलों तर आपलें भलेंच होईल अशी पुरेपूर श्रद्धा आपल्यांत असली पाहिजे, आणि तसे संपन्न अनुभव आपल्याला आतांपर्यंत मिळालेलेहि आहेत. १८

आतां, सत्याग्रहाला अवश्य असणाऱ्या शारीरिक तयारीचा आपण

विचार करूं. सत्याग्रही हा जर मनानें आणि शरीरानें आरोग्यसंपन्न नसेल तर पूर्ण निर्भयता अंगीं आणण्यांत त्याला कदाचित् यश येणार नाहीं. रात्रंदिवस एकाच जागेवर अखंड पहारा करीत राहण्याची कुवत त्याच्या अंगीं असली पाहिजे; थंडी, उन्ह, पाऊस कांहींहि सहन करावे लागो, त्यानें आजारी पडतां कामा नये; जेथें जिवाला धोका असेल त्या जागीं जाण्याचें, जेथें आग लागलेली असेल त्या ठिकाणीं घुसण्याचें, बळ त्याच्यांत असलें पाहिजे. तसेंच निर्जन जंगलांत आणि जेथें मृत्यु नित्य वावरत असेल तेथे एकटा फिरण्याचें धैर्य त्याच्या ठिकाणीं असलें पाहिजे; खूप मारझोड, उपासमार आणि त्याहूनहि कठीण असे प्रसंग कुरकूर न करतां तो सहन करील, आणि कच न खातां आपल्या नेमल्या जागीं तो स्थिर राहील; दंग्याच्या ठिकाणीं, जेथें शिरणें अशक्य आहे असें वाटेल तेथें, उडी घेण्याची हिकमत आणि शक्ति त्याच्या ठिकाणीं असेल; भर पुरांत उडी घालून वाहात जाणाऱ्या लोकांना वांचविण्याइतकी निर्भयता त्याच्यांत असेल.

तात्पर्य, धोक्यांत आणि आपत्तींत सांपडलेल्या लोकांच्या मदतीसाठीं धांवून जाण्याची आणि स्वतःला कितीहि दुःख दिलें गेलें तरी तें आनंदानें सहन करण्याची शक्ति आपण कमावली पाहिजे. हा मूलभूत सिद्धान्त मान्य असेल तर सत्याग्रह्याकरितां शारीरिक शिक्षणाचे नियम सहज आंखतां येतील. माझी ही दृढ निष्ठा आहे कीं अशा शिक्षणाचा मूळ पाया ईश्वरावरील श्रद्धा हाच आहे. ती जर नसेल तर कितीहि शिक्षण मिळालेलें असलें तरी आणीबाणीच्या वेळीं तें दगा देण्याचा संभव आहे.

सत्याग्रह्याचें एकमेव शस्त्र ईश्वर हें आहे, मग त्याला कोणत्याहि नांवानें ओळखा. त्याच्यावांचून भयानक शस्त्रास्त्रांनीं नखशिखान्त सज्ज झालेल्या शत्रूपुढें सत्याग्रह्याला कांहीं बळ राहणारच नाहीं. भौतिक बळापुढे बहुतेक माणसें शरणागति पत्करतात. पण जो ईश्वराला आपला एकमेव रक्षणकर्ता मानतो तो जगांतल्या महाबलाढ्य शक्तीपुढेंसुद्धां वांकत नाहीं. १९

**प्रश्न :** जर समाजवाद्यांचा किंवा साम्यवाद्यांचा ईश्वरावर विश्वास नसेल तर त्यांना सत्याग्रही होतां येणार नाहीं काय ?

**गांधीजी :** ' नाहीं ' असें मला म्हणावें लागेल. कारण, सत्याग्रह्याला ईश्वरावांचून दुसरा कोणताहि आधार नसतो; आणि ज्याला दुसरा एखादा आधार असेल किंवा दुसऱ्या एखाद्या मदतीवर जो अवलंबून असेल त्याला सत्याग्रह अंमलांत आणतां येणार नाहीं. तो निःशस्त्र प्रतिकार करणारा, असहकारी वगैरे होऊं शकेल, पण खरा सत्याग्रही होऊं शकणार नाहीं.

**प्रश्न :** मग बौद्ध आणि जैन यांच्या बाबतींत काय ? ते सत्याग्रही म्हणून लक्ष्यांत दाखल होऊं शकणार नाहींत काय ?

**गांधीजी :** बौद्ध आणि जैन हे स्वतःच जर हा आक्षेप उत्पन्न करतील आणि म्हणतील कीं असा कडक नियम जर पाळावा लागत असेल तर आम्ही सत्याग्रही होण्याला अपात्र ठरूं, तर मला म्हणावें लागेल कीं होय, तुम्ही म्हणतां तसेंच माझें मत आहे. पण अर्थात् मी ज्या ईश्वरावर विश्वास ठेवतों त्याच ईश्वरावर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे असें मात्र माझें बिलकुल म्हणणें नाहीं. तुमची ईश्वराची व्याख्या माझ्याहून वेगळी असेल, पण त्या ईश्वरावरचा तुमचा विश्वास हा तुमचा अंतिम आधार असला पाहिजे. ती कोणी सर्वश्रेष्ठ शक्ति किंवा अवर्णनीय असें महान् सत्त्व असेल, पण त्यावर श्रद्धा असणें अत्यंत आवश्यक आहे. यत्किंचितहि कुरकूर न करतां किंवा राग न धरतां सर्व प्रकारचे हाल सहन करणें हें ईश्वराकडून मिळणाऱ्या बळावांचून अशक्य आहे. त्याच्या बळानेंच आम्ही सबळ आहोंत. आणि त्या अपरिमेय शक्तीकडे जे आपल्या सगळ्या चिंता आणि भयें सोपवूं शकतात त्यांची ईश्वरावरच श्रद्धा म्हणायची. २०

सत्याग्रहाच्या बाबतींत ईश्वरावर श्रद्धा असणें जितकें आवश्यक तितकेंच ब्रह्मचर्यहि आवश्यक आहे. ब्रह्मचर्यावांचून त्याच्यांत तेज येणार नाहीं. शस्त्र न घेतां साऱ्या जगाच्या विरुद्ध उभें राहाण्याचें मनोबळ त्याच्यांत असणार नाहीं. 'ब्रह्मचर्या'चा येथें आत्मसंयमानें केलेला वीर्यसंग्रह एवढाच मर्यादित अर्थ घेतला तरी चालेल. ज्याला बेताचा आहार घेऊन व कोणत्याहि बाह्य उपायांचा आसरा न घेतां जगण्याची इच्छा आहे आणि तरीहि आपल्यांत बळ राहावें असें ज्याला वाटतें त्याला वीर्याचा संग्रह करण्यावांचून गत्यंतर नाहीं.

माणसाचें तें सर्वांत मोठें भांडवल आहे. जो त्याचें रक्षण करूं शकतो त्याला त्यांतून नवें नवें बळ मिळत राहतें. जो तें कळत वा न कळत खर्च करून टाकतो तो शेवटीं नामर्द बनेल. योग्य वेळीं त्याचें बळ त्याला काम देणार नाहीं. वीर्यसंग्रह कसा करावा यासंबंधीं मी अनेक वेळां लिहिलें आहे. जो डोळ्यांनीं किंवा स्पर्शानें कामेच्छा धरतो किंवा जो मांसाच्या गोळ्यावर आसक्त होतो त्याला वीर्यसंग्रह कधींहि शक्य होणार नाहीं. कोणतींहि व्रतें आणि नियम यांचें कडकपणें पालन न करतां वीर्याचा संग्रह करण्याची आशा जे बाळगीत असतील त्यांची ती आशा म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध गतीनें पोहत असतांनासुद्धां दमछाक न व्हावी अशासारखीच आहे. जो शरीराचा संयम करतो पण मनांत पापवासना ठेवतो त्याची स्थिति ब्रह्मचर्य पाळण्याचा आव न आणतां संयमी गृहस्थजीवन घालविणाऱ्या माणसापेक्षां अधिक वाईट होते. कारण जो मनानें काम भोगतो त्याची इच्छा नेहमीं अतृप्त राहणार आणि आमरण तो नीतिभ्रष्ट आणि भारभूत असें जीवन कंठणार. असा मनुष्य कधींहि पूर्ण सत्याग्रही होऊं शकणार नाहीं.

तसाच संपत्ति—कीर्तीच्या मागें लागणाराहि सत्याग्रही होऊं शकणार नाहीं. २१

सत्याग्रहाच्या सेनापतीच्या शब्दांत सामर्थ्य असलें पाहिजे; हें सामर्थ्य म्हणजे अमर्याद शस्त्रसंग्रहापासून मिळणारें सामर्थ्य नव्हे तर जीवनाचें पावित्र्य, कडक जागरूकता व सतत प्रयत्न यांतून निर्माण होणारें सामर्थ्य. ब्रह्मचर्यपालनावांचून तें असंभवनीय आहे. मनुष्यप्राण्याला, जेवढें शक्य तितकें तें ब्रह्मचर्य पूर्ण असलें पाहिजे. येथें ब्रह्मचर्याचा अर्थ केवळ शरीराचा संयम असा नाहीं. त्याहून त्याचा अधिक व्यापक अर्थ आहे. तो म्हणजे सर्व इंद्रियांवर संपूर्ण नियंत्रण. उदाहरणार्थ, अशुद्ध विचार हा ब्रह्मचर्याचा भंग आहे; तसाच क्रोध. ज्या वीर्यातून जीव-निर्मिति होते त्याचा संग्रह करणें आणि उदात्त कार्याकडे तें लावणें यांत सर्व शक्तीचा उगम आहे. पापी विचारांनींच नव्हे तर भरकटणाऱ्या, अस्ताव्यस्त, अनिष्ट अशा विचारांनींसुद्धां हें वीर्य सतत आणि अजाणतांसुद्धां क्षीण होतें. आणि विचार हेंच उच्चार-आचाराचें मूळ असल्यामुळें जसा विचार तसाच उच्चार व आचार होत असतो. म्हणून सर्वांगांनीं नियंत्रित विचार हीच

एक अति महान् बलवती व स्वयंप्रभावी शक्ति आहे. अंतरींच्या मूक प्रार्थनेचा हाच अर्थ असावा असें मला वाटतें. जर मनुष्य हा ईश्वराची प्रतिमूर्ति असेल तर त्याला नेमून दिलेल्या मर्यादित क्षेत्रांत त्यानें एखाद्या गोष्टीची इच्छा धरण्याचा अवकाश कीं ती व्हावयाचीच. अशी शक्ति आपल्या वीर्याची वाटेल तशी उधळपट्टी करणाऱ्याच्या बाबतींत असंभवनीय आहे. गळती असलेल्या नळींतील वाफेला शक्ति कोठून असणार? प्रजोत्पादनाचा स्पष्ट हेतु सोडून होणारा लैंगिक व्यवहार हें वीर्याच्या उधळपट्टीचें एक नमुन्याचें व ढोबळ स्वरूप आहे, आणि म्हणून तें विशेषेंकरून निषेधार्ह ठरविण्यांत आलें आहे, आणि तें रास्त आहे. परंतु ज्याला मोठमोठ्या समाजांना अहिंसक लढा करण्याकरितां संघटित करायचें आहे त्यानें मी वर वर्णिलेला सर्वेन्द्रियांवर संपूर्ण ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि तो जवळ जवळ साध्यहि केला पाहिजे.

असा ताबा ईश्वराच्या कृपेवांचून साध्य होणें शक्य नाहीं. हा ताबा यांत्रिक किंवा तात्पुरता नसतो. तो एकदां साध्य झाला कीं कधींहि गमावला जात नाहीं. २२

कामविकारावर विजय हा पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या जीवनांतील उच्चतम पुरुषार्थ आहे. कामविकाराला जिंकल्यावांचून स्वतःवर राज्य करण्याची मनुष्याला आशा धरतां येणार नाहीं. आणि स्वतःवर राज्य चालवितां न आलें तर स्वराज्य किंवा रामराज्य कोठलें? स्वतःवर ताबा न ठेवतां इतरांवर गाजविलेलें राज्य म्हणजे खेळण्यांतल्या रंगीत आंब्यासारखेंच फसवें व मनाचा हिरमोड करणारें राज्य होईल. कामविकारावर जय न मिळालेल्या कोणत्याहि कार्यकर्त्याला हरिजनकार्य, जातीय ऐक्य, खादी, गोरक्षण किंवा ग्रामीण पुनर्घटना यांसारख्या कार्यांत आपली मनापासूनची सेवा अर्पण करण्याची आशाच ठेवतां येणार नाहीं. यांसारख्या महान् कार्यांची सेवा केवळ बौद्धिक सामुग्रीनें करणें शक्य नसतें. त्याकरितां आध्यात्मिक साधना किंवा आत्मबळ असावें लागतें. आत्मबळ हें ईश्वराच्या कृपेनेंच प्राप्त होतें आणि ईश्वराची कृपा कामविकाराचा गुलाम असलेल्याला कधींच प्राप्त होत नाहीं. २३

**प्रश्न** : गुप्ततेबद्दल आपण आपलें मत स्पष्टपणें सांगावें. गेल्या चळवळींत

सरकारी अधिकाऱ्यांना फसविण्याकरितां मोठ्या प्रमाणांत गुप्ततेचा अवलंब केला गेला होता.

गांधीजी : गुप्ततेनें आपल्या कार्याला कांहींहि लाभ होत नाहीं. याविषयीं मला बिलकुल शंका नाहीं. पोलिसांना यशस्वीपणें जे चकवूं शकले त्यांना त्यांतून मौज वाटली ही गोष्ट खरी. त्यांची त्यांत शिताफी होती यांत कांहीं शंका नाहीं. पण सत्याग्रह हा शिताफीहून अधिक आहे. सत्याग्रहाची जी थोरवी आहे ती गुप्ततेमुळें नाहींशी होते. सत्याग्रह्यांच्याकडे गुप्त निधि किंवा गुप्त जमाखर्च असण्याचें कांहींच कारण नाहीं. अनेक सहकारी कार्यकर्त्यांना माझें हें मत पसंत नाहीं हें मला माहीत आहे. परंतु तें बदलण्याला माझ्याजवळ कांहीं कारण नाहीं. या बाबतींत मी थोडा मऊ होतों हें मी कबूल करतों. अनुभवानें मी शिकलों आहें कीं मी या बाबतींत खंबीर असलें पाहिजे. २४

गुप्ततेच्या पद्धती आपण निषिद्धच मानल्या पाहिजेत याविषयीं मी पूर्वी-इतकाच दृढ आहें. गुप्ततेनें फार अपाय केला आहे आणि ती जर कठोरपणें दडपून टाकली नाहीं तर आंदोलनाचा नाश होईल. कांहीं अपवादात्मक वेळा अशा येत असतील कीं जेव्हां गुप्त पद्धतीचा अवलंब करणें आवश्यक होतें, पण अशा गुप्ततेमुळें मिळणारा लाभ मी सोडून देईन, कारण आपल्याला जनतेला निर्भयपणाचें शिक्षण द्यायचें आहे. अमुक परिस्थितींत तुम्हांला गुप्त पद्धती अंमलांत आणतां येतील असें वाटायला लावण्यासारखा गोंधळ मी लोकांच्या डोक्यांत उत्पन्न करणार नाहीं. सत्याग्रहाची वृत्ति वाढण्याला गुप्तता ही मारक आहे. २५

## साधनसामुग्रीची नासधूस

नासधूस हें हिंसेचेंच एक रूप आहे. माणसाच्या शरीराला इजा करण्यांतून कांहीं परिणाम निष्पन्न होत नाहीं हें लोकांच्या लक्षांत आलें आहे, परंतु कांहीं लोकांना प्रथमदर्शनीं असें वाटतें कीं हिंसा जर नासधूस करण्यापुरत्या मर्यादित स्वरूपांत अंमलांत आणली तर तिला यश येऊं शकेल. माझी पक्की खात्री आहे कीं, पूर्ण अहिंसा जर उपयोगांत आली नसती तर साऱ्या जनसमुदायानें धैर्याची आणि निर्भयतेची जी उंची गांठली ती त्यांनीं गांठली नसती. अहिंसा कशी काम करते तें अजून आपल्याला

पुरतें कळलेलें नाहीं, परंतु अहिंसा अंमलांत आणल्यानें जरी त्या बाबतींत आपल्याला अनेक वेळां अपयश आलें आणि आपली पीछेहाट झालीसें दिसलें तरी, आपलें बळ उत्तरोत्तर वाढतच गेलें आहे ही वस्तुस्थिति आहे. उलटपक्षीं दहशतवादानें आपल्यांत नीतिभ्रष्टता आली. उतावळेपणांतून अपव्ययच निष्पन्न होतो. २६

उतावळेपणा ही हिंसेचीच एक अवस्था आहे. सत्याग्रह्याला यशाशीं कांहीं कर्तव्य नाहीं, त्याला त्याची खात्रीच असते. पण तें ईश्वराकडून येतें हेंहि त्याला समजून घेतलें पाहिजे. क्लेश सोसणें हेंच त्याचें काम. २७

## अ-सत्याग्रह

कांहीं विद्यार्थ्यांनीं धरणें धरून बसण्याच्या स्वरूपांत रानटीपणाच्या जुनाट प्रकाराचें पुनरुज्जीवन केलें होतें. सुदैवानें हा प्रकार सुरू होतांच थांबविण्यांत आला. त्या विद्यार्थ्यांनीं आपल्या दुसऱ्या विद्यार्थीबंधूंची वाटच अडवून धरली. त्या विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटींत जाऊन आपली फी भरायची होती किंवा शिक्षणखात्याच्या कोणा अधिकाऱ्यांना भेटायचें होतें. मी त्या प्रकाराला ' रानटीपणा ' अशाकरितां म्हणालों कीं सक्ती वापरण्याचा हा असभ्य मार्ग आहे. मी त्याला ' रानटीपणा ' अशाकरितां म्हणतों कीं जो धरणें धरून बसतो त्याला माहीत असतें कीं आपल्याला तुडवून कोणी जाऊं शकणार नाहीं. या प्रकाराला हिंसक म्हणणें कठीण आहे, पण हिंसक प्रकारापेक्षांहि तो वाईट आहे. आपण आपल्या विरोधकाशीं जर दोन हात केले तर निदान त्याला ठोशाला ठोसा देण्याची तरी आपण मुभा ठेवतों. पण जेव्हां आपल्याला माहीत असतें कीं हा कांहीं आपल्याला तुडवून जाणार नाहीं आणि तरी आपण त्याला तसें करण्याचें आवाहन देतों तेव्हां आपण त्याला अत्यंत अवघड आणि अपमानास्पद परिस्थितींत टाकतों. जे फाजील उत्साही विद्यार्थी धरणें धरून बसले त्यांना आपल्या या कृत्याच्या रानटीपणाची कल्पनाहि नसेल हें मी जाणतों. पण विवेकाला धरून वागेल आणि संकटावर संकटें ओढवत असतांनाहि त्यांना एकाकी झुंज देत उभा राहील अशी ज्याच्याविषयीं अपेक्षा, त्या तरुणानें अविवेकाच्या आहारीं जाऊन कसें भागेल ? २८

* * *

## : १० : सत्याग्रहांत उपवासाचें स्थान

सत्याग्रहाचे अनेक प्रकार आहेत, त्यांपैकीं उपवास हा एक प्रकार होऊं शकेल किंवा होऊं शकणारहि नाहीं, हें त्या त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. एखाद्या माणसानें दुसऱ्याकडे थकत असलेली आपली बाकी वसूल करण्याकरितां उपवास केला तर तो सत्याग्रह होऊं शकणार नाहीं. स्वतःच्या व्यक्तिगत लाभाकरितां सत्याग्रहाचा अवलंब करतां येणार नाहीं, इतरांच्या भल्याकरितांच तो करतां येईल. आत्मक्लेश आणि द्रव्यहानि सोसण्याला सत्याग्रह्यानें नेहमींच तयार असलें पाहिजे. उपवासाच्या स्वरूपाचा सत्याग्रह विरोधकाला विरोध करण्याकरितां म्हणून करतां येणार नाहीं. आपल्या प्रियजनांच्या आणि आप्तस्वकीयांच्या बाबतींतच, आणि तोहि त्यांच्या केवळ भल्याच्या दृष्टीनेंच, उपवासाचा अवलंब करतां येईल. १

आजकाल सत्याग्रहाच्या नांवानें बरेच उपवास होतात. प्रसिद्ध झालेल्या उपवासांपैकीं बरेचसे अर्थशून्य होते, पुष्कळ दूषित होते. उपवास हें एक जाज्वल्य शस्त्र आहे. त्याचें स्वतःचें असें एक शास्त्र आहे. माझ्या माहितीप्रमाणें, कोणालाहि त्याचें पूर्ण ज्ञान झालेलें नाहीं. अशास्त्रीय रीत्या त्यासंबंधींचा प्रयोग केल्यानें उपवास करणाऱ्याचें नुकसान होतेंच, पण कार्याचीहि त्यामुळें हानि होण्याचा संभव असतो, म्हणून अधिकारावांचून कोणी उपवासाच्या शस्त्राचा उपयोग करूं नये. ज्याच्या विरुद्ध उपवास करायचा त्याच्याशीं ज्याचा संबंध आहे अशानेंच फक्त तो करावा. उपवास करणाऱ्याचा तो ज्या कारणाकरितां सुरू करावयाचा त्या कारणाशीं साक्षात् संबंध असला पाहिजे.

माझे सर्व सार्वजनिक उपवास याच कोटीचे होते. त्या सर्वांत राजकोटच्या उपवासांतून पुष्कळसें शिकण्याजोगें आहे. अनेकांनीं त्याचा निक्षून निषेध केला आहे. प्रारंभीं तो निर्दोष आणि आवश्यक होता. त्यांत दोष मागाहून आला. सत्याग्रह्याच्या दृष्टीनें राजकोटचा उपवास हा एक अभ्यासाला उपयुक्त विषय आहे. निर्दोष उपवास गैरसावधपणामुळें कसा दूषित होण्याचा संभव आहे हें दाखविण्याकरितां राजकोटच्या उपवासाचें महत्त्व आहे. उपवास करणाऱ्यांत स्वार्थ, रोष, अविश्वास, उतावीळपणा यांचा प्रवेश

होतां कामा नये. माझ्या त्या उपवासांत हे सगळे दोष आले होते, असें समजण्यांत अतिशयोक्ति नाहीं. माझ्या तपश्चर्येचें फळ मिळावें अशी स्वार्थी इच्छा माझ्यांत होती. राजकोटच्या उदाहरणावरून उपवास करणाऱ्यांनी कशा रीतीनें सावधान राहिलें पाहिजे हें समजून येतें. शुद्धतम उपवाससुद्धां थोड्याशा बेसावधपणामुळें कसा दूषित होऊं शकतो हें त्यावरून शिकावयास मिळतें. त्यावरूनच आपल्याला हें स्पष्टपणें समजून येतें कीं सत्याग्रह म्हणून उपवास करणाऱ्यांत सत्य-अहिंसेच्या जोडीला असा आत्मविश्वास असला पाहिजे कीं ईश्वर आवश्यक ती शक्ति आपल्याला देईल, आणि उपवासांत जर यत्किंचितहि अशुद्धता असल्याचें आढळलें तर तो आपण तत्क्षणीं सोडून द्यायला मागें-पुढें पाहणार नाहीं. उपवास करतांना अलोट धैर्य, दृढ निश्चय, कार्याविषयीं अनन्य निष्ठा, पूर्ण मनःशान्ति आणि अक्रोध या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. परंतु हे सर्व गुण एकदम आपल्यांत आणणें कोणालाहि शक्य नसल्यामुळें अहिंसेचे नियम म्हणजे यमनियमादि व्रतें ज्यानें आपल्या जीवनांत पाळलेलीं नाहींत त्यानें सत्याग्रही उपवास करूं नये. २

सत्याग्रही उपवासाच्या बाबतींत एक सर्वसामान्य सिद्धान्त मी मांडूं इच्छितों. अन्याय-निरसनाचे सर्व उपाय अजमावून पाहिले आणि त्यांना यश येत नाहीं असें झालें म्हणजेच अंतिम आसरा म्हणून सत्याग्रह्यानें उपवासाचा अवलंब करावा. उपवासांत अनुकरणाला वाव नाहीं. ज्याला अंतरांतून बळ वाटत नसेल त्यानें त्याचा स्वप्नांतहि विचार करूं नये, आणि यशाची आसक्ति धरून तर कधींच करूं नये. परंतु मनाची पूर्ण खात्री पटल्यानंतर सत्याग्रह्यानें उपवास सुरू केला तर त्याला यश येवो न येवो त्यानें आपल्या निश्चयाला चिकटून राहिलें पाहिजे. उपवास सफळ होऊं शकतो किंवा नाहीं हें सांगण्याचा येथें हेतु नाहीं. फळाच्या अपेक्षेनें जो उपवास करतो तो बहुधा खचतो. जरी तो न खचल्यासारखा दिसला तरी खऱ्या उपवासांत जो अंतरींचा आनंद असतो त्याला तो मुकतो.

स्वार्थी हेतूकरितां उपवास करणें चुकीचें आहे, उदाहरणार्थ, आपल्या पगारांत वाढ व्हावी म्हणून. कांहीं विशिष्ट परिस्थितींत आपल्या गटाच्या वतीनें, पगारांत वाढ व्हावी म्हणून, उपवास करणें क्षम्य ठरेल.

विक्षिप्तपणाचे उपवास प्लेगाच्या सांथीसारखे पसरत आहेत, ते

हानिकारक आहेत. परंतु जेव्हां उपवास करणें हें कर्तव्य होतें तेव्हां तो सोडून देतां येत नाहीं. म्हणून मला जेव्हां उपवास करणें आवश्यक वाटतें तेव्हां मी तो करतों आणि कांहीं झालें तरी त्यापासून ढळत नाहीं. जें मी स्वतः करतों तें तशाच परिस्थितींत इतरांनीं करूं नये असा अडथळा मी करूं शकत नाहीं. चांगल्या गोष्टींत जें सर्वोत्कृष्ट आहे त्याचा पुष्कळ वेळां दुरुपयोग केला जातो हें सर्वांना माहीत आहे. रोज तें घडत असलेलें आपण पाहतों. ३

अहिंसेच्या उपासकाच्या भात्यांतलें उपवास हें शेवटचें अस्त्र आहे. मानवी बुद्धिचातुर्यानें हात टेकले कीं अहिंसेचा उपासक उपवासाचा आसरा घेतो. अशा उपवासानें प्रार्थनाभाव जागृत होतो. म्हणजेच उपवास ही एक आध्यात्मिक उपाययोजना असते आणि म्हणून ती ईश्वराभिमुख असते. लोकांच्या जीवनावर या उपायाचा असा परिणाम होतो कीं उपवास करणारा मनुष्य जर त्यांच्या पूर्ण माहितीचा असेल तर त्यांची सुप्त मनोदेवता जागृत होते. परंतु यांत एक धोकाहि आहे; तो असा कीं लोक चुकीच्या सहानुभूतीमुळें आपल्याला प्रिय असलेल्या उपाशी मनुष्याचा प्राण वांचविण्यासाठीं म्हणून आपल्या इच्छेविरुद्धहि वर्तन करण्याचा संभव असतो. असा धोका पत्करण्यावांचून गत्यंतर नाहीं. आपल्याला जर आपल्या कृतीची न्याय्यता पटलेली असली तर रास्त उपाययोजनेपासून आपण ढळतां कामा नये. त्यायोगें सावधानता वाढण्यालाच मदत होईल. अशा तऱ्हेचा उपवास अंतःप्रेरणेच्या आज्ञेला मान देऊनच केला जातो आणि म्हणून त्यांत घाई चालत नाहीं. ४

आमरणान्त उपवास हा सत्याग्रहाच्या कार्यक्रमाचा एक अविभाज्य भाग आहे, आणि विशिष्ट परिस्थिति असतांना तो सत्याग्रहाच्या भात्यांतलें अति महान् आणि प्रभावी शस्त्र ठरतो. योग्य अशा तालमींतून गेल्याखेरीज वाटेल त्याला त्याचा उपयोग करण्याची लायकी येत नाहीं. अहिंसेचें भावात्मक स्वरूप परहितबुद्धि हें आहे (मी ‘प्रेम’ हा शब्द मुद्दाम वापरला नाहीं, कारण तो आतां प्रतिष्ठित राहिलेला नाहीं). त्या अर्थानें अहिंसा ही एक फार मोठी शक्ति आहे, कारण अन्याय करणाऱ्याला कसलीहि शारीरिक किंवा भौतिक इजा न करतां किंवा तसा हेतु मनांत

न धरतां आत्मक्लेश सहन करण्याला उपवासांत अमर्याद वाव मिळूं शकतो. उपवासाचा हेतु नेहमीं अन्याय करणाऱ्यांत जें सर्वोत्कृष्ट आहे तें जागृत करण्याचा असतो. ठोशास ठोसा देण्यानें त्याच्यांतील अधम वृत्ति जागृत होते, तर आत्मक्लेशानें त्याच्यांतील सद्वृत्तीला आवाहन केलें जातें, योग्य परिस्थितींत उपवास हें अशा प्रकारचें अप्रतिम आवाहन आहे. राजकीय बाबतींत मी आतांपर्यंत अनेक उपवास केले असले तरी राजकारणी लोकांनी ते चालूं दिले इतकेंच. राजकारणांत उपवासाचें औचित्य जर राजकीय मुत्सद्दयांना दिसून येत नसेल तर त्याचें कारण या अत्यंत निर्दोष शास्त्राचा हा अभिनव उपयोग होत आहे हें आहे. अहिंसेचा उपयोग केवळ गिरिकंदरांतील ऋषी-मुनींच्याकरितां आणि परलोकांत उत्तमपद देणारें पुण्य संपादण्यापुरता सीमित करणें हें चुकीचें आहे असें माझें मत आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत जर सद्गुणांचा उपयोग नसेल तर त्यांचें कांहीं प्रयोजन नाहीं. म्हणून जे केवळ राजकारणी वृत्तीचे लोक आहेत त्यांना माझें आर्जवपूर्वक सांगणें आहे कीं त्यांनीं अहिंसेचा पराकाष्ठेचा आविष्कार म्हणून उपवासाचा सहानुभूतीनें आणि समजूतदारपणें अभ्यास करावा. ५

सत्याग्रह म्हणून करावयाच्या उपवासाला निश्चित स्वरूपाच्या मर्यादा आहेत. जुलमी सत्ताधाऱ्याविरुद्ध तुम्हांला उपवास करतां येणार नाहीं, कारण तो त्याच्यावर हिंसा करण्याचाच प्रकार होईल. त्याचा आज्ञाभंग करून तुम्ही स्वतःवर शिक्षा ओढून घेतां; पण जर त्यानें तुम्हांला शिक्षा करण्याचें नाकारलें आणि शिक्षा भोगण्याची संधी तुम्हांला मिळूं दिली नाहीं तर तुम्हीच स्वतःवर शिक्षा लादून घेणें हें योग्य होणार नाहीं. उपवास हा फक्त आपल्या प्रियजनांच्या विरुद्ध, आपले हक्क सक्तीनें मिळविण्याकरितां नव्हे तर त्यांना सुधारण्याकरितांच, करतां येतो. उदाहरणार्थ, दारू पिणाऱ्या बापाच्या बाबतींत मुलगा उपवास करतो. माझा मुंबईचा आणि बारडोलीचा उपवास तशा स्वरूपाचा होता. माझ्यावर ज्यांचें प्रेम होतें त्यांना सुधारण्याकरितां मी ते उपवास केले. पण जनरल डायरसारख्याला सुधारण्याकरितां मी उपवास करणार नाहीं, कारण त्याचें माझ्यावर प्रेम नाहीं, एवढेंच नव्हे तर तो स्वतःला माझा शत्रु समजतो. ६

## : ११ : राजकारणांत सत्याग्रह

राजकीय क्षेत्रांत सत्याग्रहाचा प्रयोग एका अढळ अशा अनुभवसिद्ध वचनावर आधारून केला जातो. तें वचन असें कीं जाणून बुजून अथवा अजाणतां, जोंवर लोकांची संमति असेल तोंवरच त्यांच्यावर राज्य करतां येतें. १९०७ सालीं ट्रान्सवालच्या एशियाटिक कायद्याच्या अमलाखालीं राहण्याची आमची तयारी नव्हती तर सत्याग्रहाच्या प्रचंड शक्तीपुढें त्या कायद्याला हार खावी लागली. त्या वेळीं आमच्यापुढे दोन मार्ग होते : एक, त्या कायद्यापुढें मान वांकविण्याला सांगण्यांत आलें म्हणजे अत्याचाराचा वापर करणें; किंवा दुसरा मार्ग म्हणजे राज्यकर्ते अथवा कायदे करणारे यांच्या अंतःकरणांतील सहानुभूतीची तार छेडली जाईपर्यंत तो कायदा मान्य करण्याचेंच नाकारून त्यायोगें होणाऱ्या शिक्षा सहन करणें आणि अशा रीतीनें आमच्यांतील आत्मबळ जागृत करून तें प्रकट करणें. जें ध्येय आम्ही आमच्यापुढें ठेवलें होतें तें साधण्याला आम्हांला वेळ लागला. त्याचें कारण आमचा सत्याग्रह हा परिपूर्ण सत्याग्रह नव्हता. सर्वच सत्याग्रह्यांना या बळाची किंमत पुरतेपणीं कळलेली नसते, किंवा बुद्धीला पटून हिंसेपासून निवृत्त झालेलीं माणसेंहि आपल्याला नेहमीं मिळतात असें नाहीं. १

गुलामींत पडून राहणें हें माणुसकीच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारें आहे. ज्या गुलामाला आपल्या गुलामगिरीची जाणीव होऊनसुद्धां तिचे पाश तोडण्याचा प्रयत्न करावासा वाटत नाहीं तो पशूहूनहि हीन आहे. ज्याक्षणीं गुलामाच्या मनाचा इतःपर आपण गुलाम राहणार नाहीं असा निश्चय होतो त्याच क्षणीं त्याच्या बेड्या गळून पडतात. तो स्वतः मुक्त होतो आणि इतरांना मार्ग दाखवितो. स्वतंत्रता आणि गुलामगिरी या मनाच्या अवस्था आहेत. म्हणून गुलामानें प्रथम आपल्या मनाशीं म्हटलें पाहिजे कीं ‘ मी आतां गुलाम म्हणून राहणार नाहीं, गुलाम म्हणून हुकुमांची तामिली तर मी करणार नाहींच उलट माझ्या विवेकबुद्धीच्या विरुद्ध ते असतील तर मी त्यांचा भंग करीन.’ धनी म्हणविणारा त्याकरितां ताडन करील आणि आपली चाकरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....... वि: ....... नों. दि: .......

त्याला करायला लावण्यास प्रयत्न करील. गुलाम त्याला सांगेल, 'नाहीं, पैशाच्या लालचीनें किंवा धमकावणीनें मी तुझी चाकरी करणार नाहीं.' त्यांतून क्लेश वांट्याला येतील. क्लेश भोगण्याची गुलाम असलेल्या प्रजांची तयारीच स्वातंत्र्याची ज्योत पेटवील, आणि ती ज्योत विझविणें कोणालाहि शक्य होणार नाहीं. २

राज्यकर्त्यांकडून होणाऱ्या बहुतेक अन्यायांच्या बाबतींत सर्वसामान्य उपायांनीं दाद न लागली तर प्रजाजनांना ते निमूटपणें सहनच करावे लागतात हें खरें आहे. मात्र ते अन्याय प्रजाजनांची मानखंडना करणारे असतां कामा नयेत. परंतु असह्य अशा अन्यायाविरुद्ध बंड करणें हा प्रत्येक राष्ट्राचा आणि व्यक्तींचा हक्क आहे, नव्हे तो त्यांचा धर्म आहे. माझा सशस्त्र उठावावर विश्वास नाहीं. रोगापेक्षांहि तो इलाज वाईट आहे. सूड, उतावळेपणा आणि संताप मनांत असल्याचें तें लक्षण आहे. शेवटीं हिंसेच्या पद्धतीनें कधीं भलें होऊं शकणार नाहीं.

आपल्याजवळ त्यापेक्षां अधिक चांगली पद्धति आहे. हिंसापद्धतींत संयम आणि धीर उपयोगांत आणावे लागत नाहींत. अहिंसापद्धतींत तर ते येतातच, पण त्यांच्या जोडीला निश्चयाचें बळहि असावें लागतें. ही पद्धति म्हणजे अन्यायांत सहभागीं होण्याचें नाकारणें. गांजलेल्या व्यक्तीच्या अगतिक सहकार्याखेरीज– आणि बहुधां हें सहकार्य अगतिकच असतें– कोणत्याहि जुलुमी माणसाला आजपर्यंत आपला हेतु तडीला नेतां आलेला नाहीं. जुलुमी माणसाचा प्रतिकार करतांना होणारे परिणाम भोगण्यापेक्षां बहुतेक लोक त्याच्या इच्छेपुढें वांकणें पसंत करतात. त्यामुळें दहशतीचा उपयोग करणें ही जुलूम करणाऱ्यांची नेहमींची युक्तीच होऊन बसली आहे. परंतु दहशत दाखवून दुसऱ्याला आपल्या मर्जीप्रमाणें वागायला लावण्याचे प्रयत्न फोल ठरल्याचीं इतिहासांत उदाहरणें आहेत. ३

प्रत्यक्ष प्रतिकारावांचून या पृथ्वीतलावर एकहि गोष्ट कधीं साध्य झालेली नाहीं. 'पॅसिव्ह रिझिस्टन्स' ( निःशस्त्र प्रतिकार ) हा शब्द अपुरा पडत असल्यामुळें आणि तें दुबळ्या माणसांचें शस्त्र मानलें जात असल्यामुळें मी त्या शब्दाचा अव्हेर केला. दक्षिण आफ्रिकेंत प्रत्यक्ष प्रतिकाराचाच परिणाम

झाला आणि तो इतका प्रभावीपणें झाला कीं त्यायोगें जनरल स्मटस्चें मन पालटलें आणि त्याला शहाणपण सुचलें. प्रत्यक्ष प्रतिकारामुळेंच चम्पारण्यांतील फार जुनें गाऱ्हाणें दूर झालें. एखादी सामाजिक अपात्रता किंवा तक्रार दूर व्हावीशी इच्छा असते आणि तिच्यामुळें मनांतल्या मनांत मनुष्य संतापानें जळफळत राहतो, अशा वेळीं त्यानें दुबळेपणानें नमतें घेतलें तर विरोधकाशीं ऐक्य होण्याला कांहीं मदत होत नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यामुळें जो कमजोर असेल तो चिडतो, तप्त होतो आणि स्फोटाची संधी पाहात राहतो. अशा कमजोर माणसाचा कैपक्ष घेऊन त्याला प्रत्यक्ष, खंबीर असा पण अनत्याचारी प्रतिकाराचा मार्ग शिकवून त्याच्यांत सबळपणाची जाणीव मी निर्माण करतों आणि जबरदस्त शरीरबळाला सामना देण्याची ताकद आपल्यांत आहे असें त्याला वाटायला लावतों. लढण्याकरितां आपल्यांत हुरूप आला असें त्याला वाटायला लागतें, त्याच्यांत आत्मविश्वास परत येतो, आणि उपाय आपल्याच हातीं आहे हें जाणून सूडाची भावना मनांत वागविण्याचें तो सोडून देतो व ज्या अन्यायाचें निवारण करण्याचा त्याचा प्रयत्न असतो तो दूर होतांच समाधान मानायला तो शिकतो.

बुद्धानें आणि ख्रिस्तानें जो व्यापक सहपोषणाचा धर्म सांगितला त्याचा अर्थ काय ? बुद्धानें निर्भयपणें शत्रूच्या छावणींतच लढाई नेली आणि अहंमन्य पुरोहितशाहीला नाक घासायला लावलें. ख्रिस्तानें जेरुसलेमच्या मंदिरांतून नाणेदलालांना हाकून दिलें आणि दांभिकांवर व फारिसी लोकांवर ईश्वरी शाप ओढवून आणला. बुद्ध आणि ख्रिस्त दोघेहि प्रत्यक्ष प्रतिकाराचे पुरस्कर्ते होते. परंतु त्या दोघांनीं जरी असे कोरडे ओढले असले तरी आपल्या प्रत्येक कृतीमागें निरपवादपणें सौजन्य आणि प्रेम दर्शविलें. आपल्या शत्रूंच्या विरुद्ध ते बोटसुद्धां उचलीत नव्हते, उलट ज्या सत्याकरितां त्यांचें जीवन होतें तें सत्य सोडून देण्यापेक्षां स्वतःला शत्रूच्या हातीं सोपविणें त्यांनीं आनंदानें मान्य केलें असतें. बुद्धाचें सार्वभौम प्रेम पुरोहितवर्गाला वांकविण्याच्या कामीं जर तुल्यबळ ठरलें नसतें तर त्यांना तोंड देतांना बुद्धानें मरण पत्करलें असतें. ख्रिस्तानें एका महान् साम्राज्याच्या सामर्थ्याला तोंड देतांना डोक्यावर कांट्यांचा मुकुट घेऊन

दा. क्र. १८६४

क्रुसावर मरण पत्करलें. आणि जर मी अहिंसक स्वरूपाचे प्रतिकार निर्माण करीत असेन तर ते केवळ नम्रपणें या महान सद्गुरूंच्या पावलावर पाऊल ठेवूनच करीत आहें. ४

असहकार आणि सविनय कायदेभंग या सत्याग्रहवृक्षाच्या दोन वेगवेगळ्या शाखा आहेत. सत्याग्रह हा माझा कल्पद्रुम आहे. सत्याग्रह म्हणजे सत्याचा शोध. स्वराज्य हा माझ्या दृष्टीनें त्या सत्याचाच एक भाग आहे. सत्याग्रहांत कसल्याहि प्रकारच्या द्वेषभावनेला किंवा हिंसेला स्थान नसते. ५

हिंसक कृतींच्यापेक्षां अहिंसक कृतींचें दडपण पुष्कळच जास्त परिणामकारक असतें असें माझें म्हणणें आहे, कारण हें दडपण सद्भाव आणि सौजन्य यांचें असतें. ६

सामान्य राजकीय चळवळी पुष्कळ वेळां सरकारला पेंचांत टाकण्याच्या उद्देशानें केल्या जातात, पण सत्याग्रहाच्या चळवळीचा तो उद्देश नसतो, आणि तरीहि जर सत्याग्रह्याला आपल्या चळवळीमुळें सरकार पेंचांत पडत आहे असें दिसून आलें तर मागें पुढें न पाहतां तो त्या प्रसंगाला तोंड देतों. माझ्या कल्पनेप्रमाणें सत्याग्रह म्हणजे कुटुंबधर्माचा राजकारणाच्या क्षेत्रापर्यंत विस्तार होय. ७

**सर चिमणलाल सेटलवाड**—असहकाराच्या मुळाशीं सरकारला पेंचांत आणणें हाच हेतु नसतो काय ?

**गांधीजी**—मुळींच नसतो. अन्यायाच्या निवारणाकरितां सत्याग्रही हा आत्मक्लेश सहन करण्यावर विसंबून राहतो, पेंचांत पाडण्यावर तो विसंबत नाहीं.

**प्रश्न**—त्यामुळें सुव्यवस्थित राज्यकारभार चालणें अशक्य होणार नाहीं का ?

**उत्तर**—सर्वतोपरी निरुपद्रवी राहून लोक जर कायदे मोडूं लागले तर सरकार सुव्यवस्थित चालणें अशक्य होणार नाहीं. पण सरकारनें आपला सारा सुज्ञपणा गुंडाळून ठेवला आहे असें जर मला दिसून आलें तर तें सरकार चालणें मी अशक्य करून सोडीन. ८

## असहकार

राजकीय असहकाराचा अर्थ मुख्यत्वें जें सरकार असहकार करणाऱ्याच्या मतें नीतिभ्रष्ट झालें आहे त्या सरकारशीं असलेला आपला सहकार काढून घेणें. यांत उग्र स्वरूपाचा सविनय कायदेभंग येत नाहीं. स्वभावतःच असहकार हा कळूं लागलेल्या मुलांनासुद्धां करतां येईल इतका सोपा आहे आणि सर्वसामान्य जनतेला तो बिनधोकपणें अमलांत आणतां येण्याजोगा आहे. ९

असहकाराचा मुख्य उद्देश अनीतिमान् व अनुताप न वाटणाऱ्या सरकारशीं असलेला आपला सहकार काढून घेऊन स्वतःची शुद्धि करणें हा आहे. त्याचा दुय्यम उद्देश आपल्यांत असलेली असाहाय्यतेची भावना काढून टाकणें हा आहे. त्याचें साधन म्हणजे सर्व सरकारी नियंत्रणांपासून व देखरेखी-पासून अलग होणें हें आहे. याचाच अर्थ, शक्य त्या सर्व कामीं आपणच आपल्यावर सत्ता चालवायची. हे दोन्ही उद्देश पूर्ण करण्याकरितां कोणत्याहि व्यक्तीला किंवा मालमत्तेला धक्का पोंचेल किंवा तिची नासधूस होईल अशी कृति करण्यापासून किंवा तसें दुसऱ्याला उत्तेजन देण्यापासून स्वतःला आवरणें हेंहि त्यांत अंतर्भूत आहे. १०

**प्रश्न :** तुमच्या मतानें असहकार हेंच साध्य आहे कीं कोणत्या तरी साध्याचें तें साधन आहे? साधन असेल तर त्याचें साध्य कोणतें?

**गांधीजी :** आजच्या सरकारला नीतिमान् बनविणें हें साध्य आहे, आज तें बहुतांशीं अनीतिमान् बनलें आहे. त्याकरितां साधन असहकार हें आहे. नीतियुक्त सरकारशीं सहकार हा जितका कर्तव्य तितकाच अनीति-मान् सरकारशीं असहकार हाहि कर्तव्य आहे. ११

पापी प्रवृत्तीशीं असहकार हें सत्प्रवृत्तीशीं सहकार करण्याइतकेंच कर्तव्य आहे असें माझें नम्र मत आहे. आजपर्यंत पाप करणाऱ्याला इजा करून असहकार प्रकट केला जात असे. पण अशा हिंसक असहकारानें पापप्रवृत्ति वाढते आणि ती फक्त हिंसेनेंच टिकविली जाऊं शकत असल्यामुळें त्या पापप्रवृत्तीचा आधार काढून घ्यायचा तर हिंसेपासून पूर्णपणें निवृत्त होण्याचीच गरज असते हें मी माझ्या देशबांधवांना दाखवून देण्याचा

प्रयत्न करीत आहें. पापप्रवृत्तीशीं असहकार केल्यामुळें होणारी शिक्षा स्वेच्छेनें मान्य करणें हाच अहिंसेचा अर्थ आहे. १२

अहिंसक असहकारांत अनैतिक कांहींहि नाहीं असें माझें म्हणणें आहे. हिंसक प्रतिकार हासुद्धां असहकारच आहे. पण त्यांत हिंसा असल्यामुळें तो नीतिविरुद्ध आहे. हा प्रतिकार अहिंसक असतो तेव्हां तो नीतीला धरून होतो. पापाशीं असहकार हें पवित्र कर्तव्य आहे. त्याचें स्वरूप अहिंसक असल्यामुळें तो मुळांतच आध्यात्मिक आहे. १३

असहकार ही कांहीं निष्क्रिय अवस्था नाहीं. ती पराकाष्ठेची क्रियाशील अशी अवस्था आहे. ती शारीरिक प्रतिकारापेक्षांसुद्धां जास्त क्रियाशील आहे. मी ज्या अर्थानें असहकार शब्द वापरला आहे त्यांत हिंसा वर्ज्य असली पाहिजे आणि म्हणून तो शिक्षेच्या किंवा सूडाच्या बुद्धीनें अमलांत आलेला किंवा आकस, दुष्ट भावना किंवा द्वेष यावर आधारलेला असतां कामा नये. १४

असहकाराचा लढा हा अहिंसक लढा आहे. म्हणून त्यांत नम्रता गृहीत आहे. तो सत्याला धरून असलेला लढा आहे, तेव्हां त्यांत सत्य आहे. या जाणिवेनें आपल्यांत खंबीरपणा आला पाहिजे. आपण माणसें मारण्याकरितां निघालेलों नाहीं. आपल्याला एकहि शत्रु नाहीं. या पृथ्वीवरच्या एकाहि जीवाविषयीं आमच्या मनांत दुष्ट भाव नाहीं. आत्मक्लेशानें मनांत बदल घडवून आणणें हा आमचा उद्देश आहे. अत्यंत कठोर हृदयाचा किंवा अत्यंत स्वार्थी प्रतिपक्षी असला तरी त्याच्या मनांत पालट करण्याच्या कामीं मला निराशा वाटत नाहीं. त्याला भेटण्याची जी जी संधी मिळेल ती ती मी स्वागतार्ह मानीन. १५

असहकारवादी जर नम्र नसेल तर तो असहकारवादीच नव्हे. असंतुष्ट वृत्ति जेव्हां एखाद्याच्या मनावर आपला पगडा बसविते तेव्हां त्याची वाढ खुंटलीच समजावी आणि म्हणून तो स्वातंत्र्याला अपात्र समजावा. जो अत्यंत नम्र आणि धार्मिक वृत्तीनें यत्किंचित् कां होईना स्वार्थत्याग करतो त्याला त्याची कल्पना लगेच कळून येते. त्यागाच्या मार्गाला लागलें कीं, आपल्या स्वार्थीपणाचें प्रमाण आपल्याला समजूं लागतें. म्हणून आपण सदोदित

जास्त जास्त देऊं लागलें पाहिजे आणि संपूर्ण आत्मसमर्पण झाल्याखेरीज आपल्याला समाधान वाटतां कामा नये. १६

असहकाराची चळवळ ही जर क्रांतीची क्रिया कोणी म्हणत असतील तर ती क्रांति हळूहळू विकसित होणारी क्रांति आहे, ती रक्तपात न करतां होणारी क्रान्ति आहे. ही चळवळ म्हणजे विचारांत, मानसांतच क्रान्ति आहे. असहकार ही शुद्धीची प्रक्रिया आहे, आणि त्यामुळें माणसाच्या मतप्रणालींतच क्रान्ति घडून येते. १७

अहिंसात्मक असहकाराला कधींहि हिंसेचें रूप येतां कामा नये. ती नेहमीं प्रेमाचीच कृति होईल असेंहि मी म्हणत नाहीं. कारण प्रेम हा स्वतंत्र क्रियात्मक गुण आहे आणि तो गुण कृतीवरून ओळखतां येईल असें नाहीं. एखादा सर्जन अत्यंत यशस्वी ऑपरेशन करील आणि तरी त्याला आपल्या रुग्णाविषयीं प्रेम असणार नाहीं. १८

क्लेश सोसण्याचा जो दैवी नियम त्याच्या संबंधांत असहकाराचा अर्थ हा आहे कीं जें सरकार लोकांच्या इच्छेविरुद्ध लोकांवर राज्य करतें त्या सरकारला असलेला आपला पाठिंबा काढून घेतल्यानें जी अनेक प्रकारची हानि आणि गैरसोय होईल ती लोकांनीं स्वेच्छापूर्वक सहन करावयाची. नीति-न्यायशून्य सरकारच्या अंमलाखालीं सत्ता आणि संपत्ति जवळ बाळगणें हा गुन्हा आहे, तशा परिस्थितींत दारिद्र्य हा सद्गुण आहे, असें थोरो म्हणतो. संक्रमणकालांत लोकांकडून चुका होण्याचा संभव आहे, सहज टाळतां येण्याजोगा त्रासहि त्यांना सोसावा लागेल. राष्ट्राची खची होण्यापेक्षां या गोष्टी परवडल्या. १९

असहकार हें शिस्तबद्धतेचें व त्यागाचें पाऊल आहे आणि त्यांत विरुद्ध मताविषयीं सहनशीलता व आदर आवश्यक मानला आहे. सर्वस्वीं विरुद्ध बाजूच्या मतांच्या बाबतींत सहिष्णुतेची भावना जर आपण आपल्या मनांत वाढवूं शकत नसलों तर असहकार हा असंभवनीय आहे. कटु अनुभवांनीं मी एक श्रेष्ठ पाठ शिकलों आहें, तो हा कीं आलेला राग आवरून सांठवून ठेवावा. त्यामुळें, सांठवून ठेवलेली उष्णता जशी शक्तींत रूपांतरित होते, तसाच आवरलेला राग शक्तींत रूपांतरित करतां येतो आणि त्या शक्तीनें जगाला हालवितां येतें. २०

अहिंसा म्हणजे निरुपद्रवीपणा नव्हे, अर्थात् ती अकरणात्मक अवस्था नव्हे तर ती प्रेम करण्याची, म्हणजे दुष्प्रवृत्त माणसाचेंसुद्धां भलें करण्याची, करणात्मक अवस्था आहे, हें अहिंसेवरचें भाष्य मला मान्य आहे. पण त्याचा अर्थ दुष्कृत्य करणाऱ्याला मदत करायची किंवा स्वस्थ राहून तें दुष्कृत्य सहन करायचें असा नाहीं. उलट, प्रेम ही जी अहिंसेची सक्रिय अवस्था तींत दुष्कृत्य करणाऱ्याशीं असलेला आपला संबंध तोडून टाकून त्याला विरोध करणें हें कर्तव्य ठरतें, मग त्यामुळें त्याला संताप आला किंवा शारीरिक त्रास झाला तरी हरकत नाहीं. २१

बळजबरीनें दुसऱ्याचें कल्याण करण्यांत त्याच्या व्यक्तित्वाची हानि होते. असा परिस्थितीचा बदल जर अहिंसक असहकाराच्या म्हणजेच प्रेमानें मन वळविण्याच्या शक्तीनें घडवून आणला तरच व्यक्तित्वाचा पाया कायम राहूं शकेल आणि वास्तविक, टिकाऊ अशी प्रगति खात्रीपूर्वक जगाच्या पदरीं पडूं शकेल. २२

अहिंसा हा असहकाराचा अत्यंत महत्त्वाचा व अभिन्न असा भाग आहे. आपण इतर सर्व गोष्टींत हार खाल्ली आणि अहिंसा सोडली नाहीं तरी आपली लढाई चालू राहूं शकते. पण अहिंसेला चिकटून राहण्याच्या बाबतींत जर आपण कमी पडलों तर आपण नामुष्कीची शरणागति पत्करूं. सरकाररूपी इमल्याचा हिंसा हा चावीचा दगड आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंसा हा त्याचा अंतिम आसरा असल्यामुळें आमच्याकडून होणाऱ्या हिंसेचा त्याच्यावर यत्किंचितहि परिणाम होणार नाहीं अशी स्थिति सरकारनें करून ठेवली आहे; लोकाकडून होणारे हिंसक प्रयत्न सर्व फोल ठरविण्याइतकी सरकारची तयारी आहे. त्यामुळें आपण जेव्हां हिंसेचा आधार घेतों तेव्हां आपण सरळ सरळ सरकारशीं सहकार्यच करतों. आमच्याकडून घडणारें कोणतेंहि हिंसेचें कृत्य आमच्या बुद्धिशून्यतेची, अज्ञानाची आणि वांझोट्या संतापाचीच निशाणी ठरेल. आम्हांला चिडविण्याचा कितीहि मोठा प्रयत्न झाला तरी संयम पाळणें हेंच शौर्याचें लक्षण आहे. २३

असहकाराचा वापर कोठेंहि करतां येतो असें माझें मत आहे. तो योग्य रीतींनीं उपयोगांत आणल्यास परस्परांची हानि करणाऱ्या रानटी

शस्त्रास्त्रांच्या जागीं त्याचा उपयोग राजकीय क्षेत्रांत संपूर्णपणें होऊं शकतो. म्हणून त्याच्या उपयोगावर मर्यादा घालण्याऐवजीं त्याचें क्षेत्र वाढविणें अवश्य आहे, काळजी एवढीच घ्यावयाची कीं त्याचा वापर कोठें कसा करावयाचा यासंबंधींचे सर्वांना माहीत असलेले जे नियम-निर्बंध आहेत त्यांना धरूनच तो अंमलांत यावा. दुरुपयोगाचा धोका अर्थात् पत्करावाच लागेल. पण त्याचा योग्य उपयोग करण्याचें ज्ञान जसजसें वाढेल तसतसा तो धोका कमी कमी होत जाईल.

असहकाराच्या बाबतींत एक गोष्ट सुरक्षितपणाची आहे, ती ही कीं त्याचा दुरुपयोग जर झाला तर तो ज्याच्या विरुद्ध केला जातो त्यांच्या-ऐवजीं खुद्द उपयोग करणाऱ्याच्याच अंगावर तो उलटतो. घरगुती संबंधाच्या बाबतींत त्याचा दुरुपयोग जास्तींत जास्त होतो, कारण ज्यांच्या विरुद्ध त्याचा उपयोग केला जातो ते दुरुपयोगाचा प्रतिकार करण्याइतके सबळ नसतात. प्रेम अनाठायीं उपयोगांत आणल्याचा तो प्रकार होतो. लाड करणारे आईबाप किंवा बायका या प्रकाराला जास्तींत जास्त बळी पडतात. प्रेम हें कांहीं कोणत्याहि स्वरूपाच्या लुबाडणुकीला शरण जावें असें म्हणत नाहीं. जेव्हां त्यांना ही गोष्ट कळून येईल तेव्हां त्यांच्यांत शहाणपणा येईल. खरें प्रेम तर असल्या कृत्यांचा प्रतिकारच करील. २४.

असहकार हा सत्याग्रहाचें एक अंग आहे आणि सत्याग्रहाची खुबी ही आहे कीं, दोघांच्या लढ्यांत दोहोंपैकीं कोणालाहि तो उपयोगी पडण्याजोगा असतो; आणि त्याच्यांत अशीं नियंत्रणें आहेत कीं ज्याच्या बाजूला सत्य आणि न्याय जास्त प्रमाणांत त्याच्या बाजूनें सत्य व न्याय प्रस्थापित होईल. अशा रीतीनें सत्याग्रहाची प्रक्रिया आपोआप चालू होते– मग ती बाजू कोणाचीहि असो. मजुरांच्या हातीं तो जितक्या प्रभावीपणें शस्त्र म्हणून जातो तितक्याच प्रभावीपणानें भांडवलवाल्यांच्या हातींहि शस्त्र म्हणून तो जातो. प्रजे-प्रमाणेंच सरकारच्याहि हातीं तो तितकेंच प्रभावी अस्त्र बनतो; लोकांची जर दिशाभूल झालेली असली व त्यांची बाजू अन्यायाची असली तर सत्याग्रहामुळें सरकारला जय मिळेल, आणि सरकारची बाजू अन्यायाची असली तर त्या लढ्यांत लोकांना जय मिळेल. सत्याग्रहाच्या शस्त्रानें जर लढाई

लढली गेली तर कृत्रिम आधारावर उभ्या केलेल्या गोष्टी आणि चळवळी लगेच डळमळायला लागतात आणि त्या कोसळून पडणें क्रमप्राप्त होतें. लोक जर समजा आपलें राज्य चालवायला नालायक असले, किंवा आपल्या कार्याकरितां बलिदान करण्याला उत्सुक नसले तर कितीहि आरडा-ओरडा केला तरी त्यामुळें असहकारांत त्यांना जय लाभणार नाहीं. २५

व्यक्तिगत असहकार तेव्हांच शक्य होतो कीं जेव्हां तो करणाराची मातीच्या ढेकळावरसुद्धां मालकी नसते. हें फक्त संन्याशालाच शक्य आहे. म्हणून धर्माचें परिपूर्ण पालन करायचें असेल तर त्याकरितां सर्व परिग्रहाचा त्याग करावा लागतो. आपला जीवनधर्म एकदां निश्चितपणें समजून घेतल्यानंतर तो आपल्या सामर्थ्याप्रमाणें आचारांत उतरविण्याला आपण झटलें पाहिजे, यापेक्षां जास्त आपल्या हातीं कांहीं नाहीं. आपण स्वतःच्या शरीरबळावर जगत नसून इतरांच्या संमतीच्या आधारावर जगत आहों. म्हणून पराकाष्ठेच्या नम्रतेची आणि सर्वस्वीं ईश्वरशरण होण्याची गरज. याचेंच नांव आत्मशक्तीच्या आधारावर जगणें; हीच आपल्या आत्म्याची उत्कृष्ट अभिव्यक्ति. २६

## विध्वंसात्मक असहकार

**प्रश्न :** पुष्कळ काँग्रेस-कार्यकर्त्यांनीं उघडपणें लोकांना सांगितलें कीं, रूळ उखडणें, पोलिस-चौक्या जेव्हां ताब्यांत घेतां येत नसतील तेव्हां त्या जाळून टाकणें, तारांचे खांब मोडून टाकणें, पोस्टपेट्या जाळून टाकणें इ. रीतीनीं मालमत्तेचा विध्वंस करण्यांत हिंसा नाहीं; आपल्याला हें माहीतच आहे.

**उत्तर :** हा युक्तिवाद मी कधींच समजूं शकलेलों नाहीं. ही निव्वळ हिंसा आहे. सत्याग्रह म्हणजे आत्मक्लेश सहन करणें आणि दुसऱ्यावर क्लेश न लादणें. एखाद्याच्या शरीराला इजा करण्यापेक्षां त्याची मालमत्ता जाळून टाकणें यांत खरोखर जास्त हिंसा आहे. सत्याग्रही म्हणविणारांनीं दंडापेक्षां किंवा स्वतःच्या मालमत्तेच्या जप्तीपेक्षां तुरुंगवास नाहीं का पसंत केला ? माझ्यावर टीका करणाऱ्यांपैकीं एकानें बरोबर म्हटलें आहे कीं विध्वंसक कायदेभंग लोकांना शिकविण्यांत तुम्हांला चांगलें यश आलें आहे आणि

आतां तो परत घरांतच येऊन विसांवला आहे, लोकांना अहिंसेची अत्यंत अवघड विद्या शिकविण्यांत तुम्हांला पराकाष्ठेचें अपयश मिळालें आहे. त्यानें असेंहि म्हटलें आहे कीं घाईघाईत तुम्ही बैलाच्यापुढें गाडी जोडलीत आणि म्हणून तुमची सविनय कायदेभंगाची सारी भाषा म्हणजे मूर्खपणा आहे. या टीकेला मी कांहीं समाधानकारक उत्तर देऊं शकलेलों नाहीं. मी एक दुर्बळ मानव आहें. माझा माझ्या प्रयोगांवर आणि स्वतःच्या नितांत खरेपणावर विश्वास आहे. परंतु मी मेल्यानंतर माझ्यावरील मृत्युलेखांत ' या माणसानें धडपड केली पण सपशेल पडला ' असेंहि लिहिलें जाण्याचा संभव आहे. २७

## मजुरांचे संप

मजुरांच्या संपांनीं राजकीय हेतू साधतात हें मला अमान्य नाहीं. परंतु अशा संपांची गणना अहिंसक असहकाराच्या योजनेंत होत नाहीं. मजुरांना देशाची परिस्थिति जोंवर कळत नाहीं आणि ते सामाजिक हितासाठीं काम करायला जोंवर तयार होत नाहींत तोंवर मजुरांचा राजकीय कामाकरितां उपयोग करणें हें जोखमीचें आहे हें समजण्याला बुद्धीला फार ताण देण्याची गरज नाहीं. मजुरांच्याकडून या गोष्टी एकदम अपेक्षिणें, आणि तेंहि स्वतःचा पोटापुरता निर्वाह चालविण्याला ते समर्थ होण्याइतकी त्यांची स्वतःची स्थिति सुधारेपर्यंत त्यांच्याकडून अपेक्षिणें, कठीण आहे. म्हणून, त्यांनीं स्वतःची स्थिति सुधारावी, अधिक चौकस व सज्ञान बनावें, आपल्या हक्कांच्या बाबतींत आग्रह धरावा, त्याचप्रमाणें जो माल तयार करण्यांत त्यांचा इतका महत्त्वाचा हिस्सा आहे त्या मालाचा मालकांच्याकडून योग्य विनियोग झाला पाहिजे अशी मागणीसुद्धां हक्कानें करावी, हेंच मजुरांचें राजकारणांत सर्वांत मोठें सहाय्य ठरेल. या दृष्टीनें मजुरांनी मालकींत भागीदार होण्याच्या दर्जापर्यंत स्वतःची उन्नति करून घ्यावी हा त्यांचा योग्य विकास म्हणतां येईल. म्हणून, तूर्त संप व्हायचे ते मजुरांची स्थिति साक्षात् सुधारण्याकरितां, आणि त्यांच्यांत देशभक्तीची भावना आली म्हणजे आपल्या उत्पादित मालाच्या किंमती योग्य मर्यादेंत राखण्याकरितां व्हावेत. २८

## सविनय कायदेभंग

राजकीय क्षेत्रांत लोकांकडून होणाऱ्या झगड्याचें स्वरूप अन्यायी कायद्यांच्या रूपांत असलेल्या प्रमादाला विरोध करणें हें असतें. कायदे करणाऱ्यांची चूक अर्ज विनंत्या इत्यादि मार्गांनीं त्यांच्या पदरांत जर तुम्ही घालूं शकलां नाहींत आणि त्या चुकीपुढें जर तुम्हांला नमतें घ्यायचें नसेल तर तुमच्यापुढे एकच उपाय राहतो आणि तो म्हणजे, एक तर शारीरिक बळानें त्यांना वांकायला लावायाचें, किंवा त्या कायद्यांचा भंग करून त्याकरितां होणारी शिक्षा स्वतःवर ओढून घेऊन स्वतः क्लेश सहन करायचे. म्हणूनच लोकांना सत्याग्रह हा सविनय कायदेभंगाच्या किंवा सविनय प्रतिकाराच्या रूपांत बहुधां दिसून येतो.

सर्वसामान्यपणें कायदे मोडणारीं माणसें चोरून कायदे मोडतात व त्याबद्दलची शिक्षा चुकविण्याचा प्रयत्न करतात. सविनय प्रतिकार करणारा तसें करीत नाहीं. तो ज्या राज्यांत राहात असेल ज्या राज्याचे कायदे तो नेहमीं पाळतो–शिक्षेच्या भीतीनें नव्हे तर समाजहिताच्या दृष्टीनें ते योग्य वाटतात म्हणून. परंतु असे प्रसंग येतात कीं जेव्हां विशिष्ट कायदे त्याला इतके अन्यायाचे वाटतात कीं ते पाळणें म्हणजे त्याला आत्म्याचा उपमर्द वाटतो; अर्थात् असे प्रसंग फार थोडे असतात. अशा वेळीं तो ते कायदे उघडपणें आणि शिष्टता संभाळून मोडतो आणि त्याबद्दल निमूटपणें शिक्षा भोगतो. कायदे करणाऱ्यांच्या कृत्याबद्दल आपला निषेध नोंदविण्याकरितां सरकारशीं असलेला आपला सहकार काढून घेण्याची त्याला मोकळीक असते. असा असहकाराचा मार्ग म्हणजे ज्या कायद्यांच्या भंगांत नैतिक दोष होणार नाहीं अशा कायद्यांचा भंग करणें.

माझ्या मतें सत्याग्रहाची खुबी आणि परिणामकारकता इतकी महान् आहे आणि त्याचीं तत्त्वें इतकीं साधींसुधीं आहेत कीं तो मुलांनासुद्धां करायला सांगतां येण्याजोगा आहे. २९

सविनय कायदेभंग आचारांत आणण्याला पात्र होण्यापूर्वीं त्या राज्याच्या कायद्यांचें मनापासून व आदरपूर्वक पालन झालेलें असलें पाहिजे. बहुतेक वेळां आपण हे कायदे पाळतों ते त्यांचा भंग झाल्यामुळें शिक्षा होईल या

भीतीनें, आणि ही गोष्ट ज्यांत नैतिक तत्त्वाशीं कांहीं संबंध येत नाहीं अशा कायद्यांच्या बाबतींत विशेषेंकरून खरी ठरते. उदाहरणार्थ, एखादा प्रामाणिक, सन्मान्य गृहस्थ, चोरी न करण्याचा कायदा असो नसो, एकदम चोरी करण्याला प्रवृत्त होणार नाहीं; पण ह्याच गृहस्थाला अंधार पडतांच सायकलीला दिवा लावून ती न्यावी हा नियम न पाळण्याची कांहीं खंत वाटणार नाहीं. नव्हे, 'या बाबतींत तुम्ही जास्त काळजी घेतली पाहिजे' असें जर त्याला सांगितलें तर तें तो सद्भावपूर्वक ऐकून घेईल कीं नाहीं याविषयीं शंका आहे. परंतु या प्रकारचा कोणताहि सक्तीचा नियम असेल तर मात्र तो पाळील, कारण तो नियम मोडल्यानें होणाऱ्या खटल्याला तोंड देणें त्याला परवडत नाहीं, त्यांतून सुटावयाची त्याला इच्छा असते म्हणून. अर्थात्, अशा प्रकारें कायदा मानणें म्हणजे मनापासून किंवा स्वयंस्फूर्तीनें कायदा मानणें नव्हे. सत्याग्रही हा समाजाचे कायदे बुद्धिपूर्वक आणि स्वतःच्या राजीखुषीनें पाळतो. कारण त्यांचें पालन हें आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे असें तो मानतो. अशा रीतीनें जेव्हां एखाद्या माणसानें समाजाचे कायदे चोखंदळपणें पाळले असतील तेव्हांच त्याला अमुक कायदे हितकर आणि न्यायाचे, अमुक अधर्मयुक्त आणि अन्यायाचे, हें समजण्याची पात्रता येते. तेव्हांच त्याला विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट कायद्यांचा भंग करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ३०

सविनय कायदेभंग करणाऱ्याला, शिक्षेच्या भयानें नव्हे तर स्वेच्छापूर्वक कायदे पाळण्याचे मुळांत वळण असतें हें गृहीत आहे. म्हणून कायदेभंग हा अगदीं निर्वाणीचा उपाय म्हणून आणि तोहि पहिल्या प्रथम कांहीं निवडक लोकांनाच अंमलांत आणतां येईल. ३१

सविनय कायदेभंग म्हणजे घटनात्मक रीतीनें पास झालेल्या, पण नीतीशीं संबंध नसलेल्या, कायद्यांचा सविनय भंग. माझ्या माहितीप्रमाणें हा शब्द-प्रयोग थोरोचा आहे. त्यानें तो गुलामगिरीला परवानगी देणाऱ्या सरकारच्या कायद्यांना आपला असलेला विरोध दर्शविण्याकरितां वापरला होता. सविनय कायदेभंगाचा धर्म यावर त्यानें एक विद्वत्ताप्रचुर प्रबंध लिहून ठेवला आहे. परंतु थोरो हा बहुधा अहिंसेचा कट्टा पुरस्कर्ता नसावा. त्यानें कायद्यांच्या भंगाची मर्यादा बहुतकरून महसुलाचा कर भरण्याच्या कायद्या-

पुरतीच धरली असावी. पण ‘ सविनय कायदेभंगांत ’ कोणताहि कायदेशीर रीत्या पास झालेला आणि नीतीशीं संबंध नसलेला कायदा येतो. त्यायोगें प्रतिकार करणाऱ्याची शिष्टाचारयुक्त म्हणजेच अहिंसात्मक बंडखोरी दर्शविली जाते. त्याकरितां कायद्यानें ठेवलेली शिक्षा तो मागून घेतो आणि आनंदानें तुरुंगवास भोगतो. ३२

पुष्कळ काँग्रेसजन अहिंसेकडे उथळपणें पाहतात. कोणीकडून तरी तुरुंग भरावयाचे या अर्थानें ते सविनय कायदेभंगाचा विचार करतात. सविनय कायदेभंग ही एक महान् शक्ति आहे, तिचा असा अर्थ करणें हें बालिशपणाचें आहे. मला हें पुनः पुनः, अगदीं वीट येईपर्यंतसुद्धां, सांगितलें पाहिजे कीं विधायक कामांना मनापासून पाठिंबा आणि अन्याय करणाऱ्यांच्या विषयीं मनांत सद्भाव नसेल तर, तुरुंगभरती ही हिंसा आहे आणि म्हणून सत्याग्रहांत तिला मनाई आहे. अहिंसा हीच सविनय कायदेभंगांतील निर्णायक घटक आहे. ३३

वस्तुतः सविनय कायदेभंगांत मनःक्षोभ नसला पाहिजे. सविनय कायदेभंग म्हणजे क्लेश निमूटपणें सहन करण्याची तयारी. त्याचा परिणाम जरी अव्यक्त राहिला तरी तो अद्भुत होतो आणि तो सात्त्विक असतो. कांहीं प्रमाणांत मनःक्षोभ मी अपरिहार्य मानला, निर्हेतुकपणें कांहीं प्रमाणांत झालेली हिंसा मी क्षम्यहि मानली, म्हणजेच परिस्थिति कांहींशी अपूर्ण असली तरी सविनय कायदेभंग मी असंभाव्य मानला नाहीं. परिस्थिति पूर्ण निर्दोष असली तर, कायदेभंग हा जेव्हां शिष्टाचारयुक्त असतो तेव्हां, तो क्वचितच जाणवतो. परंतु परिस्थिति अगदीं प्रतिकूल असेल त्या वेळीं कायदेभंगाची चळवळ हा एक धोक्याचा प्रयोग आहे यांत शंका नाहीं.

चौरीचौऱ्याची दुःखद घटना ही मी धोक्याची सूचना मानली. जी कडक खबरदारी घ्यावयाची ती जर घेतली नाहीं तर हिंदुस्तान सहज कोणत्या मार्गाकडे वळेल हें त्यावरून दिसून आलें. आपल्याला जर अहिंसेमधून हिंसा वाढवायची नसेल तर आपण आपलीं पावलें ताबडतोब मागें घेतलीं पाहिजेत, शांततेचें वातावरण प्रस्थापित करून आपला कार्यक्रम

नव्यानें आंखला पाहिजे, आणि मोठ्या प्रमाणावर सविनय कायदेभंग सुरू केला तरी आणि सरकारनें प्रक्षोभक असें कांहीं केलें तरीसुद्धां शांतता राहील अशी आपली खात्री होईपर्यंत मोठ्या प्रमाणावर सविनय कायदेभंग सुरू करतां कामा नये हें अगदीं स्पष्ट झालें. कोणी अनधिकृतपणें मोठ्या प्रमाणावर सविनय कायदेभंग करणार नाहीं याचीहि आपल्याला खात्री पटली पाहिजे. आमचा मानभंग किंवा पराभव झाला अशी कल्पना करून आमचे विरोधक हर्ष मानतील कदाचित्, पण आपली प्रतिज्ञा मोडून ईश्वराकडे पाठ फिरविल्याचें पाप लागण्यापेक्षां भ्याडपणाचा आणि दुर्बलतेचा आरोप पुरवला. स्वतःला बेईमान 'होण्या'पेक्षां जगापुढें बेईमान 'दिसणें' लक्षपटीनें पत्करलें. ३४

आपली चळवळ ही फुशारकीची, थापेबाजीची किंवा दमदाटीची नाहीं. आमच्या प्रामाणिकपणाची ती कसोटी आहे. त्याकरितां भरीव व मूक आत्मबलिदानाची गरज आहे. आमच्या प्रामाणिकपणाला आणि राष्ट्रकार्य करण्याच्या आमच्या कुवतीला तें आह्वान आहे. विचारांचें आचारांत रूपांतर करण्याच्या उद्देशानें सुरू केलेली ही चळवळ आहे आणि जितके जितके आपण करीत जावें तितकें तितकें आपल्या अपेक्षेपेक्षां आणखी किती तरी करण्याची गरज आहे असें आपल्याला आढळून येतें. आपल्या अपूर्ण-पणाच्या या जाणिवेनें आपण नम्र बनलें पाहिजे. ३५

सविनय कायदेभंग हा नागरिकांचा जन्मसिद्ध हक्क आहे ही गोष्ट जर मला प्रत्येकाला पटवून देतां आली तर किती चांगलें होईल ! हा हक्क सोडून देणें म्हणजे माणुसकीवरच पाणी सोडणें आहे. सविनय कायदेभंगांतून अराजक निघणें कधींहि शक्य नाहीं. गुन्ह्याच्या स्वरूपाचा कायदेभंग केल्यानें अराजक माजण्याचा संभव असतो. कोणतेंहि सरकार अशा स्वरूपाचा कायदेभंग सक्तीनें दडपून टाकतें. जर तें तसें न करील तर तें नष्ट होईल. पण सविनय कायदेभंग दडपून टाकणें म्हणजे सदसद्विवेकबुद्धीलाच बंदींत टाकण्यासारखें आहे. सविनय कायदेभंगानें केवळ बळ आणि शुद्धताच वाढूं शकते. सविनय कायदेभंग करणारा कधीं शस्त्राचा वापर करीत नाहीं आणि म्हणून जें सरकार लोकमत काय म्हणतें तें ऐकून घ्यायला थोडें का होईना तयार असेल त्या सरकारला अशा कायदेभंगाचा कसलाहि उपसर्ग

पोंचत नाहीं. अरेरावी सत्तेला मात्र हा कायदेभंग भयजनक असतो, कारण सरकारला ज्या बाबतींत त्याचा विरोध असेल त्या बाबतींत लोकमताचें पाठबळ मिळवून तो त्या सरकारचा पाडाव घडवून आणतो. म्हणून सरकार जेव्हां कायद्याला सोडून चालूं लागतें, किंवा तें नीतिभ्रष्ट होतें–दोहोंचा अर्थ एकच–तेव्हां सविनय कायदेभंग हें पवित्र कर्तव्य होऊन बसतें. आणि जो नागरिक अशा सरकारशीं सौदा करतो तो त्याच्या भ्रष्टतेंत आणि बेबंद वागणुकींत भागीदार होतो.

म्हणून, एखाद्या विशिष्ट कायद्याचा सविनय भंग करण्यांत शहाणपणा नाहीं असा आक्षेप घेतां येईल; दम धरा आणि जपून पावलें टाका असेंहि कोणी सांगू शकेल. पण कायदेभंग करण्याच्या हक्काच्या बाबतींतच कोणी आक्षेप घेईल तर तो चालणार नाहीं. तो नागरिकांचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि स्वाभिमान गमावल्यावांचून तो हक्क सोडतां येणार नाहीं.

सविनय कायदेभंग करण्याच्या हक्काचा आग्रह ठेवण्याबरोबरच त्याचा वापर करतांना जे जे निर्बंध लक्षांत येतील ते ते सर्व पाळण्याची काळजी घेतली गेली पाहिजे. हिंसा, किंवा कायदे न जुमानण्याची सार्वत्रिक प्रवृत्ति, माजूं नये या दृष्टीनें शक्य ती सर्व तरतूद अगोदर करून ठेवली पाहिजे. ३६

केवळ सविनय कायदेभंगावरच विसंबून राहण्याचें साहस करणें बरोबर होणार नाहीं. सुरीचा वापर करायचाच झाला तर तो जसा आपण जपूनच करतों तशासारखा त्याचा वापर करायचा आहे. जो मनुष्य एकसारखा कापीतच सुटतो तो अगदीं मुळावरच घाव घालतो आणि मग, वरचे कठीण कवच छाटून ज्या गाभ्यापर्यंत पोंचायचें तो तर हातीं लागलाच नाहीं, असें त्याला दिसून येतें. एरवीं जर आपण एकूण विकासक्रियेच्या नियमांना धरूनच वागत असलों तरच सविनय कायदेभंगाचा वापर हा स्वास्थ्यकर, आवश्यक आणि परिणामकारक होईल. म्हणून 'कायदेभंगा'पेक्षां 'सविनय' या विशेषणाला पुरतें आणि म्हणूनच जास्त महत्त्व देणें अवश्य आहे. सभ्यता, संयम, विवेक, अहिंसा हे गुण नसलेला कायदेभंग म्हणजे निश्चित नाशच होय. प्रेमयुक्त कायदेभंग म्हणजे साक्षात् जीवनाचा सुधारस होय. सविनय कायदेभंग हा जीवनाच्या विकासक्रियेचा द्योतक असा एक

सुरेख उन्मेष आहे. तें कांहीं विसंवादी तत्त्व नव्हे. विसंवादित्व म्हणजे मृत्यु होय. ३७

सविनय कायदेभंगाकरितां अवश्य असणारें वातावरण जर आपल्याला निर्माण करतां आलें तर तो आमच्या सर्व दुखण्यांवरचा रामबाण उपाय म्हणून योजतां येईल. व्यक्तींच्या बाबतींत तसें वातावरण नेहमींच असतें, मात्र त्यांच्या सविनय कायदेभंगानें हमखास रक्तपात होणार अशी स्थिति असेल तर गोष्ट वेगळी. परंतु तसें असलें तरीसुद्धां अंतरांतून असा आदेश येण्याचा संभव आहे कीं ज्याकडे दुर्लक्ष करण्याचें धारिष्ट आपल्याला होणार नाहीं, मग त्याकरितां कांहींहि किंमत द्यावी लागो. त्या आदेशाकडे दुर्लक्ष करणें म्हणजे ईश्वराचाच इन्कार करणें असें जेव्हां असेल तेव्हां सविनय कायदेभंग हें एक अनुल्लंघनीय कर्तव्यकर्म ठरतें. ३८

सविनय कायदेभंग आक्रमक स्वरूपाचा आणि बचावाचा असा दोन प्रकारचा असतो. त्यांतील नेमका भेद समजावून घेणें अवश्य आहे.

आक्रमक, हक्क प्रस्थापित करणारा किंवा चढाईचा सविनय कायदेभंग म्हणजे सरकारच्या अशा कायद्यांचा अहिंसक रीतीनें व बुद्धिपुरस्सर भंग कीं ज्यांच्या भंगानें नीतीला धक्का पोचत नाहीं, व जो सरकारविरुद्ध केलेल्या बंडाचें एक द्योतक म्हणून हातीं घेतला जातो. उदाहरणार्थ, महसुलाशीं संबंध असलेले किंवा सरकारच्या सोयीकरितां व्यक्तीच्या हालचालीवर निर्बंध घालणारे कायदे. हे कायदे खुद्द जरी जाचक नसले आणि म्हणून ते बदलण्याची गरज नसली तरी त्यांचा भंग आपला हक्क प्रस्थापित करणारा, आक्रमक किंवा चढाईचा सविनय कायदेभंग होईल.

उलटपक्षीं, बचावाचा सविनय कायदेभंग म्हणजे जे कायदे मुळांत वाईटच आहेत आणि जे पाळण्यानें स्वाभिमानाला किंवा मानव म्हणून असलेल्या प्रतिष्ठेलाच धक्का पोंचतो, अशा कायद्यांचा अनिच्छया किंवा नाइलाजास्तव भंग. उदाहरणार्थ, बंदी हुकूम असतांनासुद्धां तो न जुमानतां शांततामय कामाकरितां स्वयंसेवक दलें उभारणें, अशाच कारणाकरितां जाहीर सभा भरविणें, अत्याचाराचा उद्देश किंवा त्याला उत्तेजन नसलेले लेख प्रसिद्ध करणें, हा बचावाचा सविनय कायदेभंग आहे. अशाच पद्धतीनें, बंदी हुकूम

असतांनासुद्धां लोकांचें मन वळवून निषिद्ध मानलेल्या वस्तूंपासून किंवा संस्थांपासून त्यांना परावृत्त करण्याकरितां शांततापूर्वक निरोधनें चालविणें, हा बचावाचा सविनय कायदेभंग आहे. वर दिलेल्या अटींचें पालन हें बचावाच्या तशाच आक्रमक सविनय कायदेभंगालाहि लागू आहे. ३९

सविनय कायदेभंग जर खराच सविनय असेल तर प्रतिपक्षालासुद्धां तो तसाच वाटला पाहिजे. हा प्रतिकार आपल्याला कसलीहि इजा पोंचविण्याच्या उद्देशानें होत नाहीं त्याचा त्याला प्रत्यय आला पाहिजे. ४०

## सामुदायिक सविनय कायदेभंग

सामुदायिक सविनय कायदेभंगाचें अधिष्ठान हें वेगळ्या प्रकारचें आहे. तो शांत वातावरण असतांनाच अमलांत आणतां येतो. ही शांति दुर्बळपणांतून आलेली नव्हे तर सामर्थ्ययुक्त शांति, अज्ञानांतून आलेली नव्हे तर ज्ञानयुक्त शांति असली पाहिजे. व्यक्तीनें केलेला सविनय कायदेभंग हा प्रातिनिधिक स्वरूपाचा म्हणजे, दुसऱ्याकरितां म्हणून केलेला कायदेभंग होऊं शकतो, पुष्कळ वेळां तो तसा असतोहि. सामुदायिक सविनय कायदेभंग स्वार्थपर असूं शकतो, नव्हे पुष्कळ वेळां असतोहि; स्वार्थपर या अर्थानें कीं त्यांत सामील झालेल्या व्यक्ती आपल्या कायदेभंगांतून व्यक्तिगत लाभाची अपेक्षा ठेवतात. पहिल्याचें उदाहरण म्हणजे दक्षिण आफ्रिकेंत कॅलनबॅक व पोलॅक यांनीं इतरांकरितां केलेला सविनय कायदेभंग. त्यांना स्वतःला त्यापासून कांहीं मिळवायचें नव्हतें. हजारों लोकांनीं तो केला कारण त्यांना त्यापासून लाभ होण्याची अपेक्षा होती; उदाहरणार्थ, करारांतून मुक्त झालेले पुरुष आणि त्यांची बायका-मुलें यांच्यावर लादलेली वार्षिक डोईपट्टी त्यामुळें निघावयाची होती. सामुदायिक सविनय कायदेभंगांत, प्रतिकार करणाऱ्यांना त्या सिद्धान्ताची कार्यपद्धति कळलेली असली तरी पुरें असतें.

दक्षिण आफ्रिकेंत, मनाई केलेल्या क्षेत्रांकडे दोन-तीन हजार स्त्री-पुरुषांनिशीं मी चाललों असतां जवळजवळ वस्ती नसलेल्या भागांत मला अटक करण्यांत आली होती. माझ्या बरोबरच्या लोकांत पठाण आणि इतरहि सामर्थ्यवान् माणसें होतीं. मला पकडण्याकरितां आलेले जे पोलीस

होते त्यांच्या खांडोळ्या करणें या लोकांना अवघड नव्हतें. पण तो पराकाष्ठेचा भ्याडपणा झाला असता. इतकेंच नव्हे तर आपल्याच प्रतिज्ञेचा तो विश्वासघातक भंग झाला असता आणि स्वातंत्र्याचा लढा त्यामुळें मोडून पडला असता व प्रत्येक हिंदी माणूस दक्षिण आफ्रिकेंतून जबरदस्तीनें हद्दपार केला गेला असता. पण ते सत्याग्रही लोक बाजारबुणगे नव्हते. ते शिस्तबद्ध सैनिक होते आणि निःशस्त्र असल्यामुळें तर अधिक तयार झालेले होते. त्यांच्यांतून पोलिसांनीं जरी मला ओढून नेलें, तरी ते लोक पांगले नाहींत किंवा ते परतहि फिरले नाहींत. ठरलेल्या ठिकाणाकडे ते कूच करीत राहिले आणि शेवटीं त्यांच्यापैकीं प्रत्येकाला पकडून तुरुंगांत टाकण्यांत आलें. माझ्या माहितीप्रमाणें हें शिस्तबद्धतेचें आणि अहिंसेचें उदाहरण आहे आणि याला इतिहासांत कोठेंहि तोड नाहीं. अशा आत्मसंयमावांचून सामुदायिक सविनय कायदेभंग यशस्वी होण्याची मला आशा वाटत नाहीं.

कोणालाहि अटक झाली कीं प्रत्येक वेळीं प्रचंड निदर्शनें करून सरकारला घाबरवून सोडण्याची कल्पना आपण डोक्यांतून काढून टाकली पाहिजे. उलट, अटक होणें हें असहकारवाद्याच्या पांचवीलाच पुजलें आहे असें आपण मानलें पाहिजे. जसा एखादा फौजेंतला शिपायी लढाईवर जातो तो मृत्यूला कवटाळायलाच जातो तशी आपण अटक आणि कैद मिळविण्याचाच प्रयत्न केला पाहिजे. कैद टाळून नव्हे ओढवून घेऊन सरकारचा विरोध हाणून पाडण्याची आपण इच्छा करतों, मग त्याकरितां सामुदायिक प्रमाणावर अटक करून घेऊन तुरुंगांत जाण्याची तयारी दाखवावी लागली तरी हरकत नाहीं. तेव्हां सविनय कायदेभंगाचा स्पष्ट अर्थ हा आहे कीं एक जरी बिनहत्यारी पोलीस आला तरी त्याच्या स्वाधीन व्हावें. बकरीं जशीं कत्तलखान्याकडे नेलीं जातात तसें आपण हजारोंच्या संख्येनें तुरुंगाकडे नेलें जाण्यांत आपला विजय आहे. जगांतलीं बकरीं जर स्वेच्छापूर्वक बळी गेलीं असतीं तर यापूर्वीं केव्हांच तीं खाटकाच्या सुऱ्यापासून वांचलीं असतीं. आपला विजय दुसरा अशा गोष्टींत आहे कीं आपला कसलाहि अन्याय नसतांना आपण तुरुंगांत जात असतों. आपला निरपराधीपणा जितका जास्त, तितकी आपली ताकद जास्त आणि तितका आपला जय त्वरित.

परिपूर्ण सविनय कायदेभंग म्हणजे शांततामय बंडाची स्थिति—सरकारनें केलेला कोणताहि कायदा पाळण्याचा इन्कार. ही स्थिति सशस्त्र बंडाहून निःसंशय जास्त धोक्याची आहे. कारण, सत्याग्रही जर पराकाष्ठेच्या हालअपेष्टांना तोंड द्यायला तयार असतील तर हें बंड कधींच मोडतां येणार नाहीं. कांहीं निरपराधी माणसांचे आत्मक्लेश म्हणजेच कार्यसिद्धीची स्वभावसिद्ध गुरुकिल्ली, या श्रद्धेंत या कायदेभंगाचें बळ असतें व त्यावरच तो अधिष्ठित असतो. गाजावाजा न करतां तुरुंगांत जाण्यानें सत्याग्रही हा वातावरण शांतीचें राहील असा विश्वास निर्माण करतो. प्रतिकारच न झाला तर अन्याय करणाऱ्याला अन्याय करण्याचा कंटाळा येऊं लागतो. अन्यायाला बळी पडणारा मनुष्य कसलाहि प्रतिकार दर्शवीत नाहीं तेव्हां त्यांतली सारी मौज निघून जाते. सामुदायिक सत्याग्रहासारख्या महान् कार्याला हात घालण्यापूर्वीं, निदान लोकांच्या प्रतिनिधींना तरी, सत्याग्रह यशस्वी होण्याकरितां आवश्यक अशा सर्व गोष्टींची पूर्ण कल्पना असावी लागते. उपाय जितके तडकाफडकीचे तितकेच त्यांत धोके अधिक आणि म्हणून तसे उपाय हाताळण्याला अतिशय कौशल्य लागतें. ४१

मुंबईत लोकांनी दगडफेंक केली; ट्रामगाड्यांच्या वाटेंत अडथळे टाकून त्या चालणें अशक्य केलें. हा सत्याग्रह नव्हे. अत्याचाराचीं कृत्यें केलीं म्हणून ज्या लोकांना अटक केली गेली त्यांच्या सुटकेची सत्याग्रही म्हणविणारांनीं मागणी केली. आपणा सत्याग्रह्यांचें कर्तव्य मुख्यतः स्वतःला पकडून घेणें हें आहे. अत्याचाराचीं कृत्यें करणाऱ्यांच्या सुटकेचा प्रयत्न करणें हा आपल्या धर्माचा भंग आहे. सत्याग्रह्यांची चळवळ सुरू केल्यानंतर जे जे परिणाम त्याच्या मागोमाग येतात त्यांना सत्याग्रही हे जबाबदार असतात कीं काय असा मला प्रश्न विचारण्यांत आला. मी ‘ होय ’ असें उत्तर दिलें. म्हणून मी सुचवूं इच्छितों कीं आपल्याकडून लेशमात्रहि अत्याचार न होतां जर आपल्याला ही चळवळ चालवितां येत नसेल तर ती आपल्याला बंद करावी लागेल, किंवा तिला कांहीं वेगळें आणि अधिकच मर्यादित असें रूप देणें आवश्यक होईल. कदाचित् याहि पुढें जाणें आवश्यक होईल. कदाचित् आपल्याच लोकांविरुद्ध सत्याग्रह करण्याची मला पाळी येईल. ४२

**प्रश्न** : सर्वसामान्य लोकांना चट्दिशीं राग येतो किंवा द्वेष वाटूं लागतो आणि यःकश्चित् कारणासाठींसुद्धां ते वर्दळीवर येतात हें आपल्याला माहीत असतांना लोक अहिंसा आचरूं शकतील असें आपल्याला वाटतें तरी कसें ?

**गांधीजी** : लोक तसे आहेत ही गोष्ट खरी, तरीसुद्धां समाजाच्या हिताकरितां ते अहिंसा आचरूं शकतील असें मला वाटतें, ज्या हजारों स्त्रियांनीं बेकायदा मीठ गोळा केलें त्यांच्या मनांत कोणाहि विरुद्ध दुष्ट भावना होत्या असें तुम्हांला वाटतें ? कॉंग्रेसनें किंवा गांधीनें आपल्याला कांहीं गोष्टी करायला सांगितल्या आहेत एवढें त्यांना माहीत होतें आणि त्या त्यांनी सद्भावनेनें केल्या. त्यांची अहिंसेवर श्रद्धा ज्ञानपूर्वक नव्हती, जशी पृथ्वी गोल आहे याविषयीं अनेकांची श्रद्धा ज्ञानपूर्वक नसते तशी. परंतु आपल्या पुढाऱ्यांवरील त्यांचा विश्वास हा मनापासून होता, आणि तेवढा असणें पुरेसें होतें. पुढाऱ्यांची गोष्ट मात्र वेगळी. त्यांची श्रद्धा ज्ञानपूर्वक असली पाहिजे आणि त्या श्रद्धेंतून ध्वनित होणाऱ्या सर्व गोष्टी त्यांनी आपल्या जीवनांत अंमलांत आणल्या पाहिजेत.

**प्रश्न** : पण जगभरचा सर्वसामान्य जनसमुदाय हा असाच नाहीं काय ?

**उत्तर** : नाहीं, कारण इतर देशांतील लोकांना अहिंसेची ही परंपरा नाहीं.

**प्रश्न** : पण आमच्या सर्वसामान्य लोकांच्या रक्तांतच अहिंसा मुरलेली असती तर ते या अशा गुलामीच्या अवस्थेप्रत कसे आले असते ?

**उत्तर** : हां, येथेंच खरोखर माझी जी कांहीं देणगी म्हणून मी फुशारकीनें सांगतों तिचा भाग आहे. ती जी दुर्बळांची अहिंसा ती शूराची अहिंसा मला करायची आहे. तें कदाचित् एक स्वप्न असेल, पण तें प्रत्यक्षांत आणण्यासाठी मला प्रयत्न करायचा आहे. ४३

सत्याग्रहाच्या शास्त्राप्रमाणें सत्ताधाऱ्याकडून जितक्या मोठ्या प्रमाणांत दडपशाहीचीं आणि बेकायदेशीरपणाचीं कृत्यें होतील तितक्या मोठ्या प्रमाणांत या कृत्यांची झळ लागलेल्यांनीं क्लेश आपल्यावर ओढवून घ्यावे. स्वेच्छेनें ओढवून घेतलेल्या पराकाष्ठेच्या क्लेशांतून शेवटीं यशच पदरांत पडतें. ४४

तुरुंगवास ओढवून घेण्यांत आत्मशुद्धि हा प्रधान हेतु असतो. सरकारला अडचणींत टाकणें हा दुय्यम हेतु असतो. निरपराधी, अज्ञात, पण शुद्ध चारित्र्याच्या व्यक्तीच्या तुरुंगांत जाण्यानें किंवा फासावरसुद्धां लटकण्यानें सरकार कोणत्याहि रीतीनें जरी अडचणींत आलें नाहीं तरी त्यायोगें सरकारचा शेवट होणार याविषयीं माझी बालंबाल खात्री आहे. एका छोट्याशा पणतीनेंहि गडद अंधकार नाहींसा होतो. असहकार हा ॲलोपथीचा उपचार नाहीं तो होमीओपथीचा उपचार आहे. होमीओपथींत रोग्याला दिलेल्या औषधाच्या थेंबांची त्याला रुचि लागत नाहीं, कित्येक वेळां तर त्याला आपण औषध घेतलें कीं नाहीं अशी देखील शंका वाटते; परंतु होमीओपथीच्या पुरस्कर्त्यांवर जर विश्वास ठेवायचा असेल तर, ते रुचिहीन थेंब किंवा त्या इवल्याशा गोळ्या ॲलोपथीच्या औंसभर डोसापेक्षा किंवा जीव गुदमरून टाकणाऱ्या गोळ्यांपेक्षां फार मोठ्या प्रमाणांत शक्तिशाली असतात. शुद्धि करणाऱ्या असहकाराचा परिणाम हा अशा होमिओपथीच्या औषधाच्या परिणामापेक्षाहि जास्त खात्रीचा असतो हें मी निश्चयपूर्वक सांगतों. ४५

(सामुदायिक सत्याग्रहाच्या लढ्यांत) क्लेश सहन करण्याला स्पष्ट अशी ठराविक मर्यादा आहे. क्लेश सहन करणें शहाणपणाचें व बिनशहाणपणाचें दोन्ही असूं शकेल आणि मर्यादेची कड गांठली कीं क्लेश लांबवीत नेणें हें बिनशहाणपणाचेंच नव्हे तर पराकाष्ठेच्या मूर्खपणाचें ठरेल. ४६

आमच्या प्रगतीला जे खीळ घालत आहेत असें आम्हांला वाटतें त्यांना दहशत दाखवून किंवा ठार मारून कांहीं स्वातंत्र्य प्रस्थापित करणें शक्य होणार नाहीं. आमचे आपसांतले भेद बुद्धीची आणि हृदयाची आळवणी करून मिटवून टाकण्यानें आणि आमच्यांत आपापसांत जीवाभावाचें ऐक्य निर्माण करण्यानेंच तें शक्य होईल. विरोधकाचें मन धीरें धीरें व सौजन्य-युक्त प्रयत्नांनी आपल्याला बदलायचें आहे म्हणूनच आपण सामुदायिक सविनय कायदेभंग करूं इच्छीत आहों. हा रामबाण उपाय आहे हें प्रत्येकाला मान्य आहे. प्रत्येकाला हें माहींत आहे कीं येथें ‘सविनय’ शब्दाचा अर्थ फक्त ‘अहिंसक’ असाच आहे; आणि सामुदायिक सविनय कायदेभंग हा

सामुदायिक अहिंसेवांचून व सामुदायिक शिस्तीवांचून अशक्य आहे हें पुष्कळ वेळां मीं सांगितलें आहे. ४७

सामुदायिक सत्याग्रह आणि व्यक्तिगत सत्याग्रह यांच्यांत मुख्य फरक असा कीं व्यक्तिगत सत्याग्रहांत प्रत्येकजण स्वतःपुरता स्वतंत्र असतो आणि तो जर खालीं पडला तर त्याचा इतरांवर वाईट परिणाम होत नाहीं. सामुदायिक सत्याग्रहांत एक जर पडला तर त्याचा सामान्यपणें इतरांवर विपरीत परिणाम होतो. दुसरी गोष्ट म्हणजे, सामुदायिक सत्याग्रहांत पुढारीपण अवश्य असतें, व्यक्तिगत सत्याग्रहांत प्रत्येक सत्याग्रही हा स्वतःच स्वतःचा पुढारी असतो. तिसरा फरक म्हणजे सामुदायिक सत्याग्रहांत अपयश येण्याची शक्यता असते; व्यक्तिगत सत्याग्रहांत अपयशाची शक्यताच नसते. शेवटचा मुद्दा म्हणजे सामुदायिक सत्याग्रहाला तोंड देण्याची राज्यसत्तेला शक्यता असते, परंतु व्यक्तिगत सत्याग्रहाला तोंड द्यायला आजवर कुठलीहि राज्यसत्ता समर्थ झालेली आढळांत नाहीं. ४८

## अहिंसक लढा व विधायक कार्यक्रम

लोक कांहीं एका दिवसांत अहिंसक बनूं शकणार नाहींत असें मला सांगतात. तसें मी कधींच म्हटलेलें नाहीं. परंतु योग्य तें शिक्षण दिल्यानें त्यांचा स्वतःचा तसा संकल्प असेल तर ते अहिंसक होऊं शकतात असें मी मानतों. ज्यांना सविनय कायदेभंग करायचा असेल त्यांच्या बाबतींत अहिंसेचें प्रत्यक्ष आचरण आवश्यक आहे, पण कायदेभंगाकरितां ज्यांची निवड झाली त्यांच्याशीं लोकांना सहकार करायचा असेल तर लोकांची त्यांच्याविषयीं सद्भावना आणि लोकांना योग्य असें शिक्षण एवढीं पुरेशीं आहेत. त्यांना अंमलांत आणण्याला सांगितलेलें विधायक कार्य हेंच त्यांचें योग्य शिक्षण आहे. म्हणून अहिंसेच्या साधनानें हिंदुस्तान आपलें साध्य प्राप्त करून घेत आहे हें पाहण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांनीं आपल्या कार्यशक्तीचा प्रत्येक अंश विधायक कार्यक्रम अत्यंत कळकळीनें पार पाडण्याकडे लावावा; सविनय कायदेभंगाचा विचारहि त्यांनीं मनांत आणूं नये. ४९

वातावरणांत जेव्हां अहिंसेच्या ऐवजीं हिंसा व्यापली आहे असें दिसतें तेव्हां पराकाष्ठेची दक्षता घेण्याची जरूर असते. हिंसेनें वातावरण भारलेलें आहे

अशा परिस्थितींत अहिंसेच्या प्रयोगाला वाव नाहीं असें कोणी म्हणतील आणि त्यांत खरोखर कांहीं तथ्यहि आहे. पण हीच विचारसरणी आणखी थोडी ताणली तर अहिंसेचा प्रयोग प्रायः अशक्यच आहे असें वाटायला लागेल. वस्तुतः दावा असा आहे कीं कितीहि भयानक स्वरूपाची हिंसा असो, तिचा प्रभाव नाहींसा करण्याकरितां अहिंसा हीच एक परिणामकारी शक्ति आहे. वातावरण हिंसेनें व्याप्त असतें अशा वेळीं अहिंसा सविनय कायदे-भंगाच्या रूपानें कदाचित् प्रकट होणार नाहीं, आणि सविनय कायदेभंगाचें रूप तिला यायचें असेल तर त्याला पुरेशा निर्बंधांचें कुंपणहि घालावें लागेल. सत्याग्रहांत संख्येला महत्त्व नाहीं, गुणाला आहे, आणि हिंसेच्या शक्ति जबरदस्त होतात अशा वेळीं तर गुणालाच महत्त्व अधिक. ५०

न मागतां आलेली लढाई जशी सैनिकाला शिक्षण घेण्याची एक संधीच असते, तशीच दडपशाही हीसुद्धां सत्याग्रहांत एक शिक्षणाची संधीच होते. सत्याग्रह्यांनीं दडपशाहीचीं कारणें शोधून काढावींत. त्यांना असें आढळून येईल कीं दडपले गेलेले लोक, जरा बळजोरी दिसली कीं, घाबरून जातात आणि क्लेश सहन करण्याला व आत्मबलिदान करण्याला तयार होत नाहींत. हीच अर्थात् सत्याग्रहाचे पहिले धडे घेण्याची वेळ असते. ज्यांना या अद्वितीय शक्तीचें थोडें फार ज्ञान झालें असेल त्यांनीं आपल्या आसपासच्या माणसांना दडपशाही दुबळेपणानें किंवा अगतिकतेनें नव्हे तर शूरपणानें व ज्ञानपूर्वक सहन करायला शिकवावें. उदाहरणार्थ, समजा, राज्यसत्तेनें एखादी संघटना बेकायदेशीर ठरविली; तर तिचे सभासद अशा हुकुमाला एक तर शिक्षेच्या भयानें मान तुकवितील किंवा सविनय कायदे-भंग अजून सुरू करावासा वाटत नाहीं म्हणून ते तो हुकूम मानतील. या दुसऱ्या प्रकारच्या आज्ञापालनांत ते आपल्या शक्तीचा जपून उपयोग करतात आणि अहिंसक रीतीनें प्रतिकार करण्याची लोकांची व आपली इच्छाशक्ति वाढवितात. त्या संघटनेचे सभासद व्यक्तिगत रीत्या एरवीं बेकायदेशीर न मानल्या जाणाऱ्या प्रवृत्ती चालूच ठेवतील. आपली संघटना कायदेशीर ठरावी याकरितां सनदशीर चळवळीहि ते चालू ठेवतील. आणि अशा रीतीनें स्वेच्छेनें स्थानिक कायद्यांच्या कक्षेंत काम करीत असतांनासुद्धां जर त्यांना अटक झाली किंवा इतर रीतींनीं वाईट वागविण्यांत आलें तर

त्यामुळें जे क्लेश भोगावे लागतील ते ते भोगतील. क्लेश भोगतांना ते स्वतःचे परीक्षण करतील कीं आपल्याला दुःख भोगायला लावणाऱ्या-विषयीं आपल्या अंतःकरणांत वैरभाव किंवा राग उद्‌भवला आहे काय? स्वतःच्या मनाला ते विचारतील कीं या आपत्तींत आपला खरा सहाय्यकर्ता आणि मार्गदर्शक जो ईश्वर त्याचें अस्तित्व आपल्या चित्तांत आपल्याला भासतें का? खरोखर अशा प्रकारचें शिक्षण जर योग्य रीतीनें आणि सतत घेतलें तर तें घेणाऱ्यांमध्यें धीरगंभीर अशा अहिंसक प्रतिकाराची शक्ति उत्पन्न करील, ही शक्तीच मुळीं अजिंक्य अशी होईल, आणि पुढें सविनय कायदेभंगाच्या रूपानें कांहीं प्रयत्न करण्याची गरजच राहणार नाहीं. मागील सविनय कायदेभंगाच्या चळवळी सुरू करण्यांत मीं फाजील आत्मविश्वास बाळगला आणि घाई केली हा माझा दोष मी कबूल करतों. त्यायोगें देशाची कांहीं हानि झालेली दिसून आली नाहीं याचें कारण इतकेंच कीं देशाच्या नाडीवर माझा सतत हात होता आणि ईश्वराची कृपा कीं जरा मला धोक्याचा वास आला किंवा परिस्थितीची परीक्षा किंवा अदमास घेण्यांत माझी चूक आढळली कीं मी पाऊल मागें घेतलें आहे. एक हानि मात्र कबूल केली पाहिजे, ती ही कीं पूर्वतयारीच्या बाबतींत ढिलेपणा ठेवण्याची संवय झाल्यामुळें लोकांना आतां पूर्वतयारीचे मवाळ वाटणारे नियम कडकपणें अंमलांत आणणें जड वाटूं लागलें आहे. पण सत्याग्रहाच्या शिक्षणाचा तोच अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. उमेदवार जर परिश्रमाच्या अवस्थांतून गेला नाहीं तर बलवान् आणि प्रभावी अहिंसाशक्ति त्याच्यांत उतरणार नाहीं. दडपशाहीचा अर्थ बरोबर समजून घेतला तर सत्याग्रह्यांत स्वाभाविक आणि उत्स्फूर्त अशी प्रतिकार-क्रिया जागृत होते, ही गोष्ट जर मी बरोबर पटवूं शकलों असेन तर या ज्ञानांतून कदाचित् विधायक प्रवृत्ति बळावेल. विधायक प्रवृत्ति मवाळ वाटते याचा अर्थच सत्याग्रहाचें मर्म आणि अहिंसेची खुबी व प्रभाव लक्षांत आलेला नाहीं असा होतो. ५१

विधायक कार्यक्रम जर पुरता अंमलांत आणला गेला तर सविनय कायदेभंग करण्याची गरजच राहणार नाहीं. जाती-जमातींत सलोखा घडून आला, अस्पृश्यता नष्ट केली गेली, दारूनें पछाडलेल्या हिंदुस्तानाऐवजीं

व्यसनमुक्त असा हिंदुस्तान झाला, आणि हिंदुस्तानांत सर्वत्र ग्रामोद्योग आपण सुरू केले तर सविनय कायदेभंगाचा प्रसंगच पडणार नाहीं. माझा सविनय कायदेभंग सर्व कांहीं व्यापून टाकील. स्वराज्यानंतरसुद्धां हा माझा सविनय कायदेभंग पुरेसा होईल. अशा रीतीनें काम करण्यांत स्वराज्य आहे हें लोकांना पटवून देण्याचीच खरी अडचण आहे. ५२

सगळ्या देशाचें सहकार्य जर विधायक कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या बाबतींत लाभूं शकलें तर शुद्ध अहिंसक प्रयत्नांनीं स्वातंत्र्य संपादन करण्याकरितां सविनय कायदेभंगाचीच गरज आहे असें नाहीं. पण असें सद्भाग्य राष्ट्रांना काय किंवा व्यक्तींना काय क्वचितच लाभतें. म्हणून राष्ट्रव्यापी अहिंसक प्रयत्नांत सविनय कायदेभंगाच्या लढ्याचें स्थान काय तें समजून घेणें अवश्य आहे. त्याचीं तीन वेगवेगळीं कार्यें आहेत :

१. एखाद्या स्थानिक अन्यायाच्या किंवा तक्रारीच्या निवारणासाठीं सविनय कायदेभंग पूर्णपणें उपयोगी पडतो.

२. एखाद्या विशिष्ट अन्यायला किंवा पापप्रवृत्तीला उद्देशून पण परिणामांची अपेक्षा न ठेवतां तो करतां येतो. मात्र त्याचें उद्दिष्ट स्थानिक लोकांना त्या पापप्रवृत्तीची आपल्या बलिदानानें जाणीव करून देणें किंवा त्यांची विवेकबुद्धि जागृत करणें हेंच फक्त असेल. चंपारण्यांत मी जो सविनय कायदेभंग केला तो अशाच प्रकारचा होता; माझ्या कार्याचा अमुक परिणाम होईल असा हिशेब न करतां आणि लोक कदाचित् आपल्याला सहानुभूतीहि दाखविणार नाहीं हें मला पुरतें माहीत असूनसुद्धां मीं तो केला होता. माझ्या त्या कार्याला अनपेक्षितपणें फळ वेगळें आलें ती ईश्वराची कृपा म्हणा, नशिबाचा खेळ म्हणा, जसें ज्याला रुचेल तसें त्यानें मानावें.

३. विधायक कार्याला लोकांचा पुरेसा पाठिंबा न मिळाला तर त्याच्या ऐवजीं, १९४१ सालच्या लढ्यासारखा, सविनय कायदेभंगाचा लढा हातीं घेतां येईल. तो लढा जरी आपल्या स्वातंत्र्यसंग्रामाचा एक भाग म्हणून आणि त्याला मदत म्हणून हातीं घेण्यांत आला होता तरी भाषणस्वातंत्र्याच्या विशिष्ट मुद्द्यापुरताच तो मर्यादित ठेवण्यांत आला होता. सविनय कायदेभंगाचा

लढा पूर्ण स्वराज्यासारख्या एखाद्या मोघम कारणाकरितां कधींहि करतां येणार नाहीं. ज्या मागणीकरितां तो लढा करायचा ती मागणी नेमकी पाहिजे, विरुद्ध पक्षाला ती स्पष्ट समजण्यासारखी आणि त्याच्या हातून ती पुरी होण्यासारखी असली पाहिजे. ही पद्धति जर योग्य रीतीनें अंमलांत आणली तर ती अंतिम साध्याकडे खात्रीपूर्वक नेणारी आहे.

सविनय कायदे-भंगाचें संपूर्ण क्षेत्र आणि त्याची शक्याशक्यता यांची मी येथें छाननी केलेली नाहीं. विधायक कार्य आणि सविनय कायदेभंग यांच्यामधील संबंध वाचकांच्या लक्षांत येणें सुलभ व्हावें इतपत त्या विषयाला मी स्पर्श केला आहे. वर लिहिलेल्या पहिल्या दोन बाबतींत मोठ्या प्रमाणावरील विधायक कार्यक्रमाची जरूर नव्हती आणि असूं शकत नाहीं. परंतु स्वातंत्र्यसंपादनाकरितां म्हणून जेव्हां सविनय कायदेभंगाची योजना केली जाते तेव्हां त्याकरितां पूर्वतयारीची गरज असते, आणि या तयारीच्या मागें या लढ्यांत सामील झालेल्यांच्या प्रत्यक्ष व जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नांचें पाठबळ असावें लागतें. या रीतीनें सविनय कायदेभंग हा लढा करणाऱ्यांना प्रोत्साहक आणि विरोधकाला आह्वान करणारा असा होतो. पूर्ण स्वराज्याच्या प्राप्तीकरितां केलेल्या सविनय कायदेभंगाच्या लढ्याला करोडो लोकांचें विधायक कार्याच्या रूपांत जर सहकार्य नसेल तर तो कायदेभंग म्हणजे फुसका बार ठरेल आणि त्याचा कांहींसुद्धां उपयोग नाहीं. ५३

विधायक कार्यक्रम हाच पूर्ण स्वराज्य मिळविण्याचा सत्य-अहिंसेचा मार्ग आहे, नव्हे, मी म्हणेन विधायक कार्यक्रम पूर्णपणें अंमलांत आणणें म्हणजेच पूर्ण स्वराज्य होय...व्यक्तिगत किंवा सामुदायिक सविनय कायदेभंग किंवा सत्याग्रह हा विधायक कार्याला साहाय्यरूप होतो; सशस्त्र बंडाच्या ऐवजीं त्याच्या इतकाच तो उपयोगी पडण्याजोगा उपाय आहे. सशस्त्र बंडाकरितां जशी शिक्षणाची जरूरी आहे तशीच सत्याग्रहाकरितांसुद्धां शिक्षणाची जरूरी आहे. अर्थात् दोन्ही शिक्षणांचे मार्ग भिन्न आहेत. दोन्ही प्रकारच्या लढ्यांमध्यें प्रसंग आला म्हणजेच कृति घडते. लष्करी पद्धतीनें बंड करण्याचा अर्थ असा होतो कीं आपण सर्वांनीं शस्त्रें वापरायला शिकायचें, आणि आतां कदाचित् ॲटम् बॉंबचा उपयोग करायलाहि शिकायचें. सत्याग्रह करण्याचा

अर्थ असा होऊं शकतो कीं आपण सर्वांनीं निरनिराळे विधायक कार्यक्रम अमलांत आणायचे.

यावरून एक गोष्ट सिद्ध होते; ती ही कीं कार्यकर्त्यांनीं कधीं सत्याग्रह करण्याकरितां प्रसंग शोधीत राहूं नये. खुद्द विधायक कार्य बंद पाडण्याचा किंवा तें विफल करण्याचा प्रयत्न होईल, अशा प्रसंगीं मात्र सत्याग्रह करण्याला त्यांना तयार राहावें लागेल. सत्याग्रह कोणत्या प्रसंगीं करावा आणि कोणत्या प्रसंगीं करूं नये, या बाबी एक-दोन उदाहरणांवरून लक्षांत येतील. आपल्याला माहीत आहे कीं राजकीय क्षेत्रांत अमुक प्रकारचे करार होऊं दिले गेले नाहींत. ते होतांना आडकाठी केली जाण्याचाहि संभव असतो. परंतु व्यक्ती-व्यक्तीमध्यें मैत्री स्थापन होण्याला आडकाठी कोणी करूं शकत नाहीं, म्हणजेच आडकाठी करण्याचे प्रयत्न झाले तर त्याविरुद्ध सत्याग्रह करणें प्राप्त होतें. या प्रकारची निःस्वार्थ आणि खरी मैत्रीच राजकीय करारांना पायाभूत बनली पाहिजे. याच प्रकारें, खादीच्या केंद्रीभूत उत्पादनाला सरकार आडकाठी करूं शकेल. परंतु व्यक्तिगत म्हणजेच आपापल्या वापरापुरती खादी काढण्याला आणि तिचा वापर करण्याला आडकाठी करण्याची कोणाहि सत्तेची ताकद नाहीं. या प्रकारचीं कामें सुरू करणाऱ्यांनासुद्धां अडवणुकींना सामना द्यावा लागेल. पण अशांना जगभर आत्मक्लेशाच्या अग्निदिव्यांतून जावेंच लागत असते. ५४

माझा धर्म मला दुराचाऱ्यावर देखील प्रेम करायला शिकवितो आणि माझा असहकार हें त्या धर्माचेंच एक अंग आहे. सविनय प्रतिकाराची इच्छा आणि सहकार यांच्यामध्यें मला कांहींच विसंगति दिसत नाहीं. अन्यायाचा सविनय प्रतिकार कांहीं मला नवा सिद्धान्त किंवा आचार नाहीं. ती तर माझी जन्मभरची निष्ठा आणि जन्मभरचा आचार आहे. देशाला सविनय प्रतिकारासाठीं तयार करणें म्हणजे अहिंसेकरितां तयार करणें आहे; अहिंसेकरितां तयार करणें म्हणजे विधायक कार्याकरितां तयार करणें आहे; आणि विधायक कार्याचें माझ्या दृष्टीनें दुसरें नांव चरखा हें आहे. ५५

विधायक कार्य अखंडपणें करीत राहण्यानें जो विश्वास प्राप्त होतो तो

आणीबाणीच्या क्षणीं अतिशय मोलाचा ठरतो. तयारी नसलेल्या लोकांत व्यक्तिगत सविनय कायदेभंग आणि तोहि लोकांना माहीत नसलेल्या किंवा त्यांचा विश्वास नसलेल्या पुढाऱ्यांकडून झाला तर त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं; मग सामुदायिक सविनय कायदेभंग तर दूरच राहिला. ५६

खुदाई खिदमतगारांच्या पुढाऱ्यांना मीं सांगितलें कीं सविनय कायदेभंग हा अहिंसक कार्यक्रमाचें शेवटलें कलस आहे, आरंभ तर मुळींच नव्हे. तरीहि १९१८ सालीं मी या देशांत चुकीनें शेवटाकडून सुरुवात केली. गरज पडल्यानें तसें करणें मला अनिवार्य झालें. त्यामुळें देशाला अपाय झाला नाहीं याचें एकच कारण कीं मी अहिंसक तंत्राचा स्वतःला तज्ज्ञ मानीत असल्यामुळें पावलें केव्हां व कशीं मागें घ्यायचीं याचें मला ज्ञान होतें. १९२० सालच्या विधायक कार्यक्रमावर माझी त्या वेळीं जितकी श्रद्धा होती तितकी आजहि आहे. पूर्ण स्वराज्याकरितां करावयाच्या सविनय कायदेभंगाच्या मोहिमेचें नेतृत्व त्या कार्यक्रमाच्या पूर्ण पालनावांचून करणें मला शक्य नव्हतें. सविनय कायदेभंगाचा अधिकार त्यांनाच प्राप्त होतो कीं जे स्वतः किंवा इतरांनीं बनविलेल्या कायद्यांचें स्वेच्छेनें पालन करण्याचें कर्तव्य जाणतात आणि आचरतात. ५७

विधायक कार्याहून सविनय कायदेभंगाला प्रथम स्थान देण्यांत माझ्याकडून चूक झाली आणि माझ्या या हिमालयाएवढ्या चुकीनें माझा कांहींहि लाभ झाला नाहीं. माझे सहकारी मला पारखे होतील अशी मला भीति वाटली आणि म्हणून मी अपुऱ्या अहिंसेनें काम तसेंच चालू ठेवलें. ५८

## करबंदी

करबंदीची चळवळ ही नोकरशाहीकडून लोकांच्या हातीं सत्ता येण्याकरितां आहे. म्हणून शेतकरीवर्ग फक्त अहिंसक राहिला तर तेवढें पुरेसें नाहीं. अहिंसा हा लढ्याचा नऊ-दशांश हिस्सा तर आहेच, पण तीच कांहीं सर्व नाहीं. शेतकरीवर्ग अहिंसक राहिला, पण जर तो 'अस्पृश्यां'ना आपले बांधव मानणार नसेल; हिंदू, मुसलमान इ. भिन्न धर्मांच्या लोकांना आपले बांधव समजणार नसेल; चरखा व खादी यांचें आर्थिक आणि

नैतिक मूल्य जर त्यांनीं समजून घेतलें नसेल, तर त्यांना स्वराज्य मिळविणें शक्य होणार नाहीं. या सर्व गोष्टी जर त्यांनीं आज केल्या नाहींत तर स्वराज्यानंतर ते त्या करणार नाहींत. या राष्ट्रीय सद्गुणांचा आचार म्हणजेच स्वराज्य हें जाणण्याला त्यांना शिकविलें पाहिजे.

तेव्हां सविनय करबंदी ही एक विशेष अधिकाराची गोष्ट आहे आणि कडक शिस्तीच्या तालमींतून पार पडल्यानंतरच तो अधिकार वापरतां येतो. ज्याप्रमाणें सविनय कायदेभंग हा सरकारचे कायदे नित्य मोडणाऱ्या गुन्हेगारांच्या बाबतींत कठीण, त्याचप्रमाणें एवढ्या तेवढ्या निमित्तानें करबंदी करण्याची संवय ज्यांना लागली आहे त्यांना सविनय करबंदी अंमलांत आणणें कठीण आहे. सविनय करबंदी ही असहकारामधली खरोखर अंतिम पायरी आहे. सविनय कायदेभंगाचे इतर प्रकार अजमावून पाहीपर्यंत आपण करबंदीचा आसरा घेऊं नये. आणि करबंदीचा प्रयोग प्राथमिक अवस्थेंत मोठ्या किंवा अनेक क्षेत्रांत करणें ही कमालीची असुज्ञता होईल. ५९

करबंदीचा हेतु कर देणाऱ्या सत्याग्रह्यांना श्रीमंत करणें हा नाहीं, तर त्यांच्या क्लेशांनीं राष्ट्राला संपन्न करणें हा आहे. आणि त्यांनीं स्वतःची शुद्धि केली असेल तरच त्यांना हा विशेष अधिकार अमलांत आणतां येईल. ६०

ज्या लोकांत अहिंसेचें तत्त्व अजून पुरतें बाणलेलें नाहीं असे लोक करबंदीच्या मोहिमेमुळें चळवळींत दाखल होतील, असा एक मुद्दा पुढें आला आहे. हें अगदीं सत्य आहे, आणि तें सत्य आहे म्हणूनच त्यांतून द्रव्याचें आमिष हटकून पुढें येतें. त्यामुळें ओघानेंच असें येतें कीं लोकांचा करबंदीला तत्काळ पाठिंबा मिळण्याचा संभव आहे एवढ्यासाठीं कांहीं करबंदीचा कार्यक्रम आपण हातीं घेतां कामा नये. ही लोकांची उत्सुकता म्हणजे घातक मोह आहे. अशा प्रकारची करबंदी ही सविनय किंवा अहिंसक होणार नाहीं, तर ती गुन्ह्याच्या स्वरूपाची होईल, किंवा त्यांतून हिंसा होण्याचा फार मोठा संभव आहे. सविनय करबंदीचें प्रयोजन आणि त्यांतील सात्त्विकता आकलन होण्याइतकें शिक्षण जोंपर्यंत शेतकरी वर्गाला दिलें गेलें नाहीं आणि जोंपर्यंत ते आपला जमीनजुमला जप्त झाला

( अर्थात् तो तात्पुरताच जप्त होऊं शकतो ) आणि त्याची व गुरांढोरांची सक्तीनें विक्री झाली तरी तें सर्व निमूटपणें पाहात राहण्याला तयार झाले नाहींत तोंपर्यंत कर न देण्याचा सल्ला त्यांना दिला जाऊं नये. ६१

## लोकशाहींत सत्याग्रह

कांहीं थोड्या लोकांनीं सत्ता संपादन केल्यानें खरें स्वराज्य येणार नसून सत्तेचा दुरुपयोग होत असतां त्या सत्तेचा प्रतिकार करण्याची शक्ति सर्वांच्या अंगीं येण्यांत खरें स्वराज्य म्हणजे लोकराज्य आहे हें दाखवून देण्याची आशा मी बाळगली आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर, सत्तेचें नियमन करण्याची व तिच्यावर नियंत्रण ठेवण्याची आपली शक्ति आहे ही जाणीव शिक्षणानें लोकांत उत्पन्न करूनच स्वराज्य प्राप्त करून घ्यायचें आहे. ६२

कायदेमंडळाच्या द्वारा सत्ता हातीं येते असा विचार करण्याची फार दिवसांची आपल्याला संवय लागली आहे. ही समजूत म्हणजे जडतेंतून किंवा मोहवशतेंतून निपजलेली एक गंभीर भूल आहे असें मी मानतों. ब्रिटिशांच्या इतिहासाचा वरवर अभ्यास करून आपल्याला वाटूं लागलें कीं, सर्व सभा पार्लमेंटमधून खालीं लोकांत पाझरते. वस्तुस्थिति अशी आहे कीं सत्ता ही लोकांमध्येंच आहे व ती कांहीं काळापुरती त्यांनीं आपल्या निवडलेल्या प्रतिनिधींच्याकडे सोपविलेली आहे. लोकांव्यतिरिक्त पार्लमेंटांना कांहींहि सत्ता किंवा अस्तित्वसुद्धां नाहीं. गेलीं कित्येक वर्षें हें साधें सत्य लोकांना समजावून देण्याचा माझा प्रयत्न आहे. सविनय कायदेभंग हें सत्तेचें कोठार आहे. कायदेमंडळाचे कायदे मानायला तयार नसलेली आणि ते न मानल्यामुळें ओढवणारे परिणाम भोगायला तयार असलेली सबंध जनता आपल्या डोळ्यांपुढे आणा. अशी जनता कायदे करण्याची आणि त्यांचा अंमल करण्याची सबंध यंत्रणाच बंद पाडील. पोलीस आणि लष्कर किती जरी शक्तिशाली असलें तरी तें कांहीं थोड्या लोकांवर दडपण टाकण्यापुरतेंच उपयोगाचें. लोक जेव्हां पराकाष्ठेचे क्लेश सोसायला तयार होतात तेव्हां पोलिसांची किंवा लष्कराची कसलीहि सक्ति त्यांच्या खंबीर निश्चयाला वांकवूं शकत नाहीं. ६३

**पं. जगत्नारायण** ( हंटर चौकशीकमिटींतील एक सभासद ) : बेजबाबदार परकीय अधिकाऱ्यांना विरोध करण्याकरितां तुमच्यापाशीं दुसरा कोणताहि उपाय नाहीं, आणि म्हणून तुम्ही ही सत्याग्रहाची चळवळ सुरू केली आहे, होय ना ?

**गांधीजी** : तें मी खात्रीपूर्वक सांगूं शकत नाहीं. भविष्यकाळांत येणाऱ्या पूर्ण जबाबदार स्वराज्याला विरोध करण्याकरितांसुद्धां सत्याग्रहाची जरूर माझ्या विचारांतून मला भासते. आपलें अज्ञान पुढें करून आमचे मंत्री स्वतःच्या गैरकृत्यांचा बचाव करूं म्हणतील तर तें केव्हांहि शक्य होणार नाहीं.

**प्रश्न** : परंतु स्वराज्याचे सर्व अधिकार असल्यानंतर आपण मंत्र्यांना बडतर्फ करूं शकूं.

**गांधीजी** : त्या बाबतींत कायमचे निर्धास्त राहतां येईल असें मला वाटत नाहीं. इंग्लंडमध्यें पुष्कळ वेळां असें घडतें कीं मंत्र्यांवरचा लोकांचा विश्वास जरी उडालेला असला तरी ते कारभार पुढें चालू ठेवूं शकतात. तीच गोष्ट येथेंहि घडूं शकेल आणि म्हणून या देशांत अशा परिस्थितीची मी कल्पना करूं शकतों कीं ज्या परिस्थितींत, स्वराज्य असलें तरीसुद्धां, सत्याग्रहाची गरज पडेल. ६४

लोकमताला धाब्यावर बसविणारें सरकार कोणतेंहि असो तें मी परकीय मानतों. ६५

**प्यारेलाल** : निवडणुका आणि कायदेमंडळें या कार्यक्रमांतून सामान्य जनता कधीं तरी सत्तेवर येऊं शकेल का ?

**गांधीजी** : केवळ त्या कार्यक्रमानें ती सत्तेवर येऊं शकणार नाहीं. अहिंसक असहकाराच्या शक्तीवरच शेवटीं माझी भिस्त आहे, आणि तीच शक्ति उभी करण्याचा मी इतकीं वर्षें प्रयत्न चालविला आहे.

**प्यारेलाल** : अहिंसेच्या मार्गानें सत्ता हस्तगत करणें शक्य आहे काय ? आमचे समाजवादी मित्र म्हणतात कीं अहिंसेच्या शक्तीची कांहीं एका मर्यादेपर्यंत आम्हांला खात्री पटली आहे. पण ते म्हणतात, सत्ता काबीज

करण्याला लोक अहिंसेनें कसे समर्थ होतील हें आम्हांला समजत नाहीं. आपणहि असेंच म्हणाला होतां. येथेंच, ते म्हणतात, अहिंसेचा अपुरेपणा आहे.

**गांधीजी :** एका अर्थीं त्यांचें म्हणणें बरोबर आहे. स्वभावतः अहिंसा ही सत्ता ‘ काबीज ’ करूं शकत नाहीं किंवा तें तिचें साध्यहि असूं शकत नाहीं. पण अहिंसा त्याहून जास्त कामगिरी करूं शकते. सरकारी यंत्र हस्तगत न करतांच ती सत्तेवर प्रभावीपणें ताबा ठेवूं शकते आणि तिला मार्गदर्शन करूं शकते. हीच तर तिची खुबी आहे. याला एक अपवाद अर्थात् आहे. लोकांकडून अहिंसक असहकार जर राज्यकारभार बंद करण्याइतपत पूर्णत्वानें अमलांत आला, किंवा परचक्र आल्यानें राज्ययंत्र कोलमडून पडलें आणि पोकळी निर्माण झाली, तर मग लोकांचे प्रतिनिधी बनलेलीं माणसें पुढें येतात आणि ( राज्ययंत्र आपल्या हातीं घेऊन ) ती पोकळी भरून काढतात. तात्त्विक दृष्ट्या तें शक्य आहे. ६६

दिवसेंदिवस मला असें वाटत आहे कीं सत्याग्रह हा अमुक एका गोष्टीवरच केन्द्रित केला पाहिजे. आज आपण सत्याग्रह सत्ता मिळविण्या-करितां करीत आहों, खरें म्हणजे तो सत्तेची शुद्धि करण्याकरितां असेल. सत्ता म्हणजे हिंसाच. सत्तेला टिकविण्याकरितां लष्कर लागतें. सत्तेचा त्याग हा सत्याग्रहाच्या मुळाशीं आहे. कौन्सिलें वगैरेपासून सत्याग्रही दूर राहतील तरच ते सत्तेला शुद्ध करूं शकतील. माझे अकरा मुद्दे मोतीलालजींना आवडले नव्हते आणि जवाहरलाललाहि पसंत नव्हते. पण मी अजून त्यांवर कायम आहें....प्रसंग आला तर फिरून मी देशाला या अकरा मुद्द्यांकडे आणीन. ( सारांश ), सत्ता मिळविण्याकरितां सत्याग्रह असूंच शकत नाहीं. सत्ता हस्तगत केल्यावर ती शुद्ध रीतीनें संभाळली जावी याकरितां तिचा त्याग करण्यांत सत्याग्रह असेल.

सत्याग्रह सत्ता मिळविण्याकरिता असूंच शकत नाहीं, सत्तेला शुद्ध ठेवण्याकरितां, तिचा सदुपयोग करायला लावण्याकरितां तो असेल. आजपर्यंत आपण जितक्या प्रमाणांत सत्ता मिळविण्याकरितां सत्याग्रह केला आहे तितक्या प्रमाणांत चुकलों आहोंत आणि ती चूक सुधारली पाहिजे. त्याकरितां प्रायश्चित्त केलें पाहिजे असें नाहीं. कारण ती चूक म्हणजे ज्या हत्याराचा ज्या कामासाठीं उपयोग नाहीं त्या कामासाठीं त्याचा उपयोग

केला एवढेंच. तसा उपयोग आतां पुढें करूं नये म्हणजे झालें. अहिंसेचा उपयोग हिंसेकरितां होणारच नाहीं.

सत्याग्रह अमुक एका गोष्टीवर केन्द्रित केला पाहिजे याचा अर्थ सत्ता मिळविण्यावर तो केन्द्रित केला पाहिजे असा नव्हे, तर एक विशिष्ट गोष्ट सिद्ध करायची आहे त्याकरितां तो होईल. मग ती गोष्ट अकरा मुद्द्यांची असो कीं अकराशें मुद्द्यांची असो. चालू राज्यकारभार असतांनाच ती गोष्ट आपण सिद्ध करीत गेलें पाहिजे. त्याच्यापुढें दुबळे राज्यतंत्र टिकूंच शकणार नाहीं, तें मोडूनच पडेल किंवा तंत्रांत आपोआप सुधारणा होईल, पण तंत्रांत सत्ता घेण्याची गोष्ट आली कीं आपण दूर राहावें. 'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः'. आपण मतदान करावें, मत देण्याइतकी सत्ता वापरायला हरकत नाहीं, पण तीसुद्धां राम आणि रावण यांच्या निवडणुकींत रामाची निवड करण्याकरितां. अर्थात् रामसुद्धां जितक्या प्रमाणांत सत्ता चालवील तितक्या प्रमाणांत हिंसाच करणार.

आपलें एक सत्याग्रहदल असावें, असें कीं जें केवळ सत्तेला शुद्ध करण्याकरितांच अस्तित्वांत राहील, सत्ता हातीं घेण्याचा विचारसुद्धां त्याच्या मनांत असणार नाहीं. म्हणून सत्यमूर्तीसारखे लोक जे सत्याग्रही नाहींत त्यांनीं कौन्सिलांत जाण्याचा विचार करावा हेंच इष्ट आहे. पण जेव्हां असें एक दल कौन्सिलांत जात असेल आणि काँग्रेस त्या दलाला कौन्सिलांत पाठवीत असेल तेव्हां काँग्रेसपासून स्वतंत्रच दुसरें एक दल सत्याग्रह करीत असेल. कौन्सिलांत जाईल तो कांहीं कैदखान्यांत जाऊन बसूं शकणार नाहीं. ६७

**गांधीजी :** कोणत्याहि छापाच्या साम्राज्यशाहीशीं लढण्याकरिता हिंसक बंडाचा जुन्या अनुभवानें निरुपयोगी ठरलेला मार्ग सोडून नवा मार्ग जर आपण काढला नाहीं तर जगांतील दलित राष्ट्रांना वर उठण्याची कांहीं आशा नाहीं.

**प्रश्न :** अहिंसक बंड हा सत्ता काबीज करण्याचा कार्यक्रम नाहीं काय ?

**गांधीजी :** हाच तर भ्रम आहे. अहिंसक क्रांति म्हणजे सत्ता काबीज करण्याचा कार्यक्रम नव्हे. शास्ते आणि शासित यांच्या परस्परसंबंधांत

क्रांति घडवून आणण्याचा हा कार्यक्रम आहे आणि त्यांतून अंतीं सत्तेचें शांततापूर्वक संक्रमण घडून येतें. मुंबईत भरलेल्या अ. भा. कॉंग्रेस कमिटीच्या सभेपुढील माझ्या ता. ८ ऑगस्टच्या भाषणांत मीं सांगितलेले पांच उपाय जर लोकांनीं पूर्णपणें अमलांत आणले असते आणि जर देशांत अहिंसेचें वातावरण परिपूर्ण असतें तर सरकारची दडपशाहीची शक्ति नामोहरम झाली असती आणि राष्ट्राच्या मागणीपुढे मान वांकविणें त्यांना भाग पडलें असतें.

जर परचक्राच्या स्वारीमुळें किंवा अशाच कांहीं कारणांनीं राज्यकर्त्या सत्तेनें राज्यसूत्रें खालीं ठेवलीं आणि पोकळी निर्माण झाली तर साहजिकच लोकांची संघटना त्या सत्तेचें कार्य आपल्याकडे घेईल. पण अशा तऱ्हेच्या राष्ट्रीय सरकारजवळ आपले आदेश लोकांना अंमलांत आणायला लावण्या-करितां अहिंसेवांचून आणि लोकसेवेवांचून दुसरें कोणतेंहि बळ असणार नाहीं. तें सरकार कधींहि जबरदस्ती अमलांत आणणार नाहीं. जे विरुद्ध मताचे असतील त्यांनासुद्धां या सरकारकडून संरक्षण मिळेल. ६८

**प्रश्न** : सत्तेच्या शिखराला सर्व बिघडलेलें असतां जो अपायकारक परिणाम घडून येतो त्याला सामना देऊन पायाशीं असलेल्या जनतेचा सज्जनपणा आपला प्रभाव पाडूं शकेल काय ?

**गांधीजी** : शिखराला असलेलीं माणसें जर बिघडलीं तर पायाशीं असलेल्यांना त्या माणसांना काढून टाकण्याची खात्रीनें मुभा आहे, नव्हे तें त्यांचें कर्तव्य आहे, डोक्यावर धरलेली छत्री नाहीं का आपण सहज काढून बाजूला घेत ? कारण ती खालच्या हातानें धरलेली असते. तसें हें शक्य आहे. जर पायाशीं असणारे म्हणजे जनता अडाणी असली तर त्यांचा फायदा कोणीहि घेणारच. म्हणून जर वर बिघाड झालेला असला तर बुडाशीं खात्रीनें कांहीं तरी मोठा बिघाड झालेला असला पाहिजे असें मी म्हणेन. म्हणून लोकांनीं आपला अज्ञानजन्य दुबळेपणा टाकून द्यावा. ६९

स्वतंत्रता म्हणजे स्वैराचाराचा सदर परवाना नव्हे. स्वतंत्रता म्हणजे स्वतःच स्वतःवर घातलेलें बंधन आणि शिस्त. जो कायदा करण्यांत सगळ्या राष्ट्राचें अंग लोकनियुक्त प्रतिनिधींच्या मार्फत आहे अशा कायद्याला स्वेच्छेनें दिलेली मान्यता. लोकसत्तेपाशीं असलेलें एकमेव सामर्थ्य म्हणजे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... दि: ..................

लोकमत. सत्याग्रह, सविनय कायदेभंग व उपवास या उपायांचें प्रकट वा अप्रकट बळजबरीशीं कसलेंहि साम्य नाहीं. या उपायांचा उपयोगसुद्धां लोकशाहींत मर्यादितच असतो. ७०

लोकांना आपले राजकीय हक्क काय आहेत याची जाणीव झाली नाहीं आणि आणीबाणीच्या वेळीं काय उपाय केला पाहिजे हें कळलें नाहीं तर लोकसत्ता कधींहि प्रस्थापित होऊं शकणार नाहीं. ७१

जन्मजात लोकशाहीवादी मनुष्य हा जन्मजात शिस्तीचा भोक्ता असतो. ज्याला, मानवी अथवा दैवी, कोणत्याहि कायद्यांचें खुषीनें पालन करण्याची नित्याची संवय आहे अशा मनुष्यामध्यें लोकशाही स्वभावतःच येत असते. मी स्वतः अंतःप्रेरणेनें आणि संस्कारांनीं लोकशाहीवादी आहें असा माझा दावा आहे. लोकशाहीला उपयोगी पडण्याची ज्यांना आकांक्षा आहे त्यांनीं प्रथम या लोकशाहीच्या कडक परीक्षेंतून उतरून स्वतःला लायक बनवावें. दुसरें म्हणजे, लोकशाहीवादी हा पूर्णपणें निःस्वार्थ असला पाहिजे. त्याचे विचार आणि कल्पना स्वतःच्या किंवा आपल्या पक्षाच्या दृष्टीनें न चालतां केवळ लोकशाहीच्या दृष्टीनें चालल्या पाहिजेत. तेव्हांच त्याला सविनय कायदेभंग करण्याचा अधिकार प्राप्त होतो. कोणी आपलीं निश्चित मतें सोडून द्यावींत किंवा स्वतःची कुचंबणा करून घ्यावी असें माझें म्हणणें नाहीं. निर्दोष आणि प्रामाणिक मतभेदानें आमच्या कार्याला धक्का बसेल असें मी मानीत नाहीं. परंतु संधीसाधूपणा, ढोंग, किंवा कशाबशा जुजबी केलेल्या तडजोडी यांनीं मात्र कार्य खचित बिनसेल. ७२

**प्रश्न** : आपण म्हणतां कीं राजे, जमीनदार किंवा भांडवलदार यांनीं गरीबांचे विश्वस्त बनावें. आज तसे कोणी असल्याची आपल्याला माहिती आहे काय ? कीं ते तसे बदलतील अशी आपल्याला अपेक्षा आहे ?

**गांधीजी** : आजसुद्धां तसे जमीनदार वगैरे अगदीं सोजके का होईना आहेत अशी माझी समजूत आहे, अर्थात् 'विश्वस्त' या शब्दांत प्रकट होणाऱ्या संपूर्ण अर्थानें नव्हे. ते त्या दिशेकडे चालले आहेत यांत शंका नाहीं. पण, ते गरीबांचे विश्वस्त होतील अशी आशा आहे का असा प्रश्न कोणी विचारूं शकेल. ते आपण होऊन विश्वस्त होत नसतील तर परिस्थितीच्या दडपणानें त्यांना व्हावें लागेल,

नाहीं तर ते सर्वनाश ओढवून घेतील. पंचायत-राज्य स्थापन होईल तेव्हां हिंसा जें कधींच घडवून आणूं शकणार नाहीं तें कार्य लोकमत घडवून आणील. जनतेला जोंवर आपलें बळ समजून येत नाहीं तोंवरच जमीनदार, भांडवलदार आणि राजेलोक यांची सद्दी असते. लोक जर जमीनदारीच्या किंवा भांडवलदारीच्या पापप्रवृत्तीशीं असहकार करतील तर पोषण न मिळाल्यामुळें ती आपोआप मरूनच जाणार. पंचायत-राज्य होईल तेव्हां पंचायतीचेच हुकूम मानले जातील आणि पंचायत ही तर स्वतःचे कायदे स्वतः करूनच चालूं शकते. ७३

औंध संस्थानच्या राजेसाहेबांनीं पत्र लिहून मला विचारलें आहे कीं, माझ्या संस्थानांत मी जी पंचायतपद्धति सुरू केली आहे ती संस्थानचें विलीनीकरण झालें तरी तशीच चालूं राहूं शकणार नाहीं काय? राजेसाहेबांना ( भारत सरकारकडून ) असें कळविण्यांत आलें आहे कीं, आपलें संस्थान विलीन झाल्यानंतर तेथील कारभाराचें स्वरूप हिंदुस्तानांतील इतर ठिकाणांप्रमाणेंच झालें पाहिजे.

माझ्या मतानें लोकांना जेथें जेथें पंचायत पाहिजे असेल तेथें तेथें तिचें कार्य कोणताहि कायदा बंद पाडूं शकणार नाहीं. औंध संस्थान हें संस्थान म्हणून राहणार नाहीं, परंतु औंध म्हणून एक खेड्यांचा असणारा विशिष्ट गट राहीलच. अशा प्रत्येक गटाला किंवा त्यांतील सभासद-गांवाला पंचायत पद्धति ठेवतां येईल, मग हिंदुस्तानच्या इतर भागांत ती असो वा नसो. कर्तव्यकर्म पार पाडण्यांतूनच खरे हक्क प्राप्त होत असतात. असे हक्क कोणीहि हिरावून घेऊं शकत नाहीं. पंचायत ही लोकांची सेवा करण्याकरितां आहे. हिंदुस्तानच्या खऱ्या लोकशाहींत खेडें हा मूळ घटक आहे. एका गांवाला जरी 'पंचायत-राज्य'—ज्याला इंग्रजींत 'रिपब्लिक' म्हणजे गणराज्य म्हणतात तें—हवें असलें तरी तें कोणालाहि अडवितां येणार नाहीं. ७४

मी पूर्वीं म्हणालों होतों कीं, ब्रिटिश आणि ब्रिटिशांनीं तयार केलेलें लष्कर व पोलीसदल यांच्यावर विसंबून राहणें हें स्वातंत्र्याशीं विसंगत आहे; आतां एक पाऊल पुढें जाऊन मी म्हणतों कीं तें लोकशाहीशींसुद्धां विसंगत आहे. लोकशाहींत तुम्ही जर एखाद्या गुंडाला सत्तेवर नेऊन

बसविलेंत तर तुम्हीच तयार केलेल्या शय्येवर तुम्ही पहुडतां – मग ती कांट्यांची असो वा फुलांची असो. यावर उपाय एकच; तो हा कीं मतदारांना, अवश्य तर सत्याग्रहानें, शिक्षित करणें आणि त्यांच्या मनांत पालट घडवून आणणें. म्हणून मी लोकांनीं निवडून दिलेल्या मंत्र्यांच्याकडेच गेलें पाहिजे, कारण ते ‘ माझे ’ मंत्री आहेत. त्यांनीं जर दगा दिला तर त्यांच्याऐवजीं दुसरे मंत्री आणण्याकरितां लोकमत निर्माण केलें पाहिजे. हीच लोकशाही म्हणायची. ७५

हिंदुस्तान आतां स्वतंत्र झाला आहे आणि वस्तुस्थितीचें मला आतां स्पष्ट दर्शन होत आहे. गुलामगिरीचें दडपण उचललें गेल्यामुळें सगळ्या अनिष्ट प्रवृत्ती आतां उफाळून वर आल्या आहेत. अर्थात् हें चांगलेंच लक्षण आहे. परंतु आतां सर्व सत्‌शक्तींची नीट व्यूहरचना करून त्यांच्या साहाय्यानें आपण या देशाला महान् बनवूं शकतों असें व्हायला पाहिजे. माणसा-माणसांतले तंटे–मग ते एकाच प्रजेंतील दोन गटांत असोत किंवा दोन सरकारांमधले असोत ते–मिटविण्याचा आजपर्यंतचा रुळलेला हिंसामार्ग देशानें सोडून दिलेला असेल. अशा प्रसंगांना पुरें पडण्याची आपली शक्ति आहे असें हिंदुस्तान दाखवून देईल आणि नव्या दोन राज्यांचा झालेला जन्म हें एक अरिष्ट नसून साऱ्या मानवजातीला तें वरदान आहे असें तो जगापुढें सिद्ध करील, असा अजून मला विश्वास वाटतो. हिंदुस्तानचे स्वातंत्र्य खरोखर लाभकारी ठरायचें असेल तर सामुदायिक झगडे मिटविण्याच्या कामीं अहिंसेच्या साधनाचा वापर करण्यांत पूर्णता मिळविणें हा स्वतंत्र हिंदुस्तानाचा धर्म आहे. ७६

* * *

# : १२ : देशरक्षणाच्या कामीं सत्याग्रह

**प्रश्न :** १. हिंदुस्तानाला स्वातंत्र्य मिळवून देण्याला सत्याग्रह हा समर्थ आहे असें मानून चाललों, तर स्वतंत्र हिंदुस्तानांत तो सरकारी धोरणाचा पायाभूत सिद्धान्त म्हणून मानला जाण्याचा कितपत संभव आहे ? दुसऱ्या शब्दांत म्हणायचें तर, सामर्थ्यसंपन्न स्वतंत्र हिंदुस्तान स्वसंरक्षणाचा मार्ग म्हणून सत्याग्रहाचा अवलंब करील कीं बचावाच्या स्वरूपांत का होईना, जुन्या युद्धसंस्थेचा अवलंब करण्याकडे घसरत जाईल ?

२. समजा, स्वतंत्र हिंदुस्ताननें सरकारचें ठरलेलें धोरण म्हणून सत्याग्रहाचा स्वीकार केला, तर दुसऱ्या एखाद्या सार्वभौम सत्तेकडून होणाऱ्या संभाव्य हल्ल्याला कशा रीतीनें तोंड देऊन तो आपला बचाव करील ? हाच प्रश्न केवळ एक तात्त्विक समस्या घेऊन दुसऱ्या भाषेंत मांडतों. चढाई करून आलेल्या शत्रूला सरहद्दीवरच थोपविण्याकरितां सत्याग्रहाच्या उपाययोजनेचे नमुने कसे असतील ? आज हिंदी राष्ट्रवादी आणि ब्रिटिश सरकार यांच्यामध्यें जशी व्यवहाराची एक समान भूमिका आहे तसें नव्या शत्रूच्या बाबतींत झालेलें नाहीं तोंवर कोणत्या स्वरूपाचा प्रतिकार अमलांत आणावा ? कीं शत्रूनें देश ताब्यांत घेईपर्यंत सत्याग्रह्यानें आपली उपाययोजना तहकूब ठेवावी ?

**गांधीजी :** हे प्रश्न तात्त्विक आहेत हें गृहीतच आहे. अजून ते पक्तेलाहि आलेले नाहींत—या अर्थानें कीं मला अहिंसेचें सर्व तंत्र आकलन झालेलें आहे असें नाहीं. हा प्रयोग अजून अपूर्ण अवस्थेंत आहे. तो प्रगत अवस्थेलाहि पोंचलेला नाहीं. अशा स्वरूपाच्या प्रयोगाच्या बाबतींत एका वेळीं एकच पाऊल टाकण्यांत समाधान मानावें लागतें. फार दूरवरचें पाहणें त्याबाबतींत शक्य नसतें. म्हणून माझीं उत्तरें केवळ कल्पनात्मकच समजावीं.

वास्तविक, मी पूर्वीं म्हटल्याप्रमाणें आजच्या आपल्या स्वातंत्र्यसंपादनाच्या लढ्यांतसुद्धां निर्भेळ अहिंसा आलेली नाहीं.

पहिल्या प्रश्नाचें उत्तर म्हणजे सरकारी धोरणाचा सिद्धान्त म्हणून अहिंसेचा स्वीकार केला जाण्याचा संभव, आज मला जेवढें दिसत आहे त्यावरून, फार कमी वाटतो. स्वातंत्र्य मिळविल्यानंतर हिंदुस्ताननें अहिंसा हें जर आपलें धोरण म्हणून मानलें नाहीं तर दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर देण्याची गरज राहत नाहीं.

परंतु अहिंसेच्या शक्तीसंबंधींचें माझें व्यक्तिगत मत मी मांडतों. माझा असा विश्वास आहे कीं, जनतेपैकीं बहुसंख्य लोक जर अहिंसक असतील तर अहिंसेच्या पायावर सरकारचा कारभार हाकतां येईल. माझ्या माहिती-प्रमाणें हिंदुस्तान हाच एकटा असा देश आहे कीं जेथें अशा प्रकारचें राज्य स्थापन होण्याचा संभव आहे. त्या श्रद्धेवरच मी माझा प्रयोग चालविला आहे. म्हणून, समजा, हिंदुस्ताननें शुद्ध अहिंसेच्या मार्गानें स्वातंत्र्य संपादन केलें तर हिंदुस्तानाला तें त्याच मार्गानें संरक्षणेंहि शक्य होईल. अहिंसक व्यक्ति किंवा समाज बाहेरून हल्ले होण्याची कल्पना अगोदरच करून ठेवीत नांहीं किंवा त्याकरितां तरतूदहि करीत नाहीं. उलट, अशा व्यक्तीचा किंवा समाजाचा दृढ विश्वास असतो कीं कोणीहि आपल्याला त्रास द्यायला येणार नाहीं. पण समजा नको तें घडलें, तर अहिंसेपुढे दोन मार्ग खुले आहेत: आक्रमकाला आपलें सर्व असेल तें देऊन टाकायचें, पण त्याच्याशीं असहकार करायचा. उदा. समजा, नीरो-सारख्या क्रूर जुलमी बादशहाचा दुसरा अवतार हिंदुस्तानावर स्वारी करून आला, तर येथील सरकारचे प्रतिनिधी त्याला आंत येऊं देतील पण सांगतील कीं तुला लोकांची कसलीहि मदत मिळणार नाहीं. शरण जाण्या-पेक्षां ते मरण पत्करतील. दुसरा मार्ग म्हणजे अहिंसक प्रतिकाराचें शिक्षण मिळालेल्या लोकांकडून होणारा अहिंसक प्रतिकार. स्वतः निःशस्त्र राहून आक्रमकाच्या तोफांचें ते स्वतःला खाद्य बनवितील. दोन्ही उदाहरणांत विश्वास मुळांत हा धरला आहे कीं नीरोसारख्या पाषाणहृदयी सत्ताधाऱ्यालासुद्धां हृदय असतें. आक्रमकाच्या इच्छेला शरण जाण्यापेक्षां स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या एकामागून एक अखंड रांगा मरण पत्करीत आहेत या अनपेक्षित दृश्यानें त्या आक्रमकाचें हृदय आणि त्याच्या सैनिकांचीं हृदयें अंतीं विरघळलींच पाहिजेत. व्यावहारिक दृष्ट्या विचार

केला तर सशस्त्र प्रतिकार केला असतां जितकी मनुष्यहानि होण्याचा संभव आहे त्याहून जास्त हानि या मार्गानें होणार नाहीं. शिवाय, शस्त्र-सज्जतेकरितां आणि तटबंद्या उभारण्याकरितां त्यांत कांहीं खर्च नाहीं. लोकांना मिळालेल्या अहिंसेच्या शिक्षणानें त्यांच्या नैतिक उंचींत फार मोठी भरच पडेल. असे स्त्री-पुरुष ज्या दर्जाचें वैयक्तिक शौर्य दाखवितील तें सशस्त्र युद्धांत दाखविल्या जाणाऱ्या शौर्याहून किती तरी उच्च प्रतीचें असेल. दोहोंतहि जें शौर्य आहे तें मरण पत्करण्यांत आहे, मारण्यांत नाहीं. आणि शेवटचा मुद्दा हा कीं अहिंसक प्रतिकारांत पराजय म्हणून नाहींच. पूर्वीं असें कधीं घडलें नाहीं हें मी रेखाटलेल्या चित्राला प्रत्युत्तर नव्हे. मी कांहीं अगदींच अशक्य असें चित्र रेखाटलेलें नाहीं. मीं उल्लेखिलेल्या नमुन्याच्या व्यक्तिगत अहिंसेच्या उदाहरणांनीं इतिहास ओतप्रोत भरलेला आहे. स्त्रियांच्या किंवा पुरुषांच्या समूहांना पुरेसें शिक्षण दिल्यानें सामूहिक स्वरूपांत—म्हणजे समूह म्हणून किंवा राष्ट्र म्हणून—ते अहिंसक रीतीनें वागणार नाहींत असें म्हणण्याला किंवा मनांत आणण्याला कांहीं आधार नाहीं. किंबहुना, मनुष्यजातीच्या आजपर्यंतच्या अनुभवाचें सार हें आहे कीं माणसें कशीं का होईना जगतात. या वस्तुस्थितीवरून मी असें अनुमान काढतों कीं मनुष्यजातीवर सत्ता चालविणारा कायदा प्रेमाचा आहे. हिंसेची म्हणजे द्वेषाची जर आमच्यावर सत्ता असती तर आपण यापूर्वीं केव्हांच नष्ट झालों असतों. आणि तरी दुःखाची गोष्ट ही आहे कीं, सुधारलेलीं म्हटलीं जाणारीं माणसें आणि राष्ट्रें अशा रीतीनें वागतात कीं जणूं समाजाचा आधार हिंसा हा असावा. प्रेम हाच जीवनाचा सर्वोच्च व एकमेव कायदा आहे हें सिद्ध करणारे प्रयोग करण्यांत मला अनिर्वचनीय आनंद वाटतो. त्याविरुद्ध असणारा पुरावा पुष्कळ असला तरी माझी श्रद्धा ढळावयाची नाहीं. हिंदुस्तानाच्या भेसळ अहिंसेचीसुद्धां माझ्या विचाराला पुष्टीच मिळाली आहे. परंतु एखाद्या अश्रद्ध मनुष्याचीं खात्री पटविण्याइतका जरी तो पुरावा पुरेसा नसला तरी स्नेहभाव बाळगणाऱ्या टीकाकाराला अनुकूल वाटण्याइतपत तो आहे. १

**प्रश्न** : हिंदुस्तानावर कोणी चढाई करून आले तर अहिंसक असहकाराचें

शस्त्र कसें उपयोगीं पडेल यासंबंधी कांहीं नवीन योजना आपण सांगणार आहां असें ऐकलें. आपण त्यासंबंधींची कांहीं कल्पना देऊं शकाल का ?

**गांधीजी** : तुम्ही ऐकलेंत तें चुकीचें आहे. माझ्या मनांत कसलीच योजना नाहीं. तशी असती तर ती मी तुम्हांला सांगितली असती. तुम्ही म्हणतां तशा परिस्थितींत निर्भेळ अहिंसक असहकार अमलांत यावा आणि सबंध देशानें त्याला अनुकूलता दर्शविली आणि एकमतानें तो अमलांत आणला तर रक्ताचा एक थेंबहि न सांडतां, जपानचीं शस्त्रास्त्रें-किंवा आणखी अनेक शस्त्रास्त्रांचा संगम झाला तरी तीं-निर्वीर्य होतील हें मी दाखवीन, हें जें मी पूर्वी सांगितलें आहे त्याहून मला अधिक कांहीं सांगण्याची गरज आहे असें वाटत नाहीं. याकरितां हिंदुस्तानचा असा निर्धार झाला पाहिजे कीं कोणत्याहि बाबीसंबंधीं दयामाया दाखवायची नाहीं आणि लक्षावधि जीवांचा बळी देण्याची तयारी ठेवायची. परंतु एवढी किंमत मी स्वस्तच समजतों आणि या किंमतीला मिळालेला जय गौरवशाली मानतों. ही किंमत द्यायची हिंदुस्तानची कदाचित् तयारी असणार नाहीं अशी शक्यता आहे. तो संभव खरा ठरणार नाहीं अशी मला आशा वाटते, पण अशी कांहीं तरी किंमत कोणत्याहि देशाला आपलें स्वातंत्र्य टिकविण्याकरितां द्यावीच लागेल. रशियाच्या आणि चीनच्या लोकांनीं केलेला त्याग पहा, तो किती प्रचंड प्रमाणावर आहे. आणि ते सर्वस्व द्यायला तयार आहेत. हीच गोष्ट इतर देशासंबंधींहि म्हणतां येईल, मग ते आक्रमक असोत किंवा बचाव करणारे असोत. ही किंमत फार जबर आहे. म्हणून, इतर देशांना जी जोखीम पत्करावी लागत आहे आणि हिंदुस्तानने सशस्त्र प्रतिकार करायचा म्हटलें तर जेवढी जोखीम त्याला पत्करावी लागेल त्याहून अधिक जोखीम अहिंसक तंत्राचा स्वीकार करून पत्करायला हिंदुस्तानाला मी सांगत नाहीं.

**प्रश्न** : परंतु निर्भेळ अहिंसक असहकार ग्रेट ब्रिटनच्या बाबतींत कांहीं यशस्वी झालेला नाहीं. तर नव्या आक्रमक शत्रूच्या बाबतींत तो कसा यशस्वी होणार ?

**गांधीजी** : माझा या विधानाला संपूर्णपणें विरोध आहे. निर्भेळ स्वरूपाचा अहिंसक असहकार यशस्वी झालेला नाहीं असें आतांपर्यंत मला

कोणी सांगितलेलें नाहीं. तो कोणी अंमलांतच आणला नाहीं ही गोष्ट खरी. म्हणून, आजपर्यंत जें अंमलांत आणलें नाहीं तें हिंदुस्तानापुढें जपानी सैन्य येऊन ठाकलें असतां लगेच अंमलांत येण्याचा संभव नाहीं असें म्हणा वाटलें तर. वेळप्रसंग आला कीं हिंदुस्तान अहिंसक असहकार अंमलांत आणायला जास्त तयार होईल अशी फक्त मी अपेक्षाच करूं शकेन. ब्रिटिश सत्तेशीं हिंदुस्तानची इतकीं वर्षें घसट पडली आहे कीं त्यामुळें हिंदुस्तानच्या मनाला किंवा हिंदी जनतेला ती इतकीशी खुपतच नाहींशी झाली असावी कदाचित्, नवी सत्ता आली तर ती जास्त खुपेल. अर्थात् तुमचा प्रश्न तुम्ही चांगला मांडला आहे. हिंदुस्तान कदाचित् अहिंसक असहकार अंमलांत आणण्याला समर्थहि होणार नाहीं अशी शक्यता आहे. परंतु सशस्त्र प्रतिकाराच्या बाबतींतसुद्धां असाच प्रश्न पुढें मांडतां येईल. तशा स्वरूपाचे कितीएक प्रयत्न झाले आहेत आणि त्यांना यश आलेलें नाहीं, तेव्हां जपान्यांचें आक्रमण झालें असतां सशस्त्र प्रतिकारहि यशस्वी होणार नाहीं. हीच तर्कपद्धति आपण पुढें चालविली तर अशा मूर्खपणाच्या निर्णयाला आपण येतों कीं, हिंदुस्तान स्वातंत्र्य संपादण्याला कधींच तयार होणार नाहीं. पण असला सिद्धान्त मी मान्य करूं शकत नसल्यामुळें हिंदुस्तान अहिंसक असहकाराच्या हांकेला ओ देण्याला तयार होईपर्यंत मला पुनः पुनः प्रयत्न करावा लागेल. पण हिंदुस्तान अहिंसेच्या हांकेला जर ओ देणार नसेल तर त्याला हिंसेशीं संबद्ध असलेल्या दुसऱ्या कोणत्या तरी पुढाऱ्याच्या किंवा संघटनेच्या आवाहनाला साथ द्यावी लागेल. पण तशा कोणालाहि या प्रयत्नांत यश येणार नाहीं असें माझें मत आहे. २

**एक जर्मन** : ऱ्हाइनलंडमध्यें ( पहिल्या महायुद्धांत ) आम्ही जर्मनांनीं फ्रान्सचा अहिंसक प्रतिकार केला, पण शेवटीं आम्हांला शरणच जावें लागलें.

**गांधीजी** : तुमचें म्हणणें पूर्णपणें चुकीचें आहे. तुम्ही अहिंसक नव्हता. अहिंसक मनुष्याला शरण जाण्याची मुळींसुद्धां गरज नाहीं. आपल्याला शरण जावें लागलें असें तुम्ही म्हणतां याचा अर्थ तुमच्या

निःशस्त्र प्रतिकाराची शक्ति संपली होती. तसें जर नसतें तर फ्रेंचांना त्या भागांतला एकूण एक जर्मन कापावा लागला असतां. त्यांत फ्रान्सची नाचक्की झाली असती. थर्मापिलीची खिंड ज्यांनीं लढविली त्या सहाशें ग्रीक योद्धयांचें उदाहरण लक्षांत आणा. त्यांनीं केलेला प्रतिकार हिंसक होता, पण शेवटचा माणूस पडेपर्यंत ते लढले आणि म्हणून जगांत त्यांची पूजा होत आहे.

**जर्मन :** आम्हीं हिंसक प्रतिकार केला नाहीं तर आमचें नांवनिशाणहि राहणार नाहीं.

**गांधीजी :** तेंच आतांपर्यंत जगानें केलें. आतां माझ्यासारखा एक माणूस पुढें येतो आणि माणसामाणसांतल्या संबंधांचे नियम घालून देण्याचा एक वेगळा मार्ग दाखवितो. हिंसेनें प्रतिकार करणारीं माणसें शेवटच्या माणसापर्यंत मेल्याचें इतिहासांत नमूद नाहीं. कांहीं एका मर्यादित संख्येपर्यंत तें प्राणार्पण करतात. जर्मन लोकांनीं कांहीं एका मर्यादेपर्यंत प्राणार्पण केलें आणि मग ते शरण गेले. तसें करण्यानें लांच्छन आलें असें नाहीं, पण मी म्हणतों तसा प्रसंग इतिहासांतच घडलेला नाहीं. तसा जर एखादा मानववंश जन्माला आला तर कोणीहि राष्ट्र त्याच्यावर हात टाकूं शकणार नाहीं अशी माझी नितान्त श्रद्धा आहे. २

## काश्मीर-रक्षण

एखाद्याचा हिंसेवर विश्वास असला तरी ज्या बाबतींत तो गौरवाला पात्र असेल त्या बाबतींत त्याचा गौरव केलाच पाहिजे, तो नाकारणें हें माझ्या अहिंसेंत बसत नाहीं. उदाहरणार्थ, सुभाषबाबूंचा हिंसेवरील विश्वास आणि तदनुसार त्यांच्याकडून झालेली कृति मला मान्य नव्हती तरी त्यांच्या देशभक्तीची, योजकतेची आणि शौर्याची मनसोक्त स्तुति करण्याला मी मागेंपुढें पाहिलें नाहीं. याचप्रमाणें, काश्मीरी लोकांना मदत करण्याकरितां भारतसरकारनें जो शस्त्रांचा वापर केला तो मला मान्य नसला आणि शेख अब्दुल्लांनी जो शस्त्रांचा आश्रय घेतला तोहि मला पसंत नसला तरी दोघांनींहि जी योजकता आणि प्रशंसनीय वर्तणूक दाखविली, विशेषतः काश्मीरी सैन्यांतील आणि त्यांच्या कुमकेला गेलेल्या

हिंदी सैन्यांतील प्रत्येक सैनिक जर शूराच्या मरणानें मेला असेल तर, त्याबद्दल त्यांचा गौरव केल्यावांचून राहणें मला शक्य नाहीं. तसें शौर्याचें मरण जर त्यांनीं पत्करलें असेल तर ते कदाचित् हिंदुस्तानचें रूपच पालटून टाकतील, याची मला जाणीव आहे; परंतु जर हा बचाव विचारांत आणि आचारांत शुद्ध अहिंसक असता तर मी वर ' कदाचित् ' हा शब्द वापरला तो वापरला नसता; कारण अशा अहिंसक बचावानें भारताचें रूप पालटेलच याविषयीं माझी खात्री आहे, एवढेंच नव्हे तर भारतीय मंत्रिमंडळाचें-पाकिस्तानी मंत्रिमंडळाचेंहि कां म्हणूं नये—त्या योगें मन पालटून तें आहिंसक पद्धतीनें बचाव करणाऱ्यांच्या मताकडे वळेल.

मी जें अहिंसक तंत्र सुचवूं इच्छितों तें हें कीं संरक्षक स्वयंसैनिकांना कसलीहि शस्त्रांची मदत पुरवावयाची नाहीं. अहिंसक मदत भारत-सरकारकडून यावयाची असेल तर ती वाटेल तेवढी त्यानें पाठवावी. परंतु अशी मदत येवो न येवो, हे अहिंसक संरक्षक चढाई करून येणाऱ्याच्या बळाला किंवा प्रचंड संख्येनें असलेल्या शिस्तबद्ध सैन्यालासुद्धां तोंड देतील आणि असे हे संरक्षक, अंतःकरणांत यत्किंचितहि द्वेषभावनेला किंवा क्रोधाला थारा न देतां, आणि शस्त्रांचाच काय आपल्या हातांचाहि उपयोग न करतां आपल्या नेमलेल्या ठिकाणीं मरत आहेत, हें शौर्याचें दृश्य इतिहासांतसुद्धां अभूतपूर्व असें होईल. मग काश्मीर हिंदुस्तानांतच नव्हे तर साऱ्या जगभर आपला सुवास दरवळून सोडणारी पुण्यभूमि होईल.

अहिंसक उपाययोजना म्हणजे काय तें मीं सांगितलें खरें, पण माझ्या शब्दांत आज ती ताकद उरलेली नाहीं आणि त्या दृष्टीनें माझी दुर्बळता मला कबूल केली पाहिजे; ती ताकद, गीतेच्या स्थितप्रज्ञ - वर्णनांत सांगितल्याप्रमाणें, स्वतःवर पूर्ण स्वामित्व मिळाल्यानेंच येते. त्याकरितां अवश्य असणारी तपश्चर्या माझी नाहीं. ईश्वराला माझी प्रार्थना आहे कीं, तुझ्या मनांत असेल तर तशी पात्रता देऊन तूं मला सबळ कर. ४

**प्रश्न** : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या अहिंसेचें पुढें काय? आपलें अहिंसेचें धोरण आपण कोठवर अंमलांत आणणार आहां?

**गांधीजी** : हा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. हिंदुस्तानच्या मानसासंबंधीं माझी जी कल्पना आहे त्या कल्पनेप्रमाणें त्या मानसाचें प्रातिनिधित्व

करण्याचा मी प्रयत्न करीत आहें. तें मिश्रस्वरूपाचें आहे आणि तसेंच असणार. राष्ट्रीय सरकार कोणतें धोरण अंगीकारील तें मला सांगतां येणार नाहीं. माझी इच्छा असली तरीसुद्धां तोंवर मी जगेन कीं नाहीं कोणास ठाऊक. जर जगलों वांचलों तर शक्य तितक्या पराकाष्ठेनें अहिंसेचा अंगीकार करण्याचा मी त्या सरकारला सल्ला देईन आणि तीच हिंदुस्तानची जगाच्या शांतीप्रीत्यर्थ आणि नव्या युगाच्या प्रस्थापनेच्या कामीं मोठी कामगिरी ठरेल. हिंदुस्तानांत पुष्कळ लढाऊ जमाती आहेत आणि त्या सर्वांचा त्या काळच्या सरकारांत हात असणारच, तेव्हां राष्ट्राचें धोरण सौम्य स्वरूपाचें का असेना लष्करीकरण करण्याकडे झुकतें असेल अशी माझी अटकळ आहे. अर्थात् राजकीय शक्ति म्हणून अहिंसेची कार्यसाधकता दाखवून देण्याचे गेल्या बावीस वर्षांचे सर्व प्रयास फुकट जाणार नाहींत आणि शुद्ध स्वरूपाची अहिंसा प्रकट करणारा एक शक्तिशाली पक्ष देशांत राहील अशी मला आशा वाटते. ५

अहिंसक उपाययोजना अंमलांत आणण्याकरितां कल्पनेनें पुढील तीन गोष्टी गृहीत धराव्या लागतात आणि हिंदुस्तान त्या गोष्टींची पूर्तता करण्याला समर्थ नाहीं असा एका मित्राचा आक्षेप आहे. त्या तीन गोष्टी म्हणजे :

( १ ) स्वातंत्र्याची इच्छा आणि त्याची मागणी करण्याच्या बाबतींत लोकांचें संपूर्ण एकमत असलें पाहिजे;

( २ ) सत्याग्रहाचें तत्त्व त्यांत अंतर्भूत असलेल्या सर्व विचारांसह पूर्णपणें लोकांना पसंत होऊन तें त्यांच्यांत भिनलेलें असलें पाहिजे, आणि म्हणून, सूड-बुद्धीनें म्हणा किंवा स्वसंरक्षणाच्या दृष्टीनें म्हणा, हिंसेचा आधार घेण्याची स्वाभाविक प्रेरणा त्यांना आवरतां आली पाहिजे; आणि

( ३ ) असंख्य लोक आत्मक्लेश भोगत आहेत हें दृश्य पाहून आक्रमकाचें हृदय विरघळेल आणि आपल्या हिंसेच्या मार्गापासून परावृत्त होण्याची त्याला बुद्धि होईल असा गाढ विश्वास असला पाहिजे.

या आक्षेपाला माझें उत्तर असें आहे कीं, अहिंसक उपाययोजना अंमलांत आणण्याकरितां पूर्ण एकमत असलेंच पाहिजे हें कांहीं आवश्यक नाहीं. तसें असतें तर त्या उपायात विशेष गुण तो काय ? कारण पूर्ण

ऐक्य झालें कीं हां हां म्हणतां स्वातंत्र्य येईल. अगदीं मूठभर सच्चे सत्याग्रही-सुद्धां स्वातंत्र्य आणण्याला पुरेसे आहेत हें मी अनेक वेळां सांगितलें आहे. आधुनिक युद्धशास्त्रांत तयार झालेलें जितकें मोठें सैन्य लागेल त्याहून सत्याग्रह्यांचें लहान सैन्य आपल्याला पुरेल असें माझें म्हणणें आहे, आणि त्याकरितां होणारा खर्च शस्त्रास्त्रांवर होणाऱ्या राष्ट्रांच्या अवाढव्य खर्चापेक्षां किती तरी पटींनीं कमी होईल.

दुसरें गृहीतकृत्यहि आवश्यक नाहीं. सत्याग्रहाचें तत्त्व त्यांत अंतर्भूत असलेल्या सर्व गोष्टींसह जर सर्वांच्या पचनीं पडणें अवश्य मानलें तर मोठमोठ्या जनसमुदायांकडून सत्याग्रह ही वस्तु अशक्यच होईल. त्या सर्व गोष्टी माझ्या पचनीं पडल्या आहेत किंवा त्या सर्व मला समजल्या आहेत असेंसुद्धां मी म्हणूं शकत नाहीं. सैन्यांतल्या प्रत्येक शिपायाला कांहीं सगळें लष्करी शास्त्र माहीत नसतें; तसेंच प्रत्येक सत्याग्रह्याला सत्याग्रहाचें संपूर्ण शास्त्र माहीत असतें असें नाहीं. त्याचा आपल्या सेनापतीवर विश्वास असला, त्याचे हुकूम तो इमानानें पाळत असला आणि शत्रु म्हटल्या जाणाऱ्याविषयीं अंतःकरणांत यत्किंचितहि रोष न बाळगतां मृत्यु पत्करायला तो तयार असला म्हणजे पुरें आहे.

तिसरी गृहीत गोष्ट मात्र आवश्यक आहे व ती पुरी झाली पाहिजे. मी ती सांडतांना निराळ्या भाषेंत मांडीन, पण त्याचा शेवटीं मथितार्थ जवळ जवळ तोच असेल. ही तिसरी गोष्ट गृहीत धरण्याला इतिहासांत कांहीं पुरावा नाहीं, कदाचित् अशोकाचें उदाहरण हा एक अपवाद असेल, असें त्या मित्राचें म्हणणें आहे. परंतु माझ्या कामाकरितां अशोकाचें उदाहरण घेण्याचीसुद्धां गरज नाहीं. इतिहासांत तसें उदाहरण माझ्या माहितीप्रमाणें तरी नाहीं हें मी कबूल करतों. म्हणूनच हा प्रयोग अद्वितीय असल्याचें मला म्हणावें लागतें. आपण कुटुंबांत किंवा मोठ्या घराण्यांत जें करतों तेंच मी इकडे लावतों असें मी मांडलें आहे. मानवजात हें एक महान् कुटुंब आहे, आणि जें प्रेम व्यक्त होतें तें जर गाढ असेल तर तें साऱ्या मानवजातीला लागू झालें पाहिजे. जर व्यक्तींनासुद्धां रानटी लोकांच्या संबंधांत यश मिळालें आहे, तर मग व्यक्तिसमूहाला रानटी लोकांच्या समूहाच्या बाबतींत यश कां मिळूं नये ? इंग्रजांच्या बाबतींत जर

आपल्याला यश मिळूं शकलें तर त्यांच्याहून कमी संस्कारांच्या किंवा कमी उदार मताच्या राष्ट्रांच्या बाबतींत यश मिळण्याचा संभव आहे असें मानणें म्हणजे फक्त आपली श्रद्धा अधिक विस्तृत करणें आहे. जर आपल्याला इंग्रजांच्या बाबतींत निर्भेळ अहिंसक प्रयत्नांनीं यश मिळूं शकलें तर इतरांच्याहि बाबतींत आपल्याला यश मिळालेंच पाहिजे असें माझें मत आहे; किंवा हेंच दुसऱ्या शब्दांत म्हणायचें तर, जर आपण अहिंसेनें स्वातंत्र्य मिळविलें तर त्याच शस्त्रानें आपण त्याचें रक्षणहि करूं. तेवढा विश्वास जर आपल्यांत आला नसेल तर आपली अहिंसा म्हणजे केवळ एक प्रसंगापुरतें योजलेलें साधन आहे, ती हिणकस आहे, तें शुद्ध सोनें नव्हे. ६

**प्रश्न :** तुमच्या अहिंसक असहकाराची जी शक्ति इंग्रजांना येथून काढता पाय घ्यायला लावायला समर्थ ठरेल ती जपान्यांचें आक्रमण थोपवून धरण्याइतकी बलशाली होईल असें तुम्हांला वाटत नाहीं काय ?

**गांधीजी :** जुन्या आक्रमकाला धक्का देण्याकरितां जी उपाययोजना पुरेशी होईल त्याहून अगदीं निराळ्या प्रकारची उपाययोजना नव्या आक्रमकाला येथें पाय ठेवूं न देण्याकरितां करावी लागेल. उदाहरणार्थ, आपण ब्रिटिशांची सत्ता करबंदी करून किंवा अशाच अनेक मार्गांनी अमान्य करूं शकूं. पण हे उपाय जपान्यांचा हल्ला थोपविण्याला लागू होऊं शकणार नाहींत. ७

**प्रश्न :** एक निःशस्त्र तटस्थ देश इतर राष्ट्रांचा नाश कसा होऊं देईल ? गेल्या युद्धांत आमच्या ( स्विट्झर्लंडच्या ) सरहद्दीवर आमचें सैन्य जर उभें नसतें तर आमचा नाश झाला असता.

**गांधीजी :** एक स्वप्नदर्शी किंवा पागल म्हणून जरी मी म्हटला गेलों तरी मला माहीत असलेल्याच रीतीनें या प्रश्नाला उत्तर मला द्यावें लागेल. एखाद्या तटस्थ देशानें आपल्या शेजारच्या राष्ट्राचा एखाद्या सैन्याला विध्वंस करूं देणें हें भ्याडपणाचें होईल. पण हिंसक युद्धाचें सैनिक आणि अहिंसेचे सैनिक या दोघांचें दोन मार्गांच्या बाबतींत साधर्म्य आहे, आणि मी जर स्विट्झर्लंडचा नागरिक आणि त्या संघराज्याचा अध्यक्ष असतों

तर मी असें केलें असतें कीं, दुसऱ्या देशावर चढाई करून जाणाऱ्या सैन्याला सर्व प्रकारची रसद पुरविण्याचें बंद करून त्यांना मार्ग देण्याचें नाकारलें असतें; दुसरी गोष्ट म्हणजे स्विट्झर्लंडमध्यें दुसरी थर्मापिली* घडवून आणण्याचें ठरवून तुम्हांला स्त्री-पुरुष-मुलांची एक जिवंत तटबंदी शत्रुसैन्यापुढें उभी करतां आली असती आणि, आमच्या प्रेतांवरून चालत जा, असें तुम्ही त्यांना आवाहन केलें असतें. ही गोष्ट मनुष्याच्या अनुभवाच्या आणि सहनशक्तीच्या पलीकडची आहे असें तुम्ही म्हणाल. तसें नाहीं असें माझें म्हणणें आहे. गेल्या वर्षीं ( १९३० सालीं ) गुजरातमध्यें स्त्रियांनीं कच न खातां लाठीमार अंगावर घेतला, आणि पेशावरमध्यें हजारों लोकांनीं आपल्या छातीवर गोळ्या झेलल्या पण पोलिसांवर हात टाकला नाहीं. दुसऱ्या देशावर चालून जाणाऱ्या सैन्याला सुरक्षित रस्ता पाहिजे आहे आणि तो न देण्याकरितां या सैन्यासमोर अहिंसक स्त्री-पुरुष उभे आहेत असें चित्र डोळ्यांपुढें आणा. तुम्ही म्हणाल सैन्यांतलीं माणसें पशु असतात, तीं खुशाल त्यांच्यावरून चालून जातील. तरी, मी म्हणेन कीं तुम्ही आपली फना करूं देऊन आपलें कर्तव्य बजावलेंत. जें सैन्य निर्दोषी स्त्री-पुरुषांचीं प्रेतें तुडवीत जाऊं शकतें तें तसा प्रयोग पुनः करूं शकणार नाहीं. स्त्री-पुरुष जनसमुदायाकडून इतक्या धैर्याची अपेक्षा करतां येईल यावर तुम्ही विश्वास नका ठेवूं वाटलें तर. पण मग तुम्हांला अहिंसेचें पाणी कांहीं वेगळेंच असतें हें मान्य करावें लागेल. तें दुर्बलांचें शस्त्र कधींच कल्पिलेलें नाहीं, तें अत्यंत मजबूत हृदयाच्या लोकांचें शस्त्र म्हटलें आहे. ८

अत्यंत दुर्बळ असलेलें राष्ट्रसुद्धां, जर अहिंसेची विद्या शिकलें तर, बाहेरच्या हल्ल्यापासून स्वतःला निर्भय राखूं शकेल. परंतु, एखादें लहानसें राष्ट्र कितीहि शस्त्रसंभारानें शक्तिसंपन्न झालेलें असो, शस्त्रसज्ज अशा राष्ट्रांच्या बलवान् जुटीपुढें तें टिकूं शकणार नाहीं. त्याला त्या राष्ट्रगटापैकीं कोणत्यातरी एका राष्ट्रांत सामील होऊन जावें लागेल किंवा त्याच्या संरक्षणाखालीं राहावें लागेल. ९

---

* ( किंवा महाराष्ट्राला समजणाऱ्या भाषेंत दुसरी 'पावन खिंड' -अनुवादक )

**प्रश्न** : ( १ ) शस्त्रसज्ज इटालीच्या विरुद्ध तुटपुंज्या शस्त्रांचा अबिसीनिया जर अहिंसक झाला तर काय करूं शकेल ?

( २ ) इंग्लंड हें राष्ट्रसंघांतील एक अत्यंत महान् बलिष्ठ सभासद-राष्ट्र आहे. तें जर आपल्या अहिंसेच्या अर्थानुसार अहिंसक होईल तर त्याला इटालीच्या निर्धाराच्या हल्ल्याविरुद्ध काय करतां येईल ?

**गांधीजी** : या दोन प्रश्नाचीं उत्तरें देण्यापूर्वीं अहिंसेसंबंधींचीं पांच साधीं सिद्धान्तसूत्रें मला माहीत आहेत त्याप्रमाणें मांडण्याची मी परवानगी घेतों. तीं सूत्रें पुढीलप्रमाणें :

( १ ) अहिंसेंत मनुष्यमात्राला शक्य असेल इतकी पूर्ण आत्मशुद्धि गृहीत आहे.

( २ ) व्यक्ती व्यक्ती अनुसार अहिंसक मनुष्यांत हिंसा करण्याचें जितक्या प्रमाणांत सामर्थ्य असेल तितक्याच प्रमाणांत त्याच्यांत अहिंसेची शक्ति असते.

( ३ ) अहिंसा ही निरपवादपणें हिंसेहून श्रेष्ठ आहे; म्हणजे, एखादा मनुष्य हिंसक असतां त्याला जेवढी शक्ति प्राप्त होईल त्याहून नेहमीं अधिक शक्ति तो अहिंसक असल्यामुळें त्याला उपलब्ध असते.

( ४ ) अहिंसेंत पराभव अशी वस्तूच नाहीं. हिंसेचें पर्यवसान निश्चितपणें पराजयांत होतें.

( ५ ) अहिंसेचें अंतिम फल निःसंशय विजय हेंच असतें — अर्थात् अहिंसेच्या संबंधांत जय-पराजय हे शब्द वापरतां आले तर. वस्तुतः पराजयाची जेथें भावनाच नाहीं तेथें जयाचीहि भावना असणार नाहीं.

हे सिद्धान्त लक्षांत घेऊन वरील प्रश्नांचीं उत्तरें देतां येतील :

( १ ) अबिसीनिया जर अहिंसक असेल तर त्याच्याजवळ शस्त्रें असणार नाहींत, त्याला शस्त्रांची गरजहि वाटणार नाहीं. तो राष्ट्रसंघाला किंवा इतर कोणाहि राष्ट्राला सैन्यबळानें मध्यें पडण्याकरितां पाचारण करणार नाहीं. तो आपल्याविरुद्ध तक्रारीला कांहीं जागा ठेवणार नाहीं. आणि अबिसीनियाचे लोक जर सशस्त्र प्रतिकार करणार नसतील किंवा खुशी-

नाखुषीचें सहकार्यहि देणार नसतील तर इटालीला अबिसीनिया जिंकण्यांत स्वारस्यहि वाटणार नाहीं. तशा परिस्थितींत इटालीनें त्या देशाचा ताबा घेणें म्हणजे लोकांशिवाय केवळ जमिनीचा ताबा घेणें असा अर्थ होईल. अर्थात् तो कांहीं इटालीचा हेतु नाहीं. त्या सुंदर भूमीच्या लोकांची शरणागति त्यांना पाहिजे आहे.

( २ ) इंग्रज लोक राष्ट्र म्हणून जर मनानें अहिंसक होणार असतील तर ते साम्राज्यवाद सोडून देतील, शस्त्रांचा वापर सोडून देतील. त्यांच्या या अशा त्यागानें जी नैतिक शक्ति निर्माण होईल त्यायोगें इटाली गडबडून जाईल आणि आपले सारे बेत स्वखुषीनें सोडून देईल. मग इंग्लंड हें मी वर सांगितलेल्या सिद्धान्ताची जिवंत मूर्ति होईल. अशा प्रकारचें हृदय-परिवर्तन म्हणजे युगायुगांतील सर्वांत मोठा चमत्कार मानला जाईल. आणि तरीहि, अहिंसा ही जर निव्वळ स्वप्नच राहायची नसेल तर अशा प्रकारची कांहीं ना कांहीं घटना कोठे ना कोठें केव्हां ना केव्हां घडून यावीच लागणार आहे. त्या श्रद्धेवरच मी जगत आहें. १०

**प्रश्न** : हे हुकूमशहा चाणाक्षपणें बळाचा वापर टाळतात पण आपल्याला जें पाहिजे त्याचा सरळ ताबा घेऊन टाकतात. अशा परिस्थितींत अहिंसक प्रतिकार करणाऱ्यांनीं काय करावें ?

**गांधीजी** : समजा हिटलरचें सैन्य झेकोस्लोव्हाकियांत आलें आणि त्यांनीं झेक लोकांच्या खाणींचा, कारखान्यांचा आणि नैसर्गिक संपत्ति निर्माण करणाऱ्या साधनसामुग्रींचा ताबा घेतला, तर पुढील परिणाम घडून येतील : ( १ ) हुकुमांचा भंग करण्याबद्दल झेक लोकांचा निःपात केला जाईल; तो झेक लोकांचा गौरवशाली विजय आणि जर्मनीच्या पतनाचा प्रारंभ ठरेल; ( २ ) प्रचंड सैन्याच्या सान्निध्यामुळें झेक लोकांत नीति-भ्रष्टता येईल. असा परिणाम सर्वच युद्धांतून सामान्यपणें निघतो. परंतु जर नीतिभ्रष्टता आलीच तर ती अहिंसेमुळें नसून अहिंसा नसल्यामुळें किंवा ती अपुरी पडल्यामुळें येईल; ( ३ ) तिसरी एक गोष्ट अशी घडून येण्याचा संभव आहे कीं, जर्मनीनें ज्या प्रदेशाचा ताबा घेतला तेथें ते आपली वाढलेली लोकसंख्या आणून वसवितील. ही गोष्टसुद्धां

हिंसक प्रतिकारानें टाळणें शक्य होणार नाहीं; कारण हिंसक प्रतिकार अशक्यच आहे असें आपण गृहीत धरलें आहे. म्हणून कल्पना करता येण्याजोग्या सर्व परिस्थितींत अहिंसक प्रतिकार हाच सर्वोत्तम मार्ग आहे. ११

" हिटलरसारख्याला दयामाया नसते. तुमच्या आध्यात्मिक साधनेचा त्याच्यापुढे कांहीं उपयोग होणार नाहीं. "

" तुमचें म्हणणें बरोबर असूं शकेल. कोणाहि राष्ट्रानें अहिंसक प्रतिकार करण्याचें अंगीकारलें असल्याचा दाखला आजवरच्या इतिहासांत नाहीं. माझ्या आत्मक्लेशांनीं हिटलरच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं तरी कांहीं हरकत नाहीं. त्यामुळें मी मोलाचें कांहीं गमावलें असें होत नाहीं. माझी इज्जत हीच एक संरक्षण करण्याजोगी वस्तु आहे. ती कांहीं हिटलरच्या कृपेवर अवलंबून नाहीं, पण अहिंसेवर जर माझी श्रद्धा असेल तर मी कां म्हणून तिच्या शक्तीला मर्यादा आहे असें मानावें ? आजपर्यंत हिटलरनें आणि त्याच्यासारख्या इतरांनीं, माणसें बळजोरीपुढे वांकतात, या नित्याच्या अनुभवावर विश्वास ठेवलेला आहे. स्त्रिया, पुरुष आणि मुलें निःशस्त्र राहून आपल्या अंतःकरणांत यत्किंचितहि कटुता न ठेवतां अहिंसक प्रतिकार करतात हा त्यांना एक नवाच अनुभव येईल. अधिक उदात्त आणि सूक्ष्म अशा शक्तींना अनुकूल असा प्रतिसाद देणें हिटलर-सारख्यांच्या स्वभावांत नाहीं असें छातीठोकपणें कोण सांगेल ? माझ्यांत जो आत्मा आहे तोच त्यांच्यांतहि आहे. १२

" तुम्ही सांगतां ती अहिंसा विमानांतून चालणाऱ्या युद्धक्रियेला कशी सामना देऊं शकणार ? कारण, त्या युद्धांत माणसाचा माणसाशीं वैयक्तिक संबंधच येत नाहीं. "

याचें उत्तर असें कीं, या विनाशकारी बॉंबच्या मागें तो टाकणारा हात आहे आणि त्या हाताच्या मागें त्याला गति देणारें मानवी हृदय आहे हें गृहीत धरलें आहे. आणि दहशतवादाच्या धोरणाच्या मागेंसुद्धां ही गोष्ट गृहीत धरलेली असते कीं पुरेशा प्रमाणांत दहशतवाद लागू केला कीं इष्ट परिणाम घडून येणारच, म्हणजे जुलूम करणाऱ्याच्या इच्छेपुढें प्रतिपक्षी वांकणारच. पण समजा, लोकांनीं ठरविलें कीं जुलूम करणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें आम्ही

वागणार नाहीं, किंवा त्याच्या पद्धतींनींच त्याच्यावर उलट आघात करणार नाहीं, तर जुलूम करणाऱ्याला आपला दहशतवाद चालू ठेवण्यांत कांहीं हंशील वाटणार नाहीं. जुलूम करणाऱ्याला भरपूर खाद्य देत गेलें तर केव्हांतरी एक वेळ अशीं येईल कीं जेव्हां पोटाला तडस लागेल इतकें आपल्याला खायला मिळालेलें आहे असें त्याला आढळून येईल. १३

आपला आत्मा जेत्याच्या स्वाधीन न करणें याचा अर्थ हा कीं आपली सदसद्विवेकबुद्धि जें आपल्याला करूं नको म्हणून म्हणेल तें करण्याचें नाकारणें, शत्रू ज्या अपमानकारक गोष्टी करायला सांगेल त्या न करणें. पण त्यानें तुमची मालमत्ता हिसकून घेतली तर ती तुम्ही त्याच्या स्वाधीन कराल, कारण, अहिंसेचा उपासक म्हणून तुम्ही प्रारंभींच ठरविलें आहे कीं ऐहिक परिग्रहाशीं आत्म्याला कांहीं कर्तव्य नाहीं. जें माझ्या मालकीचें आहे असें तुम्हांला वाटत असतें तें, जग तुम्हांला तुमचें म्हणूं देतें तोंवरच, तुम्ही आपल्यापाशीं ठेवूं शकतां.

आपलें मन शत्रूच्या आधीन न करणें म्हणजे तुम्ही कोणत्याहि मोहाला बळी न पडणें. मनुष्य हा पुष्कळ वेळां लोभाच्या आणि गोड गोड शब्दांच्या जाळ्यांत सांपडण्याइतका दुर्बळ मनाचा असतो. आपल्या रोजच्या सामाजिक व्यवहारांत आपण हें घडत असलेलें पाहतों. दुर्बळ मनाचा मनुष्य कधींहि सत्याग्रही होऊं शकणार नाहीं. सत्याग्रह्यानें नकार दिला म्हणजे तो नकारच आणि होकार म्हणजे होकारच असतो. अशाच मनुष्याला सत्य-अहिंसेचा उपासक होण्याचें सामर्थ्य असतें. पण या ठिकाणीं आग्रह किंवा स्थिर निश्चय आणि दुराग्रह किंवा हटवादीपणा यांतला भेद जाणून घेतला पाहिजे. एकदां ‘ होय ’ अथवा ‘ नाहीं ’ म्हटल्यानंतर आपला निर्णय चुकीचा आहे असें मागाहून आढळून आलें आणि तरीहि त्यालाच जर आपण चिकटून बसलों तर तो हटवादीपणा व मूर्खपणा होईल. कोणत्याहि निर्णयाला येण्यापूर्वीं सर्व गोष्टी काळजीपूर्वक आणि पुरत्या विचारांत घेणें आवश्यक असतें.

प्रभुत्व मानण्याला नकार देणें याचा अर्थ स्पष्ट आहे. जेत्याच्या श्रेष्ठत्वापुढें तुम्ही नमणार नाहीं. त्याच्या हेतुपूर्तीकरितां तुम्ही त्याला मदत करणार नाहीं. हिटलरला ब्रिटनचा ताबा घ्यावा असें स्वप्नांतहि वाटत नाहीं. ब्रिटिशांनीं पराभव मान्य करावा हें त्याला हवें आहे. जेता मग जितांकडून

हव्या त्या गोष्टींची मागणी करूं शकतो आणि जिताला नमल्यावांचून गत्यंतर राहत नाहीं. पण पराभव जर मान्य केला नाहीं तर शत्रु विरोध करणाऱ्याशीं लढतो आणि शेवटीं त्याला ठार मारतो. परंतु सत्याग्रह्याच्या बाबतींत शत्रु त्याला मारण्यापूर्वींच तो आपल्या शरीराला मेलेला असतो; म्हणजेच आपल्या शरीरविषयक आसक्तीपासून तो मुक्त झालेला असतो आणि केवळ आत्म्याच्या विजयाच्या रूपानेंच तो जगत असतो. म्हणून स्वतः अगोदर मरून गेलेला असल्यामुळें तो दुसऱ्याला मारण्याची तळमळ कशाला बाळगील ? मारीत असतांना मरणें म्हणजे मुळांतच पराभूत होऊन मरणें आहे. कारण, शत्रूला तुमच्याकडून जिवंतपणीं जें हवें आहे तें मिळविण्याला तो जर असमर्थ ठरला तर तुम्हांला मारून तें तो मिळविण्याचें ठरवील. उलट जर त्याला असें समजून आलें कीं आपला जीव वांचविण्यासाठींसुद्धां त्याच्याविरुद्ध हात उचलण्याचा लेशमात्रहि विचार तुमचा नाहीं तर तुम्हांला मारण्याचा उत्साहच त्याला राहणार नाहीं. प्रत्येक शिकाऱ्याला याचा अनुभव येतो. गायींची कोणी शिकार केल्याचें ऐकिवांत नाहीं. १४

**प्रश्न :** ‘ लुटारू ’ राष्ट्रांच्या बाबतींत काय उपाययोजना करावी ? अमेरिकेंत व्यक्तिगत लुटारूपणा चालत होता. तेथें स्थानिक आणि राष्ट्रीय प्रमाणावर कडक पोलीस उपाययोजना करून ही लूटमार मोडून काढण्यांत आली. अशाचसारखा कांहीं उपाय राष्ट्राराष्ट्रांत जी लूटमार आज चालू आहे तिच्यावर आपल्याला करतां येणार नाहीं काय ? आंतरराष्ट्रीय पोलीसदलासारखें कांहीं आपल्याला करतां येणार नाहीं काय ?

**गांधीजी :** हिंदुस्तानांतील परिस्थितीच्या बाबतींत मला तशाच स्वरूपाचे प्रश्न सोडवावे लागतात. आम्हांला येथें जातीय आणि कामगारांचे दंगेधोपे शमवावे लागतात. लोकांच्या मंत्र्यांनीं कांहीं बाबतींत लष्करी आणि बहुतेक सर्व बाबतींत पोलीस-बळाचा उपयोग केला आहे. मंत्र्यांना तसें करण्यावांचून गत्यंतर नव्हतें असें जरी मी मान्य केलें असलें तरी काँग्रेस-मंत्री आपल्या भांडवलाच्या बाबतींत दिवाळखोर ठरले असें मीं म्हटलें आहे. भांडवल म्हणजे त्यांनीं स्वीकारलेलें अहिंसेचें शस्त्र तरी तुमच्या प्रश्नासंबंधीं सांगायचें तर, जर जगांतील सर्वोत्तम व्यक्तींच्या मनावर अहिंसेचें तत्त्व बिंबलें नसेल तर त्यांना लुटारूपणाला जुन्या पद्धतीनेंच

तोंड द्यावें लागेल. पण त्याचा अर्थ असा होईल कीं आपण रानटीपणाच्या कायद्याच्या पलिकडे फारसें गेलेलों नाहीं, ईश्वरानें आम्हांला दिलेल्या वारसाचें मोल ओळखायला आपण शिकलों नाहीं, अनेक महान् धर्मांची शिकवण असूनसुद्धां माणसें म्हणून फारशी प्रगति केलेली नाहीं. अर्थात् ज्यांच्या चित्तांत अहिंसा ठसलेली नाहीं त्यांनी बळाचा उपयोग केला तर तो एक मला समजूं शकेल, पण ज्यांना अहिंसा समजली आहे त्यांनीं आपलें सारें वजन लुटारूपणालासुद्धां अहिंसेनें सामना दिला पाहिजे हें सिद्ध करण्याकरितां खर्च करावें असें मी म्हणेन. कारण, बळाचा उपयोग कितीहि वाजवी रीतीनें केला तरी तो शेवटीं आपल्याला हिटलर-मुसोलिनीं-च्या बळाप्रमाणें तशाच दलदलींत फसायला लावील. फक्त कमी-अधिक प्रमाणाचाच काय तो फरक राहील. आपण जे अहिंसेवर श्रद्धा ठेवणारे आहोंत त्यांनी आणीबाणीच्या वेळीं तिचाच उपयोग केला पाहिजे. लुटारूंच्या हृदयाला आपल्याला स्पर्श करतां आला नाहीं आणि यापुढे भिंतीवर डोकें फोडल्यासारखें होत आहे, पुढें रस्ता नाहीं असें जरी त्या वेळेपुरतें वाटलें, तरी आपण निराश होतां कामा नये. १५

[ गेल्या महायुद्धाच्या काळांत हिंदुस्थानावर जपानचें आक्रमण होणार अशी परिस्थिति आली होती त्या वेळीं श्री. मिराबहेन यांनीं गांधीजींना एक सविस्तर पत्र लिहून, जपाननें जर हा देश ब्रिटिशांपासूनच जिंकला आणि त्यांचीं सैन्यें आंत शिरलीं तर हिंदी जनतेनें अहिंसेनें त्यांना कसें तोंड द्यावें यासंबंधीं आपले विचार लिहून पुढें कांहीं अडचणी व प्रश्न विचारले होते, हे प्रश्न थोडक्यांत देऊन गांधीजींचीं उत्तरें शब्दशः दिलीं आहेत. —अनुवादक ]

प्रश्न : जपानी आक्रमक हे लोकांना त्यांची मजुरी, अन्न व साधन-सामुग्री यांच्या मोबदल्यांत ब्रिटिशांच्या चलनी नोटा देण्याचा संभव आहे. तेव्हां भरमसाट मोबदला मिळत असतांनासुद्धां लोकांनी मजुरी करण्याचें किंवा त्यांना आपला माल विकत देण्याचें नाकारावें काय ? फार काळपर्यंत जर हा प्रतिकार टिकवायचा असला तर या गोष्टींना आळा घालणें कठीण होईल. जपान्यांकडून कांहींहि काम किंवा मदत घेण्याचें लोक जोंवर नाकारतील तोंवरच त्यांची पिळवणूक केली जाण्याचा धोका टळेल.

**उत्तर :** लोकांनीं काय करावें यासंबंधीं आपण लोकांना सांगितलें पाहिजे असें मला वाटतें. अर्थात् त्यांच्या शक्तीप्रमाणें ते वागतील. त्यांच्या शक्तीविषयीं आपणच कयास बांधूं लागलों आणि त्याला धरून मार्गदर्शन करूं लागलों तर तें मार्गदर्शन धरसोडीचें आणि पड खाऊन अहिंसेला कमीपणा आणणारेंसुद्धां ठरेल, आणि तसें कांहीं आपल्याकडून घडतां कामा नये. याकरितां तें लक्षांत बाळगून माझ्या सूचना वाचाव्यात.

आपलें धोरण जपानी फौजेशीं संपूर्ण असहकाराचें आहे हें लक्षांत ठेवावें, म्हणून त्यांना कोणत्याहि रीतीनें आपल्याकडून मदत होतां कामा नये, किंवा त्यांच्याशीं लोकांनी व्यवहार करून फायदाहि करून घेतां कामा नये. म्हणून आपण त्यांना कांहीं विकूं शकणार नाहीं. जपानी फौजांना सामना देण्याचें सामर्थ्य जर लोकांत नसेल तर सशस्त्र सैनिक जें करतात तेंच ते करतील, म्हणजे पाडाव होतांच माघार घेतील. जर त्यांनीं तसें केलें तर जपान्यांशीं देवघेव करण्याचा प्रश्नच येणार नाहीं, येतां कामा नये. पण जर लोकांत जपान्यांना मरेपर्यंत प्रतिकार करीत राहण्याचा दम नसेल आणि त्यांनीं जिंकलेला मुलूख खाली करून सोडून जाण्याचें धैर्य व शक्ति नसेल तर कॉंग्रेसकडून दिल्या गेलेल्या मार्गदर्शक सूचना लक्षांत घेऊन ते आपल्याला त्यांपैकीं जेवढें करणें शक्य तेवढें करतील. एक गोष्ट मात्र त्यांनी केव्हांहि करूं नये, ती म्हणजे जपान्यांना आपखुषीनें शरण जाणें. तें भ्याडपणाचें आणि स्वातंत्र्यप्रेमी लोकांना न शोभणारें असें कृत्य होईल. एका आगींतून निघून कदाचित् त्याहून भयानक अशा दुसऱ्या आगींत पडायचें असें त्यांनी करूं नये. याकरितां त्यांची प्रवृत्ति नेहमीं जपान्यांना प्रतिकार करीत राहण्याचीच असली पाहिजे. म्हणून ब्रिटिशांच्या चलनी नोटा किंवा जपानी नाणीं स्वीकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. जपान्यांकडून येणारें कांहींसुद्धां ते हातांत धरणार नाहींत. आपल्याच लोकांशीं देवघेव करण्याच्या बाबतींत ते एक तर वस्तुविनिमयाची पद्धति अंगीकारतील किंवा जो कोणता ब्रिटिश पैसा त्यांच्यापाशीं असेल त्याचा ते उपयोग करतील— अर्थात् पुढें ब्रिटिश सरकारच्या जागीं जें राष्ट्रीय सरकार येईल तें आपल्या शक्ति-अनुसार सर्व ब्रिटिश पैसा लोकांकडून आपल्याकडे घेईल या आशेवरच.

**प्रश्न :** ब्रिटिशांनीं उडवून दिलेले पूल वगैरे बांधण्याचें काम जर

समजा जिंकणाऱ्या जपानी सेनेनें सुरू केलें, आणि हे पूल, कालवे वगैरे जनतेला जरूरच असणार, तर लोकांनीं त्या कामांत भाग घ्यावा कीं दूर राहावें ?

**उत्तर :** पूल इ. बांधण्याच्या कामीं सुद्धां लोकांनीं मुळींच सहकार करावयाचा नाहीं हें वरील उत्तरांत सांगितलेंच.

**प्रश्न :** सिंगापूर, ब्रह्मदेश येथे जे हिंदी सैनिक कैद होऊन जपानी फौजांबरोबर हिंदुस्तानच्या किनाऱ्यावर पाय ठेवतील, त्यांच्या बाबतींत आमचें धोरण काय असलें पाहिजे? जपान्यांप्रमाणेंच त्यांच्या बाबतींतहि आमचे बहिष्काराचें धोरणच असलें पाहिजे कीं त्यांना आमच्या विचार-सरणीकडे ओढण्याचा आपला प्रयत्न असला पाहिजे ?

**उत्तर :** हिंदी सैनिक जर येथील जनतेच्या संपर्कांत आले आणि त्यांचें मन आपल्याविषयीं स्वच्छ असलें तर आपण त्यांच्याशीं अवश्य बंधुभाव जोडावा आणि " तुम्हांला शक्य असेल तर स्वराष्ट्राला येऊन मिळा " असें आपण त्यांना पाचारण करावें. तुमचा देश विदेशी लोकांच्या जोखडा-खालून सोडवायची संधि तुम्हांला मिळेल असें आश्वासन देऊन कदाचित् त्यांना येथें आणलेलें असेल. आतां विदेशी जोखड राहणार नाहीं म्हणन ते जनतेशीं मित्रत्वाचें नातें जोडतील आणि ब्रिटिश सरकारच्या जागीं जें राष्ट्रीय सरकार आलेलें असेल त्याचे हुकूम ते पाळतील अशी त्यांच्या-विषयीं अपेक्षा बाळगली जाईल. ब्रिटिश जर जातांना सर्व सूत्रें हिंदी लोकांच्या हातीं देऊन सुव्यवस्थित रीतीनें निघून गेले असले तर सर्व कांहीं सुरळीतपणें चालेल व जपान्यांना हिंदुस्तानांत किंवा त्याच्या कोणत्याहि भागांत बिनघोरपणें स्थायिक होणें कठीण करतां येईल; कारण त्यांची अशा लोकांशीं गांठ पडलेली असेल कीं जे त्यांच्याशीं कसलाहि संबंध ठेवूं इच्छीत नाहींत, उलट जे त्यांचा प्रतिकार करतील. काय घडूं शकेल हें सांगणें कठीण आहे. प्रतिकाराची शक्ति अंगीं आणण्याचें वळण जर लोकांना लावलें तर तें पुरेसें आहे, मग सत्ता कोणतीहि असो—जपानी असो वा ब्रिटिश असो. १६

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................

## : १३ : युद्धाशीं असहकार

[ सरकारनें सशस्त्र युद्धांत भाग घ्यायचा असें ठरविलें आणि सक्तीची लष्करभरती सुरू केली तर युद्धाच्या पद्धतीवर ज्यांचा विश्वास नाहीं. आणि जे अहिंसेशीं व्रतबद्ध झाले आहेत त्यांना अहिंसेशीं इमानदार कसें राहतां येईल ? शस्त्रें हातीं धरण्याचें केवळ नाकारून ? —या प्रश्नाच्या उत्तरादाखल गांधीजी म्हणाले : ]

केवळ लष्करांत काम करण्याचें नाकारणें पुरेंसें नाहीं. विशिष्ट वेळ आली असतां लष्करी काम करण्याला नकार देणें म्हणजे त्या पापाशीं लढा करण्याची जी वेळ होती ती सगळी जवळ जवळ संपल्यानंतर लढा देणें आहे. लष्करी काम हें एका रोगाचें चिह्न आहे आणि तो रोग फार खोलवर गेलेला आहे. जे लष्करी काम करणाऱ्यांच्या यादींत नोंदलेले नाहींत असे लोकसुद्धां जर सरकारला इतर रीतींनीं आधार देत असतील तर ते त्या गुन्ह्यांत तितकेच भागीदार आहेत असें माझें म्हणणें आहे. जें सरकार प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें लष्करी स्वरूपांत संघटित झालेलें आहे अशा सरकारला पाठिंबा देणारे स्त्री-पुरुष त्या पापांत भागीदार होतात. कर भरून तें सरकार चालूं राहण्याला ते मदत करतात, आणि अशा रीतीनें लहान-थोर सर्व त्या पापांत भाग घेतात. यामुळेंच युद्ध चालूं असतांना मी मनाशीं म्हटलें कीं जोंवर सैन्याच्या बळावर उपलब्ध झालेला गहूं मी खात आहे तोंवर मी फक्त सैनिक झालों नाहीं इतकेंच, बाकी सर्व कांहीं मदत मी करीत आहें, अशा स्थितींत सैन्यांत भरती व्हावें आणि गोळी खावी हें उत्तम; नाहीं तर हिमालयांत जावें आणि निसर्ग काय निर्माण करील तें अन्न खावें. म्हणून ज्यांना लष्करी कामच बंद पाडायचें आहे त्या सर्वांना आपला सर्व प्रकारचा सरकारशीं होणारा सहकार मागें घेऊनच तें करणें शक्य आहे. लष्करांत काम करण्याचें नाकारणें ही गोष्ट सरकारला आधारभूत असलेल्या एकंदर राज्यप्रणालीशीं असहकार करण्याच्या मानानें फार वरवरची आहे. अर्थात् अशा रीतीनें सर्व प्रणालीशीं असहकार करण्यानें आपला विरोध इतका शीघ्रगामी आणि परिणामकारी होतो

कीं त्यामुळें आपल्याला तुरुंगांत जाण्याचीच जोखीम पत्करावी लागते असें नव्हे तर देशोधडीला लागण्याचेंहि पत्करावें लागतें.

**प्रश्न** : मग लष्कराव्यतिरिक्त सरकारच्या इतर लोकोपयोगी कामांचा लाभहि घेऊं नये काय ?

**गांधीजी** : या प्रश्नानें तुम्ही मनुष्यस्वभावांतल्या मर्मालाच स्पर्श केलांत. असहकाराच्या चळवळीचा जनक म्हणून हाच प्रश्न माझ्या पुढे उभा राहिला होता. मी स्वतःशीं विचार केला कीं नीरो किंवा मुसोलिनी-सारख्या अरेरावांचें सरकार असलें तरीदेखील ज्याच्यांत अगदीच भलेपणा नाहीं असें एकहि सरकार नसतें; परंतु एकदां आपण त्या सबंध राज्यपद्धतीशींच असहकार करायचें ठरविलें असलें तर आपल्याला सरसहा सगळें सरकारच नाकारावा लागेल. आपल्या देशांत केवढे मोठमोठे रस्ते आहेत. टोलेजंग शैक्षणिक संस्था आहेत, पण हें सर्व राष्ट्राला चिरडून टाकणाऱ्या राज्यपद्धतीचें अंग आहे. मला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य असतां कामा नये. हिंदुस्तानांतील ब्रिटिश राज्यकारभारानें राष्ट्राचा आत्मा चिरडून टाकून त्याची वाढ खुरटवून टाकली आहे. म्हणून या सरकारकडून होणारीं लोकोपयोगी कामें, न्यायकचेऱ्या, पदव्या इतर सर्व सुखसोई आपण घ्यायच्या नाहींत असें मीं ठरविलें. देशांच्या भिन्नतेप्रमाणें या धोरणांत भिन्नता येईल, पण आत्मबलिदान आणि सुखत्याग या मात्र अत्यंत आवश्यक गोष्टी आहेत.

**प्रश्न** : परंतु स्वतंत्र राष्ट्र आणि गुलाम राष्ट्र यांच्यांत मोठा भेद नाहीं का ? हिंदुस्तानचें परकीय सरकारशीं मूलभूतच भांडण असूं शकेल, पण स्विस् लोक आपल्याच सरकारशीं कसे भांडतील ?

**गांधीजी** : भेद निःसंशय आहेच. गुलाम राष्ट्राचा प्रजाजन या नात्यानें माझी गुलामगिरी फेकून देऊनच मी या कामीं जास्तींत जास्त मदत देऊं शकेन. पण या देशांत ( स्वित्झर्लंडांत ) मला, लष्करी मनोवृत्तींतून जास्तींत जास्त कसें सुटतां येईल, असा प्रश्न विचारण्यांत आला आहे. तुम्हांला आज मिळत असलेल्या सुखसोयी तुम्ही सरकारला लष्करी मदत द्यायची या अटीवरच मिळत आहेत. येथें तुमच्यापुढें प्रश्न आहे तो सरकारला लष्करी मनोवृत्ति कशी सोडायला लावायची हा आहे. असहकाराची व्याप्ति कर नाकारण्या-पर्यंत तुम्हांला वाढवावी लागेल. १

**प्रश्न :** शिपायानें हवेंत गोळीबार करायचा आणि हिंसा टाळायची असें केलें तर चालेल कीं नाहीं ?

**गांधीजी :** जो शिपायी, सैन्यांत भरती झाल्यानंतर, हवेंत गोळ्या झाडून आपण हिंसा टाळतों अशी बढाई मारतो त्यानें आपल्या धैर्याचीहि पत ठेवली नाहीं आणि आपल्या अहिंसेच्या ब्रीदाचीहि शोभा राखली नाहीं. माझ्या मतानें असा मनुष्य असत्य आणि भ्याडपणा या दोन्ही दोषांना पात्र होईल; भ्याडपणा असा कीं शिक्षेंतून सुटका करून घेण्याकरितां त्यानें भरती करून घेतली, आणि असत्य असें कीं सैनिक म्हणून काम करण्याकरितां भरती होऊनहि त्याच्या संबंधींच्या अपेक्षेप्रमाणें त्यानें गोळ्या झाडल्या नाहींत. 'युद्धाविरुद्ध युद्ध' पुकारण्याच्या कार्याला असल्या कृत्यानें बट्टा लागतो. युद्धाचा प्रतिकार करण्याचें कंकण बांधलेल्यांचें वर्तन संशयाच्या अतीत असलें पाहिजे. त्या कार्याच्या नीतितत्त्वाला संपूर्णपणें एकनिष्ठ राहण्यांतच त्यांचें सारें बळ असतें. २

* * *

## : १४ : वांशिक भेदभाव व सत्याग्रह

जर्मन लोकांनीं ज्यूंची जी ससेहोलपट चालविली आहे त्याला इतिहासांत तोड नाहीं. जर्मनींतील ज्यू लोकांना अशा संघटित आणि निर्लज्ज वांशिक छळाला तोंड देणें शक्य होईल का ? आपला स्वाभिमान संभाळण्याचा आणि असाहाय्यतेची, उपेक्षिततेची आणि निराधारपणाची भावना न येऊं देण्याचा कांहीं मार्ग आहे का ? आहे असें मी नम्रपणें सुचवितों. चालत्या बोलत्या ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्या कोणाहि माणसाला असहाय्य किंवा निराधार वाटण्याचें कारण नाहीं. ज्यूंचा जेहोवा हा ख्रिश्चनांच्या, मुसलमानांच्या किंवा हिंदूंच्या ईश्वराहून जास्त सगुण स्वरूपाचा आहे; अर्थात्, खरें म्हणजे, परमार्थदृष्ट्या तो सर्वसमान, अद्वितीय आणि अनिर्वचनीय असाच आहे. परंतु ज्यू हे देवाला सगुण - साकार मानतात आणि आपल्या प्रत्येक हालचालीवर त्याची सत्ता आहे अशी त्यांची श्रद्धा असते. तेव्हां त्यांना असहाय्य वाटतां कामा नये. मी जर ज्यू असतों, जर्मनींत जन्माला आलों असतों, आणि माझा जीवननिर्वाह तेथेंच चालवीत असतों तर जर्मनींतल्या ज्यू नसलेल्या त्या वरिष्ठांत वरिष्ठ माणसाइतकेंच जर्मनी हें माझें घर मीं मानलें असतें आणि 'त्याकरितां मला गोळी घालून मारायचें असलें तर मार किंवा तळघरांत टाकून दे ' असें आह्वानपूर्वक म्हटलें असतें. देशांतून हद्दपार होण्याचें किंवा भेदभाव करणाऱ्या वागणुकीपुढें मान वांकविण्याचें मीं नाकारलें असतें. हें करतांना, इतर ज्यू बांधव या सविनय प्रतिकारांत मला सामील होतील का याची मी मुळींच वाट पाहिली नसती, पण असा विश्वास बाळगला असता कीं अखेरीस ते माझें अनुकरण केल्यावांचून राहणारच नाहींत. मी सांगितलेला हा उपाय जर एक ज्यू किंवा सारी ज्यू जमात स्वीकारील तर त्याची किंवा त्यांची स्थिति आज आहे त्याहून कांहीं जास्त वाईट होणार नाहीं. आणि स्वेच्छेनें ओढून घेतलेल्या आत्मक्लेशांनीं त्यांना जें आत्मबळ आणि जो आंतरिक आनंद लाभेल तो जर्मनीबाहेर केल्या गेलेल्या सहानुभूतीच्या अनेक ठरावांनीं कांहीं लाभणार नाहीं. नव्हे, जरी ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिका यांनीं जर्मनीविरुद्ध

लढाई पुकारली तरी त्यामुळें तो अंतरांतील आनंद, तें आंतरिक बळ त्यांना मिळणार नाहीं. अशा लढाईच्या घोषणेला पहिला जबाब म्हणून हिटलरच्या योजनाबद्ध अत्याचारांतून ज्यूंची सार्वत्रिक कत्तलसुद्धां घडून येईल. पण जर ज्यूंचें मन स्वेच्छा-बलिदानाला तयार होऊं शकलें तर मी वर कल्पिलेल्या कत्तलीच्या दुर्दिनाला धन्यतेच्या आणि हर्षोत्सवाच्या मंगलदिनाचें रूप देतां येईल, कारण कीं जेहोवानें जुलमी सत्ताधाऱ्याच्या हातानेंच ज्यू-वंशाची मुक्ति घडवून आणली. कारण ईश्वराची भीति बाळगणाऱ्यांना मृत्यूचें भय नसतें. त्यांना मृत्यु म्हणजे सुखनिद्रा आहे, तिच्या मागून येणारी जाग ही दीर्घ निद्रेमुळें अधिकच उत्साहप्रद ठरणार आहे अशी त्याची श्रद्धा असते. १.

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोक हे बहिष्कृतांची वेगळी वस्ती ( Ghetto ) करण्याच्या कायद्याचा सविनय म्हणजे अहिंसक आणि म्हणूनच सुसंस्कृत मार्गानें प्रतिकार करीत आहेत. ज्या कायद्याचा नैतिक दृष्ट्या बचाव करतां येणार नाहीं अशा कायद्याचा भंग करून त्याकरितां होणारी शिक्षा ते आनंदानें स्वीकारीत आहेत. परंतु गोरे गुंडहि स्वतःच्याच सरकारचे कायदे मोडत आहेत. त्यांचा हा कायदेभंग गुन्हेगारीच्या स्वरूपाचा आहे. करार करून दक्षिण आफ्रिकेंत मजुरीकरितां गेलेल्या मजुरांचीं आणि व्यापाऱ्यांचीं मुलें– ज्यांतील बरेच हरिजनांचे वंशज आहेत– आज शूर सत्याग्रही ठरत आहेत ही हिंदुस्तानाला अभिमानाची गोष्ट आहे. उलट गोरे लोक सुलतानी कायद्याचा अवलंब करीत आहेत. किती झालें तरी सविनय प्रतिकाराचा जन्म आशियांतच झाला आहे ! येशू हा आशियाखंडाचा रहिवासी होता. तो जर पुनः जन्माला आला आणि आजच्या दक्षिण आफ्रिकेंत जाऊन राहिला तर त्याला बहिष्कृतांच्याच वस्तींत राहावें लागेल. २

डरबनहून बातमी आली आहे कीं, सत्याग्रहावरचा ज्यांचा विश्वास उडाला आहे अशा कांहीं हिंदी लोकांचा एक गट दक्षिण आफ्रिकेंत तयार झाला आहे. नीग्रो लोक, गौरेतर, इतर आशियावासी व सहानुभूति बाळगणारे युरोपीय यांच्याशीं हातमिळवणी करूनच आपण गोऱ्यांचें राज्य उलथून पाडूं शकूं अशा स्वप्नांत ते गुंग आहेत. या वदंतेंत कांहीं सत्यांश

असेल तर ती चिंताजनक आहे आणि निश्चितपणें दुधांत मिठाचा खडा टाकणारी आहे. कोणाचा अहिंसेवर विश्वास असो नसो; पण सर्वांनीं हें समजून घ्यावें कीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांची जगभर जी प्रतिष्ठा झाली ती एवढ्याचमुळें कीं ते मूठभर होते तरी त्यांनीं क्लेश सोसण्याची अचाट शक्ति दाखविली आणि आपला धीर सोडून विध्वंस व हिंसा यांचा अवलंब केला नाहीं. खरें कल्याण आत्मक्लेशांतूनच होतें आणि ऐक्यांत जय असतो हा हितकारी धडा ते शिकले. माझा स्वतःचा अनुभव म्हणून माझा दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांना असा निश्चित सल्ला आहे कीं त्यांनीं कोणत्याहि मोहाला बळी पडून आणि कशाहिकरितां सत्याग्रहाचें अप्रतिम शस्त्र टाकून देऊं नये.

याचा अर्थ त्यांनीं गौरेतर लोक, नीग्रो लोक व इतर सहानुभूतीचे लोक यांची मदत स्वीकारूं नये, किंवा प्रसंग आला तर ते त्यांना मदत देणार नाहींत, असा नाहीं. शर्त एकच आहे कीं सत्याग्रह हें त्यांचें एकमेव शस्त्र असलें पाहिजे. अहिंसेचा मार्ग सोडून जर ते बाजूला गेले तर आमच्यांतल्या म्हणीप्रमाणें 'तेल गेलें, तूप गेलें आणि हातीं धुपाटणें आलें' असें होईल. २

'समज तूंच नीग्रो आहेस आणि तुझ्या बहिणीवर एका गोऱ्याकडून अत्याचार झाला किंवा सगळ्या गोऱ्या जमातीनें तिला मारून टाकली, तर त्या वेळीं तुझें कर्तव्य काय?' असा प्रश्न मीच मला विचारतों. आणि मला उत्तर असें येतें कीं मी त्यांचें वाईट चिंतूं नये, पण तरी त्यांच्याशीं मी सहकारहि करूं नये. ज्या जमातीनें मारण्याचें काम केलें तिच्यावर एरवीं जर मी माझ्या चरितार्थाकरितां अवलंबून असेन तर मी त्यांच्याशीं सहकार करण्याचें नाकारीन, त्यांच्याकडून मिळणाऱ्या अन्नाला स्पर्श करणार नाहीं, आणि जे जे माझे नीग्रो बांधव हा अन्याय सहन करतात त्यांच्याशीं सहकार्य करण्याचें मी नाकारीन. अशा उपायांचा मी माझ्या आयुष्यांत नेहमीं अवलंब करीत आलों आहें. अर्थात् उपाशी राहण्याची क्रिया यांत्रिक झाली तर तिला कांहीं महत्त्व नाहीं. उपवासानें क्षणाक्षणानें प्राणांचा क्षय होत असतांनासुद्धां आपली श्रद्धा अंधुक न होत जातां

तेजस्वी राहिली पाहिजे. परंतु मी अहिंसेच्या आचाराचा अगदींच यःकश्चित नमुना आहे, आणि माझ्या उत्तरानें कदाचित् तुमची खात्री पटायची नाहीं, तथापि मी पराकाष्ठेचा प्रयत्न करीत आहें. जरी या जन्मीं मला त्यांत यश आलें नाहीं तरी माझी अहिंसेवरील श्रद्धा काडीमात्रहि कमी व्हायची नाहीं. ४

* * *

विचार केला असतां आपल्याला दिसून येतें कीं सामाजिक सुधारणेकरितां-सुद्धां सत्याग्रहाचा प्रयोग करतां येईल. आमच्या सामाजिक संस्थांत जे अनेक दोष आहेत ते आपल्याला सत्याग्रहानें काढून टाकतां येतील, हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडवितां येईल, तसेंच राजकीय प्रश्नहि सोडवितां येतील. सोयीकरितां म्हणून जरी आपण निरनिराळ्या प्रश्नांना अनुसरून चळवळींचे निरनिराळे विभाग पाडले असले तरी ते सर्व प्रश्न एकमेकांशीं संलग्न आहेत हें आपण विसरतां कामा नये. धर्माला किंवा सामाजिक सुधारणेला राजकारणाशीं कांहीं कर्तव्य नाहीं असें म्हणणें बरोबर नाहीं. राजकीय प्रश्नांच्या संबंधांत विचार करतांना त्यांत धर्म आणल्यानें जो परिणाम निपजेल त्याहून वेगळाच परिणाम धर्म सोडून राजकारण केल्यानें निपजेल. १

सत्याग्रह ही अशी शक्ति आहे कीं जी मूकपणें आणि दिसायला संथपणें अशी काम करतें. पण वस्तुतः सत्याग्रहाइतकी सरळ साध्याकडे नेणारी आणि शीघ्रपरिणामकारी दुसरी शक्ति जगांत नाहीं. कित्येक वेळां शारीरिक बळाच्या साहाय्यानें यश अधिक शीघ्र गतीनें प्राप्त झालेंसें दिसतें. जसें, अंगमेहनतीनें आपला निर्वाह चालविणें ही निर्वाह करण्याची सत्याग्रही पद्धति झाली. शेअर-बाजारांत जुगार खेळणें किंवा घरफोडी करणें यानें संपत्ति तत्काळ प्राप्त होते, पण हे सत्याग्रहाच्या विरुद्ध असलेले मार्ग आहेत. मला वाटतें जगाला आतां हें कळून चुकलें आहे कीं जुगार आणि घरफोडी हे कांहीं चरितार्थाचें साधन मिळविण्याचे मार्ग नव्हेत, त्यानें जुगाऱ्याचें किंवा चोराचें भलें होण्यापेक्षां अहितच जास्त होतें. २

## गरीबांचा श्रीमंताविरुद्ध सत्याग्रह

**प्रश्न** : श्रीमंतांना गरीबांविषयींचें स्वतःचें कर्तव्य ओळखायला लावण्याच्या कामीं सत्याग्रहाचें स्थान काय ?

**उत्तर** : जें परकीय सत्तेच्या बाबतींत तेंच त्यांच्याहि बाबतींत. सत्याग्रह हा सर्वत्र लागू होणारा कायदा आहे. कुटुंबापासून तों थेट कोणत्याहि

क्षेत्रापर्यंत तो लागू करतां येतो. समजा, एक जमीनमालक आपल्या कुळांना पिळून काढीत आहे आणि त्यांच्या श्रमाचें फळ सक्तीनें वसूल करून तें तो आपल्या उपयोगाकडे लावीत आहे. कुळें त्याला चार शब्द सांगून पाहतात पण तें तो ऐकत नाहीं आणि म्हणतो कीं माझ्या बायकोकरितां इतकें पाहिजे, मुलांसाठीं इतक्याची गरज आहे, वगैरे वगैरे. कुळें, किंवा त्या कुळांची ज्यांनीं बाजू घेतली आहे आणि ज्यांचें कांहीं वजन आहे ते, बायकोला विनुवणी करून नवऱ्याला चार शब्द सांग असें म्हणतील. ती कदाचित् म्हणेल त्यांचा पिळवणुकीचा पैसा मला कांहीं नको. त्याचप्रमाणें समजा मुलेंहि म्हणतील कीं आम्हांला पाहिजे तें आमचें आम्ही मिळवूं. पुढें आणखी आपण असें समजूं कीं मालक कोणाचेंच ऐकत नाहीं किंवा त्याची बायको व मुलें कुळाविरुद्ध एक होतात, तर अशा परिस्थितींत कुळें वांकणार नाहींत. जमीन सोडायला सांगितली तर ते जमीन सोडतील, पण कसतो त्याची ही जमीन आहे असें ते स्वच्छ बजावून सांगतील. मालक कांहीं स्वतःच सगळी जमीन एकटा कसणार नाहीं, त्याला कुळांच्या न्याय्य मागण्यांपुढें वांकावेंच लागेल. तथापि असेंहि होईल कीं या कुळांच्या जागीं दुसरीं कुळें घेतलीं जातील. मग अहिंसक चळवळ सुरु राहील, आणि शेवटीं कुळें म्हणून आलेलीं माणसें आपली चूक ओळखतील आणि काढून टाकलेल्या कुळांशीं तीं संगनमत करतील. अर्थात् सत्याग्रह हा लोकांचें मत शिक्षित करण्याची एक अशी प्रक्रिया आहे कीं ज्यांतून समाजाचें कोणतेंहि अंग सुटत नाहीं आणि अंतीं सत्याग्रहाला विरोध करणें कठीण होतें. हिंसेनें या प्रक्रियेला अडथळा येतो आणि सबंध सामाजिक रचनेंत खरीखुरी क्रान्ति घडून येण्याचा दिवस दूर जातो. ३

वाईट मार्गांनीं मिळविलेल्या संपत्तीचा आणि अनैतिक कृत्यांचा बचाव करण्याच्या कामीं अहिंसा मुळींसुद्धां उपयोगी पडत नाहीं असा अहिंसेचा स्वभावधर्मच आहे. धनसंग्रह हा पिळवणुकीशिवाय होणेंच शक्य नाहीं असें माझें ठाम मत आहे. त्यालाच मी वाईट मार्गांनीं मिळविलेली संपत्ति मानतों. ४

## गुंडगिरीवर उपाय

**प्रश्न :** तुमच्या उपवासाचा समाजांतील समाजद्रोही गुंडांच्यावर कांहीं परिणाम होईल अशी शक्यता आहे का? तुमच्या प्रायश्चित्तानें त्याच्या अंतःकरणांत कांहीं पालट घडून येऊं शकेल का?

**गांधीजी :** समाजांत गुंड आहेत याचें कारण आम्ही त्यांना गुंड बनविलें आहे हें आहे. गेल्या एक वर्षाच्या अंदाधुंदीच्या काळांत समाजांतल्या या लोकांना कशी प्रतिष्ठा आली होती हें सहज समजण्यासारखें आहे. परंतु आतां शांतताप्रेमी नागरिकांनीं आपला प्रभाव जाणवून देऊन गुंडगिरीला लोकांतून अलग पाडण्याची वेळ आली आहे. अहिंसक असहकार हा सार्वत्रिक उपाय आहे. चांगलें हें स्वयंभू असतें, तसें वाईट हें नसतें. तें एखाद्या बांडगुळाप्रमाणें चांगल्याच्या जिवावर आणि त्याच्या आधारानें राहतें. चांगल्याचा त्याला मिळणारा आधार काढून घेतला कीं तें आपोआप मरून जातें. समाजद्रोही माणसांचीं मतें पालटोत वा न पालटोत, समाजांतील सज्जनता आतां शांतिप्रीत्यर्थ आपला प्रभाव पाडूं लागली आहे एवढें त्यांना समजलें तरी पुरें. ५

कायद्यानें हृदयपालट घडवून आणणें कधीं शक्य नाहीं, अंतरांत होणाऱ्या संपूर्ण परिवर्तनानेंच तो साधला म्हणजे मग सक्तीच्या कायद्यांची गरजच राहात नाहीं. ६

**प्रश्न :** प्रत्येक खेडेगांवांत आपस्वार्थी व लुबाडणूक करणारे असे कांहीं लोक असतात. ते आपला स्वार्थ साधण्यासाठीं वाटेल तें करतात. त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून चालावें कीं त्यांच्यांतहि सुसंस्कारिता आणण्याचा प्रयत्न करावा?

**गांधीजी :** शेवटीं आपल्याला त्यांच्यापैकीं कांहींना सोडून द्यावें लागेल कदाचित्, परंतु म्हणून कोणीहि सुधारण्याला अपात्र आहे असें आपण मानूं नये. दुष्कर्मी माणसाची मनोवृत्ति काय आहे ती समजून घेण्याचा आपण प्रयत्न करावा. तो पुष्कळ वेळां आपल्या परिस्थितीचा बळी असतो. धीरानें आणि सहानुभूतीनें त्यांच्यापैकीं कांहींना तरी आपल्याला न्यायाच्या बाजूला ओढून घेतां येईल. शिवाय, आपण हेंहि विसरतां कामा नये कीं

पापप्रवृत्तीसुद्धां जी टिकते ती सज्जनांच्या खुशीच्या किंवा नाखुशीच्या सहकार्यानेंच टिकते. सत्य हेंच एकटें असें आहे कीं तें स्वयंभूपणें टिकतें. शेवटचा उपाय म्हणजे दुष्कर्म करणाऱ्यांशीं संपूर्ण असहकार करून आणि त्यांना इतरांपासून बाजूला करून आपल्याला त्यांच्या अपायकारी शक्तीवर नियंत्रण ठेवतां येईल. हेंच थोडक्यांत अहिंसक असहकाराचें तत्त्व आहे. त्यावरून हें ओघानेंच येतें कीं या असहकाराचें मूळ प्रेमांत असलें पाहिजे. त्याचा उद्देश प्रतिपक्ष्याला शिक्षा करणें किंवा त्याला दुखापत करणें हा नसावा. त्याच्याशीं असहकार करीत असतांनासुद्धां आपली वागणूक अशी असली पाहिजे कीं त्यायोगें त्याला आपल्या मनांत त्याच्याविषयीं मित्रभाव आहे असें भासलें पाहिजे आणि शक्य तेव्हां त्याला माणुसकीची मदत देऊन त्याच्या हृदयापर्यंत पोंचण्याचा आपला प्रयत्न असला पाहिजे. नव्हे, खरें म्हणजे अहिंसक संघर्षांत मागें द्वेषभावना राहात नाहीं, आणि शेवटीं शत्रू हे मित्र बनतात कीं नाहीं हीच अहिंसेची खरी परीक्षा ठरते. काळ बदलतो आणि पद्धती हळूहळू नाश पावतात. परंतु अंतीं अहिंसा आणि तिच्यावर जें आधारलेलें असेल तेंच टिकतें अशी माझी श्रद्धा आहे... ७

## दरोडेखोरांवर उपाय

चोर - दरोडेखोरांशीं सामना देण्याचे तीन मार्ग आहेत. एक जुना रुळलेला मार्ग म्हणजे पोलिसांत वर्दी देण्याचा; पुष्कळ वेळां त्यांतून उपाय-योजना कांहीं होतच नाहीं, पोलिसांना पैसे खाण्याची संधी मिळते इतकेंच. दुसरा मार्ग, जो खेड्यांतील लोकांचा नेहमींचा आहे, तो म्हणजे मुकाट्यानें स्वस्थ बसणें. त्याचें मूळ भ्याडपणांत असल्यामुळें तो धिक्कारणीय आहे. त्यामुळें गुन्हेगारी मोकाट सुटते आणि भ्याडपणा कायम राहतो. विशेष म्हणजे आमच्या स्वस्थ बसण्यानें आम्ही स्वतः गुन्ह्यांत सहभागी होतों. तिसरा मार्ग हा सत्याग्रहाचा मार्ग. या मार्गानें जावयाचें म्हणजे चोरांना व गुन्हेगारांनासुद्धां आपले बांधव मानावयाचे, आणि गुन्हेगारी हा त्यांना जडलेला एक रोग समजून त्यावर इलाज करावयाचा. चोराविषयीं किंवा गुन्हेगाराविषयीं संताप मनांत ठेवण्याऐवजीं आणि त्याला शिक्षा करविण्या-ऐवजीं लोकांनीं जरा अधिक खोलांत शिरावें, गुन्हा करण्याची प्रवृत्ति

त्यांच्यांत कां आली तें समजून घ्यावें आणि त्यावर उपाय करण्याचा प्रयत्न करावा. उदाहरणार्थ, एखादा उद्योगधंदा शिकवून त्याला प्रामाणिक उपजीविकेचें साधन पुरवावें आणि अशा रीतीनें त्याचें जीवन बदलून टाकावें.

सत्याग्रह्यानें गुन्हा करणाऱ्यावर उलट आघात करूं नये, तसेंच त्याच्यापुढें वांकूंहि नये, तर स्वतःला सुधारून त्याला सुधारण्याचा प्रयत्न करावा. त्यानें एकाच वेळीं दोन घोड्यांवर स्वार होण्याचा प्रयत्न करूं नये; म्हणजेच सत्याग्रहाचा कायदा अनुसरतों असें एकीकडे दाखवायचें आणि त्याच वेळीं पोलिसाची मदत घ्यायची असें करूं नये. सत्याग्रहाचा मार्ग अनुसरण्याकरितां त्यानें पोलीसठाण्याची वाट सोडून दिली पाहिजे. एकीकडे गुन्हेगाराच्या अंतःकरणाला स्पर्श करून त्याचा विश्वास संपादन करायचा आणि दुसरीकडे पोलिसांत वर्दी द्यायची यांत विश्वासघात केल्यासारखें होणार आहे. सुधारक सेवकाला हेरगिरी करणें चालूं शकणार नाहीं. माझ्याकडे कित्येक गुन्हेगारांनीं येऊन आपले गुन्हे कबूल केले, त्यांच्यासंबंधीं मीं पोलिसांना कांहींहि सांगण्याचें नाकारलें. सत्याग्रह्याकडे येऊन गुन्हा कबूल करणाऱ्या इसमाविरुद्ध पुरावा देण्याकरितां सत्याग्रह्यावर कोणीहि पोलीस अधिकारी सक्ती करूं शकत नाहीं. सत्याग्रही हा विश्वासाचा घात करण्याचें पातक कधींहि करणार नाहीं. ८

**लॉर्ड हंटर :** ज्या लोकांनीं गुन्हे केले आहेत अशांना योग्य त्या सरकारी अधिकाऱ्यांकडून शिक्षा व्हावी हें सत्याग्रहाच्या सिद्धान्ताप्रमाणें बरोबर आहे कीं नाहीं ?

**गांधीजी :** या प्रश्नाचें उत्तर देणें अवघड आहे, कारण शिक्षा म्हणजे बाहेरचें दडपण आपण गृहीत धरतों. तें चुकीचें आहे असें मी म्हणणार नाहीं, परंतु त्याहून चांगली अशी दुसरी पद्धति आहे. पण, मला वाटतें, गुन्हेगाराला शिक्षा मिळाली तर त्याबद्दल सत्याग्रह्याला कांहीं तक्रार करतां येण्याजोगी नाहीं असें म्हणणें एकंदरीनें वाजवी होईल, आणि म्हणून त्या अर्थानें सत्याग्रही हा सरकारविरोधी असूं शकणार नाहीं.

**लॉर्ड हंटर :** परंतु सत्याग्रह्याला गुन्ह्यासंबंधीं जी कांहीं माहिती असेल

ती त्यानें सरकारपुढें ठेवल्यानें गुन्हेगारांना जर शिक्षा होत असेल तर तशी माहिती देऊन सरकारला मदत करणें हें अर्थातच सत्याग्रहाच्या तत्त्वाच्या विरुद्ध असणार ?

**गांधीजी :** तें सत्याग्रहाच्या तत्त्वाशीं विसंगत आहे याचें कारण एवढेंच कीं पोलिसांनाच खुल्या असलेल्या पद्धतीच्या बाबतींत पोलिसांना मदत देणें हें कांहीं सत्याग्रह्याचें काम नव्हे. लोकांमध्यें कायदा पाळण्याची वृत्ति अधिक वाढवावी आणि अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें ते अधिक सन्मानाला पात्र व्हावेत या कामीं सत्याग्रह्याची अधिकाऱ्यांना मदत होते.

**लॉर्ड हंटर :** समजा, गेल्या दंगलींत* एखाद्या सत्याग्रह्यानें आपल्या देखत कांहीं भयंकर स्वरूपाचे गुन्हे घडतांना पाहिले असले. त्यानें पोलिसांकडे जाऊन त्यांची खबर देणें हें त्याचें कर्तव्य होणार नाहीं काय ?

**गांधीजी :** सत्याग्रह्याला आपल्या स्वतःच्या भावाच्या विरुद्ध जातां येणार नाहीं, अर्थात् मला देशाच्या तरुणांना चुकीचें मार्गदर्शन करायचें नाहीं. मी भाऊ म्हणतों तेव्हां मी अर्थात् त्यांत तो अमक्या देशाचा किंवा अमक्या राष्ट्राचा नागरिक असा भेद करीत नाहीं. सत्याग्रह्याची भूमिका ही कांहींशी आरोपीचा बचाव करणाऱ्या वकिलासारखी असते. महाभयानक स्वरूपाचे गुन्हेगार माझ्या माहितीचे आहेत आणि त्यांना गुन्हे करण्यापासून परावृत्त करण्याला मी कारणीभूत झालों असल्याचेंहि मी नम्रपणें सांगूं शकेन. तशा एकाचेंहि नांव मीं जर फोडलें तर त्यांचा विश्वास मी गमावून बसेन. परंतु समजा गुन्ह्यापासून त्यांना परावृत्त करण्यांत माझी शक्ति कमी पडली तर पुढचें पाऊल म्हणून पोलिसांकडे जाऊन त्यांच्यासंबंधीं मी वर्दी खात्रीनें देणार नाहीं. सत्याग्रह्याच्या डोळ्यांसमोर जरी गुन्हा घडला

---

* ता. ६ एप्रिल १९१९ च्या सर्व देशभरच्या शांततापूर्वक हरताळानंतर गांधीजी पंजाबांत चालले असतां त्यांना पकडण्यांत आलें. त्या बातमीमुळें सबंध गुजरातमध्यें असंतोष पसरून अहमदाबाद व विरमगाम येथें लोकांनीं भयंकर दंगल माजविली आणि सरकारी अधिकाऱ्यांचे खून व सरकारी मालमत्तेची जाळपोळ, लुटालूट केली. त्या दंगलीचा येथें उल्लेख आहे. तो लक्षांत घेऊन गांधीजींचें उत्तर वाचावें. — अनुवादक.

असला तरी त्यानें त्याची साक्ष न देणें ही त्याच्या बाबतींत अगदीं सहज गोष्ट आहे असें मी बिनदिक्कतपणें म्हणतों. पण या सिद्धान्ताचा वापर अगदीं क्वचितच होऊं शकेल आणि एखादा गुन्हेगार गुन्हा करीत असतांना अचानक माझ्या दृष्टीस पडला तर त्याच्या विरुद्ध मी साक्ष देईन कीं नाहीं हें आजसुद्धां मला सांगणें कठीण आहे. ९

मी अशा परिस्थितीची कल्पना करूं शकतों कीं जेव्हां दुष्ट कर्म करणाऱ्यांना शिक्षा व्हावी अशी शिफारस करणें मला अगदीं योग्य वाटेल. उदाहरणार्थ, आजच्या समाजाच्या अवस्थेंत चोरांना आणि लुटारूंना बंदींत टाकण्याला मला दिक्कत वाटणार नाहीं, ती एक त्यांना शिक्षाच आहे. परंतु त्याबरोबर ती सत्याग्रह-सिद्धान्तापासूनहि च्युति आहे हें मी कबूल करीन. ही त्या सिद्धान्ताच्या दुर्बळतेची नव्हे तर माझ्या दुर्बळतेची कबुली आहे. आजच्या समाजाच्या अवस्थेंत दुसरा कोणताहि उपाय सुचत नाहीं. म्हणून मी तुरुंगांचा उपयोग शिक्षा करण्याच्या संस्था म्हणून न करतां संस्कार-शाळा म्हणून करावा असें म्हणेन, आणि तेवढ्यावर समाधान मानीन. पण जीवें मारणें आणि बंदींत टाकणें, किंवा देहदंड देणेंसुद्धां म्हणा, यांत मी फरक करीन. हा फरक प्रमाणाचाच नसून प्रकाराचासुद्धां आहे असें मला वाटतें. बंदीखान्याची शिक्षा मला मागें घेतां येईल, देहदंड ज्याला दिला त्याची मला भरपायी करून देतां येईल. पण एकदां माणूस मारलें गेलें कीं ती शिक्षा परत घेणें किंवा तिचें परिमार्जन करणें आपल्या आटोक्यांत राहत नाहीं. ईश्वरालाच एक जीव घेतां येईल, कारण तोच एकटा जीव देणारा आहे. १०

## धार्मिक सत्याग्रह

सुधारकांना जो धडधडीत पापमय धर्मभोळेपणा वाटतो, तो सनातनी लोकांना आपल्या धर्मश्रद्धेचाच भाग वाटतो असें आढळून येतें. म्हणूनच सत्याग्रह्यानें सनातन्यांच्या बुद्धीला आळविणें प्राप्त आहे. परंतु अनुभवानें असें दिसून येतें कीं ज्यांचीं मतें अगदीं पक्कीं झालेलीं असतात त्यांच्या बाबतींत केवळ बुद्धीची आळवणी करून भागत नाहीं. केवळ बुद्धिवादानें त्यांच्या बुद्धीचा डोळा उघडत नाहीं, त्यासाठीं

सत्याग्रह्याला आत्मक्लेश सोसावे लागतात. सत्याग्रही हा हृदयांत प्रवेश करून तद्द्वारां बुद्धीकडे पोंचण्याचा प्रयत्न करतो. हृदयांत प्रवेश करण्याचा मार्ग म्हणजे लोकमत जागृत करणें. लोकमताची आपल्याला चाड असते, म्हणून लोकमत ही दारूगोळ्यापेक्षां जबरदस्त शक्ति आहे. ११

उद्दिष्टांची गल्लत ही कोणत्याहि प्रकारच्या सत्याग्रहांत हानिकारक असते, पण धार्मिक सत्याग्रहांत तर तिला मुळींच थारा देतां येत नाहीं. धार्मिक सत्याग्रह एखादा अन्तःस्थ किंवा प्रापंचिक हेतु साधण्याकरितां बुरखा किंवा युक्ति म्हणून वापरणें अथवा वापरूं देणें हें घातक आहे.

जशी साध्याच्या तशीच साधनाच्या बाबतींतसुद्धां या प्रकारच्या सत्याग्रहांत निर्भेळ शुद्धता राखणें ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. या प्रकारच्या चळवळीं-तील पुढारी हा अतिशय खोल आध्यात्मिक प्रवृत्तीचा असणें अवश्य आहे. तो विवाहित असो कीं अविवाहित असो, तो ब्रह्मचारी असला तर अधिक बरें. चळवळ ज्या विशिष्ट धार्मिक विधीच्या पालनाकरितां म्हणून सुरू केलेली असेल त्या विधीवर विश्वास ठेवून त्याचें आचरण करणारा तो असला पाहिजे, नव्हे अशा चळवळींत भाग घेणारा प्रत्येकजणच तसा असला पाहिजे. पुढारी हा सत्याग्रह-शास्त्रांत निष्णात असला पाहिजे. त्याच्या भाषणांतून सत्य आणि अहिंसा तळपली पाहिजे. त्याची सर्व वागणूक अथपासून इतिपर्यंत स्फटिकासारखी स्वच्छ असली पाहिजे. कारस्थान आणि भानगडी यांना त्याच्या शस्त्रागारांत स्थान असतां कामा नये.

अहिंसेवर व ईश्वरावर निरपेक्ष विश्वास ही अशा प्रकारच्या सत्याग्रहाची अनिवार्य शर्त आहे.

धार्मिक स्वरूपाच्या सत्याग्रहांत चढाईखोरी, दिखाऊपणा व डामडौल यांना स्थान नाहीं. त्या सत्याग्रहांत भाग घेणाऱ्यांना आपल्यापेक्षां वेगळी धर्मश्रद्धा असणाऱ्यांच्या धार्मिक निष्ठेविषयीं आणि नाजूक भावने-विषयीं तितकाच आदर व कदर असली पाहिजे. त्यांच्या दृष्टींत यत्-किंचितहि जरी संकुचितपणा असला तरी तो विरोधकांत अनेक पटींनीं वाढून परावर्तित होण्याचा संभव आहे.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, धार्मिक सत्याग्रह ही आत्म-

शुद्धीची एक प्रक्रिया आहे. त्यांत केवळ संख्याबलाला व बाह्य मदतींना मुळींच महत्त्व दिलें जात नाहीं, कारण त्यांनीं कांहीं सत्याग्रह्याच्या आत्मशुद्धींत भर पडूं शकत नाहीं. संख्याबलाच्या व बाह्य मदतींच्याऐवजीं त्यांत ईश्वरावरच सर्वस्वीं भरंवसा असतो, कारण तोच सर्व बळाचें उगमस्थान आहे. म्हणून धार्मिक सत्याग्रह खऱ्या ईश्वरभक्ताच्या नेतृत्वाखालींच उत्कृष्टपणें सफळ होतो. असा ईश्वरभक्त आपल्या शुद्ध जीवनानें, आपल्या कार्यांतील अत्यंत निःस्वार्थ वृत्तीनें आणि आपल्या दृष्टीच्या व्यापकपणानें विरोधकांतसुद्धां आदर व प्रेम उत्पन्न करील. १२

धार्मिक बाबतींत सुधारणा घडवून आणूं इच्छिणारा सेवक लोकांच्या मनावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करीत नसतो. तो लोकांना हलवून जागें करतो आणि त्यांना विचार व आचार करण्याला प्रवृत्त करतो. १३

देवळें आणि सार्वजनिक ठिकाणें हरिजनांना उघडीं व्हावींत म्हणून एक कळकळीचा पण उतावळा कार्यकर्ता प्रयत्न करीत आहे. त्याला त्यांत थोडेंसें यशहि आलें आहे पण तें अभिमान वाटण्यासारखें नाहीं. त्यामुळें अधीर होऊन तो लिहितो :

"हीं जुन्या समजुतीचीं माणसें या कामाला सुरुवात करतील अशी वाट पाहात बसण्यांत कांहीं हशील नाहीं. सक्तीशिवाय तीं हलणार नाहींत. अस्पृश्यता पुसून टाकण्यासाठीं कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. म्हणून, देवळांच्या दारांपुढें कार्यकर्त्यांनीं आणि हरिजनांनीं सत्याग्रह करून सनातनी मताच्या माणसांना देवळांत जाण्याला अडथळा करणें हा परिणामकारक मार्ग होईल का याविषयीं आपलें मत देण्याची कृपा करावी अशी माझी आपल्याला विनंति आहे. विनवण्या इत्यादींचा कांहीं उपयोग झालेला नाहीं आणि त्यांवर आतां अधिक वेळ खर्चणें हें वेळेचा निव्वळ अपव्यय करणें होईल असें मला वाटतें."

अशा रीतीनें वाट अडविणें म्हणजे निव्वळ सक्ती होईल. आणि धर्माच्या किंवा कोणत्याहि सुधारणांच्या बाबतींत सक्ती बिलकुल होतां कामा नये. अस्पृश्यता काढून टाकण्याची चळवळ ही आत्मशुद्धीची चळवळ आहे. कोणाहि मनुष्याची इच्छा नसेल तर त्याच्यांत शुद्धता आणतां येणार नाहीं.

म्हणून, सनातन्यांच्या विरुद्ध प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें सक्तीचा वापर करतां येणार नाहीं. आपल्यापैकीं पुष्कळजण, अस्पृश्यतानिवारणाची आवश्यकता पटण्यापूर्वी असेच सनातनी होते ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. त्या वेळीं देवळांत जातांना आपला मार्ग कोणी अडविला असता तर आपल्याला खपलें नसतें, कारण त्या काळीं आमचा असा चुकीचा समज होता कीं देवळांत हरिजनांना प्रवेश मिळतां कामा नये. त्याच रीतीनें सनातन्यांचा देवळाचा मार्ग आपण रोखून धरणें बरें नाहीं.

'सत्याग्रह' हा शब्द पुष्कळ वेळां वाटेल तसा वापरला जातो आणि छुप्या हिंसेवर त्याचें पांघरूण घातलें जातें. परंतु हिंसेचें कोणतेंहि रूप, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, छुपें वा उघडें, विचारांतलें असो, उच्चारांतलें असो, आचारांतलें असो, सत्याग्रहांत बसत नाहीं हें त्या शब्दाचा जनक या नात्यानें मी सांगण्याची परवानगी घेतों. विरोधकाविषयीं वाईट इच्छिणें किंवा त्याला टाकून बोलणें किंवा त्याला धक्का पोंचविण्याच्या हेतूनें त्याच्याविषयीं वाईट बोलणें हा सत्याग्रहाचा भंग आहे. आणि पुष्कळ वेळां चळवळीच्या भरांत एखादी प्रत्यक्ष हिंसेची गोष्ट केली आणि लगेच त्याविषयीं कदाचित् पश्चात्ताप वाटून ती विसरली गेली अशा हिंसेपेक्षां कुविचार किंवा कडु शब्द हा सत्याग्रहाच्या दृष्टीनें बोलायचें तर महाभयानक असूं शकेल. सत्याग्रह हा सौम्य असतो, तो कधीं दुखापत करीत नाहीं. क्रोधांतून किंवा द्वेषभावनेंतून तो निघालेला नसला पाहिजे. त्यांत अवडंबर, उतावीळपणा, कांगावखोरपणा कधीं असणार नाहीं. सक्तीच्या तो अगदी उलट असतो. हिंसेच्या ऐवजीं सर्वस्वीं त्याचाच उपयोग करावयाचा अशा कल्पनेनेंच तो योजला गेला आहे.

असें असलें तरी, अस्पृश्यता पुसून टाकण्यासाठीं निकराचे उपाय योजण्याची आवश्यकता आहे या पत्रलेखकाच्या मताशीं मी सहमत आहें. पण ही उपाययोजना आपण स्वतःच्याच विरुद्ध करावयाची आहे. सनातनी लोकांची मनापासून अशी समजूत आहे कीं आपण पाळत असलेली अस्पृश्यता शास्त्रांतच सांगितलेली आहे आणि ती जर काढून टाकली तर आपल्यावर आणि हिंदुधर्मावर भयंकर अरिष्ट कोसळेल. आतां या समजुतीला तोंड कसें द्यायचें ? त्यांच्या देवळांत हरिजनांना प्रवेश द्यायला लावून कांहीं ही त्यांची समजूत बदलणार नाहीं हें स्पष्ट आहे. आवश्यकता आहे ती हरिजनांना

देवळांत प्रवेश मिळावा यापेक्षां हरिजनांना देवळांत जाण्याला बंदी करणें हें चुकीचें आहे असा बदल सनातनी लोकांच्या मतांत व्हावा याची. हें परिवर्तन त्यांच्या हृदयाला आळवूनच, म्हणजे त्यांच्या अंतरांत जें सत्य-शिव-सुंदर आहे तें जागृत करूनच, घडवून आणतां येणार. अशी आळवणी प्रार्थनेंतून, उपवासांतून आणि इतर आत्मक्लेशांतून, म्हणजे दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर, आळवणी करूं इच्छिणाऱ्यांच्या नित्य वाढत जाणाऱ्या आत्मशुद्धींतूनच करतां येते. तिला कधीं अपयश आल्याचें अजून ऐकिवांत नाहीं. कारण साध्य मुळीं तेंच आहे. सुधारक सेवकाला आपल्या कार्याच्या सत्यतेविषयींची जाणीव असली पाहिजे. त्यायोगें तो विरोधकाच्या बाबतींत अधीर होणार नाहीं, स्वतःच्या बाबतींतच अधीर होईल. आमरण उपोषण करण्याचीसुद्धां त्याची तयारी असली पाहिजे. प्रत्येकालाच तो अधिकार किंवा ती शक्ति असते असें नाहीं. ईश्वर मोठी कठोर परीक्षा पाहणारा आहे. तो आपल्या भक्ताकडून नम्रतेचें माप पुरेपूर घेतो. उपवासालासुद्धां सक्ती करण्याचें रूप येण्याचा संभव आहे. पण एखादी गोष्ट माणसाच्या हातांत आली आणि तिचा दुरुपयोग झाला नाहीं अशी एकहि गोष्ट जगांत नाहीं. मनुष्यप्राणी हा बऱ्यावाईटाचें, जेकिल आणि हाइडचें* मिश्रण आहे. परंतु जेथें आत्मक्लेशांचा संबंध आहे तेथें त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता कमींत कमी असते. १४

## किसान-कामगार-संघटना

शेतकऱ्यांना जेव्हां स्वतःच्या अहिंसक शक्तीचें भान येईल तेव्हां जगांतली कोणतीहि सत्ता तिच्या विरुद्ध टिकूं शकणार नाहीं. सत्तेचा ताबा मिळविण्याकरितां खेळल्या जाणाऱ्या राजकारणांत शेतकऱ्यांचा कधींहि

---

* दिवसां अत्यंत सद्भावनेनें डॉक्टर म्हणून लोकांची सेवाशुश्रूषा करणाऱ्या आणि रात्र होतांच पिशाचाप्रमाणें लोकांना सतावून सोडणाऱ्या एकाच व्यक्तित्वाच्या अशा दोन चिरफळ्या दाखविणारें पात्र एक इंग्रज कादंबरीकार रॉबर्ट स्टीव्हनसन् यानें ‘ डॉ. जेकिल अँड मि. हाइड ’ या आपल्या विख्यात कादंबरींत चित्रित केलें आहे. —अनुवादक.

उपयोग केला जाऊं नये. त्यांचा असा गैरवापर करणें हें मी अहिंसक पद्धतीविरुद्ध समजतों. शेतकऱ्यांची संघटना कशी करावी याची माझी पद्धति ज्यांना समजून घ्यावयाची असेल त्यांनीं चंपारण्याच्या लढ्याचा अभ्यास केला असतां त्यांना लाभ होईल. याशिवाय खेडा, बारडोली आणि बोरसद येथें झालेल्या शेतकऱ्यांच्या लढ्यांचा अभ्यास केल्यानेंहि लाभ होईल. शेतकरी-संघटनांत यशाची किल्ली ही आहे कीं त्यांच्याच असतील अशा व त्यांना समजणाऱ्या आणि त्रास देणाऱ्या असतील अशा तक्रारी दूर करायला लावण्याच्या कामाखेरीज इतर कोणत्याहि राजकीय हेतूनें त्यांच्या संघटनांचा दुरुपयोग करूं नये. एखाद्या निश्चित स्वरूपाच्या अन्यायाचें किंवा तक्रारीचें मूळ दूर करण्याकरितां संघटित व्हावें ही गोष्ट त्यांना चट्कन् समजतें. त्यांना अहिंसेचा उपदेश करावा लागत नाहीं. आपल्या तक्रारी दूर करून घेण्याचा एक परिणामकारक इलाज म्हणून त्यांनीं जर अहिंसा समजून घेऊन उपयोगांत आणली आणि मागाहून त्यांना, ‘ तुम्ही अंमलांत आणली ती अहिंसक पद्धति आहे ’, असें जाणवून देण्यांत आलें कीं लगेच त्या लोकांना अहिंसेची ओळख पटते आणि तिचें रहस्य त्यांच्या लक्षांत येतें. १५

## संप व हरताळ

संप केव्हां आणि कोणाविरुद्ध करावे याचा निश्चित न्यायनिवाडा आपण कधीं करीत नाहीं. आजकाल तर हिंदुस्तानांत संप करणें हें एक मोठें बहादुरीचेंच कृत्य मानलें जातें. बोलतां बोलतां गिरण्यांत हरताळ पडतात. बारीक-सारीक निमित्तांनीं विद्यार्थी शाळा-कॉलेजांत हरताळ पाडतात. यांत नुकसान कोणाचें अधिक होतें त्याचा कधीं त्यांनीं विचार केला आहे ? नुकसान होतें मजुरांचें व विद्यार्थ्यांचेंच, भांडवलवाल्यांचें किंवा सरकारी शाळा-कॉलेजांचें नाहीं. गिरणी-मालकांची गिरणी एखादा दिवस किंवा महिना बंद राहिली म्हणून कांहीं त्यांच्या पोटाला चिमटा बसत नाहीं, पण ज्यांचें पोट हातावर आहे त्यांचें काय ? अशाच रीतीनें सरकारी कचेऱ्यांतून कारकून-पोस्टमेन संपावर जातात. अर्थात् समान मजुरीच सर्वांना मिळावी या मताचा मी आहें. भंग्याला सबंध दिवसाच्या

कामाचे चारच आणे आणि वकिलाला शंभर रुपये असें कां म्हणून असावें? पण जग अजून त्या आदर्शाप्रत पोचलेलें नाहीं, कारण लोक नाना प्रकारच्या अडचणींमुळें वकील-बॅरिस्टरांना मागतील तेवढे पैसा देतात. समाजांत प्रातीचें मान समसमान करायला अजून फार काळ जाईल. तुम्हांला (कामकऱ्यांना) अन्याय होत असेल तर तुम्ही समजूतदारपणानें आपल्या मालकाकडे जा, त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करा; तुमच्याकडे आज जो येईल तो तुम्हांला आपापल्या पक्षाची आणि 'वादा'ची भाषा करून चढवूं पाहील, त्याला तुम्ही बळी पडूं नका. वाद रोज नवे नवे निर्माण होत आहेत. तुम्ही अशिक्षित आहांत, मजूर आहांत, तेव्हां हे लोक तुमचा दुरुपयोग करणार नाहींत याची खबरदारी घ्या. आणि गिरणी-मालकांनींसुद्धां आतां ओळखलें पाहिजे असें मला वाटतें. आतां जर ते मजुरांचें रक्तशोषण करतील तर गिरण्यांची राखरांगोळी झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांचे बंगले, त्यांच्या मोटारी या सर्व तुमच्या श्रमांतून आहेत. पण मला माहिती आहे त्याप्रमाणें बहुतांश गिरणी-मालक समजुतदार आहेत. ते देशाची स्थिति लक्षांत घेऊनच मजुरांच्याशीं वागतील अशी मला आशा आहे. मालक आणि मजूर यांच्यामध्यें बाप-मुलांसारखा संबंध आज नाहीं तरी वर्षा दोन वर्षांनीं का होईना बांधल्यावांचून गत्यंतर नाहीं. यांतच उभयतांचें श्रेय आहे. नाहीं तर दोघेहि ढासळून पडतील यांत मला शंका नाहीं. म्हणून माझी आपली तुम्हांला नम्र सूचना आहे कीं तुम्ही परत कामावर जा; तुमच्यापैकीं तुम्हांला योग्य वाटतील अशांची एक कमिटी नेमा. त्यांनीं मालकाकडे जावें आणि तुमची सारी हकीकत त्यांच्यापुढें मांडावी. त्यांची अडचण तुम्ही समजून घ्यावी, तुमची त्यांनीं समजून घ्यावी. असा मेळ करूनच योग्य रस्ता तुम्ही धरावा हेंच दोन्ही पक्षांना हितकर आहे. १६

## निरोधन

दारू आणि परदेशी कापड यांच्यापुढें निरोधन करण्याचें काम हें खरें म्हटलें तर स्त्रियांचेंच एकमेव काम म्हणून त्यांच्यावरच त्या दोन चळवळी सोपविण्याची योजना मी मनांत केली आहे. आपण पुरुष मंडळी

दारूचा धंदा चालविणाऱ्यांच्या ओळखी करून घेऊन आणि त्यांच्या प्रत्यक्ष गांठी-भेटी घेऊन, 'राष्ट्राला आतां नवप्रसूतीच्या वेदना होत आहेत म्हणून तुम्ही आतां हा धंदा सोडा' असें त्यांना सांगूं शकतों, आणि अशा रीतीनें स्त्रियांना त्यांच्या कामीं मदत करूं शकतों. आपल्या महिलावर्गा-विषयीं अधिक प्रमाणांत आणि अधिक मार्दवयुक्त आदर दाखविण्यानेंहि त्यांना मदत होऊं शकेल. वातावरणाची सर्वसामान्य पातळी अशी उन्नत केल्यानें त्याचा दारू-दुकानदार व कापडाचे दुकानदार यांच्यावर तसाच पिणाऱ्या ग्राहकांवरहि परिणाम होईल, कारण त्यांच्यापैकीं कोणीहि मग महिलांकडून केल्या गेलेल्या आळवणीला विरोध करूं शकणार नाहीं. असे अनेक सद्गुण आहेत कीं ज्यांत स्त्रिया पुरुषांच्या पुढें आहेत, आणि अहिंसा हा त्यांतील एक प्रमुख सद्गुण आहे. स्त्री त्या सद्गुणाचा आचार सहज आणि अंतःस्फूर्तीनें करते, तर पुरुषाला बुद्धि आणि तर्क लढवून मोठ्या कष्टानें तो संपादन करावा लागतो. आम्ही पुरुषांनीं स्त्रियांच्या कामांत ढवळाढवळ न करतां त्यांच्याकडेच तें काम सोपविलें तर साध्याकडे त्या अधिक द्रुतगतीनें पोंचण्याचा संभव आहे. पुरुषांनीं फक्त लागेल तेव्हां त्यांना आपली सल्लामसलत आणि मार्गदर्शन देऊन मदत करावी. १७

दारू-दुकान किंवा परदेशी-कापड-दुकान यांच्यापुढें निरोधन करतांना एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे, ती ही कीं, अशा निरोधनाचा हेतु व्यसनी मनुष्याच्या किंवा ग्राहकाच्या मनांत पालट घडवून आणणें हा असतो. आपलें उद्दिष्ट नैतिक व आर्थिक सुधारणा हें आहे. राजकीय परिणाम हा केवळ आनुषंगिक आहे. म्हणून पुढील नियम तो उद्देश धरून वाचावेत :

१. दुकानावर निरोधन करतांना तुमचें लक्ष ग्राहकावर खिळलेलें असावें.

२. ग्राहकाशीं किंवा दुकानदाराशीं तुमचें वर्तन उर्मटपणाचें कधींहि होऊं नये.

३. आपल्याभोंवतीं गर्दी गोळा होईल असें तुम्हीं करूं नये किंवा मोर्चे बांधूं नयेत.

४. तुमचा प्रयत्न मुकाटपणें चाललेला असावा.

५. संख्याबळाचा धाक दाखवून नव्हे तर आपल्या सौम्य वागणुकीनें तुम्ही ग्राहकाला किंवा दुकानदाराला आपल्या बाजूला जिंकून घेण्याचा प्रयत्न करावा.

६. रहदारीला अडथळा होईल असें करूं नये.

७. ' हाय हाय ' किंवा अशाच लज्जा उत्पन्न करणाऱ्या घोषणा करूं नयेत.

८. प्रत्येक ग्राहकाचें नांव, ठावठिकाणा, धंदा तुम्ही जाणून घ्यावा आणि त्याच्या किंवा तिच्या घरांत आणि अंतःकरणांत शिरावें. याकरितां निरोधन करणारी मंडळी नेहमीं तीच ती असणें अवश्य असतें.

९. ग्राहकाच्या व विक्रेत्याच्या अडीअडचणी तुम्ही समजावून घेण्याचा प्रयत्न करावा आणि जेथें त्या तुम्हांला दूर करतां येणार नाहींत तेथें त्या तुम्ही वरिष्ठांना कळवाव्यात.

१०. परदेशी कापडावर तुम्ही निरोधन करीत असाल तर तुमच्याजवळ थोडी खादी किंवा निदान खादीच्या निरनिराळ्या नमुन्यांचें एखादें पुस्तक खादीच्या दरासह असावें आणि जेथें त्या ग्राहकाला घेऊन जातां येईल असें जवळचें खादीचें दुकान तुम्हांला माहीत असावें. ग्राहकाला खादी घ्यायची नसेल तर स्वदेशी गिरणी कापडाचें दुकान त्याला दाखवावें.

११. ग्राहकांना देण्याकरितां तुमच्यापाशीं त्या त्या विषयासंबंधींचे वाङ्मय असावें.

१२. मिरवणुकी काढाव्यात, मॅजिक् लॅटर्नसह किंवा त्याच्याविना व्याख्यानें द्यावीं. भजनी मंडळें काढावीं.

१३. आपल्या रोजच्या कामाची तपशिलासह नोंद ठेवलेली असावी.

१४. आपले प्रयत्न सफल होत नाहींत असें जर तुम्हांला वाटलें तर निरुत्साहि होऊं नये, तर सार्वभौम अशा कर्मसिद्धान्तावर श्रद्धा ठेवून राहावें आणि खात्री बाळगावी कीं कोणताहि सद्विचार, सद्उच्चार किंवा सदाचार विफल होत नसतो. हिताचा विचार करणें, बरें बोलणें हें आपलें काम, फळ ईश्वराच्या हातीं. १८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम .................... वि: ............ १७७
नों. दि: ............

एक तक्रार अशी आहे कीं शांततामय निरोधनाच्या नांवावर निरोधक हे अशा पद्धती वापरीत आहेत कीं ज्या हिंसेंत मोडण्याचा मोठा संभव आहे. उदाहरणार्थ, निरोधकांची एक अशी तटबंदी उभी करायची कीं ज्या योगें जाणाऱ्याला स्वतःला किंवा तटबंदी करणाऱ्यांना इजा झाल्यावांचून पुढें जाताच येणार नाहीं. शांततामय निरोधनाचा जनक या नात्यानें अशा प्रकारच्या निरोधनाला मी कधीं उत्तेजन दिल्याचें मला मुळींच स्मरत नाहीं. धारासनाचें उदाहरण कोणी देतात, पण तेथें निरोधन नव्हतें. कामकऱ्यांना कामावर जाण्याला प्रतिबंध करण्याकरितां त्यांच्यापुढे फळी करून उभे राहणें म्हणजे शुद्ध हिंसा आहे. ती टाकली पाहिजे. कारखान्याच्या मालकांनी जर अशा वेळीं पोलिसांची मदत मागितली तर तें त्यांचें करणें योग्यच होईल आणि काँग्रेसवाले जर अशा कृत्यापासून परावृत्त झाले नाहींत तर पोलिसांची कुमक पाठविणें काँग्रेस सरकारचें कर्तव्य ठरेल. १९

ज्याच्या न्याय्यतेविषयीं वाद नाहीं असें कारण असल्यावांचून होणारें सर्व निरोधन, त्यांत शरीरबळ न वापरलें तरी, हिंसाच होय. अशा तऱ्हेचें निरोधन म्हणजे एक उपद्रव होय. तें वैयक्तिक हक्कावर गदा आणतें. सामान्यपणें एखाद्या जबाबदार संघटनेनें जर पुरस्कार केलेला नसेल तर व्यक्तींनीं निरोधन हातीं घेऊं नये. सविनय कायदेभंगाप्रमाणेंच निरोधनालासुद्धां आंखीव मर्यादा आहेत आणि त्या न पाळल्या तर तें गैर-सनदशीर व दूषणास्पद ठरतें. २०

प्रेम आणि अहिंसा परिणामकारकतेच्या दृष्टीनें अप्रतिम आहेत. परंतु त्यांच्या व्यवहारांत अवडंबर, दिखाऊपणा, गवगवा किंवा जाहिरातबाजी यांना स्थान नाहीं. प्रेम किंवा अहिंसा यांत आत्मविश्वास गृहीत असतो आणि आत्मविश्वासांत आत्मशुद्धि गृहीत असते. निष्कलंक चारित्र्याचीं आणि आत्मशुद्धियुक्त माणसें सहजच विश्वास उत्पन्न करतात आणि आपल्या भोंवतालचें वातावरण आपोआपच शुद्ध करतात. माझी फार दिवसांपासूनची अशी समजूत आहे कीं, राजकीय सुधारणेपेक्षां सामाजिक सुधारणा हें जास्त अवघड काम आहे. राजकीय सुधारणेकरितां वातावरण तयार आहे, लोकांना त्यांत आस्था आहे, आणि राजकारण हें आत्म-

शुद्धीशिवाय संभवनीय आहे या मताची छाप परदेशांत लोकमानसावर आहे. उलटपक्षीं, सामाजिक सुधारणांविषयीं लोकांना आस्था जवळ जवळ नसतेच, चळवळीचा परिणाम डोळ्यांत भरण्यासारखा नसतो आणि त्यांत अभिनंदनांना व मानपत्रांना वाव फारच कमी असतो. म्हणून सामाजिक सुधारकांना कांहीं काळ कष्टानें आपला मार्ग कंठावा लागेल, धीर धरावा लागेल आणि वरवर कमी दिसणाऱ्या परिणामांत संतोष मानावा लागेल.

मला या ठिकाणीं मध्येंच एक व्यावहारिक सूचना करावीशी वाटते. वृद्ध माणसांचीं तरुण मुलींच्याशीं लग्नें होण्याच्याविरुद्ध वातावरण निर्माण करण्याचें अत्यंत परिणामकारक साधन म्हणजे अशा विशिष्ट लग्नाविरुद्ध लोकमत निर्माण करावयाचें आणि वृद्ध नवरदेव व नवऱ्यामुलीचा लोभी बाप यांच्यावर शांततापूर्ण सामाजिक बहिष्कार अमलांत आणावयाचा. अशा एका का होईना उदाहरणांत जर बहिष्कार यशस्वी रीत्या अंमलांत आला तर आईबाप आपल्या मुलींचा विक्रा करतांना शंभर वेळां विचार करतील आणि म्हातारे नवरे तरुण मुली शोधायला कचरतील.

सारांश, अशा लग्नांना विरोध करण्यांतील आपल्या उद्देशासंबंधीं आपल्या मनांत स्पष्टता असली पाहिजे. जरठ माणसांना कामवासनेपासून परावृत्त करणें हा आपला उद्देश असणें शक्य नाहीं; तो असेल तर प्रथम आपल्याला तरुणांच्या कामवासनेचा समाचार घ्यावा लागेल. पण ती फार मोठी गोष्ट आहे. आपला उद्देश तरुण मुलींना कामी वृद्धांच्या आणि त्यांच्या लोभी आईबापांच्या तावडींतून सोडविणें एवढाच असूं शकतो. म्हणून सुधारकानें उपवर मुलींचा विकरा करण्याच्या विरुद्ध सतत मोहीम चालविण्याच्या कामाला लागलें पाहिजे. त्यानें उपवर मुलींच्या आईबापांना जाऊन भेटलें पाहिजे. याकरितां सत्याग्रह्यानें आपल्या कामाचें क्षेत्र आंखून घ्यावें, त्या क्षेत्रांत राहणाऱ्या विवाहयोग्य वयाच्या सर्व मुलींची मोजदाद करावी, त्या मुलींच्या आईबापांशीं संपर्क ठेवावा आणि आपल्या मुलींसंबंधींच्या कर्तव्याची जाणीव त्यांच्यांत उत्पन्न करावी. सुधारकाला जर यश मिळवावयाचें असेल तर त्यानें या मर्यादांच्या पलिकडे जाऊं नये. २१

## सामाजिक बहिष्कार

आपल्याहून दुसऱ्यांचीं मतें भिन्न आहेत म्हणून जर आपण सामाजिक बहिष्कार पुकारूं लागलों तर ती एक भयानक गोष्ट होईल. पाण्याचा आणि अन्नाचा पुरवठा बंद करणें हें अहिंसातत्त्वाच्या सर्वस्वीं विरुद्ध होईल. असहकाराचा लढा म्हणजे आपण जें बोलतों तें स्वतः आचरणांत आणून प्रचार करण्याचा कार्यक्रम आहे. दुसऱ्यांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें सक्ती करून आपण म्हणतों तें अंमलांत आणायला लावण्याचा हा कार्यक्रम नाहीं. आपल्या विरोधकांचें मत बदलण्याचा आपण सबूरीनें प्रयत्न केला पाहिजे. गुलामगिरींतून लोकशाहीची भावना जर आपल्याला विकसित करायची असेल तर विरोधकांशीं वागतांना आपण चोखंदळपणें कांटेकोर असलें पाहिजे. सरकारच्या गुलामगिरीऐवजीं असहकारवाद्यांची गुलामगिरी अस्तित्वांत येईल असें आपण करतां कामा नये. आपण स्वतःकरितां जेवढें स्वातंत्र्य मागतों आणि त्यासाठीं लढतों तेवढें स्वातंत्र्य आपल्या विरोधकांना आपण दिलें पाहिजे.

परंतु आपल्याला जर कांहीं प्रभाव दाखवायचा असेल तर अहिंसक स्वरूपाचा बहिष्कार अंमलांत आणल्यावांचून गत्यंतर नाहीं. जें आपण असत्य समजतों, तें गोऱ्या कातडींत असलें काय किंवा सांवळ्या कातडींत असलें काय, त्याच्याशीं आपण मुळींच तडजोड करतां कामा नये. असहकार न करणाऱ्या नव्या कौन्सिल - सभासदांकडून आपण कसलींहि कामें करवून घेतां कामा नयेत. मतदार जर आपल्या प्रतिज्ञेला इमानी असतील तर ज्यांना आपले प्रतिनिधी मानायचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें आहे त्यांचा उपयोग करून घेण्यापासून परावृत्त होणें त्यांना प्राप्त आहे.

लोक जर असहकारवादी असतील तर त्यांनीं अशा प्रतिनिधींच्या राजकीय समारंभांना वा मेजवान्यांना हजर राहूं नये व अशा प्रकारें त्यांना मिळणारी प्रतिष्ठा काढून घ्यावी.

कांहीं विशिष्ट निर्वाणीच्या प्रसंगीं, म्हणजे जेव्हां एखादी बेगुमान अल्पसंख्य जमात, एखाद्या तत्त्वाच्या पालनाकरितां नव्हे तर केवळ बहुसंख्येचा उपमर्द करण्याकरितां किंवा त्याहूनहि कांहीं वाईट हेतूनें,

बहुसंख्येपुढें नमण्याचा इन्कार करते अशा प्रसंगीं अहिंसक सामाजिक बहिष्कारसुद्धां करण्याची शक्यता मी कल्पूं शकतों. हिंसक स्वरूपाचा बहिष्कार, उदाहरणार्थ सार्वजनिक विहिरींचा उपयोग न करूं देणें, हा रानटीपणाचा प्रकार आहे. राष्ट्राचा स्वाभिमान आणि उद्धार व्हावा अशी इच्छा असणाऱ्या कोणाहि मनुष्यसमूहाकडून असल्या प्रकारचा रानटीपणा कधीं आचरला जाईल असें मी मानीत नाहीं. २२

सामाजिक बहिष्कार ही फार प्राचीन संस्था आहे. ती जाति-संस्थे-इतकीच प्राचीन आहे. भयंकर अशी ती शिक्षा आहे आणि तिचा अंमल फार परिणामकारी होतो. जातिबहिष्कृत जो झाला त्याचें आतिथ्य किंवा सेवा करण्याला जात किंवा जमात बांधलेली नाहीं, या भावनेवर तो आधारलेला असतो. ज्या वेळीं प्रत्येक गांव स्वयंपूर्ण असा समुदाय होता आणि जातगंगेला धाब्यावर बसविणारीं माणसें विरळ असत त्यां वेळीं त्याचा उपयोग होत होता. पण जेव्हां मतामतांत भेद पडतात, जेव्हां एखाद्या गोष्टीचा प्रयोग करून पाहायचा असतो, अशा वेळीं बहुसंख्याकांच्या इच्छेपुढें अल्पसंख्याकांना वांकविण्याकरितां सामाजिक बहिष्काराचा तडकाफडकीं उपयोग करणें म्हणजे अक्षम्य असा हिंसेचा प्रकार आहे. त्याचा आग्रह धरला तर आपली समाजशुद्धीची चळवळ सोडूनच पडेल. ज्याच्यावर बहिष्कार घातला त्याला तो शिक्षेसारखा न भासतां त्यानें तो शिस्तीचा उपाय म्हणून मान्य केला आहे असें जेव्हां होतें तेव्हांच तो लागू करावा आणि तरच तो परिणामकारी होतो. शिवाय, अहिंसक मोहिमेंत सामाजिक बहिष्कार आणायचा असेल तर त्याला अमानुषपणाचा वाससुद्धां येतां कामा नये. त्याचा प्रयोग करतांना शिष्टाचाराला रजा मिळून उपयोगी नाहीं. बहिष्कृताची जर त्यामुळें अडचण झाली तर बहिष्कार करणाऱ्यांना त्याचें दुःख झालें पाहिजे. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्याला वैद्यकीय मदत न मिळवूं देणें म्हणजे अमानुषपणाचें कृत्य होईल, नीतिनियमाच्या दृष्टीनें खून करण्यासारखेंच तें कृत्य ठरेल. मला वाटतें युद्धाच्या कायद्यांतसुद्धां वैद्यकीय उपायांची गरज असणाऱ्या शत्रूला ती मदत दिलीच पाहिजे असा नियम आहे. गांवांत विहीर असतांना त्या विहिरीचा एखाद्या मनुष्याला उपयोग न करूं देणें म्हणजे त्याला गांव

सोडून जा म्हणून सांगण्यासारखेंच आहे. उतावीळपणा आणि असहिष्णुता यांतून निर्माण झालेल्या सामाजिक बहिष्कारानें समाजशुद्धीची चळवळ ठार होईल. लोकांना आपण सक्ती वापरून शुद्ध करूं शकणार नाहीं. हिंसा वापरून तर आमच्या मताला त्यांना मान द्यायला लावणें मुळींच शक्य होणार नाहीं. जी लोकशाही लोकांच्या अंगीं आपल्याला रुजवायची आहे त्या लोकशाहीच्या तत्त्वाला तर तें अगदींच विसंगत आहे. २३

परंतु सामाजिक बहिष्काराचा दुसरा पर्याय सामाजिक दळणवळण ठेवणें हा तर मुळींच नाहीं. अत्यंत ज़िव्हाळ्याच्या बाबतींत जो मनुष्य तीव्र व निःसंदिग्ध अशा लोकमताला लाथाडतो त्याला समाजाच्या चांगुलपणाचा आणि समाजाकडून मिळणाऱ्या हक्कांचा लाभ घेण्याचा कांहीं अधिकार राहात नाहीं. अशा मनुष्याच्या लग्नकार्यांत वगैरे आपण भाग घेतां कामा नये, आपण त्याच्या देणग्या, आहेर वगैरे स्वीकारतां कामा नयेत. पण आपण त्याला पाणी, वैद्यकीय मदत, वाहतूक अशा प्रकारच्या समाजांतील सोयी नाकारणें योग्य होणार नाहीं. तें आपलें कर्तव्यकर्म आहे. लग्नकार्यांत भाग घेणें न घेणें आपल्या मर्जीची – आपल्या अधिकारांतली गोष्ट आहे, ती आपण करूं किंवा न करूं. पण यदाकदाचित् आपली चूक झालीच तर निदान त्यामुळें आपल्या हातून गैरवाजवी कांहीं घडत नाहीं एवढी खबरदारी आपण घेणें आणि मी सांगितलेल्या मर्यादित स्वरूपांत आणि अत्यंत क्वचित् प्रसंगीं बहिष्काराचा उपयोग करणें यांतच शहाणपणा आहे. आणि प्रत्येक वेळीं या शस्त्राचा उपयोग करणारा आपल्या स्वतःच्या जोखमीवरच त्याचा उपयोग करील. २४

* * *

## : १६ : प्रार्थना

अहिंसेचा अर्थ आतांपर्यंत आपण काय समजलों आणि तिचा आचार करून मिळविलेलें स्वातंत्र्य आपण कसें टिकवूं याचा आपण प्रार्थनायुक्त अंतःकरणानें विचार करूं या आणि शोध घेऊं या. आपली अहिंसा जर दुर्बलाची असेल तर अशा अहिंसेनें स्वातंत्र्य टिकविणें आपल्याला कधींहि शक्य होणार नाहीं हें ओघानेंच येतें. पण त्याबरोबर हेंहि ओघानें येतें कीं, निदान कांहीं काळपर्यंत तरी, शस्त्रानें आपण आपलें संरक्षण करूं शकणार नाहीं; त्याचें एक कारण असें कीं, आपल्याकडे शस्त्रेंहि नाहींत आणि तीं वापरण्याचें ज्ञानहि आपल्याला नाहीं. त्याकरितां अवश्य असणारी शिस्तहि आपल्यांत नाहीं. याचा परिणाम असा कीं आपल्याला दुसऱ्या राष्ट्राच्या मदतीवर विसंबून राहावें लागेल, आणि तें बरोबरीच्या नात्यानें नव्हे तर 'कमी दर्जाचे' म्हणून आणि, हे शब्द कानाला झोंबत असतील तर, गुरु-शिष्याच्या नात्यानें विसंबावें लागेल म्हणूं या पाहिजे तर.

तेव्हां स्वातंत्र्य संपादण्याकरितां जसा आपल्याला अहिंसेचाच शेवटीं आधार घ्यावा लागला, तसा तें टिकविण्याकरितां अहिंसेवांचून दुसरा आपल्याला आधार नाहीं, म्हणजेच जे स्वतःला आमचे विरोधक म्हणवितात त्यांच्या बाबतींत अहिंसेचाच आचार आपण केला पाहिजे, ही गोष्ट ज्यानें जवळ जवळ तीस वर्षें अहिंसा अंगीं बाणविण्याचा अभ्यास केला अशा माणसाला फार अवघड वाटण्याचें कारण नाहीं. या अहिंसक आचाराचें थोडक्यांत सार म्हणजे – "आपल्या अब्रूकरितां आणि स्वातंत्र्याकरितां जरूर तर मारा आणि मारतां मारतां मरण पत्करा" या सूत्राऐवजीं "त्याकरितां स्वतःचे प्राण अर्पण करा" हें सूत्र होय. शूर योद्धा काय करतो? तो जरूर पडली तरच मारतो आणि मारतांना आपला जीव धोक्यांत घालतो. अहिंसेकरितां याहून जास्त धैर्याची आणि त्यागाची गरज आहे. दुसऱ्याला ठार करीत असतांना स्वतः मरणाचा धोका पत्करणें माणसाला त्या मानानें सोपें वाटावें आणि दुसऱ्याचा जीव वांचवून स्वतः मरण पत्करणें हें मात्र अतिमानुष वाटावें असें कां? मारण्याची विद्या जर आपण शिकलों

आणि ती अमलांत आणली तरच आपल्याला मरणाला तोंड देणें शक्य आहे, नाहीं तर नाहीं, असें समजणें म्हणजे पराकाष्ठेची आत्मवंचना आहे. एखादें असत्य पुनः पुनः उच्चारण्यानें त्यांतून मनावर एक प्रकारची भुरळ पडते खरी, पण म्हणून आपण स्वतःची इतकी फसवणूक होऊं देऊं नये.

परंतु टीकाकार किंवा उपहास करणारे विचारतील : ही गोष्ट जर तुम्ही सांगतां इतकी साधी आहे तर प्रार्थना कशाला मध्यें आणतां ? त्याचें उत्तर असें कीं जीवनाच्या विविध क्षेत्रांत स्वतःचें बलिदान करण्याची उदात्त आणि शौर्यशाली कला शिकण्यामधला प्रार्थना हा पहिला आणि शेवटचा धडा आहे; त्याचा कळस म्हणजे आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें आणि इभ्रतीचें रक्षण करण्याकरितां आपलें बलिदान देणें हा आहे.

अर्थात् प्रार्थना म्हटली कीं ईश्वरावर जिवंत श्रद्धा आलीच. तशी श्रद्धा नसेल तर यशस्वी सत्याग्रहाची कल्पनाच करतां येणार नाहीं. मीं ‘ ईश्वर ’ म्हटलें, त्या नांवाऐवजीं वाटलें तर दुसरें नांव द्या; मात्र त्यांतून ‘ सनातन जीवनधर्म ’ असा अर्थ, किंवा दुसऱ्या शब्दांत, ‘ धर्म आणि धर्मकार यांचा अभेद ’, ध्वनित झाला पाहिजे.

* * *

## परिशिष्ट १

### अहिंसा व युद्धांत भाग

[ सन १९१८ सालीं पहिलें महायुद्ध सुरूच होतें आणि त्याकरितां हिंदुस्तानांतून माणसें आणि पैसा यांची मदत गोळा करण्याचा हिंदुस्तान सरकारचा प्रयत्न चालू होता. त्या वेळच्या व्हाइसरॉयनें लोकनेत्यांना या कामीं मदत करण्याची विनंति केली होती आणि अशा मदतीचा ब्रिटिशांच्या मनावर अनुकूल परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं असें सूचित केलें होतें. गांधीजींनीं युद्धप्रयत्नांना मदत करण्याचें ठरविलें होतें आणि खेडा सत्याग्रह संपतांच त्याच भागांत व गुजरातेंत इतरत्र सैनिक म्हणून भरती होण्यासाठीं माणसें गोळा करण्याकरितां ते पायींसुद्धां हिंडत राहिले होते. ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या न्यायीपणावर अजून त्यांचा विश्वास होता व त्यांच्या संकट-काळीं त्यांना मदत केली तर ते हिंदी लोकांविषयींचें आपलें कर्तव्य विसरणार नाहींत अशी त्यांनी आशा बाळगली होती. त्याचप्रमाणें, हिंदी लोकांच्या अंतःकरणांत परकीय सत्तेविषयींचा द्वेष धुमसत आहे, परंतु ते शस्त्रास्त्रहीन असल्यामुळें आणि त्यांना लष्करी शिक्षण नसल्यामुळें त्यांच्यांत अनेक अनिष्ट राजकीय प्रवृत्ती घर करूं लागल्या आहेत, म्हणून लष्करांत जाऊन लष्करी विद्या शिकण्याची ही आलेली संधी जर आपण हिंदी लोकांनीं साधली व आपल्यातर्फें माणसें सैनिक म्हणून पाठविलीं तर पुढें त्या माणसांत जो शूरपणा आलेला असेल त्याचा अहिंसक लढा देतांना आपल्याला फार उपयोग होईल व शूराची अहिंसा अमलांत आणतां येईल, या विचारसणीनें त्यांनीं लष्करभरतीची चळवळ सुरू केली होती. अहिंसेच्या विचाराशीं ही चळवळ कशी काय सुसंगत आहे यासंबंधीं त्यांच्या जवळच्या व दूरच्या माणसांनीं सतत पृच्छा केली असतां त्यांना जीं उत्तरें त्यांनीं दिलीं त्यांतून लोकांच्या मनांत धैर्य व शौर्य उत्पन्न होण्यासाठीं अशा लढाऊ शिक्षणाची कशी आवश्यकता आहे, शस्त्राविना हिंदी लोक कसे नपुंसक झाले आहेत यासंबंधींची त्यांची विचारसरणी स्पष्ट होते. म्हणून यासंबंधींचा

पुढील भाग अभ्यासाच्या दृष्टीनें येथें मुद्दाम दिला आहे. यांतील पहिला उतारा १९१७ सालचा आहे व पुढील उतारे महादेवभाईंच्या डायरींतून घेतलेले सन १९१८ मधील एप्रिल ते ऑगस्ट या महिन्यांतले आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे. —अनुवादक ]

शिपायीगिरी करण्याच्या कामाकरितां लायक बनायचें असें जेव्हां हिंदुस्तान ठरवील तेव्हां ती प्राप्त करून घ्यायला त्याला मुळींसुद्धां वेळ लागणार नाहीं. आघात करण्याला समर्थ बनण्याइतकी आपली भावना आपण कठीण केली कीं झालें. कठीण अंतःकरण बनवायला फार काळ लागत नाहीं. तण वाढतें तशा वेगानें मन भराभर तयार होतें. या प्रश्नाला दुसरी एक दुःखद बाजू आहे, कारण त्यांतून ही गोष्ट आपल्या मनांत येते कीं सरकारनें आतांपर्यंत आपल्याला लष्करी शिक्षणापासून वंचित ठेवलें आहे. जर त्यांच्या मनांत असतें तर आज त्यांना तयार सैनिक सुशिक्षित वर्गांतून सहज मिळाले असते. या दोषाचा वांटा सुशिक्षित वर्गापेक्षां सरकारकडे अधिक जातो. ब्रिटिश अंमल येथें स्थापन झाला त्या वेळीं करोडो लोकांवर राज्य करण्याच्या दृष्टीनें लोकांचीं शस्त्रें काढून घेणें आणि त्यांना लष्करी शिक्षण न देणें हें शहाणपणाचें धोरण आहे असें सरकारनें मानलें. परंतु चूक दुरुस्त करायला मुहूर्त लागत नाहीं, आणि राज्यकर्त्यांनीं आणि प्रजेनें ताबडतोब ही चूक दुरुस्त केली पाहिजे.

हें मत मांडतांना अर्थात् मी आजकालचा जो विचार-प्रवाह आहे तो योग्य आहे असें गृहीत धरलें आहे. पण मला स्वतःला मात्र हा विचार योग्य दिशेकडे नेणारा आहे असें वाटत नाहीं. आमचा लढा पाश्चात्य नमुन्यावर आधारलेला आहे. आपल्याला पाहिजे असलेलें स्वराज्य हें पाश्चात्य नमुन्याचें आहे. त्याचा परिणाम म्हणजे हिंदुस्तानाला पाश्चात्य राष्ट्रांच्या चढाओढींत उतरावें लागणार आहे. त्याशिवाय सुटका नाहीं असें कित्येकांना वाटतें. मला तसें वाटत नाहीं. हिंदुस्तान युरोप नव्हे, हिंदुस्तान जपान नव्हे, हिंदुस्तान चीन नव्हे, हें मी विसरूं शकत नाहीं. ‘ भारत हीच कर्मभूमि आहे, इतर देश भोगभूमि आहेत ’ हें वाक्य माझ्या चित्तावर ठसून गेलें आहे. हिंदुस्तानचें कार्य इतरांहून वेगळें आहे अशी माझी भावना आहे.

भारतभूमि ही जगाचें धार्मिक ( आध्यात्मिक ) श्रेष्ठपद घेण्याला योग्य अशी भूमि आहे. हा देश स्वेच्छेनें ज्या आत्मशुद्धीच्या प्रक्रियेंतून गेला आहे तिला दुनियेंत तोड नाहीं. हिंदुस्तानाला पोलादी शस्त्रास्त्रांची गरज नाहीं, तो दैवी शस्त्रांनीं आतांपर्यंत लढला आहे, आजहि त्याला तसें लढतां येईल. इतर राष्ट्रें शरीरबळाचीं उपासक आहेत. हिंदुस्तान सर्वांना आत्मबळानें जिंकूं शकेल. आत्मबळापुढें शरीरबळ कांहींच नाहीं हें सिद्ध करण्याला इतिहासांत किती तरी उदाहरणें आहेत. प्रेम म्हणजेच आत्मा. प्रेम हा आत्म्याचा गुण आहे. जर आपल्यांत पुरेशी श्रद्धा असेल तर आपण साऱ्या जगावर हें आत्मबळ चालवूं शकतों. आमच्यावरचा धर्माचा ताबा सुटल्यामुळें आधुनिक सुधारणेच्या तुफानांत आम्हांला स्थिर राखण्याकरितां नांगरच नसल्यासारखी आमची स्थिति झाली आहे. आणि त्यामुळें आम्ही इतस्ततः फेकलें जात आहों. १

**' हिंदु ' पत्राचा प्रतिनिधि :** अहिंसाव्रत घेतलेले आपण लष्करभरतीला कसें काय उत्तेजन देऊं शकतां ?

**गांधीजी :** मी लढाईच्या विरुद्धच आहें. पण ज्याला लढण्याची इच्छा असेल त्याला मी लढ म्हणून सांगेन हें खरें. माणसाचें मन आवेशांनीं भरलेलें असतें हें मी कबूल करतों. माणसानें मरायला शिकायचें तर त्या अगोदर त्याच्यांत मारण्याची शक्ति असली पाहिजे. लढणें बरें कीं नाहीं अशी माझी सल्ला कोणी विचारायला आला तर मी त्याला स्पष्ट सांगेन कीं बरें नाहीं. पण कोणी मनांत लढणें हें चांगलेंच अशी निश्चित प्रतीति घेऊन आला, पण आजच्या प्रसंगीं लढणें हें चांगलें कीं नाहीं याविषयीं त्याला शंका आहे तर मी त्याला सल्ला देईन कीं आजची घटका लढाईत भाग घेण्याची आहे. एक सरळ उदाहरणच घ्या. माझा मुलगा येऊन मला म्हणूं लागला कीं लग्न केल्याशिवाय राहणें मला शक्य नाहीं. आतां माझें निश्चित मत असें आहे कीं त्यानें ब्रह्मचर्य पाळणें उत्तम, पण मीं त्याचें लग्न करून दिलें पाहिजे. एवढ्याचकरितां कीं त्यानें वांकड्या मार्गाला जाऊं नये. अर्थात् लग्नानंतर तूं शक्य तितका अधिक संयम पाळ असें मी त्याला समजावून देईनच. २

अहिंसा कोणाला शिकवितां येईल? ज्याला हिंसा कशी करावी हें समजत नाहीं तो अहिंसा काय पाळणार? मुक्याला मौनव्रताची खुबी काय समजणार? अनेक वर्षांपासून लढण्याची शक्तीच आमच्यामधून नष्ट झाली आहे. जिच्याकरितां पूर्वी ऋषी तप करीत, शस्त्रास्त्रें मिळविण्यासाठीं गंभीर प्रतिज्ञा करीत ती शक्ति आपल्यांत यावी असें आपण इच्छितों. स्त्रियांत आणि पुरुषांत मनुष्यत्व यावें, पुरुषार्थ यावा, तो या वेळीं या संधीचा फायदा घेतल्यानेंच येण्यासारखा आहे. ३

**कु. एस्थर फेरिंग :** ज्याचा अहिंसेवर दृढ विश्वास आहे आणि सत्याग्रहाच्या प्रयोगाकरितां ज्यानें आपलें सारें जीवन समर्पित केलें आहे असा मनुष्य इतरांना कोणत्याहि रीतीनें युद्धांत सामील होण्याला आणि लढायला कसा सांगू शकेल?

**गांधीजी :** जो मनुष्य मारूं इच्छितो पण अपंग करून टाकल्यामुळें मारूं शकत नाहीं अशा माणसाला मी काय सल्ला द्यावी? न मारण्याचा अहिंसेचा सद्‌गुण त्याला समजण्यापूर्वी आपला जो हात तो गमावून बसला आहे तो मी त्याला परत दिला पाहिजे. हिंदी तरुणांना लष्करांत दाखल होण्याची सल्ला मी नेहमींच देत आलों आहें. पण आजपर्यंत त्याचा सक्रिय प्रचार करण्याच्या बाबतींत मीं स्वतःला आवरलें होतें. त्याचें कारण एवढेंच होतें कीं देशाच्या केवळ राजकीय जीवनांत आणि खुद्द युद्धप्रयत्नांत पूर्ण मन घालण्याची मला आंतून प्रेरणा झाली नव्हती. परंतु दिल्लींत माझ्यापुढें कठीण समस्या येऊन उभी राहिली. माझ्या मनांत एकदम असा विचार उद्‌भवला कीं लष्करांत सामील होण्याच्या प्रश्नाचा गंभीरपणें जर मी विचार न केला तर जीवनांतल्या मोठ्यांतल्या मोठ्या प्रश्नाला मी महत्त्वच दिलें नाहीं असें होईल. आपण एक तर या राज्याकडून मिळणाऱ्या सर्व लाभांचा त्याग तरी केला पाहिजे किंवा युद्धसंचालनाच्या कामीं आपल्या पूर्ण शक्तीनिशीं राज्याला मदत तरी केली पाहिजे. लाभांचा त्याग करण्याची आपली तयारी नाहीं. हिंदी लोकांनीं तर दुप्पट कर्तव्य बजवायचें आहे. त्यांना शांतीचा संदेश पसरवायचा असला तरी त्यांनीं युद्ध करण्याची शक्ति प्रथम सिद्ध केली पाहिजे हा शोध मला लागला. तो भयंकर आहे पण खरा आहे. जे लोक लढायला नालायक आहेत ते न लढण्यांत

असलेल्या गुणांसंबंधींचे आपले अनुभव सिद्ध करून दाखवूं शकणार नाहींत. यावरून हिंदुस्ताननें लढलेंच पाहिजे असा निष्कर्ष मला काढायचा नाहीं. पण माझें हें म्हणणें अवश्य आहे कीं हिंदुस्तानाला लढण्याची विद्या अवश्य हस्तगत झाली पाहिजे. अहिंसा म्हणजे मारण्याच्या किंवा इजा करण्याच्या इच्छेचा निरास करणें. अहिंसा अशाच माणसांच्या बाबतींत आचरतां येते कीं जे आपल्यापेक्षां सर्व रीतींनीं कमी प्रतीचे असतील. याचा अर्थ असा झाला कीं पूर्ण अहिंसाधर्मीनें पूर्णतेची पराकाष्ठा गांठलेली असली पाहिजे. म्हणजे आपण पूर्ण प्रेमधर्मी बनण्यापूर्वीं सॅन्डो होण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा का याचा अर्थ करायचा ? तें अनावश्यक आहे. जगाच्या विरुद्ध आपण न डगमगतां उभें राहूं शकतों एवढें पुरेसें आहे. या प्रकारची धमक आपल्यांत असणें हें अगदीं अवश्य आहे. कित्येकांत अशी धमक त्यांनीं लढण्याचें शिक्षण घेतलें म्हणजेच येऊं शकते. मला काय म्हणायचें आहे तें मीं फार अव्यवस्थित रीतीनें मांडलें आहे हें मी जाणतों. मी नव्या अनुभवांतून जात आहें. माझे आंतरिक विचार व्यक्त करण्याची मी धडपड करीत आहें. कित्येक गोष्टी अजून मला स्पष्ट दिसत नाहींत. ज्या गोष्टी माझ्या मनांत स्वच्छ झाल्या आहेत त्या दुसऱ्यांना सांगण्यासाठीं मी शब्द शोधीत आहें. प्रकाशासाठीं मी प्रार्थना करीत आहें आणि अतिशय विचारानें मी काम करीत आहें...४

स्वराज्याचा अर्थ–इंग्लंडच्या बरोबरीची पूर्ण स्वतंत्रता. या लढाईत इंग्लंडला जर आपण मदत करूं शकलों तर आज इंग्लंड आपल्यावर राज्य करीत आहे त्याऐवजीं आपलें दडपण त्याच्यावर राहील. आपण लष्करी शिक्षण घेण्याची आवश्यकता आहे. अहिंसाधर्म पाळणारा माझ्यासारखा हिंदुस्तानांत मी दुसरा बघितला नाहीं. मी तर प्रेमानें ओथंबलेला आहें. इंग्रजाचीं पापें माझ्याइतकीं दुसऱ्या कोणालाहि कळलेलीं नाहींत. तशींच त्यांचीं पुण्यकृत्येंहि माझ्याइतकीं दुसऱ्या कोणीं जाणलेलीं नाहींत. ज्याला शस्त्रविद्या शिकायची आहे, ज्याला मारावें कसें हें समजून घ्यायचें आहे, त्याला मी हिंसा करायलासुद्धां शिकवीन. या वेळीं मी कांहींच जर करूं शकलों नाहीं तर माझी तपश्चर्या कमी आहे असें तुम्हीं समजावें. न मारतां ज्याला मरतां येत नसेल त्यानें मारून मरायला शिकावें. ५

**श्री. अँड्र्यूज यांना पाठविलेल्या पत्रांतून—**

"माझें नांव मीं लष्करभरतींत दाखल केलें त्या वेळींच सरकारी अधिकाऱ्याला पत्रांत मीं कळविलें होतें कीं मी शत्रूला किंवा मित्राला कोणालाहि मारणार नाहीं. परंतु ज्या लोकांची प्रत्यक्ष लढाई करण्यास हरकत नाहीं पण भित्रेपणामुळें किंवा इंग्रजांविषयींच्या द्वेषामुळें जे लढायला तयार होत नाहींत त्यांच्या बाबतींत माझें कर्तव्य काय ? त्यांना मी असें सांगूं नये काय कीं 'माझा मार्ग तुम्ही घ्याल तर ती अतिशय चांगली गोष्ट आहे, पण माझा मार्ग तुम्ही स्वीकारीत नसाल तर तुम्हांला आपल्यांतला भ्याडपणा किंवा द्वेष जो काय असेल तो सोडून दिला पाहिजे आणि लढलें पाहिजे ? जो मनुष्य मारण्याची शक्ति बाळगत नाहीं त्याला तुम्ही अहिंसा समजावून देऊं शकणार नाहीं. मुक्याला मौनाची खुबी आणि लाभ तुम्ही कसें काय समजावून देणार ? जरी मौन हें उत्तम आहे हें मला माहीत असलें तरी मुक्या माणसाला वाचा मिळावी याकरितां जे उपाय करणें आवश्यक ते करण्याला मी मागें-पुढें पाहतां कामा नये. मी तर राज्य-संस्थाच मानीत नाहीं. पण स्वच्छंदी राजापेक्षां कदाचित् पार्लमेंटरी राज्य अधिक चांगलें असूं शकेल. हिंसक ( लष्करी ) माणसांना हिंसा कमींत कमी अपायकारक रीतीनें करण्याचें शिक्षण देतांना त्या प्रक्रियेंतच अहिंसेचे सद्‌गुण समजावून देण्यांत कदाचित् मी यशस्वी होऊं शकेन. या रीतीनेंच अहिंसेच्या किंवा सत्याग्रहाच्या सिद्धान्ताचा मी अधिक चांगल्या प्रकारें प्रचार करूं शकेन ..." ६

**श्री. अँड्र्यूज यांना उत्तर :—**

"तुम्ही म्हणतां कीं 'हिंदी लोकांनीं एक समाज म्हणून भूतकाळीं पूर्ण ज्ञानपूर्वक हिंसेचा त्याग केला होता आणि ज्ञानपूर्वक मानवतेचा पक्ष घेण्याचें ठरविलें होतें. ही गोष्ट काय ऐतिहासिक दृष्ट्या सत्य आहे ? मला तर महाभारतांत, रामायणांत किंवा माझ्या प्रिय तुलसीदासांतहि या गोष्टीचा मागमूसहि मिळत नाहीं. अर्थात् या वेळीं मी त्या ग्रंथाच्या आध्यात्मिक अर्थाचा विचार करीत नाहीं. त्यांत अवतारी पुरुषांना रक्तपिपासु, सूडबुद्धीचे आणि शत्रूंविषयीं कठोर असे वर्णिले आहेत यांत शंका नाहीं.

शत्रूचा पराभव करण्यासाठीं त्यांनीं युक्त्या प्रयुक्त्यांचाहि आश्रय घेतला आहे. या ग्रंथांतील युद्धाचीं वर्णनें आजच्यापेक्षां कांहीं कमी भडक नाहींत. रामाची कीर्ति गाण्याकरितां तुलसीदासांनीं जें पहिलें भजन बनविलें आहे त्यांत शत्रूचा निःपात करण्याच्या त्याच्या शक्तीला पहिलें स्थान दिलें आहे. यानंतरचा मुसलमानांचा काळ घ्या. त्या काळीं हिंदू हे मुसलमानांपेक्षां लढण्याकरितां कमी तत्पर नव्हते. फक्त ते संघटित नव्हते इतकेंच. शरीरानेंहि ते दुर्बळ झालेले होते आणि आपापसांतील तंट्यांनीं छिन्नभिन्न झाले होते. या समाजाच्या अंगीं तुम्ही जो त्यागाचा गुण चिकटवीत आहां तसा त्याग करायला मनुस्मृतीनें सांगितलेलें नाहीं. बौद्ध धर्म म्हणजे भूतमात्राविषयीं दया. या दृष्टीनें त्या धर्माचा विचार केला तर तो पूर्णतः अयशस्वी ठरला आहे. दंतकथा जर खऱ्या मानायच्या असतील तर महान् शंकराचार्यांनीं बौद्ध धर्माला हिंदुस्तानांतून पिटाळून लावण्याकरितां अनन्वित घातकीपणा वापरतांना मागेंपुढें पाहिलें नाहीं. आणि ते यशस्वी झाले ! नंतरचा ब्रिटिश काळ घ्या. लोकांना आज सक्तीनें निःशस्त्र करण्यांत आलें आहे, पण त्यांच्या मनांतून मारण्याची इच्छा काडीमात्रहि गेलेली नाहीं. जैनांतहि हा सिद्धान्त पूर्णपणें असफल झालेला आहे. त्या लोकांत रक्त बघितलें कीं भ्यावें अशी भ्रामक समजूत मोठ्या प्रमाणांत आहे. पण त्यांनासुद्धां शत्रूच्या प्राणांविषयीं कोणत्याहि युरोपीय माणसा-इतकी तुच्छता आहे; म्हणजे शत्रूचा निःपात झाल्यानें पृथ्वीवरच्या इतर कोणाहि लोकांना जितका आनंद होईल तितकाच जैनांनाहि होईल. हिंदुस्तानासंबंधीं जास्तींत जास्त जर कांहीं म्हणतां येईल तर तें इतकेंच कीं येथें कांहीं व्यक्तींनीं इतर देशांपेक्षां अहिंसेचा सिद्धान्त लोकप्रिय करण्याकरितां जास्त नेटाचे व अधिक यशस्वी परीश्रम केले आहेत. पण त्यावरून लोकांत अहिंसेच्या सिद्धान्ताचीं मुळें खोलवर रुजलीं आहेत असें मत बनविण्याचें कांहीं कारण नाहीं.

दुसरी गोष्ट, तुम्ही म्हणतां कीं, ‘ अहिंसा ही नकळत हिंदी लोकांच्या अंगीं मुरलेली वृत्तीच बनून गेली आहे, ती कोणत्याहि वेळीं जाग्रत करतां येईल, असा माझा एक मुद्दा आहे; तुमच्या ( गांधीजींच्या ) बाबतींत तुम्हीं तसें करून दाखविलेंच आहे. ’ हें खरें असतें तर बरें झालें असतें.

पण मीं तसें कांहींच करून दाखविलेलें नाहीं हें मला दिसत आहे. आफ्रिकेंत जेव्हां कांहीं मित्र मला म्हणत कीं 'पॅसिव रिझिस्टन्स' हें हिंदी लोकांनीं दुबळ्यांचें हत्यार उचललें आहे तेव्हां मला ती आमची बदनामी वाटे आणि त्यांना मी हंसत असें. पण तसें म्हणणारे खरे होते आणि मी खोटा होतों. माझ्या स्वतःच्या आणि इतर कांहीं थोड्या सहकाऱ्यांच्या बाबतींत तें सबळाचें हत्यार होतें आणि सत्याग्रह म्हणून त्याचें वर्णन करतां येण्यासारखें आहे. पण बहुसंख्य लोकांच्या बाबतींत तें निवळ पॅसिव रिझिस्टन्सच होतें. त्याचा आसरा त्यांनीं एवढ्याच कारणाकरितां घेतला होता कीं हिंसेचा मार्ग स्वीकारण्याची त्यांची शक्ति नव्हती. या शोधाचा अनुभव मला खेडा जिल्ह्यांत वरचेवर आला. तेथील लोक त्या मानानें जास्त स्वतंत्र वृत्तीचे असल्यामुळें माझ्याशीं कसलाहि संकोच न ठेवतां बोलतात आणि मला स्पष्ट सांगतात कीं हा सत्याग्रहाचा उपाय आम्ही एवढ्याचकरितां स्वीकारला आहे कीं दुसरा मार्ग अमलांत आणण्याची आमच्यांत ताकद नाहीं. हा दुसरा मार्ग मी दाखविलेल्या मार्गापेक्षां ते पुष्कळच बहादुरीचा समजतात. चंपारण्यांतील लोक किंवा खेडा जिल्ह्यांतील लोक निर्भयपणें फांशीच्या फळीवर चढणार नाहींत किंवा गोळ्यांच्या वर्षावापुढें उभे राहूं शकणार नाहींत, आणि इतका धोका पत्करून 'आम्ही महसूल भरणार नाहीं' किंवा 'आम्ही तुमचें काम करणार नाहीं' असेंहि सांगणार नाहींत. ही ताकद मला त्यांच्यांत दिसलीच नाहीं. म्हणून माझें म्हणणें हें आहे कीं जोंवर स्वतःचें रक्षण करण्याची तालीम त्यांना मिळत नाहीं तोंवर ही निर्भय वृत्ति त्यांना संपादन करतां यावयाची नाहीं. अहिंसेचा पाठ अशा माणसाला द्यायचा आहे कीं ज्याचें जीवन उत्साहानें सळसळतें आहे आणि जो आपल्या विरोधी मनुष्यासमोर छाती काढून ताठ उभा राहणारा आहे. मला असें वाटतें कीं, अहिंसा पूर्णपणें समजण्याकरितां आणि ती बरोबर पचण्याकरितां शारीरिक साहसाचा पूर्ण विकास झालेला असणें अत्यंत आवश्यक आहे.

कोणत्याहि दिशेकडून वाटेल तितक्या फौजा चाल करून आल्या तरी त्यांना हिंदुस्तान आपल्या नैतिक बळानें आपल्या हद्दीवरून परत हटवूं शकेल या तुमच्या मताशी मी सहमत नाहीं. प्रश्न असा आहे कीं असें

नैतिक बळ त्याला कसें वाढवितां येईल ? या नैतिक बळाचे प्राथमिक सिद्धान्त देखील त्याला कळूं शकण्यापूर्वीं त्याला शरीरानें बलवान् बनावें लागेल का ? आज आम्ही माणसें दररोज प्रातःकाळीं 'तें निष्कल ब्रह्म मी आहें,' 'पंचमहाभूतांनीं बनलेला हा देह तो मी नव्हे' असें म्हणून जगन्नियंत्याची एक प्रकारें चेष्टाच करीत असतों. हा आणि त्याच्या पुढचे श्लोक यांचा भव्य अर्थ कांहींसुद्धां न कळतां आम्ही निवळ पोपटपंची करीत असतों. या श्लोकांत जो आशय आहे त्याच्या पूर्ण अर्थाचा एका जरी हिंदी माणसाला साक्षात्कार होईल तर हिंदुस्तानावर चालून येणाऱ्या अत्यंत शक्तिशाली फौजांना हटविण्याला तो एकटा पुरेसा होईल. पण आपल्यांत ती ताकद आज नाहीं. आणि जोंवर देशांत स्वातंत्र्याचें आणि निर्भयपणाचें वातावरण व्यापून राहिलेलें नाहीं तोंवर ती ताकद येऊंहि शकणार नाहीं. प्रश्न असा आहे कीं, हें वातावरण उत्पन्न करायचें कसें ? एखाद्या माणसाच्या किंवा पशूच्या हिंसेला तोंड देऊन स्वतःचें रक्षण करण्याची शक्ति आपल्यांत नाहीं असें जोंपर्यंत देशांतल्या बहुसंख्य लोकांना वाटत राहील तोंपर्यंत असें वातावरण उत्पन्न होणें शक्य नाहीं. एखाद्या मुलाला मोक्षाचा अर्थ समजावून देण्यापूर्वीं त्याच्यांत पूर्ण मनुष्यत्वाचा विकास झालेला असला पाहिजे हें तर उघडच आहे. अमुक इतक्या प्रमाणांत त्याच्यांत या शरीराची आणि आजबाजूच्या दुनियेची आसक्ति उत्पन्न होऊं दिली पाहिजे. तरच या शरीराच्या व दुनियेच्या क्षणभंगुर स्वरूपाची कल्पना मला त्याला सहजपणें देतां येईल आणि असें समजावून देतां येईल कीं हें शरीर आपल्याला भोग भोगण्यासाठीं मिळालेलें नाहीं तर मुक्तीचें साधन म्हणून तें मिळालें आहे. याचप्रमाणें कोणत्याहि माणसाच्या मनांत अहिंसेचा म्हणजेच पूर्ण प्रेमाचा सिद्धान्त रुजावा म्हणून तें मन प्राणवान् शरीराच्या माध्यमांतून यथायोग्य विकसित होऊन परिपक्व होण्याची मी वाट पाहिली पाहिजे. आतां माझी अडचण ही आहे कीं हा विचार व्यवहारांत कसा आणायचा ? प्राणवान् शरीर असणें म्हणजे काय ? हिंदी लोकांनीं शस्त्र वापरण्याच्या शिक्षणांत कोठपर्यंत जायला पाहिजे ? अगदीं प्रत्येक व्यक्तीला या शिक्षणाच्या तालमींतून पूर्णपणें गेलें पाहिजे का, कीं स्वातंत्र्याचें वातावरण उत्पन्न झालें आणि लोकांत शस्त्र धारण न करतां-

सुद्धां आजूबाजूच्या वातावरणांतूनच अवश्य तें धैर्य त्यांच्यांत उत्पन्न झालें म्हणजे पुरे ? माझ्या मतें दुसरा विचार योग्य आहे. म्हणून आजच्या परिस्थितींत मी म्हणतों तें अगदीं खरें आहे. जेव्हां प्रत्येक हिंदी माणसानें लष्करांत जावें असें मी सांगतों तेव्हां त्याचबरोबर त्याला सतत हेंहि सांगत राहतों कीं तूं लष्करांत दाखल होत आहेस तो रक्ताची तहान भागविण्याकरितां नव्हे तर मरणाचें भय राखूं नये हें शिकण्याकरितां.

लष्करभरतीच्या माझ्या प्रत्येक भाषणांत ' हिंदुस्तानाकरितां आणि साम्राज्याकरितां आपण लढाईत जाऊं या आणि मरूं या ' असें मी सांगत असतों, ' जर्मनांना मारण्याखाठीं जाऊं या ' असें मी सांगत नाहीं. माझ्या मागणीला उत्तर म्हणून खूप मोठ्या प्रमाणांत जर भरती झाली आणि आम्ही सगळे फ्रान्समध्यें जाऊन लढाईचें पारडें जर्मनीच्या विरुद्ध झुकतें करूं शकलों तर मला वाटतें कीं आपला दावा ऐकायला लावण्याचा हिंदुस्तानाला अधिकार प्राप्त होईल आणि हिंदुस्तान चिरस्थायी समेट घडवून आणूं शकेल. आतां पुढें अशी कल्पना करा कीं निर्भय माणसांचें लष्कर उभें करण्यांत मला यश आलें आणि हे लोक खंदकांत जाऊन प्रेमपूर्ण हृदयानें आपल्या बंदुका टाकून देऊन जर जर्मनांना हांकारून सांगूं लागले कीं, ' आम्ही तुमचे मानवबंधू आहोंत, आमच्यावर चालवा तुमच्या गोळ्या ', तर मी सांगतों जर्मनांचें हृदयहि विरघळून जाईल. जर्मन लोक राक्षसी वृत्तीचेच आहेत हा आरोप मला मुळींच मान्य नाहीं.

तेव्हां या सर्वाचा अर्थ हा झाला कीं अपवादरूप परिस्थितींत युद्ध एक अपरिहार्य अनिष्ट म्हणून युद्धाचा आसरा घ्यावा लागेल—जसा या शरीराचा घ्यावा लागत आहे तसा. जर हेतु शुद्ध असेल तर युद्धांतूनहि मानवजातीचें कल्याण काढतां येईल. पण अहिंसावादी हा युद्धाकडे तटस्थपणें पाहात बाजूला उभा राहूं शकत नाहीं. एक तर युद्धांत सक्रिय सहकार द्यायचा किंवा युद्धाला सक्रिय विरोध करायचा अशी त्याला स्वतःची निवड करावीच लागेल. " ७

**श्री. हनुमंत राव यांना उत्तर—**

" मी हातीं घेतलेल्या लष्करभरतीच्या कामामुळें मित्रांना निरनिराळ्या

कारणांकरितां–राजकीय त्याचप्रमाणें धार्मिक कारणांकरितां–दुःख वाटत आहे हें मी जाणतों. पण माझ्या या कामाला नांवें ठेवण्यांत दोन्ही क्षेत्रांतील मित्रांची चूक होत आहे असें मला वाटतें. माझे विचार देशापुढें पुष्कळ काळापासून आहेत. परंतु माणसाचें खरें मूल्यमापन अर्थात् त्याच्या कृत्यावरूनच करायचें असतें, त्याच्या वाणीवरून तें क्वचितच होऊं शकतें. अहिंसेच्या माझ्या आचरणांतून आणि अहिंसेचा पहिला धडाच लोकांना समजावून देतांना आलेल्या अपयशांतून मला हा शोध लागला आहे कीं कोणतेंहि मारणें हें प्रत्येक वेळीं हिंसाच असतें असें नाहीं, कित्येक वेळां तर अहिंसेच्या पालनाकरितांसुद्धां मारण्याची गरज असते. आपण राष्ट्र म्हणून मारण्याची शक्ति गमावून बसलों आहों. जो मारण्याची शक्ति गमावून बसला त्याला अहिंसेचें आचरण शक्य नाहीं हें उघड आहे. अहिंसेंत अत्यंत उच्च प्रकारचा त्याग असतो. दुबळी आणि क्षीण होऊन गेलेली प्रजा त्यागाचें हें भव्य आचरण करूं शकणार नाहीं. उंदरानें मांजराला मारण्याच्या शक्तीचा त्याग केला आहे असें कांहीं आपण म्हणत नाहीं. आपल्याला बराच काळ जागरूक रीतीनें प्रयत्न करून ही शक्ति परत मिळवावी लागेल असें जर मीं म्हटलें तर तें भयंकर वाटेल पण तें अगदीं खरें आहे. आणि ही शक्ति मिळविल्यानंतरच तिचा सतत त्याग करून हिंसेच्या यातनांतून आपण जगाला सोडवूं शकूं. आश्रमाच्या सभासदांना देखील अहिंसा यथार्थ रीतीनें समजावून देतांना मला अपयश येई त्याचें मला किती दुःख होई तें वर्णन करण्याला मला शब्द पुरे पडणार नाहींत. पण आज आश्रमांत जवळ जवळ प्रत्येकाला ही गोष्ट समजली आहे आणि अहिंसा म्हणजे सबळांनीं केलेला त्याग, दुबळ्यांचा नव्हे, या विचारानें त्यांच्यांत नवें तेज आलें आहे. संघटित युद्ध आणि व्यक्तिगत युद्ध या दोहोंत काडीमात्र भेद करणें शक्य नाहीं. लुटारूंच्या बाबतींतसुद्धां संघटित विरोध आणि संघटित कापाकापी होऊं शकते. उत्तमोत्तम योद्धा तोच कीं जो वाटेल तितकीं माणसें विरुद्ध उभीं असोत त्यांच्यापुढे निर्भयपणें उभा राहतो. त्या वेळीं त्याला आपली मारण्याची शक्ति किती असा विचार येत नाहीं तर पलायन करून जीव बचावणें शक्य असतांनासुद्धां आपण मरायला सिद्ध होऊन उभे आहोंत या

गोष्टीची त्याला मस्ती चढलेली असते. माझें असें निश्चित मत आहे कीं आपल्या मुलांना आत्मरक्षणाची कला आपल्याला शिकवावीच लागेल. मला अधिकाधिक स्पष्टपणें वाटत आहे कीं जर आपल्याला आत्मरक्षणाची शक्ति पुनः संपादन करतां आली नाहीं तर दीर्घकालपर्यंत आपण स्वराज्याला नालायक राहणार आहोंत. यावरून आत्मविकासाविषयीं आणि देशाच्या विकासाविषयीं किती तरी कल्पनांचा मला पुनः विचार करावा लागला आहे. तुम्ही अहिंसेचा हा नवा विचार बरोबर समजून घ्यावा याकरितां मी उत्सुक आहें. यांत पतन नाहीं उलट उन्नति आहे. या शोधामुळें प्रेमाचें जें दर्शन मला झालें आहे तें पूर्वींपेक्षां अनंतपटीनें श्रेष्ठ आहे." ८

**प्रिन्सिपॉल रुद्र यांना पत्र—**

"मी लष्करभरतीची ही चळवळ अंगावर घेऊन स्वतःची वंचना करीत आहें, त्यामुळें अहिंसेच्या ध्येयाच्या माझ्या उपासनेची हानि होईल, अशी चार्ली अँड्र्यूजला भीति वाटते. मीं तर त्या ध्येयाच्याच उपासने-प्रीत्यर्थ हें काम अंगावर घेतलें आहे. माझी जबाबदारी फार मोठी आहे हें मी जाणतों. लष्करभरतीचें काम हें माझ्या क्षेत्रांत येत नाहीं असें मानून मी निश्चिंत होतों तेव्हांहि माझी जबाबदारी तितकीच मोठी होती. माझ्या वचना-वर श्रद्धा ठेवणारे लोक न मारणें ही अहिंसा आहे अशी खोटी कल्पना करून घेऊन अगदीं स्त्रैण बनतील किंवा स्त्रैण राहतील अशी धास्ती त्या वेळीं होती. शरीरबळाचें वैयर्थ्य पटून त्या बळाचा त्याग करायचा तर त्याकरितां अगोदर मारण्याची पुरती शक्ति आपल्यांत असली पाहिजे. येशू ख्रिस्तांत शत्रूंना जाळून भस्म करण्याची शक्ति होती तरी ती त्यानें वापरली नाहीं आणि स्वतःला त्यानें ठार करूं दिलें; कारण तितकें प्रेम त्याच्यांत भरलेलें होतें." ९

**श्री. अँड्र्यूज यांना पत्र—**

"जगांत युद्धें सदोदित राहणार. सगळ्या मनुष्यजातीच्या स्वभावांत इतकें परिवर्तन होईल अशी शक्यता दिसत नाहीं. मोक्ष आणि अहिंसा यांची सिद्धि व्यक्तींनाच होऊं शकेल. मालमत्ता बाळगणें तसेंच जमीन

धारण करणें किंवा संतति उत्पन्न करणें हें अहिंसेचें संपूर्ण पालन करण्याशीं विसंगत आहे.

"दुष्कृत्य करणाऱ्याला ठार करण्यांत जी जोखीम आहे ती पत्करूनहि त्याला ठार करून स्त्री-बालकांचें रक्षण करण्यांत खरी अहिंसा आहे. अंगावर चाल करून येणाऱ्या मनुष्याला न मारतां मध्यें पडून त्याचे सर्व प्रहार आपल्या अंगावर घेण्यांत संपूर्ण अहिंसा आहे. पण हिंदुस्तानानें तर प्लासीच्या रण-मैदानावर दोहोंपैकीं एकहि गोष्ट केली नाहीं. आमचें सैन्य म्हणजे एक भ्याडांचा घोळका होता. आपापसांत आम्ही झगडत होतों. ईस्ट इंडिया कंपनीच्या पैशाकरितां आम्ही वखवखलेले होतों, आणि यःकश्चित् वस्तु-करितांसुद्धां आपला आत्मा विकायला आम्ही तयार होतों. आजसुद्धां आपली दशा कमी जास्त प्रमाणांत–कमी कसलें, जास्तच प्रमाणांत–तशीच आहे. कांहीं व्यक्तींनीं शौर्य गाजविल्याचीं उदाहरणें आहेत, आणि त्या काळच्या अतिशयोक्तिपूर्ण वृत्तान्तांत मागाहून दुरुस्त्याहि झाल्या आहेत, तरीहि एकंदरीनें आम्ही जो केविलवाणा देखावा जगाला दाखविला त्यांत अहिंसा नव्हती. जुन्या काळीं खिस्ती पाद्र्यांनीं काय केलें याविषयीं मला पुरती माहिती नाहीं. त्यांनीं दुबळेपणानें नव्हे तर सबळपणानें हाल सोसले असें मी समजतों. जुन्या काळच्या ऋषींनी तर आपल्या धार्मिक क्रिया-कांडांचें रक्षण क्षात्रियांनी करावें असाच पायंडा घातला होता.

सैन्यभरती करण्यांत मला फार अडचणी येत आहेत. अजून एकसुद्धां मनुष्य मला असा भेटला नाहीं कीं ज्याला हत्या करणें निषिद्ध वाटत असल्यामुळें तो लष्करभरतींत सामील होत नाहीं. मरणाच्या भीतीमुळेंच पुष्कळांची हरकत आहे. मरणाचें हें अस्वाभाविक भय राष्ट्राची हानि करीत आहे. अर्थात् हें मीं फक्त हिंदूंच्याच बाबतींत लिहिलें. मुसलमान तरुणांत मरणाविषयीं अत्यंत बेदरकारी असते, ती त्यांची अद्‌भुत संपत्ति आहे. १०

**"चि. मगनलाल,**

...स्वामीनारायण आणि वल्लभाचार्य यांनीं आमच्या मनुष्यत्वाचें हरण केलें असें माझें मत झालें आहे. त्यांनी माणसांची रक्षणशक्तीच काढून घेतली.

स्वामीनारायण आणि वल्लभ यांनीं शिकविलेलें प्रेम भावनाविवश करणारें आहे. त्यांतून शुद्ध प्रेम निघणें शक्यच नाहीं. अहिंसेच्या शुद्ध लक्षणाचा त्यांनीं विचारच केलेला नाहीं. अहिंसा म्हणजे चित्तवृत्तीचा निरोध. मनुष्यामधल्या परस्पर-संबंधांत तिचा मुख्य प्रयोग व्हायचा असतो. त्याचा गंधहि त्यांच्या लिखाणांत आढळून येत नाहीं. त्यांची छाप गुजरातवर फार मोठी पडली. तुकाराम आणि रामदास यांची छाप मात्र त्या स्वरूपाची पडली नाहीं. तुकारामाच्या अभंगांत आणि रामदासाच्या श्लोकांत पुरुषार्थ भरलेला आहे. तेहि वैष्णवच होते ...हिंसेंत अहिंसा आहे हें आतांपर्यंत मला दिसून आलें नव्हतें तें आतां मला दिसूं लागलें आहे. हा मोठा बदल झाला आहे. दारूनें माजून अत्याचार करणाऱ्या माणसाला अटकाव करण्याचें कर्तव्य पुरतें माझ्या लक्षांत आलें नव्हतें, अतिशय व्यथेनें पीडलेल्या कुत्र्याचा जीव घेण्याची आवश्यकता मला समजली नव्हती, पिसाळलेल्या कुत्र्याला ठार करण्याची आवश्यकताहि समजली नव्हती. या सर्व हिंसेच्या कृत्यांत अहिंसा आहे. हिंसा हा शरीराचा गुण आहे. आपलीं मुलें शरीरानें बलवान् झालींच पाहिजेत. तीं जर हिंसावृत्तीचा सर्वथा त्याग करूं शकलीं नाहींत तर त्यांना हिंसा करूं देऊन, लढण्याच्या शक्तीचा उपयोग करूं देऊन, अहिंसक बनवितां येईल. अहिंसेचा उपदेश क्षत्रियांनीं क्षत्रियांना केलेला आहे... " ११

**कु. वेस्ट ( देवीबहेन ) यांना पत्र–**

" प्रिय देवी,

... माझ्या लष्करभरतीच्या कार्यक्रमाविषयीं तुमचें मत काय आहे तें मला समजलेलें नाहीं. माझा सर्व वेळ त्याच कामाला मी देत आहें. माझें त्या बाबतींतील म्हणणें पुढीलप्रमाणें आहे :

हिंदुस्तान मारण्याची शक्ति गमावून बसला आहे. मारण्याच्या शक्तीचा स्वेच्छापूर्वक त्याग त्यानें करायचा तर त्यापूर्वीं त्यानें मारणें शिकून घेणें अवश्य आहे. अशा रीतीनें एकदां मारण्याची शक्ति मिळविल्यानंतर तिचा त्याग तो कधीं करणार नाहीं असा संभव आहे. तसें घडलें तर पश्चिमेकडील देशांसारखाच, किंवा अधिक चांगल्या शब्दांत मांडायचें तर,

सर्व आधुनिक स्वतंत्र देशांसारखाच तो वाईट बनेल. आज तर त्याच्या ठिकाणीं हिंसेचीहि शक्ति नाहीं आणि तिच्या त्यागाचीहि शक्ति नाहीं. प्राचीन हिंदुस्तानाला युद्धकला अवगत होती. हिंसा करण्याची त्याच्यांत शक्ति होती. पण त्या प्रवृतीचा त्यानें शक्य तितक्या अधिक प्रमाणांत संकोच केला आणि जगाला शिकविलें कीं मारण्यापेक्षां मरणें हें अधिक चांगलें. आज तर मला असें दिसून येत आहे कीं प्रत्येक माणसाची इच्छा आहे मारण्याची पण पुष्कळजण तें करायला भितात किंवा ती शक्तिच त्यांच्यांत नसतें. ( ही शक्ति आल्याचा ) परिणाम वाटेल तो होवो; मला निश्चितपणें वाटतें कीं मारण्याची शक्ति हिंदुस्तानानें पुनः संपादन केलीच पाहिजे. त्यामुळें देशांत मोठ्या कत्तली होतील तर हिंदुस्तानाला त्यांतून जावें लागेल. आजची स्थिति असह्य आहे. ” १२

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

## परिशिष्ट २

[ सन १९२१ ]

मी माझी मदत गेल्या महायुद्धाच्या वेळीं रिक्रूटभरतीकरितां दिली... मी त्या वेळीं स्वतःला ब्रिटिश साम्राज्याचा एक नागरिक समजत होतों. तेव्हां त्या नात्यानें माझें कर्तव्य काय हा एक प्रश्न, आणि अहिंसेचा कट्टा भक्त या नात्यानें माझें कर्तव्य काय असा दुसरा प्रश्न, असे दोन प्रश्न त्या वेळीं माझ्यापुढें होते.

...अहिंसाधर्म-पालनाचा प्रश्न जास्त गहन आहे. अहिंसेसंबंधींची माझी जी कल्पना आहे त्यामुळें जें जें कार्य मी पत्करतों, त्यांपैकीं जवळ-जवळ प्रत्येक कार्यांतून मला नेहमीं अंग काढून घ्यावें लागतें. एकाहि अन्यायाचा किंवा दुःखाचा केवळ असहाय्य साक्षी बनून जोंवर मला राहावें लागतें तोंवर माझ्या आत्म्याला कधीं स्वस्थता लाभत नाहीं. पण मी एक दुर्बळ, स्खलनशील, पामर जीव; या प्रत्येक अन्यायाचें निवारण करणें किंवा माझ्या समक्ष घडत असलेल्या कोणत्याहि अन्यायाचा दोष माझ्यावर नाहीं असें समजून मोकळें होणें या दोन्हीहि गोष्टी मला शक्य नाहींत. माझ्यांतील चैतन्य मला एका बाजूला ओढतें तर हें जड शरीर मला विरुद्ध बाजूला खेंचते. या द्वंद्वाच्या क्रियेपासून मुक्त होणें शक्य नाही असें नाहीं. परंतु ती मुक्ति केवळ सावकाशीच्या आणि खडतर अशा टप्प्यांनींच साध्य आहे. यांत्रिक रीतीनें कर्मत्याग केल्यानें नव्हे तर केवळ ज्ञानपूर्वक अनासक्त कर्म केल्यानेंच मुक्ति साध्य होऊं शकेल. आत्मा सर्वस्वीं मुक्त व्हावा म्हणून शरीराचें सतत बलिदान करीत राहणें असेंच शेवटीं या संघर्षाचें स्वरूप ठरतें.

दुसरी गोष्ट म्हणजे मी एक सामान्य नागरिक होतों. माझ्या इतर नागरिक बंधूंहून जास्त शहाणपणा माझ्यांत होता असें नाहीं. माझी अहिंसेवर निष्ठा होती, इतरांची तशी नव्हती, तरीहि त्यांच्या मनांत ब्रिटिश सरकाराबद्दल द्वेष व क्रोध असल्यामुळें त्या सरकारला मदत

करण्याचें आपलें कर्तव्य ते करीत नव्हते. त्यांचा एक कार्यकर्ता बंधु या नात्यानें त्यांना योग्य मार्ग दाखविणें माझें कर्तव्यकर्म होतें. म्हणून मीं त्यांच्यासमोर त्यांचें स्पष्ट कर्तव्य काय तें ठेवलें, त्यांना अहिंसेचा सिद्धान्त समजावून दिला आणि 'तुम्हांला योग्य वाटेल तें करा' असें सांगितलें. आणि त्यांनींहि आपली निवड केली. अहिंसेच्या दृष्टीनें मला माझ्या कृतीचा पश्चात्ताप वाटत नाहीं. कारण, स्वराज्यांतसुद्धां ज्यांना शस्त्रें हातीं घ्यायचीं असतील त्यांनीं तीं घ्यावींत आणि देशाकरितां लढावें असा सल्ला देण्याला मी कचरणार नाहीं.

परंतु माझ्या स्वप्नींच्या स्वराज्यांत शस्त्रांची गरजच मुळीं नाहीं. अर्थात् आजच्या प्रयत्नांचें फळ म्हणून तें माझें स्वप्न पूर्णपणें सत्यसृष्टींत उतरेल अशी माझी अपेक्षा नाहीं. त्याचें एक कारण म्हणजे तें ध्येय आजच्या आज प्राप्त करण्याच्या दृष्टीनें आजची चळवळ सुरू केलेली नाहीं; आणि दुसरें म्हणजे, तशा तयारीकरितां राष्ट्रापुढें तपशीलवार एखादी आचार-संहिता तयार करून मांडण्याइतकी माझी प्रगति झालेली नाहीं. मी स्वतः अजूनहि मनुष्यस्वभावांत असलेल्या विकारांनीं आणि इतर उणीवांनीं भरलेला आहें त्यामुळें आंतून मला तशी प्रेरणा किंवा शक्ति वाटत नाहीं. म्हणून आचारांत संपूर्ण अहिंसा कशी पाळावी यासंबंधींचा मार्ग राष्ट्राला दाखविणें मला शक्य नाहीं. १३

[ सन १९२५ ]

... शस्त्रांचा वापर करण्यावर जरी माझा विश्वास नाहीं आणि तो वापर मी मानीत असलेल्या अहिंसाधर्माला जरी विरोधी आहे, तरी देशाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारा हत्यारांचा कायदा रद्द करण्याकरितां जर एखादी चळवळ झाली तर तिच्यांत सामील व्हायला मी कचरणार नाहीं. ब्रिटिश सरकारनें हिंदुस्तानच्या केलेल्या असंख्य घोर गुन्ह्यांपैकीं हा एक गुन्हा आहे असें मीं मानलें आहे. उलट आघात करावा असें मी मानीत नाहीं, तरी चार वर्षांपूर्वीं बेत्तियाजवळच्या खेड्यांतील लोकांना मीं हें सांगायला मागेंपुढें पाहिलें नाहीं कीं 'अहिंसेचा तुम्हांला गंधहि नसतांना जर तुम्ही आपल्या बायकामंडळींची अब्रू आणि आपली मालमत्ता शस्त्रांच्या

बळावर रक्षण केली नाहींत तर तुम्ही भ्याड ठराल... मीं नुकतेंच हिंदूंनाहि सांगितलें कीं तुमच्या स्त्रियांना पळवून नेण्याकरितां जर कोणी आले आणि जर तुमचा अहिंसेवर पूर्ण विश्वास नसेल किंवा ती तुम्ही आचरणांत आणूं शकत नसाल तर शस्त्रांच्या मदतीनें तुम्हीं त्यांचें रक्षण केलें पाहिजे; तसें तुम्हीं केलें नाहींत तर तुम्ही भ्याड ठराल, तुमच्या धर्माच्या विरुद्ध तुम्हीं वर्तन केलें असें मी म्हणेन.' हा माझा सारा उपदेश आणि माझें मागचें वर्तन हें, मी पूर्णपणें अहिंसेचें पालन करतों, या माझ्या दाव्याशीं कोणत्याहि रीतीनें विसंगत नाहीं; इतकेंच नव्हे तर त्या पालनाचेंच हें फलित आहे. त्या उदात्त सिद्धान्ताचें प्रतिपादन करणें हें सोपें आहे. तो जाणणें आणि त्याचा आचार कलहांनीं, कोलाहलांनीं आणि मनोविकारांनीं भरलेल्या या जगांत करणें हें किती कठीण आहे याची मला रोजच्या रोज जास्त जास्त जाणीव होत आहे. पण त्याचबरोबर त्यावांचून जीवन हें जगण्यासारखें राहणार नाहीं याविषयींचीहि माझी खात्री दिवसेंदिवस पक्की होत आहे. १४

[ सन १९२८ ]

मी निष्ठायुक्त युद्धविरोधी असल्यामुळें संधी असूनसुद्धां विनाशक शस्त्रांचा वापर करण्यासंबंधींचें शिक्षण कधीं घेतलें नाहीं. यामुळेंच बहुधा मी मनुष्यजीविताची साक्षात् हानि करण्यापासून बचावलों. पण जोंवर पाशवी बळावर आधारलेल्या राज्यपद्धतीच्या आसऱ्याखालीं मी राहात आहें आणि त्या राज्याकडून मिळणाऱ्या सुखसोयींचा आणि विशेषाधिकारांचा स्वेच्छेनें उपभोग घेत आहे तोंवर तें राज्य–सरकार युद्धांत गुंतलेलें असतांना त्याला लागणारी मदत माझ्या शक्तीप्रमाणें करण्याला मी बांधलेला आहें; त्या सरकारशीं मी असहकार केलेला असला आणि त्याच्याकडून मिळणाऱ्या हक्कांचा पराकाष्ठेच्या प्रयत्नानें मी त्याग केलेला असला तर मात्र गोष्ट वेगळी...

तरी तेवढ्यानें कोडें सुटत नाहीं. राष्ट्रीय सरकारच्या राजवटींत, जरी मी कोणत्याहि युद्धांत कसलाहि प्रत्यक्ष भाग घेतला नाहीं तरी, ज्यांना लष्करी शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यांना तें मिळावें याकरितां माझें मतदान

करणें हें माझें कर्तव्य ठरेल. अशा प्रसंगाची मी कल्पना करूं शकतों. कारण माझी जितकी अहिंसेवर श्रद्धा आहे तितकी श्रद्धा समाजांतील सर्व लोकांची नाहीं हें मला माहीत आहे. सक्तीनें कोणा व्यक्तीला वा समाजाला अहिंसक बनविणें शक्य नाहीं...

परंतु माझा ज्ञानदीप स्थिर आणि स्पष्ट आहे. सत्य–अहिंसेशिवाय आपणांपैकीं कोणाला तरणोपाय नाहीं. युद्ध अधर्म आहे, असह्य असें तें पाप आहे हें मी जाणतों. तें नष्ट झालेंच पाहिजे. माझ्यावर ज्या ज्या कृत्यांचा आरोप करण्यांत आलेला आहे तीं सर्व कृत्यें असमर्थनीय ठरलीं तरी पुरवलीं; पण माझ्या कोणत्याहि कृतींच्या आधारें अहिंसेला उणेपणा आला किंवा कोणत्याहि स्वरूपांत मी हिंसेचा किंवा असत्याचा पुरस्कार केला असें ठरतां कामा नये. हिंसा नव्हे – असत्य नव्हे, अहिंसा – सत्य हाच आपला जीवनधर्म आहे. १५

[ सन १९४७ ]

सर्व प्रकारच्या युद्धाला मी सदैव विरोधच करीत आलों आहें. परंतु पाकिस्तानपासून न्याय मिळविण्याचे सारेच उपाय जर थकले, सिद्ध करून दिलेली चूकहि, पदरांत घातलेलें पापहि, जर पाकिस्तान हटवादी-पणानें नाकबूलच करीत राहील आणि आपण कांहींच केलें नाहीं असेंच जर म्हणत राहील, तर हिंदी संघराज्याला पाकिस्तानशीं युद्ध करण्यावांचून गत्यंतर राहणार नाहीं. युद्ध म्हणजे थट्टा नाहीं. युद्ध कोणालाहि नको आहे. तो मार्ग विनाशाचा आहे. परंतु अन्याय सहन करा असें मी कधींच कोणाला सांगणार नाहीं ... लोकांनीं आपल्या इच्छेप्रमाणें सरकारला करायला लावावें. माझा मार्ग विचाराल तर तो निराळा आहे. मी ईश्वराचा उपासक आहें, आणि सत्य-अहिंसा हें माझ्या ईश्वराचें स्वरूप आहे. ” १६

“ आपण जर शेवटपर्यंत पाकिस्तानशीं सरळपणें वागत राहिलों तर पाकिस्तानच्या मुसलमानांना आपलीं पावलें मागें घ्यावींच लागतील. हा ( नियतीचा ) कठोर कायदा आहे. सर्वांचें समान हित करण्याचा प्रयत्न केलेल्या एका म्हाताऱ्या माणसाचे हे शब्द आहेत. आयुष्याच्या ७८ किंवा

७९ वर्षांचा भरपूर अनुभव माझ्या गांठीला आहे, कारण मी जगांत डोळे सताड उघडे ठेवून फिरलों आहें. मी वीस वर्षें हिंदुस्तानच्या बाहेर काढलीं. दक्षिण आफ्रिकेसारख्या मागासलेल्या प्रदेशांत मी राहात होतों, तेथें नीग्रोंचीच मोठी वस्ती आहे. त्यांच्यांत मी राहूं शकलों याचें कारण रामनामापासून मला बळ मिळत असे. म्हणून मी माझ्या स्वतःच्या अनुभवाची गोष्ट तुम्हांला सांगतों कीं, दुष्टपणाचा बदला दुष्टपणानें घेणें हें आपल्याला शोभत नाहीं. दुष्टपणाचा बदला सत्प्रवृत्तीनें घेणें यांतच माणुसकी असते. दुष्कृत्य करणाऱ्याला तुम्ही कशी शिक्षा करणार? त्या दुष्कृत्या-बद्दलची शिक्षा त्याला आपसुखच होईल याविषयीं मला शंका नाहीं. जगांतल्या सर्व धर्मांचें हेंच सार मला तरी आढळून आलें आहे. दुष्ट कृत्याचा बदला सत्कृत्य करून आम्हांला वाजवी रीत्या घेतां येईल. निदान तुम्हीं तसें केलेलें मला आवडेल.” १७

* * *

## परिशिष्ट ३

[ हिंदचे सरसेनापति जनरल करिआप्पा यांनीं इंग्लंडमधील आपल्या दौऱ्यांत एके ठिकाणीं भाषण करतांना म्हटलें होतें कीं भारताच्या आजच्या परिस्थितींत अहिंसा ही कांहीं कामाची नाहीं, सामर्थ्यसंपन्न सैन्यच भारताला जगाच्या मोठ्या राष्ट्रांच्या पंक्तीला नेऊन बसवूं शकेल. या त्यांच्या उद्गारांवर गांधीजींनीं ता. १६-११-१९४७ च्या 'हरिजन' मध्यें एक लेख लिहून आक्षेप घेतला होता. त्यांनीं लिहिलें होतें कीं, "जनरल करिअप्पाहून मोठ्या सेनापतींनीं, अहिंसेमध्यें कोणती महाशक्ति दडलेली आहे यासंबंधीं बोलण्याचा आम्हांला अधिकार पोंचत नाहीं, अशी मोकळ्या मनानें कबुली देण्याचा सुज्ञपणा आणि नम्रता दाखविली होती. या ॲटम् बाँबच्या युगांत हिंसेच्या सर्व हिकमती एकत्र झाल्या तरी त्यांना नामोहरम करूं शकणारी शक्ति निर्भेळ अहिंसा ही एकच आहे असें मी छातीठोकपणें सांगतों. लष्करी शास्त्राचें आणि नैपुण्याचें जें शोचनीय दिवाळें त्याच्या माहेरघरांत निघालें आहे तें आम्ही पाहात आहों. एखाद्या दिवाळखोरानें शेअर-बाजारांत जुगार खेळून सर्वस्व गमावल्यावर त्या विशिष्ट स्वरूपाच्या जुगाराचीं स्तुतिस्तोत्रें गावीं हें बरें काय ?"

जनरल करिअप्पांनीं स्वदेशीं परत आल्यावर डिसेंबर १९४७ मध्यें गांधीजींची मुद्दाम भेट घेतली. त्या वेळीं त्यांच्यांत झालेल्या संभाषणांतून, राष्ट्राराष्ट्रांमधले तंटे सोडविण्याचा मार्ग युद्ध नाहीं, त्याऐवजीं दुसरा कांहीं परिणामकारक नैतिक उपाय आहे का, यासंबंधीं चर्चा झाली. गांधीजींचीं त्यासंबंधींचीं मतें अगदीं शेवटचीं ( १९४७ डिसेंबर ) काय आहेत हें त्यांतून दिसून येतें, म्हणून तो संवाद येथें उद्धृत केला आहे.

— अनुवादक ]

गांधीजींना अभिवादन करून पहिलें औपचारिक बोलणें केल्यानंतर श्री. करिअप्पा म्हणाले, " आम्हां शिपायी गड्यांची फार नालस्ती

झालेली आहे. आपण देखील आम्हांला अत्यंत हिंसक जमात मानतां. पण आम्ही तसे नाहीं ... या दुनियेंतल्या सर्व लोकांत जर कोणाला खरोखर युद्धाचा तिटकारा असेल तर तो सैनिक लोकांना. तो तिटकारा रणांगणांतल्या धोक्यांमुळें आणि भयंकर प्रसंगामुळें आलेला नाहीं तर देशादेशांमधले तंटे मिटवायला युद्धाचा काडीइतकाहि उपयोग होत नाहीं याचें ज्ञान झाल्यामुळें आलेला आहे. एका युद्धांतून दुसरें उद्‌भवतें असें आम्हांला वाटतें. इतिहासानें आम्हांला हें शिकविलें आहे. ”

युद्धाविषयींचें हें एका नामवंत, कसलेल्या योद्ध्याचें मत ऐकून गांधीजींना सानंद आश्चर्य वाटलें. करिअप्पा पुढें म्हणाले, “ लोकसत्ताक देशांत लष्कराकडून युद्धें सुरू केलीं जात नाहींत ... राज्यकर्त्या सरकारांना जेव्हां देशादेशांमधील वादांचे प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवितां येत नाहींत तेव्हां तीं युद्धें पुकारतात ... आम्ही फक्त सरकारचे म्हणजे अर्थात् लोकांचे हुकूम अमलांत आणतों. लोकशाहींत लोकांना जर युद्धें आवडत नसलीं तर त्यांनीं आम्हांला दोष देऊं नये, त्यांनींच सत्तेवर बसविलेल्या सरकारला दोष द्यावा. लोकांना जर सरकाराविषयीं संतोष नसला तर उपाय साधा आहे, त्यांनीं सरकार बदलावें आणि युद्धाचा आसरा न घेणारें दुसरें सरकार त्या जागीं आणावें. तेव्हां, आमचा कांहीं अपराध नाहीं हें आपण पाहतांच. मग आम्हांला कां बोल लावावा ? ” गांधीजींचें त्या दिवशीं मौन असल्यामुळें ते बोलले नाहींत. त्यांनीं ज. करिअप्पांना पुनः दोन दिवसांनीं यायला सांगितलें.

करिअप्पा पुनः भेटायला आले. ते म्हणाले, “ आपण जीं तत्त्वें आचरतां, म्हणजे मानवाविषयीं प्रेम आणि निष्ठा, शिस्त, देशसेवेप्रीत्यर्थ स्वार्थत्याग, श्रमप्रतिष्ठा आणि अहिंसा, त्यांतलें प्रत्येक तत्त्व आम्ही आचरणांत आणतों. आपल्याला जर सैन्य ठेवायचेंच असेल तर तें चांगलें असलें पाहिजे. मी माझ्या रीतीनें या सैनिकांना अहिंसेच्या आवश्यकतेसंबंधीं आणि महत्त्वासंबंधीं जाणीव करून देऊं इच्छितों. पण चांगले कसलेले शिपायी बनण्याचें आपलें मुख्य काम गौण मानून अहिंसेवर तुम्ही आपलें लक्ष केंद्रित करा एवढेंच जर मी सैनिकांना सांगूं लागलों तर देशाविषयींचें माझें कर्तव्य मीं योग्य रीतीनें बजावलें असें होणार नाहीं. म्हणून आपल्याला

माझी नम्र विनंति अशी कीं आपण मला लहान मुलाला समजावून सांगतात तसें ज्ञान द्यावें. सैनिक म्हणून आपल्या व्यवसायांत आपल्याला चांगल्या रीतीनें तयार व्हायचें आहे ही कर्तव्याची जाणीव न टाकून देतां सैनिकांच्या मनावर अहिंसेचें तत्त्व मीं कसें बिंबवावें तें मला आपण कृपा करून सांगा. या विषयांत मी लहान मूल आहें. मला आपलें मार्गदर्शन पाहिजे. ''

गांधीजी हंसले आणि त्यांना म्हणाले, " हां हां, तुम्ही सगळीं लहान मुलेंच आहांत. मीसुद्धां मूलच आहे म्हणा, पण तुमच्यापेक्षां जरा मोठें मूल एवढेंच, कारण तुम्ही सर्वांनीं या प्रश्नावर जेवढें चिंतन केलें आहे त्यापेक्षां मीं त्यांचें थोडें जास्त चिंतन केलें आहे. आपल्या हाताखालच्या सैनिकांच्या मनावर अहिंसेची आवश्यकता कशी बिंबवावी हें तुम्हांला माझ्याकडून प्रत्यक्ष आणि निश्चित स्वरूपांत पाहिजे आहे. '' आपले डोळे अर्धवट मिटून आपल्या शब्दांवर जोर देण्याकरितां आपला हात त्यांनी पुढें केला आणि ते बोलले, " याचें उत्तर मला अजून सांपडत नाहीं, मी अजून अंधारांत चांचपडत आहे. तें मी शोधून काढीन आणि केव्हां तरी तुम्हांला जरूर सांगेन. ''

मध्यंतरीं इकडचीं तिकडचीं बोलणीं झाल्यानंतर निरोप द्यायच्या वेळीं गांधीजी त्यांना म्हणाले, " पुढच्या कांहीं दिवसांत मी याबद्दल कसून विचार करीन आणि लवकरच तुम्हांला कळवीन. पण तुम्ही जर मला वरचेवर भेटलात तर या अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यासंबंधीं आपल्याला अधिक चर्चा करतां येईल. ''

जनरल करिअप्पा त्यानंतर गांधीजींना १८ जानेवारीला भेटले. काश्मीरच्या आघाडीवर जातांना गांधीजींचा आशीर्वाद घेण्याकरितां म्हणून ते आले होते. गांधीजी त्यांना म्हणाले, " काश्मीरचा प्रश्न अहिंसक रीतीनें सोडविण्याच्या कामीं तुम्हांला यश येईल असें मी इच्छितों. तिकडून तुम्ही आल्यानंतर आपण भेटूं. ''

पण तो योग पुनः आलाच नाहीं. १८

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 21945 वि: ...
क्रमांक ...7302... नों: दि: 25.11.57

परिशिष्ट ४

**श्री. मनुबहन गांधी लिहितात :**

मुलींची चेष्टा करण्याची घाणेरडी संवय शहरांतल्या समाजांत असते, तशी आमच्या या छोट्याशा शहरांत आहे. एका कोळ्याच्या मुलीची तक्रार होती कीं आपण रस्त्यानें जातांना हॉटेलांत बसलेले तरुण आपली चेष्टा करतात. मुलींनीं यासंबंधीं उघड तक्रार केली तर त्यांचे पालक मुलींच्या-वरच रागावत, कारण त्यामुळें त्या मुली गांवाच्या डोळ्यांपुढें येणार. कित्येक आईबापांनीं तर मला असेंहि सांगितलें कीं या बाबतींत आम्ही किंवा आमच्या मुलींनीं कांहीं उपाययोजना केली तर त्यांचा साखरपुडासुद्धां व्हायचा नाहीं. त्यामुळें चेष्टा करणाऱ्या टोळक्याला बोलायला कोणी धजायचें नाहीं. मला ही गोष्ट कळतांच मी त्या मुलीला बरोबर घेऊन बाजारच्या रस्त्यांतून निघाले. ठराविक तरुण मुलांनीं रोजच्याप्रमाणें तिची चेष्टा करायला सुरुवात केली. मला संताप आला आणि मी पायांतलें चप्पल काढून त्या मुलाला धरून दोन तडाखे ओढले. त्यामुळें माझ्याबरोबर असलेल्या मुलीलाहि धीर आला आणि तिनेंहि त्या पोराला ठोकलें. ही गंमत बघायला माणसें जमा झालीं. कित्येक व्यापारी शाबासकी देऊन आम्हांला म्हणाले, " बरं केलंत, आमच्याहि मुलींना हे लोक सतावत होते. " मला त्या व्यापाऱ्यांचा जास्तच राग आला.

दुसऱ्यांदां दुसऱ्या कांहीं मुलींना बरोबर घेऊन मी चौकांतून निघाले तेव्हां त्या मुलींना चिडविणाऱ्या गुंड मुलांनीं आपल्या चेष्टा सुरू केल्या. आम्ही त्यांतल्या एकाला धरलें आणि खूप मार देऊन पोलिसाच्या हवालीं केलें. शेवटीं त्या सर्व गुंड मुलांनीं लेखी माफी मागितली. त्यानंतर आज-तागायत भरबाजारांतून जात असतांना कोणी एकानेंहि आमचें नांव काढलें नाहीं.

पण ज्या दिवशीं मीं त्याला मारलें त्याच रात्रीं माझ्या मनांत विचार आला कीं हें आपलें कृत्य हिंसक झालें, बापूजींना कळलें तर त्यांना किती

बरें दुःख होईल ! मी पत्र लिहून त्यांना सर्व हकीकत कळविली. बापूजींचें उत्तर आलें तें पुढीलप्रमाणें :

“ ...तूं जो मार्ग अनुसरलास ती एक प्रकारें द्रौपदीची रीत म्हणतां येईल. अनुकरणीय रीत सीतेची आहे. अर्थात् दोघीहि सतीच मानल्या गेल्या आहेत. तूं गुंडांना प्रत्युत्तर देण्याकरितां जें केलेंस तेवढेंच पुरेंसें मानलें असशील, तुझ्या मनांत क्रोध भरलेला असेल तर तूं गुंडगिरीला गुंडगिरीनेंच उत्तर दिलेंस असें होईल. पायांतलें चप्पल काढून तूं त्याला मारलेंस त्यानें तो गुंड दबला असा तूं जर अर्थ केला असशील तर तूं काय केलेंस तें तुझ्या लक्षांत येईल. भर चौकांत तूं शरीरबळ दाखविलेंस त्यानें लोकांत देखील बळ येऊं शकेल, आणि गुंडसुद्धां हाडानें भ्याडच असतात त्यामुळें तेसुद्धां दबून पळून जातील. चप्पल काढून हातीं घेणें ही जर तुझ्या अंतःकरणांतील करुणेची खूण असेल तर चप्पल काढून मारलें तरी ती मी अहिंसेची खूण समजेन. अहिंसेचें मूळ हृदयांत असतें. दुसरा माणूस ताडनाला वश झालेला नाहीं, त्या ताडनामागें जें करुणेचें तेज आहे त्याला दिपून तो आत्म्याच्या बळापुढें वांकला असा त्या अहिंसेचा परिणाम दिसून आला पाहिजे. मिस् श्लेशिननें ( गांधीजी दक्षिण आफ्रिकेंत असतांना त्यांच्या टायपिस्टचें काम करणारी तरुणी ) माझ्या तोंडावर मूर्खपणानें विडीचा धूर फुंकला. मी तिला थप्पड मारली. तिनें विडी फेंकून दिली आणि अगदीं पहिल्या प्रथमच तिला माझ्या देखत रडूं कोसळलें. तिनें माझी माफी मागितली आणि मला लिहून कळविलें कीं, ‘ आतां कधीं मी असें करणार नाहीं. तुमचें प्रेम मला समजून आलें. ’ अशी तर माझ्या जीवनांत किती एक उदाहरणें आहेत. पण इतर पुष्कळांनासुद्धां तसे अनुभव आले असतील, ते आपल्याला माहीत नाहींत. तुझ्यांत असें प्रेम आहे असें त्या गुंडाला वाटलें का ? लोकांच्या शाबासकीला भुलून जाऊन फसूं नको. तुझें हृदय तपास आणि मग विचार करून आपल्या कृत्यांत हिंसा होती कीं अहिंसा तें पाहा. सामान्यपणें विचार करतां पायांतलें चप्पल काढून मारणें ही कांहीं सभ्यतेची म्हणजेच अहिंसेची खूण नव्हे, ती नादानीची म्हणजे असभ्यतेची खूण आहे. पण हें कृत्य तुझ्या बाबतींत अहिंसेची खूणहि होऊं शकेल, त्याची साक्ष तुझी तूंच किंवा परमेश्वर होऊं

शकेल. असें हें सगळें तुझ्या कृत्याचें पृथक्करण केल्यानंतर मी तर तुला धन्यवादच देऊं इच्छितों. कारण तुझी कृति हिंसक झाली तरी मला पर्वा नाहीं. तूं दबली नाहींस एवढें मला पुरेंसें आहे. तुझें वळण अहिंसेकडे आहे असें मी मानून चाललों आहें. म्हणून ही हिंसा झाली असली तरी त्यांतून तूं विचारपूर्वक अहिंसा शिकशील ... " १९

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि: ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. ..........

# सत्याग्रह-विचार

## संदर्भ-ग्रंथावलि

[ पुढे संदर्भ-सूचींत या ग्रंथांचीं संक्षिप्त नांवें पुढें दिल्याप्रमाणें घातलीं आहेत. ]


**‘ नवजीवन प्रकाशन मंदिर, अमदाबाद ’कडून प्रकाशित**

| संदर्भ ग्रंथ | संक्षिप्त नांव |
| --- | --- |
| १ धर्ममंथन | ... |
| २ दक्षिण आफ्रिकाना सत्याग्रह नो इतिहास | द. आ. सत्या. इति. |
| ३ आत्मकथा ( गुजराती ) | ... |
| ४ सत्य एज ईश्वर छे | सत्य ईश्वर |
| ५ महादेवभाईनी डायरी पुस्तक १, २, ३ व ४ | महा. डायरी |
| ६ सत्याग्रहाश्रम नो इतिहास | आश्रम इति. |
| ७ मंगळप्रभात ( गुजराती ) | ... |
| ८ आश्रमजीवन ( गुजराती ) | ... |
| ९ पांचमा पुत्र ने बापूना आशीर्वाद | बापूना आशी. |
| १० गांधीजीनी साधना ( लेखक-रावजीभाई मणीभाई पटेल ) | ... |
| ११ बापू की छाया में ( लेखक—बलवंतसिंह ) | बापू. छाया. |
| १२ हिन्द स्वराज ( गुजराती ) | ... |
| १३ यरवडाना अनुभव | यरवडा. |
| १४ रचनात्मक कार्यक्रम ( गुजराती ) | रचना. कार्य. |
| १५ बिहारनी कोमी आगमां ( लेखिका—मनुबहेन गांधी ) | बिहार. आग. |

१६ बा बापू नी शीळी छायामां (लेखिका–मनुबहेन गांधी — बा बापू.

१७ Seven Months with Mahatma Gandhi ( By Krishnadas ) — Seven Months

१८ Gleanings ( By Mirabehn ) — ... ...

१९ Selections from Gandhi ( By N.K. Bose ) — Selections

२० Last Phase Vol. I and II ( By Pyarelal ) — ... ...

२१ Satyagraha ( Ed. by Bharatan Kumarappa ) — ... ...

२२ A Pilgrimage for Peace ( by Pyarelal ) — Pilgrimage

२३ The Nation's Voice ( by Mahadeo Desai ) — ... ...

२४ Harijan Weekly Vol. III, IV, V, VI, VII, VIII, IX, X, XI — Harijan

२५ Non-Violence in Peace and War, Vol. II — Non-Violence

२६ Delhi Diary — ... ...

## इतर संस्थांचीं प्रकाशनें

२७ दिल्ली डायरी ( मराठी ) सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें २ — ... ...

२८ गांधीजीनुं गीताशिक्षण ... ... — गीताशिक्षण

## व्होरा आणि कंपनीकडून प्रकाशित

( ३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई २ )

२९ Gandhi's View of Life ( by Chandrashankar Shukla ) — Gandhi View

३० Incidents of Gandhi's Life Incidents
( by Chandrashankar Shukla )

३१ Conversations with Gandhiji Conversations
( by Chandrashankar Shukla )

## इतर प्रकाशनें

३२ A Congress Brochure Con. Br
No 1–Satyagraha ( All India
Congress Committee Publication )

३३ Speeches and Writings of Mahatma Speeches
Gandhi ( Published by–S. Natesan
& Co., Madras )

३४ — do — Edition 1933

३५ My days with Gandhi My days
( by N. K. Bose,
Sale Agents–Indian Associated
Publishing Co. Ltd, 8c, Ramanath
Majumdar Street, Calcutta 9 )

३६ Studies in Gandhism Studies
( by N. K. Bose, Pub.–Narendranath
Chatterjee, 19 Hari Ghosh Street,
Calcutta )

३७ Mahatma Vol. 3, 4, 5, ...
( by D. G. Tendulkar,
Distributors–The Times of India Press
Fort, Bombay 1 )

३८ Young India, Weekly ...

* * *

# संदर्भ-ग्रंथ-सूचि

[ ' ग्रंथाचा पृष्ठांक ' याखालीं जेथें मध्यें स्तंभ घालून दोन आंकडे दिले आहेत तेथें पहिला आंकडा पृष्ठाचा व दुसरा परिच्छेदाचा समजावा. उदा० २३/८३. ]

| पृष्ठांक | परिच्छेदांक | संदर्भ ग्रंथ ( संक्षिप्त नांव ) | संदर्भ ग्रंथ पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ... | गांधीजींची विज्ञापना | धर्ममंथन | ५,६ |

## सत्याग्रहाचें शास्त्र

| पृष्ठांक | परिच्छेदांक | संदर्भ ग्रंथ | संदर्भ ग्रंथ पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | १ | Selections- Introduction. | iii |
| | २ | ,, ,, | vii/v |
| | ३ | ,, ,, | viii/viii |
| | ४ | ,, ,, | ix/ix |
| | ५ | Selections | २३/८३ |

## प्रकरण १ लें-सत्य हेंच जीवनाचें साध्य

| पृष्ठांक | परिच्छेदांक | संदर्भ ग्रंथ | संदर्भ ग्रंथ पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १ | १ | द. आ. सत्या. इति. | २९७ |
| १ | २ | गीताशिक्षण | ५६,५७ |
| १ | ३ | आत्मकथा (प्रस्तावना) | ५,६ |
| २ | ४ | सत्य ईश्वर | ३ |
| २ | ५ | ,, ,, | ४ |
| २ | ६ | Seven Months | ११२,११३ |
| ३ | ७ | महा. डायरी पु. १ | ३२२ |
| ३ | ८ | ,, ,, ,, २ | ३६१ |
| ३ | ९ | Gleanings | १९ |
| ४ | १० | गीताशिक्षण | ३४६ |
| ४ | ११ | द. आ. सत्या. इति. | ७७ |

### प्रकरण २ रें-सत्य हाच परमेश्वर

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | १ | महा. डायरी पु. १ | २१५ |
| ५ | २ | ,, ,, ,, २ | २८४ |
| ५ | ३ | ,, ,, ,, १ | १०६ व १०७ |
| ६ | ४ | आश्रम. इति. | ३० |
| ७ | ५ | Selections | ३१५ |

### प्रकरण ३ रें-सत्यमय जीवन

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | १ | मंगळप्रभात | २ व ३ |
| १२ | २ | Last Phase I | ४२३ |
| १२ | | महा. डायरी पु. १ | ३१२ |
| १२ | ४ | मंगळप्रभात | ४४ |
| १२ | ५ | आश्रमजीवन | ८४ ते ८६ |
| १३ | ६ | महा. डायरी पु. १ | ३२३ |
| १४ | ७ | मंगळप्रभात | ७ |
| १४ | ८ | Gandhi view | १० |
| १४ | ९ | Selections | १९।६९ |
| ४ | १० | आत्मकथा | ५९ |
| १५ | ११ | Gleanings | १८ |
| १५ | १२ | सत्य ईश्वर | ९० |

### प्रकरण ४ थें-सत्याचा आग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | १ | मंगळप्रभात | २९ |
| ६ | २ | दिल्ली डायरी ( मराठी ) | ५८ |
| १६ | ३ | महा. डायरी पु. १ | २३२ |
| १६ | ४ | ,, ,, पु. १ (आवृत्ति १९३२) | ३४६ |
| १६ | ५ | Satyagraha | ३५२ |
| १७ | ६ | Pilgrimage | ९० |

## प्रकरण ५ वें–सत्याचा आविष्कार अहिंसा

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | १ | आत्मकथा | ४५३, ४५४ |
| १९ | २ | मंगळप्रभात | ४ ते ७ |
| २० | ३ | Gleanings | २४ |
| २१ | ४ | बापूना आशी० | ९, १० |
| २२ | ५ | Gleanings | १९ |
| २३ | ६ | Pilgrimage | ८८ |
| २३ | ७ | " | ७५-७६ |
| २४ | ८ | " | १२४ |
| २५ | ९ | The Nation's voice | १४८ |
| २७ | १० | Harijan IV, 26-9-1936 | २६० |
| २८ | ११ | Young India, 29-9-1927 | ... |
| २८ | १२ | " " , 10-5-1919 | ... |
| २८ | १३ | Selections | १७।५५ |
| २८ | १४ | " | १७।५७ |
| २८ | १५ | " | १७।५९ |
| २८ | १६ | " | २०।७१ |
| २८ | १७ | " | २०।७२ |
| २९ | १८ | " | ३१।१२९ |
| २९ | १९ | Mahatma Vol. 5 | १४ |
| २९ | २० | " " | २१२ |
| २९ | २१ | गांधीजीनी साधना | १८५, १८६ |
| ३१ | २२ | मंगळप्रभात | २१ ते २३ |
| ३२ | २३ | बापू० छाया० | १३२ |
| ३३ | २४ | Harijan V, 2-4-1938 | ६५ |
| ३४ | २५ | Selections | १६१।४६९ |
| ३४ | २६ | Con. Bro. | ४३।१५ |
| ३५ | २७ | " " | ४४-४५।१७-१८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | २८ | Last Phase I | ३४९ |
| ३६ | २९ | Mahatma Vol. 4 | ५९, ६०, ६१ |
| ३७ | ३० | Harijan VII, 21-10-1939 | ३१० |
| ३७ | ३१ | ,, X, 12-9-1946 | ३१२ |
| ३८ | ३२ | Selections | १६०।४६५ |
| ३८ | ३३ | Speeches | ४२० |
| ३९ | ३४ | ,, | ७९० |
| ३९ | ३५ | Harijan V, 20-3-1937 | ४२ |
| ४० | ३६ | ,, III, 22-6-1935 | १४८ |
| ४० | ३७ | Young India 20-9-1928 | ... |
| ४१ | ३८ | Mahatma Vol. 5 | १७ |
| ४१ | ३९ | ,, ,, | १७ |
| ४१ | ४० | Young India 4-10-1928 | ... |
| ४२ | ४१ | Selections | ३१।१२४ |
| ४२ | ४२ | ,, | ३१।१२६ |
| ४२ | ४३ | ,, | ३१।१२७ |
| ४२ | ४४ | Harijan VIII, 9-3-1940 | ३१ |
| ४३ | ४५ | Harijan VII, 21-10-1939 | ३०९ |
| ४३ | ४६ | Selections | ३१।१२५ |
| ४४ | ४७ | Harijan V 8-5-1937 | ९८ |
| ४४ | ४८ | Last Phese II | ३२५ |
| ४४ | ४९ | Harijan VIII 2-3-1940 | २३ |
| ४४ | ५० | Selections | २४।८५ |
| ४४ | ५१ | Young India 13-9-1928 | ... |

## प्रकरण ६ वें–साध्य-साधन विचार

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | १ | हिन्द स्वराज | ६८ ते ७३ |
| ४७ | २ | Selections | ३६।१४८ |
| ४७ | ३ | ,, | ३६।१५२ |

## प्रकरण ७ वें–सत्याग्रहाचें शस्त्र व शास्त्र

| | | | |
|---|---|---|---|
| ४८ | १ | आश्रम० इति. | ८८ |
| ४८ | २ | Speeches | २२० |
| ४८ | ३ | Con. Bro. | ९।७ |
| ४९ | ४ | Speeches | १६५ |
| ४९ | ५ | ,, | १६६ |
| ४९ | ६ | Harijan VII 27-5-1939 | १३८ |
| ४९ | ७ | Speeches | १६६ |
| ४९ | ८ | यरवडा | २४,२५ |
| ५० | ९ | My days | १६५ |
| ५० | १० | Pilgrimage | ८९ |
| ५० | ११ | Young India 11-8-1920 | ... |
| ५० | १२ | हिन्द स्वराज | ७८ |
| ५१ | १३ | यरवडा | ७ |
| ५१ | १४ | हिन्द स्वराज | ७७ |
| ५१ | १५ | ... | ... |
| ५३ | १६ | Speeches | ४६७ |
| ५४ | १७ | ,, | ४१७ |
| ५४ | १८ | Incidents | २८२ |
| ५४ | १९ | आत्मकथा | ३४२ |
| ५४ | २० | Selections | २३६।६१७ |
| ५४ | २१ | द. आ. सत्या. इति. | २२३ |
| ५५ | २२ | ,, ,, | २८५ |
| ५६ | २३ | Satyagraha | ३०८, ३०९ |
| ५६ | २४ | Selections | २३७।६२० |
| ५७ | २५ | ,, | २३७।६२१ |
| ५७ | २६ | Pilgrimage | १२०, १२१ |
| ५७ | २७ | Harijan XI, 17-2-1947 | ... |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७ | २८ | Selections | २३१।५८८ |
| ५८ | २९ | Satyagraha | १७८ |
| ५८ | ३० | Harijan VI, 10-12-1938 | ३६९ |
| ५८ | ३१ | Selections | २४०।६३२ |
| ५९ | ३२ | Satyagraha | २९, ३०, ३१ |
| ६१ | ३३ | Selections | २२०।५५२ |
| ६१ | ३४ | ,, | २३३।६०१ |
| ६१ | ३५ | Speeches | २०० |
| ६२ | ३६ | Selections | २१८,२१९।५५१ |
| ६४ | ३७ | Harijan XI, 6-7-1947 | २१७ |
| ६५ | ३८ | Selections | २२८।५८२ |
| ६६ | ३९ | Mahatma Vol. 5 | ४२७ |
| ६६ | ४० | Satyagraha | ३७६ |

**प्रकरण ८ वें—निःशस्त्र प्रतिकार आणि सत्याग्रह**

| | | | |
|---|---|---|---|
| ६८ | १ | द. आ. सत्या. इति. | ११५ ते १२१ (कांहीं भाग गाळून) |
| ७३ | २ | Harijan XI 13-7-1947 | २३६ |
| ७३ | ३ | ,, XI 20-7-1947 | २४३ |
| ७३ | ४ | ,, XI 27-7-1947 | २५९ |
| ७३ | ५ | ,, XI 20-7-1947 | २४२ |
| ७४ | ६ | Last Phase II | ४६२, ४६३ |

**प्रकरण ९ वें—सत्याग्रहाकरितां पात्रता व पथ्यें**

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | १ | गांधीजीनी साधना | ३३६ ते ३३८ |
| ७९ | २ | Satyagraha | ७७ |
| ८० | ३ | Mahatma Vol. 5 | ३७६ |
| ८० | ४ | Satyagraha | ८७, ८८ |
| ८१ | ५ | ,, | ७९ ते ८१ |
| ८३ | ६ | ... ... | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८३ | ७ | Pilgrimage | ७४ |
| ८३ | ८ | Mahatma Vol. 5 | २९६ |
| ८३ | ९ | Harijan VIII, 21-7-1940 | २१५ |
| ८४ | १० | ,, ,, ,, | २१५ |
| ८४ | ११ | Satyagraha | ८४ |
| ८५ | १२ | Young India 25-5-1921 | |
| ८५ | १३ | Selections | २२७।५७९ |
| ८५ | १४ | ,, | २२८।५८० |
| ८५ | १५ | ,, | २२८।५८१ |
| ८६ | १६ | ,, | २२१।५६३ |
| ८६ | १७ | Satyagraha | ५६ |
| ८७ | १८ | ,, | २८९, २९० |
| ८७ | १९ | Satyagraha | ९४,९५ |
| ८८ | २० | ,, | ३६४ |
| ८९ | २१ | ,, | ९५ |
| ९० | २२ | ,, | ९७ |
| ९१ | २३ | Harijan IV 21-11-1936 | ३२१, ३२२ |
| ९१ | २४ | Satyagraha | ३७० |
| ९२ | २५ | Mahatma Vol. 3 | ३७९ |
| ९२ | २६ | Satyagraha | ३७९ |
| ९३ | २७ | ,, | ७३ |
| ९३ | २८ | Con. Bro. | ९० |

## प्रकरण १० वें-सत्याग्रहांत उपवासाचें स्थान

| | | | |
|---|---|---|---|
| ९४ | १ | Satyagraha | ३१३, ३१४ |
| ९४ | २ | ,, | ३२१, ३२२ |
| ९५ | ३ | ,, | ३२३ |
| ९६ | ४ | Harijan XI 21-12-1947 | ... |
| ९६ | ५ | ,, IX 26-7-1942 | २४८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९७ | ६ | Satyagraha | १८२ |

## प्रकरण ११ वें-राजकारणांत सत्याग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| ९८ | १ | Satyagraha | ३५ |
| ९८ | २ | Harijan X 24-2-1946 | १८ |
| ९९ | ३ | Selections | २२६।५७७ |
| ९९ | ४ | Satyagraha | ११० ते ११२ |
| १०१ | ५ | Speeches | १९९ |
| १०१ | ६ | ,, | ७०९ |
| १०१ | ७ | Con. Bro. | १४।१७ |
| १०१ | ८ | Satyagraha | ३२ |
| १०२ | ९ | ,, | ४ |
| १०२ | १० | Con. Bro. | १६।३ |
| १०२ | ११ | Satyagraha | १५९ |
| १०२ | १२ | Con. Bro. | १५ |
| १०३ | १३ | Mahatma Vol. 5 | ४२० |
| १०३ | १४ | Con. Bro. | २२।१२ |
| १०३ | १५ | ,, ,, | २०।१० |
| १०३ | १६ | Selections | २२४।६५६ |
| १०४ | १७ | Con. Bro. | २३।१५ |
| १०४ | १८ | Satyagraha | १६७ |
| १०४ | १९ | Con. Bro. | ११।७ |
| १०४ | २० | ,, ,, | ३२।२८ |
| १०५ | २१ | ,, ,, | २१।११ |
| १०५ | २२ | Selections | १६४।४८२ |
| १०५ | २३ | Con. Bro. | २५।१८ |
| १०५ | २४ | Harijan VIII 18-5-1940 | १३३ |
| १०६ | २५ | Young India 23-6-1920 | ... |
| १०७ | २६ | Con. Bro. | ८६, ८७।७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०७ | २७ | Satyagraha | ३७१ |
| १०८ | २८ | Con. Bro. | २८।२२ |
| १०९ | २९ | Satyagraha | ६, ७ |
| १०९ | ३० | ,, | ७५ |
| ११० | ३१ | Satyagraha | ४ |
| ११० | ३२ | ,, | ३ |
| १११ | ३३ | ,, | ३०७ |
| १११ | ३४ | Con. Bro. | ४८।२४,२५,२६ |
| ११२ | ३५ | ,, ,, | ४९।२८ |
| ११२ | ३६ | ,, ,, | ६६।१४,१५,१६ |
| ११३ | ३७ | ,, ,, | ६७।१७ |
| ११४ | ३८ | ,, ,, | ६७।१८ |
| ११४ | ३९ | Satyagraha | १७५ |
| ११५ | ४० | ,, | ३०६ |
| ११५ | ४१ | ,, | १७१,१७२,१७३ |
| ११७ | ४२ | Speeches | ४७४ |
| ११८ | ४३ | Selections | २२९।५८५ |
| ११८ | ४४ | Satyagraha | २७५ |
| ११९ | ४५ | Con. Bro. | ६९।२१ |
| ११९ | ४६ | Studies | १३ |
| ११९ | ४७ | Young India 2-1-1930 | ... |
| १२० | ४८ | Mahatma Vol. 3 | ३७७ |
| १२० | ४९ | Satyagraha | ३०७ |
| १२० | ५० | Harijan VII 25-3-1939 | ६४ |
| १२१ | ५१ | ,, VII 8-4-1939 | ८० |
| १२२ | ५२ | Conversations | ११९ |
| १२३ | ५३ | रचनात्मक कार्यक्रम | ४१, ४२ |
| १२४ | ५४ | ,, ,, | ६, ७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२५ | ५५ | Con. Bro. | ९१ |
| १२५ | ५६ | Young India 9-1-1930 | ... |
| १२६ | ५७ | Pilgrimage | १२६ |
| १२६ | ५८ | Harijan 21-7-1940 | ... |
| १२६ | ५९ | Satyagraha | १४१ |
| १२७ | ६० | Con. Bro. | ८०।२९ |
| १२७ | ६१ | Satyagraha | १४०,१४१ |
| १२८ | ६२ | Selections | ११४।३३४ |
| १२८ | ६३ | ,, | ११४।३३६ |
| १२९ | ६४ | Satyagraha | ३३।२४ |
| १२९ | ६५ | ,, | १७७ |
| १२९ | ६६ | Last Phase II | ६३१ |
| १३० | ६७ | महा. डायरी पु. ३ | ३४२,३४३ |
| १३१ | ६८ | Harijan X 17·2-1946 | १४ |
| १३२ | ६९ | ,, XI 25-5-1947 | १६६ |
| १३२ | ७० | ,, X 7-9-1946 | ३१६ |
| १३३ | ७१ | My days | ७५ |
| १३३ | ७२ | Selections | २२५।५७४ |
| १३३ | ७३ | Harijan XI 1-6-1947 | १७२ |
| १३३ | ७४ | Delhi Diary | ३१४,३१५ |
| १३४ | ७५ | Last Phase I | ४०१ |
| १३५ | ७६ | My days | २७०,२७१ |

**प्रकरण १२ वें–देशरक्षणाच्या कामीं सत्याग्रह**

| | | | |
|---|---|---|---|
| १३६ | १ | Satyagraha | ३८५ ते ३८७ |
| १३८ | २ | Selections | १८६।५१५ |
| १४० | ३ | Conversations | ३४, ३५ |
| १४१ | ४ | Selections | २०७।५२६ |
| १४२ | ५ | ,, | १८९।५१९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४३ | ६ | Satyagraha | ३६२, ३६३ |
| १४५ | ७ | Selections | १८४/५१२ |
| १४५ | ८ | ,, | १७०/४९८ |
| १४६ | ९ | ,, | १७१/४९९ |
| १४७ | १० | Con. Bro. | २१४ |
| १४८ | ११ | Harijan VI 24-12-1938 | ३९५ |
| १४९ | १२ | ,, VI 15-10-1938 | २९० |
| १४९ | १३ | ,, VI 24-12-1938 | ३९४ |
| १५० | १४ | ,, VIII 18- 8-1940 | २५३, २५४ |
| १५१ | १५ | ,, VI 10-12-1938 | ३७२ |
| १५२ | १६ | Last Phase II | Appendix A |

## प्रकरण १३ वें—युद्धार्थी असहकार

| | | | |
|---|---|---|---|
| १५५ | १ | Satyagraha | ३५९, ३६० |
| १५७ | २ | ,, | ३६१ |

## प्रकरण १४ वें—वांशिक भेदभाव व सत्याग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १५८ | १ | Satyagraha | ३४८ |
| १५९ | २ | Non-Violence Vol. II | २५ |
| १५९ | ३ | ,, ,, | २६ |
| १६० | ४ | Harijan IV 10-12-1936 | ३९ |

## प्रकरण १५ वें—सामाजिक सत्याग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १६२ | १ | Speeches | ४२१ |
| १६२ | २ | Satyagraha | १९६ |
| १६२ | ३ | ,, | ३८२ |
| १६३ | ४ | My days | ९८ |
| १६४ | ५ | ,, ,, | २८१ |
| १६४ | ६ | Pilgrimage | ७५ ते ७७ |
| १६४ | ७ | My days | १६७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६५ | ८ | Satyagraha | ३५०, ३५१ |
| १६६ | ९ | ,, | २८ |
| १६८ | १० | Con. Bro. | ९४।२४ |
| १६८ | ११ | Satyagraha | १९१ |
| १६९ | १२ | ,, | २०३ |
| १७० | १३ | महा. डायरी पु. २ | १०० |
| १७० | १४ | Satyagraha | २०१ |
| १७२ | १५ | रचना. कार्य. | ३२, ३३ |
| १७३ | १६ | बिहार. आग. | ३३६ |
| १७४ | १७ | Satyagraha | ३३० |
| १७५ | १८ | ,, | ३३६ |
| १७७ | १९ | Mahatma Vol. 4 | ३२७, ३२८ |
| १७७ | २० | Satyagraha | ३४० |
| १७७ | २१ | ,, | ३४५ |
| १७९ | २२ | ,, | १४७ |
| १८० | २३ | Con. Bro. | २९।२३ |
| १८१ | २४ | ,, ,, | ३१।२६ |

## प्रकरण १६ वें—प्रार्थना

| | | | |
|---|---|---|---|
| १८२ | १ | Non-violence Vol. II | ७७ |

## परिशिष्ट १

| | | | |
|---|---|---|---|
| १८५ | १ | Speeches | ४०४ ते ४०६ |
| १८६ | २ | महा. डायरी पु. ४ | ८६ |
| १८७ | ३ | ,, ,, ,, | १२८, १२९ |
| १८७ | ४ | ,, ,, ,, | १३५, १३६ |
| १८८ | ५ | ,, ,, ,, | १३९ |
| १८९ | ६ | ,, ,, ,, | १४१, १४२ |
| १८९ | ७ | ,, ,, ,, | १४२ ते १४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९३ | ८ | महा. डायरी पु. ४ | १५३, १५४ |
| १९५ | ९ | ,, ,, ,, | १६० |
| १९५ | १० | ,, ,, ,, | १६१ |
| १९६ | ११ | ,, ,, ,, | १६६ |
| १९७ | १२ | ,, ,, ,, | १७१ |

## परिशिष्ट २

| | | | |
|---|---|---|---|
| १९९ | १३ | Selections | १७२,१७३,१७४ |
| २०० | १४ | ,, | १७५ |
| २०१ | १५ | ,, | १७६, १७७ |
| २०२ | १६ | दिल्ली डायरी | ३९ |
| २०२ | १७ | Gandhi View | ६९ |

## परिशिष्ट ३

| | | | |
|---|---|---|---|
| २०४ | १८ | Last Phase II | ५२३, ५२४ |

## परिशिष्ट ४

| | | | |
|---|---|---|---|
| २०७ | १९ | बा बापू. | २३५ ते २३७ |

* * *

# विषय-सूची

[ प्रत्येक नांवाच्या पुढचे आंकडे पृष्ठांचे आहेत ]


## अ

अकरा मुद्दे–१३०.
अंतर–आदेश(आंतला आवाज)–बावीस, १.
अपरिग्रह–१०, ३०.
अप्रतिकार–५०.
अबिसिनिआ–१४७.
अभय–३१.
अभ्यास–११.
अर्थशास्त्र–५२.
ॲलोपथी–११९.
असत् ( असत्य, खोटें )–१, ३, ४, ९, १०, ११, १२, १६, ६४, ७९, ८३, ८५, १५७.
अ-सत्याग्रह–९३.
असहकारिता–६५, १०१, १०२, ते१०८, १२५, १३९, १५३, १५६, १६५, १७९.
—व्यक्तिगत–१०७.
—विध्वंसात्मक ( नासधूस )–९२, १०७.
अस्तेय–३०.
अस्पृश्यतानिवारण–१७१.
अहिंसा ( व्रत-सिद्धान्त )– एकवीस, ३, ८, ९, १०, १६ ते २६, २८, २९, ३३ ते ३७, ३९ ते ४४, ५०, ५३, ५६, ५९, ६१, ७३ ते ७५, ८४, ९२, ९३, १०५, १०८, १२६, १३०, १३१, १३७, १४२, १४३, १४५, १४६, १४८, १५२, १६५, १७३, १८२, १८६, १८७, १९०, १९१, १९२, १९४ ते १९७, १९९ ते २०१, २०६, २०८.
—अहिंसाशास्त्र–एकवीस, १४७.
—अहिंसाभक्त–४१, १९३.
—दुर्बलांची अहिंसा–११८, १८२, १९१.
—अहिंसक क्रांति (–बंड )–१३१.

## आ

आत्मा–१०७, १५०.
—आत्मदर्शन–१, ३१.
—आत्मबळ–३९, ४३, ४८, ५०, ६२, ९१, ९८, १०७, १५८, १८६.
—आत्मशुद्धि–३७, ७९.
—आत्मक्लेश–२८, ४९, ६१, ६४, ८६, १०१, १०४, १०७, १११, १४३, १५८,

१६०, १६९, १७२.
—आत्मक्लेश-सामुदायिक–११९.
आध्यात्मिक–अठरा.
आश्रम–४८, १९४.

इ

इटाली–१४७.
इतिहास–५१.
इस्लाम–७, ९.

उ

उपवास–९४ ते ९७, १७२.
—उपवासाचें शास्त्र–९४.
—राजकोटचा उपवास–९४, ९५.

ऋ

ऋषी–१९६.

औ

औंध संस्थान–१३४.

क

करबंदी–१२६ ते १२८, १५६.
करिअप्पा ( जनरल )– २०४ ते २०६.
कर्तव्यपूर्ति–६४, ६५.
कामविकार–९१.
कायदा–१६४.
—हत्यारांचा–२००.
कायदेभंग–१, १५९.
—सविनय कायदेभंग–१०१, १०९ ते ११५, १२३, १२४, १२६.
—विध्वंसक–१०७, १६०.
—सामुदायिक सविनय कायदेभंग–११५ ते १२०.
कायदेमंडळ ( कौन्सिल )–१३१.
कॉंग्रेस–१३१, १३२, १५३.
काश्मीर–१४१, २०६.
कूळ–१६३.

ग

गांधी तत्त्वज्ञान–एकवीस.
गीता–वीस, १३, १४२.
गुंड–१५९, १६४, २०७.
—गुंडगिरी–१६४.
गुन्हेगारी–१६५.
—गुन्हेगार–१६६, १६७.
गुप्तता–१५, ९२.
गुलामगिरी–९८, १७९.

च

चंपारण्य–१७३, १९१.
चरखा–१२५.

ज

जपानी–१४५, १५२ ते १५४.
जमीनदार–१६३.
जरठ-कुमारी-विवाह–१७८.
जर्मन–१४०, १४१, १४८, १५८, १९३.
जेहोवा–१५८, १५९.
जैन–८९, १९०.
ज्यू–१५८, १५९.

झ

झुलू–३५, ३९.
झेक लोक–१४८.

त

तपश्चर्या–११.
तुरुंग ( बंदीखाना )–१६८.
तुळसीदास–१९०

थ

थर्मापिली–१४१, १४६.
थोरो–१०४.

द

दडपशाही–१२१.
दरोडेखोर (चोर, लुटारु)–१६५, १६८, १९४.
दहशतवाद–९३, १४९, १५०.
दक्षिण आफ्रिका-६०, ६१, ७०, ९३, ९९, १५९, २०३.
—हिंदी लोक–१५९, १६०.
द्वेष–२८, ३४, १६५.

ध

धनसंग्रह–१६३.
धर्म–अठरा, ४, १८, ३०, ४४, ७८, ८४, १२५, १८६,
—धर्मयुद्ध–५८.

न

नम्रता–१९, २१, ८५, ८७, १०७, १७२,
नागरिक–१९९, २०१,
नास्तिक–८,
नियमितपणा–८३.
निरोधन–१७४ ते १७७.
नीग्रो–१५९, १६०.

प

पंचव्रत–९, १०.
पंचायतराज्य–१३४.
परमेश्वर ( ईश्वर )–१ ते ३, ५ ते ८, १६, १७, २०, २२, २३, २७, ३२, ३३, ३६, ४०, ४८, ५०, ५८, ५९, ६५, ७३, ८१, ८३, ८७, ८८, ८९, ९१, १५९, १६८, १७०, १७२, १८३, २०२.
पॅसिव्ह रिझिस्टन्स–६८ ते ७३, ९९, १९१.
पाकिस्तान–२०२.
पार्लमेंट–१२८.
—पार्लमेंटरी राज्यपद्धति–१८९.
पोलिसबळ–१५१.
—पोलिसांना वर्दी–१६७.
प्रतिकार ( निःशस्त्र )–७३, ७४, ८९.
—अहिंसक ( सविनय ) प्रतिकार–१०१, १२२, १२५, १३७, १५४, १५८, १५९, १६३, १६५.
—हिंसक–१४९.
—युद्धाचा–१५७.

प्रार्थना–एकवीस, ९१, ९६, १८३.
प्रेम–८, ९, १८, २५ ते २८, ४० ते ४२, ५१, ५४, ६४, ७९, ८०, १०४, १०५, १६५, १८६, १९५, २०८.
—प्रेमबळ–४८.
प्लासी–१९६.

ब

बहिष्कार–१७८ ते १८१.
—हिंसक–१८०.
बुद्ध–१००.
बुराई–४९.
बोल्शेव्हिजम् ( कम्युनिझम्, साम्यवाद )–५३.
—साम्यवादी–८८.
बौद्ध–८९, १९०.
ब्रॅड्लॉ ( चार्ल्स )–८.
ब्रह्मचर्य–९, ८९, ९०.
—ब्रह्मचारी–१६९.
ब्रिटिश ( इंग्रज ) सत्ता–७४, ७५, १३४, १४५, १४७, १४८, १५०, १५२, १५३, १५४, १५६, १८५, १९९, २००.

भ

भक्त व अभक्त–१३.
भलाई–४९.
भांडवलदार ( जमिनदार इ. )–६४.
भ्याडपणा–२४, ३५, ३८, १५७, १६५.

म

मनुस्मृति–१९०.
मंदिरप्रवेश–१७०, १७२.
मरण–१९६.
महात्मा–१.
माणुसकी–२०३.
मालक-मजूर-संबंध–१७४.
मुसलमान–१९०, १९६.
मोक्ष ( मुक्ति )–अठरा, १, १९५, १९९.
मौन–१४, १५, ३१.

य

यंग इंडिया–एकवीस.
यमनियम–१०.
युद्ध–३५, ४४, १९३, १९५, २०२.
—युद्धाचें ( लष्करी ) शिक्षण–३८, १८५, १८८.
—युद्धकला–१९८.
येशू ख्रिस्त–२८, ७२, १००, १५९, १९५.

र

राजकारण–१, ३५, ९८.
राज्यकर्ता–६४.
रामदास-तुकाराम–१९७.

ल

लढाई–१८६.
लष्करभरती–१५५, १८७,

१८९, १९३, १९५, १९७, १९९.
लष्करी मनोवृत्ति–१५६.
लुटारूपणा–१५१.
लोकमत–१६९, १७८.
लोकशाही–१२८ ते १३५, १७९, २०५.
—लोकसत्ताक देश–२०५.
—लोकशाहींतील सैनिक–२०५, २०६.

व

' वाद '–१७४.
विधायक कार्य–१२०, १२२ ते १२६.
विनयभंग–२०७, २०८.
विरोधक–८४, ८५, ८६, १७०, १७२, १७९.
विष्णुसहस्रनाम–७.
विज्ञान ( शास्त्र )–२७.
वीर्यसंग्रह–८९, ९०
वैरभाव–८५.
वैराग्य–११.

श

शंकराचार्य–१९०.
शरीरबळ ( पशुबळ, शस्त्रबळ )–३९, ४२, ४३, ५१, ७१, ७६, ७७, ७८, १३९, १८६, १९५, १९६.
शस्त्र ( लढण्याची ) विद्या–१८८, १९२, २०१.
शास्त्रज्ञ ( वैज्ञानिक )–८, २६.
शिक्षण–६३, ६४.
शिक्षा–१६८.
शेतकरी संघटना–१७२, १७३.
श्लेशिन–२०८.

स

सत्ता–७७, ८५, १२८ ते १३२.
सत्य (सत्, खरें)–अठरा, एकोणीस, वीस, १, २, ३, ५ ते ९, ११ ते १६, १८ ते २२, २६, २७, ३०, ३१, ३६, ४४, ५१, ५३, ५९, ६०, ६४, ७६, ७९ ते ८१, ८५, ८७.
—सत्यमय ( खरेपणाचें ) जीवन–एकवीस, ११, १२.
—सत्याचा शोध–१
सत्याग्रह–III, १, १७, २८, २९, ४८, ५० ते ५५, ५७, ५८, ६०, ६१, ६५, ६६, ६८, ७०, ७६ ते ८१, ८३, ८६, ८७, ८९, ९२, ९४, ९५, १०१, १२५, १३०, १३१, १४३, १४४, १६०, १६२, १७१.
—धार्मिक सत्याग्रह–१६८, १६९, १७०.

—राजकीय सत्याग्रह–९८, ९९. १०१, १०२, १०४, १०५, १०६, १०८, १०९, ११२, ११३, ११४, ११८, १२१, १२३, १२४, १२८, १२९, १३०, १३१, १३२, १३५.
—सामाजिक सत्याग्रह–१६२.
—शास्त्र–III.
—सत्याग्रह सिद्धान्त–५९.
—सत्याग्रही–५४, ५७, ५८, ६०, ६२, ६३, ६५, ६६, ६७, ७०, ७१, ७२, ७७, ७८, ८० ते ८४, ८७ ते ८९, १०१, १५१, १६६.
—सत्याग्रह्याची भूमिका–१६७
—सत्याग्रहाचा सेनापति (पुढारी)– ९०, १४४, १६९.
—सत्याग्रहाचें क्षिक्षण– १२२, १२४, १३८
—सत्याग्रह-दल–१३१.
सनातनी–१७१.
संप–१०८, १७३.
संपत्ति ( पैसा )–७७.
संरक्षण–१९५.
समाजवादी–८८.
सहपोषण ( Simbiosis )–१००.
साधन–२०, ४५, ४७.
—साध्य-साधन–४५
साक्षात्कार ( दर्शन )-अठरा, १, २, ६, १४, १८, १९, ३०.
सुभाषबाबू–१४१.
सेवाग्राम–६७.
सौंदर्य–१५.
स्वतंत्रता–१३२.
स्वराज्य–६२, १२६, १२८, १८५, १८८, २००.
स्वाभिमान–४८.
स्वामित्व ( मालकी )–४२.
स्वामीनारायण-वल्लभाचार्य–१९६, १९७.
स्वित्झर्लंड–१४५.

ह

हक्क–६४, ६५.
हरताळ–१७३.
हरिजन–१७०.
हिटलर–१४८ ते १५०, १५२, १५९.
हिंद स्वराज्य–२२.
हिंदु–१९०, १९६, २०१.
हिंदु धर्म–१७१
हिंदुस्तान–६७, ७३, ७४, १२०, १२३, १३४ ते १४०, १४२, १४३, १५१, १८५, १८६, १९० ते १९३, १९७, १९८.
हिंसा–१९, २०, २३, २५, २८, ३३, ३५ ते ३७, ३९ ते ४१,

४३, ५०, ५६, ६२, ६४,
८०, ८३, ९२, ९३, १२०,
१२१, १५७, १७१, १८९,
१९४, १९७, २०२.
हृदय (मत) परिवर्तन–१६४.
होमिओपथी–११९.
क्षत्रिय–१९७.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थलप्रत.
अनुक्रम 28909 वि.
क्रमांक 9308 नों. दि.
REFBK-0010864

मूल्य रु. २·५०

## प्रकाशित पुस्तकें

१. जीवन-दर्शन
२. गीता-विचार
३. जीवन-साधना
४. सत्याग्रह-विचार
५. सत्याग्रहाची जन्मकथा
६. स्त्री-जीवन